दिनांक :- ३०/०१/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

30 जानेवारी 2015

# नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने केलवडला भरीव मदत

## प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचा पुढाकार, टँकरसाठीही देणगी



**अस्तगाव (वार्ताहर)**- मुंबई स्थित उद्योगपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने केलवड गावाला दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्यासाठी ५१ हजार रुपयांची देणगी नुकतीच उद्योगश्रीचे समन्वयक प्रा. लक्ष्मण गार्डे यांचे हस्ते सरपंच लक्ष्मण सोनवणे यांना सुपूर्द करण्यात आली. केलवडच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयास प्रत्येकी २१ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेशही श्री. गोर्डे यांचे हस्ते देण्यात आला.

यापूर्वी ही प्राथमिक शाळेला एलईडी तसेच श्री ज्ञानेश्वर विद्यालयास ५१ हजारांची देणगी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी शाळा प्रमुखांकडे दिली आहे. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून त्यांनी केलवड गावाला पिण्याच्या पाण्याच्या टँकरसाठी ५१ हजार रुपये, प्राथमिक शाळेला इंधनविहीरीवर विद्युतपंप बसविण्यासाठी २१ हजार रुपयांचा धनादेश मुख्याध्यापिका श्रीमती रोहिणी घाटे यांचे कडे सुपुर्द केला. तर श्री ज्ञानेश्वर विद्यालयास शालेय पोषण आहारासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास एक चमचा व एक ताट घेण्यासाठी २१ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश स्थानिक शाळा समितीचे अध्यक्ष सुरेशराव गमे यांचेकडे सुपुर्द करण्यात आला.

यावेळी या दोन्ही शाळांच्यावतीने तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचा सत्कार करण्यात आला. नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने या सर्व देणग्यांसह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सर्व शाळा, अंगणवाड्यांमधील मुलांना प्रत्येकास एक बिस्किटचा पुडा खाऊ म्हणुन वाटप करण्यात आला. यात श्री. गोर्डे यांना महत्वाची भूमिका बजावली.

श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या वतीने माजी मुख्याध्यापक व्ही. एस. घोरपडे, प्राथमिक शाळेच्या वतीने केंद्रप्रमुख श्रीमती मंदाकिनी पुजारी, तर ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच लक्ष्मण सोनवणे यांनी श्री. गोर्डे यांचा सत्कार केला. सत्काराला उत्तर देतांना प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, गावाला मदत करण्यात आनंद वाटतो. उद्योगपती नरेशजी राऊत हे दूरदृष्टी असणारे असल्याने त्यांनी केलवडला मदत केली आहे. ज्ञानेश्वर विद्यालयाच्या ५ खोल्यांचा प्रस्ताव सादर करावा, त्याच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करु, असेही ते म्हणाले.

यावेळी कामगार पोलीस पाटील सुभाष पाटील गमे, माजी सरपंच बाबासाहेब गमे, सरपंच लक्ष्मण सोनवणे, उपसरपंच नामदेव घोरपडे, पी. डी. गमे, कामगार तलाठी श्री. कोळगे, गणेश चे संचालक बबनराव बनसोडे, सुरेशराव गमे, आण्णासाहेब वाघे, भिकाजी घोरपडे, मुख्याध्यापिका रोहिणी घाटे, मुख्याध्यापक नानासाहेब राहाणे, भाऊसाहेब गमे, कुंडलिकराव वाघे, माजी मुख्याध्यापक यादवराव हासे, प्रकाश जोशी, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक :- १८/०३/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

18 मार्च 2013

# टँकरचे पाणी पाहून विद्यार्थ्यांचे चेहेरे खुलले!

अस्तगाव (वार्ताहर)- जिरायती गाव...पिण्याच्या पाण्याची तिव्र टंचाई... शाळकरी मुलांनाही पिण्याच्या पाण्याची टंचाई...मात्र मुंबई चे उद्योगपती नरेश राऊत यांनी त्यांच्या नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने शाळेला एक पाण्याचा टँकर दिला! आता तहान भागणार म्हणून मुलांच्या चेहेरे खुलून गेले.

राहाता तालुक्यातील केलवड हे जिरायती गाव आहे. त्या गावात श्री ज्ञानेश्वर विद्यालय केलवड हे विद्यालय, शाळेकडे इंधनविहीर आहे. पण ती ही गुळण्यावर आलेली. विजेचाही खेळखंडोबा आणि त्यातून विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी येत होत्या. अडातच नाही तर पोहऱ्यात येणार कुठून! अशी अवस्था. घरुन आणलेले पाणी तेही बाटलीत, सारखी सारखी तहान लागते त्यामुळे बाटली केंव्हाच रिकामी व्हायची. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी उभ्या राहायच्या. प्रा. लक्ष्मण गोर्डे हे मुंबई च्या उद्योगश्री ची संबंधीत आहेत. उद्योगपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फाऊंडेशनचे ते सचिव



(छाया- अमोल कहांडळ)

आहेत. त्यांच्या मार्फत शाळेने संपर्क साधला. आणि प्रा. गोर्डे यांचे मार्फत शाळेला मदतही मिळवून दिली. प्रा. गोर्डे यांनी ही परिस्थिती उद्योगपती नरेश राऊत यांना सांगितली आणि त्यांना क्षणातच मुलांना पिण्यासाठी पाणी द्या, अशी सूचना गोर्डे यांना केली. गोर्डे यांनी तशी व्यवस्था केली.

पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत असतानाच त्यावर उपाय काढण्यासही तेथील मंडळी तरबेज आहेत. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी या गावाला टंचाई आढावा बैठकीत पाण्याच्या टाक्या देण्यात येतील असे सांगितले होते. ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, व सदस्यांनी ना. विखे पाटील यांनी दिलेली एक हजार लिटरची पाण्याची टाकी शाळेला दिली.

ना. विखे पाटील यांनी दिलेली टाकी शाळेला ग्रामपंचायतीने दिली. या टाकीत पिण्यासाठी पाणी सोडण्यासाठी श्री. गोर्डे यांनी पाहणी करून शाळेसाठी व शाळे शेजारी असणाऱ्या वस्तीसाठी त्यांनी पाण्याचा टँकर दिला. नरेश राऊत फाऊंडेशन च्या वतीने हा टँकर मिळाला. शुक्रवारी दुपारी टँकर आला त्यातून त्या टाकीत पाणी सोडण्यात आले. टँकर आल्याचे पाहून मुलांना आनंद झाला. टँकर पाहून मुलांची तहानच भागली. यावेळी प्रा. लक्ष्मण गोर्डे, भारत राऊत, संजय सोनवणे, नानासाहेब गोर्डे, यांचेसह शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक नानासाहेब राहाणे यांचेसह सर्व शिक्षक उपस्थित होते

cmyk

दिनांक :- ०१/०४/२०१३

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

1 एप्रिल 2013

## उद्योगपती राऊत यांचे दान

# केलवडात भागविते अनेकांची तहान!

**अस्तगाव (वार्ताहर)**- मुंबईस्थित उद्योगपती व नरेश राऊत फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी केलवड सारख्या जिरयती भागातील पिण्याच्या पाण्यासाठी दिलेल्या दानातून अनेकांची तहान भागत आहे.

शिर्डीपासून जवळच असलेल्या राहाता तालुक्यातील केलवड गाव हे दुष्काळी टापूतील गाव आहे. संपूर्ण शेती जिरायती आहे. सातत्याने दुष्काळाचे चटके सहन करत आलेल्या या गावाला उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची कमतरता भेडसावते आहे. यावर्षीही या गावाला पिण्याचे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत आहे. केलवड येथील सुपूत्र प्रा. लक्ष्मण गोर्डे हे मुंबईतील उद्योगपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फाऊंडेशनचे सचिव आहेत. त्यांनी श्री. राऊत यांना दुष्काळाची कल्पना दिली. त्यावर श्री. राऊत यांनी तात्काळ पिण्याच्या पाण्यासाठी टँकर दिला. या टँकरचा सर्व खर्च श्री. राऊत हे करत आहेत. केलवड विद्यालय तसेच विद्यालयाच्या आजूबाजुच्या वस्त्यांवर टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. श्री. राऊत यांचे दानाने केलवडकरांची तहान भागते आहे.

दररोज या टँकरद्वारे केलवड विद्यालयाच्या जवळील वस्त्यांना टँकरने पाणी पुरवठा केला जातो आहे. केलवड येथील रहिवाश्यांना पाण्यासाठी पायपीट करण्यासाठी जवळपास पाण्याचे स्त्रोत नाहीत. श्री. राऊत यांनी दिलेला टँकर राहाता येथून पाणी भरुन आणतो. विंधनविहीरीचे पाणी टँकरमध्ये भरुन ते केलवडला आणून तेथील रहिवाश्यांना पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे रहिवाशियांना मोठा आधार मिळाला आहे. प्रा. लक्ष्मण गोर्डे स्वत: या यंत्रणेवर लक्ष ठेवून आहेत.



दिनांक :- ०३/०४/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत




3 एप्रिल 2013

# केलवडला पाणपोई सुरु

**अस्तगाव (वार्ताहर)-** राहाता तालुक्यातील केलवड येथे मुंबईस्थित उद्योगपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने केलवड येथे पाणपोई सुरु करण्यात आली. केलवडमध्ये तीन ठिकाणी पाणपाई सुरु करण्यात आली आहे.

या पाणपोईचे उद्‌घाटन कामगार तलाठी श्री. कोळगे, सरपंच लक्ष्मण सोनवणे, ग्रामसेवक श्री. गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नरेश राऊत फाऊडेंशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, माजी उपसरपंच बाबासाहेब गमे, अंजाबापू जटाड, पोलीस मित्र संघटनेचे तालुका कार्याध्यक्ष संजय सोनवणे, शाखाध्यक्ष बाबुराव गोर्डे, संपतराव गोर्डे, योगेश गोसावी, नामदेव सोनवणे, लक्ष्मण कांदळकर, सुकदेव लिंबाजी गमे, सुनिल हारकु गमे, श्री. रजपूत, नानासाहेब गोर्डे, भारत राऊत, भाऊसाहेब कोळगे, सोमनाथ घन्सी गमे, किशोर गमे, गलांडे, सचिन वाघे, संदीप गायकवाड, श्री. गमे, श्री. घोरपडे, श्री. वाघे यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते. या पाणपोईसाठी खास टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. हे १० रांजण भरण्यासाठी तसेच त्याची देखभाल करण्यासाठी खास पगारी माणसाची नियुक्ती करण्यात आली आहे. या पाणपोईमुळे ग्रामस्थांची तसेच वाटसरुंची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणार असल्याने श्री. राऊत तसेच श्री. गार्डे यांना केलवड ग्रामस्थांनी धन्यवाद दिले आहेत.

वृत्तमानस

वर्ष:१६, अंक: २५७ ▪ मुंबई, सोमवार, २२ एप्रिल २०१३ ▪ पाने - ८ ▪ किंमत :२ रुपये कार्यकारी संपादक-जी.एम. गोसावी

# दुष्काळग्रस्तांसाठी धावला मराठी उद्योजक

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार : मुंबई येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक व उद्योगश्री पारितोषिक विजेते, गुणवंत नागरिक पुरस्कार विजेते, अभिजित डाय अॅण्ड टूल्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, सोमवंशी क्षत्रिय समाजाचे आधारस्तंभ व आदर्श कवच विधायक सेवा संस्थेचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी नुकतीच मु.पो. केलवड -शिर्डी, जि.अहमदनगर येथे भेट दिली व ७ ते ८ हजार जनता पाण्यावाचून दुष्काळाने होरपळत असताना नरेश फाऊंडेशनतर्फे गावात दररोज टँकरने पाणी पुरवठा केला जातो. येथील विद्यार्थ्यांसाठी १२ नवीन संगणक भेट म्हणून दिले. गणेश विद्या प्रसारक मंडळ, ज्ञानेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद शाळेस प्रयोगशाळा, इमारतीसाठी वगैरे कामास्तव लाखो रुपयांची मदत व देणग्या नरेश राऊत फाऊंडेशनतर्फे कवच उद्योग समूह, संगणक प्रशिक्षण केंद्र, मोफत क्लासेस, कार्यशाळा, गावात सर्वत्र पाणपोईची स्थापना, ग्रामपंचायतींना आर्थिक मदत, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, शेतकरी मेळावे, जनजागृती शिबीर, आदिवासी कल्याण केंद्रे, महिला संस्था, गरीब व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वह्या, पुस्तकांचे वाटप व ज्यांची घरे जळाली त्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांची मदत देण्यात आली. गावातील पोलीस संघटना, ग्रामपंचायत, शाळा, धनगर समाज, साखर कारखाने या संस्थांनी उद्योगपती नरेश राऊत, समाजसेविका मीना राऊत, पत्रकार व समाजसेवक - जगन्नाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर राऊत, महेंद्र सावे, उद्योजक नितीन रांगणेकर, लक्ष्मण गारडेसर या मान्यवरांचा शाल, श्रीफळ, गुच्छ, साईबाबांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. गावात गावकऱ्यांनी मिरवणूक काढून फटाके, डफ, बॅन्डपथक, ढोल-ताशा, धनगर नृत्य व गाणी गावून मानवंदना देण्यात आली. यावेळी शासकीय सेवक वर्ग, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीगणेश साखर कारखान्याचे चेअरमन अॅड. नारायणराव कार्ले-पाटील, पोलीसपाटील सुभाष गमे, सरपंच -लक्ष्मण सोनावणे, समाजसेवक - पुंडलिक गमे, अॅड. अनिल गमे, महेंद्र जेजुरकर, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळे, समाजसेवक यांची यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. उद्योजक नरेश राऊत यांनी दुष्काळाने पिडलेल्यांना सर्वतोपरी मदत, साईबाबांच्या रूपाने वावरून गावाची सतत सेवा केली आहे व करीत आहेत. दुष्काळात होरपळत असलेल्या पीडितांची तन, मन, धन रूपाने मदत करीत आहेत. उद्योगपती -समाजसेवक हे महाराष्ट्राचे नव्हे तर देशाचे भूषण आहेत, असे विचार गावकऱ्यांनी व्यक्त केले आहेत.



पुढारी

मुंबई, सोमवार २२ एप्रिल, २०१३

## दुष्काळ : मराठी उद्योजकाची मदत

**मुंबई :** अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथील केलवड गावातील दुष्काळग्रस्त जनतेच्या मदतीसाठी मराठी उद्योजकाने मदत पुरवली. अभिजित डाय अॅण्ड टूल्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, सोमवंशी क्षत्रिय समाजाचे आधारस्तंभ व आदर्श कवच विधायक सेवा संस्थेचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी वरील गावात जाऊन तेथील ८ हजार दुष्काळग्रस्त जनतेची पिण्याच्या पाण्याची सोय केली.गावात टँकरने दररोज पाणीपुरवठा सुरू केला. तर विद्यार्थ्यांसाठी १२ संगणक भेट दिले. गणेश विद्या प्रसारक मंडळ,ज्ञानेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद शाळेस प्रयोगशाळा,मोफत क्लासेस,कार्यशाळा,गावात सर्वत्र पाणपोईची सोय, शेतकऱ्यांचे मेळावे घेऊन ग्रामपंचायतींना आर्थिक मदत पुरविली; तर गावात जनजागृती शिबिरे राबविली आहेत.

मुंबई, गुरुवार, २५ एप्रिल २०१३ वृत्तमानस



मुंबईचे प्रसिद्ध उद्योजक व उद्योगश्री पारितोषिक विजेते अभिजित डाय अॅन्ड टूर्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक नरेश राऊत यांनी मु. पो. केलवड, शिर्डी, जि. अहमदनगर येथे आठ हजार जनता पाण्यापासून होरपळत असताना गावात सर्वत्र टँकरने मोफत पाणी पुरवून पाणपोई स्थापन केल्या. याप्रसंगी समाजसेविका मीना राऊत, पत्रकार जगन्नाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र सावे, चंद्रशेखर राऊत, गाडेसर व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

दिनांक :- २२/०४/२०१३

वृत्तमानस

दिनांक - 22 एप्रिल 2013

# दुष्काळग्रस्तांसाठी धावला मराठी उद्योजक

वृत्तमानस 22 एप्रिल 2013

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार : मुंबई येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक व उद्योगश्री पारितोषिक विजेते, गुणवंत नागरिक पुरस्कार विजेते, अभिजित डाय ॲण्ड टूल्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, सोमवंशी क्षत्रिय समाजाचे आधारस्तंभ व आदर्श कवच विधायक सेवा संस्थेचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी नुकतीच मु.पो. केलवड -शिर्डी, जि.अहमदनगर येथे भेट दिली व ७ ते ८ हजार जनता पाण्यावाचून दुष्काळाने होरपळत असताना नरेश फाऊंडेशनतर्फे गावात दररोज टँकरने पाणी पुरवठा केला जातो. येथील विद्यार्थ्यांसाठी १२ नवीन संगणक भेट म्हणून दिले. गणेश विद्या प्रसारक मंडळ, ज्ञानेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद शाळेस प्रयोगशाळा, इमारतीसाठी वगैरे कामास्तव लाखो रुपयांची मदत व देणग्या नरेश राऊत फाऊंडेशनतर्फे कवच उद्योग समूह, संगणक प्रशिक्षण केंद्र, मोफत क्लासेस, कार्यशाळा, गावात सर्वत्र पाणपोईची स्थापना, ग्रामपंचायतींना आर्थिक मदत, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, शेतकरी मेळावे, जनजागृती शिबीर, दिवासी कल्याण केंद्रे, महिला संस्था, गरीब व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वह्या, पुस्तकांचे वाटप व ज्यांची घरे जळाली त्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांची मदत देण्यात आली. गावातील पोलीस संघटना, ग्रामपंचायत, शाळा, धनगर समाज, साखर कारखाने या संस्थांनी उद्योगपती नरेश राऊत, समाजसेविका मीना राऊत, पत्रकार व समाजसेवक - जगन्नाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर राऊत, महेंद्र सावे, उद्योजक नितीन रांगणेकर, लक्ष्मण गारडेसर या मान्यवरांचा शाल, श्रीफळ, गुच्छ, साईबाबांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. गावात गावकऱ्यांनी मिरवणूक काढून - फटाके, डफ, बॅन्डपथक, ढोल-ताशा, धनगर नृत्य व गाणी गावून मानवंदना देण्यात आली. यावेळी शासकीय सेवक वर्ग, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीगणेश साखर कारखान्याचे चेअरमन ॲड. नारायणराव कार्ले-पाटील, पोलीसपाटील सुभाष गमे, सरपंच -लक्ष्मण सोनावणे, समाजसेवक - पुंडलिक गमे, ॲड. अनिल गमे, महेंद्र जेजुरकर, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळे, समाजसेवक यांची यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. उद्योजक नरेश राऊत यांनी दुष्काळाने पिडलेल्यांना सर्वतोपरी मदत, साईबाबांच्या रूपाने वावरून गावाची सतत सेवा केली आहे व करीत आहेत. दुष्काळात होरपळत असलेल्या पीडितांची तन, मन, धन रूपाने मदत करीत आहेत. उद्योगपती -समाजसेवक हे महाराष्ट्राचे नव्हे तर देशाचे भूषण आहेत, असे विचार गावकऱ्यांनी व्यक्त केले आहेत.



ई पेपर : epunyanagari.com

# पुण्य नगरी

वीज बील भरणा, मोबाईल, टि.व्हि. डिश रिचार्ज, मागणी सेतू चालकांकडून होत आहे. अन्य साहित्य चोरीस गेले आहे.

२४ मे 2013 दैनिक पुण्य नगरी

# दुष्काळात होरपळणाऱ्या केलवडला राऊत फाऊंडेशनची मदत

**राहाता /प्रतिनिधी**

राहाता तालुक्यातील केलवड सारख्या ग्रामीण भागात मुंबईस्थित उद्योपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फाऊंडेशनचे वतीने दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याच्या टँकरसाठी, संगणक प्रशिक्षणासाठी, शाळांना मदत, नैसर्गिक आपत्तीत मदत यासह विविध समाजउपयोगी उपक्रमांसाठी सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांचे मार्फत ९ लाख रुपयांची मदत करण्यात आली. केलवडकरांना या मदतीमुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणून हे फाऊंडेशन केलवड सारख्या जिरायती भागात महत्वपुर्ण काम करत आहे. तेथील युवक प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी उद्योगपती नरेश राऊत यांचे माध्यमातुन हे उपक्रम ते राबवित आहे. विशेषत: शैक्षणिक कामात त्यांनी मोठे योगदान दिले आहे. केलवड सारख्या ग्रामीण भागात प्रा. गोर्डे यांनी महिलांसाठी संगणक शिक्षण मिळावे म्हणुन स्वत: ५० हजार रुपये खर्च करुन महिला संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु केले. या प्रशिक्षण वर्गात ३४ मुली मोफत संगणक शिक्षण घेत आहे.

प्रा. गोर्डे यांनी या फाऊंडेशनच्या माध्यामातुन केलवड येथील प्राथमिक शाळेला एलसीडी प्रोजेक्टर दिला. ४०० मुलांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी त्यांना एक इंधनविहीर घेवुन दिली. त्यावर विद्युत मोटार तसेच त्याचे सर्व साहित्य घेवुन दिले. प्राथमिक शाळेच्या मुलांना पोषण आहारासाठी ताटे व चमचे यासाठी ७५ हजार रुपयांची मदत केली. केलवड येथीलच ज्ञानेश्वर विद्यालयासाठी विज्ञान साहित्यासाठी निधी दिला. इयत्ता पाचवी ते आठवी च्या सर्व ३२० विद्यार्थ्यांना पोषण आहारासाठी तसेच इतर मदत म्हणुन १ लाख ७० हजाराची मदत त्यांनी दिली. शिवाय वाकडी, रुई, अस्तगाव यांना प्रत्येकी २१ हजार रुपयांची मदत केलेली आहे.

केलवड येथील मारुती मंदिराच्या जिर्णोध्दरासाठी ३३ हजार रुपयांची देणगी त्यांनी दिली.

केलवड गांव दुष्काळी टापुत असल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या लक्षात घेवुन नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने केलवड ग्रामपंचायतीला ५१ हजार रुपयांचा धनादेश पाणी पुरवठ्यासाठी दिला. केलवड येथे पाच ठिकाणी पाणपोई सुरु केल्या. केलवड चे ग्रामसेवक व तलाठी यांनी दुष्काळी परिस्थितीत चांगले काम केल्याबद्दल त्यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षीस दिले. तसेच केलवड गावात ५०० लिटरच्या पाच टाक्या पाच ठिकाणी ठेवुन त्यातुन पाणी पुरवठा केला. ८००० लिटर क्षमतेच्या टँकरद्वारे त्यांनी गावातील काही भागाला मोफत पाणी वाटप केले. एका टँकरच्या दररोज ३ खेपा ते करत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासुन त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. राहाता येथुन पाणी विकत घेवुन प्रा. गोर्डे यांनी यांनी गावाला मोफत पाणी पुरवठा केला. दुष्काळी परिस्थितीत गावाची तहान भागविण्याचे काम त्यांनी केले. त्या अनुषंगाने दि. २७ मे रोजी त्यांना भास्कर अॅवार्ड ने गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर, माजी मुख्यमंत्री विरोधी पक्षनेते प्रतापसिंग राणे, भाई वैद्य, गायिका अनुराधा पौडवाल, गायिका उषा मंगेशकर यांचे उपस्थितीत गोव्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

दिनांक :- २४/०५/२०१३

दिनांक :- २४/०५/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

# नरेश राऊत फाऊंडेशनचे सहकार्य

24 मे 2013 दैनिक सार्वमत

## केलवडला टँकरसाठी आणि महिला प्रशिक्षणासाठी ९ लाखांची मदत

अस्तगाव (वार्ताहर)- राहाता तालुक्यांतील केलवड सारख्या ग्रामीण भागात नरेश राऊत फांऊंडेशनचेवतीने दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याच्या टँकरसाठी, संगणक प्रशिक्षणासाठी, शाळांना मदत, नैसर्गिक आपत्तीत मदत व आजार पणासाठी, लग्नकार्यासाठी असे विविध समाजउपयोगी उपक्रमांसाठी या फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांच्या प्रयत्नातुन ९ लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणुन हे फाऊंडेशन केलवड सारख्या जिरायती भागात महत्वपुर्ण काम करत आहे. तेथील युवक प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी उद्योगपती नरेश राऊत यांचे माध्यमातुन हे उपक्रम ते राबवित आहे. विशेषत: शैक्षणिक कामात त्यांनी मोठे योगदान दिले आहे.केलवड सारख्या ग्रामीण भागात प्रा. गोर्डे यांनी महिलांसाठी संगणक शिक्षण मिळावे म्हणुन स्वत: ५० हजार रुपये खर्च करुन महिला सगणक प्रशिक्षण केंद्र सुरु केले. या प्रशिक्षण वर्गात ३४ मुली मोफत संगणक [illegible]क्षण घेत आहे. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी खास शिक्षकाची नियुक्ती केली आहे. या प्रशिक्षण वर्गात ज्यांची फी भरुन संगणक शिक्षण घेण्याची ऐपत नाही त्यांना या संगणक वर्गात प्रवेश देऊन मोफत प्रशिक्षण दिले जात आहे.

केलवड येथील मारुती मंदिराच्या जिर्णोध्दरासाठी ३३ हजार रुपयांची देणगी त्यांनी दिली. प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या शिक्षकांच्या केंद्र संमेलनासाठी १२ हजार ५०० रुपयांचा निधी भोजनासाठी दिला.केलवड येथील चांगदेव गोर्डे व कल्याणी गोर्डे यांचे राहाते घर जळाले.त्यांच्या कुटुंबियांना तातडीची १० हजार रुपये, घराच्या बांधकामासाठी १० हजार रुपये, मुलांच्या शिक्षणासाठी ३ हजार रुपये, तसेच आईवडिलांच्या उपचारासाठी ५ हजार अशी मदत प्रा. गोर्डे यांनी फाऊंडेशनच्या वतीने मिळवुन दिली.

नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने केलवड ग्रामपंचायतीला ५१ हजार रुपयांचा धनादेश पाणी पुरवठ्यासाठी दिला. केलवड गावात ५०० लिटरच्या पाच टाक्या पाच ठिकाणी ठेवुन त्यातुन पाणी पुरवठा केला. ८००० लिटर क्षमतेच्या टँकरद्वारे त्यांनी गावातील काही भागाला मोफत पाणी वाटप केले. एका टँकरच्या दररोज ३ खेपा ते करत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासुन त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. राहाता येथुन पाणी विकत घेवुन प्रा. गोर्डे यांनी यांनी गावाला मोफत पाणी पुरवठा केला.

महिला संगणक प्रशिक्षणासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी ९ लाख रुपये खर्च त्यांनी केले आहेत. यांची दखल मुंबई येथील उद्योग विश्वाने घेवुन त्यांची पुरस्कारासाठी शिफारस केली होती. त्या अनुषंगाने दि. २७ मे रोजी त्यांना भास्कर अॅवार्ड ने गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर, विरोधी पक्षनेते प्रतापसिंग राणे, भाई वैद्य, गायिका अनुराधा पौडवाल, गायिका उषा मंगेशकर यांचे उपस्थितीत गोव्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

दिनांक :- ०६/०७/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

दैनिक सार्वमत 6 जुलै 2013

## नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने

# समाजोपयोगी कामासाठी साडेतेरा लाखांची मदत-प्रा. गोर्डे

**अस्तगाव (वार्ताहर)-** नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने ग्रामीण भागात विविध समाजोपयोगी कामांसाठी १३ लाख ५१ हजार रुपये खर्च करण्यांत आले आहे.अशी माहिती फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

मुंबई स्थित उद्योपती नरेश राऊत यांनी समाजाच्या हितासाठी हे फाऊंडेशन सन १९९७ मध्ये स्थापन केले आहे. ही संस्था सामाजिक व विधायक स्वरुपाचे कार्य सन २००८ पासून ग्रामीण भागात करत आहे. केलवड येथील सेंटर मार्फत केलवड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेसाठी एलसीडी प्रोजेक्टर, ४०० मुलांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी विंधनविहीर, विद्युतपंप, व त्याचे साहित्य आणि मुलांना जेवणाची ताटे व चमचे यासाठी ७५ हजार रुपये, तसेच केलवड येथीलच श्री ज्ञानेश्वर विद्यालयास विज्ञान साहित्य, इयत्ता ५ वी ते ८ वी च्या ३२० विद्यार्थ्यांसाठी जेवणाची ताटे व चमचे यासाठी ७५ हजार रुपये दिले आहेत. तसेच केलवड येथील मारुती मंदिरास ३३ हजार रुपये दिले आहेत.केलवडमध्ये दुष्काळ निवारणासाठी पाणपोई उभारावी. पाण्याच्या टाक्या द्याव्या, यासाठी १ लाख ६५ हजाराची मदत दिली.

गेल्या प्रजासत्ताक दिनास १००० विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद तसेच माध्यमिक विद्यालयास केंद्र समेलन समारंभास १० हजार रुपयांची मदत दिली आहे. २ डिसेंबर २०१२ रोजी केलवड येथील चांगदेव गोर्डे व कल्याणी गोर्डे यांच्या राहात्या छप्पराचे जळीत झाले. सर्व संसारोपयोगी साहित्य नष्ट झाले. त्यासाठी उद्योगपती नरेश राऊत यांनी या कुटुंबास १० हजार रुपयांची मदत केली आहे. त्यांच बरोबर घराच्या बांधकामासाठी १० हजार रुपये, मुलांच्या शिक्षणासाठी ३ हजार रुपये, त्यांच्या आईवडिलांच्या उपचारासाठी ५००० रुपयांची मदत केली आहे. पंढरीनाथ गोडगे यांनाही जळितासाठी ५००० रुपयांची मदत केली आहे.

वाकडी, अस्तगाव खुर्द येथील शाळांना प्रत्येकी २१ हजार रुपयांची मदत केली. रुई यासाठी आतापर्यंत १ लाख १२ हजार रुपयांची मदत दिली आहे. सराला बेटास महंत रामगिरी महाराज यांना मठासाठी ५१ हजार रुपये, अडबंगनाथ संस्थान भामाठाण महंत अरुणगिरी महाराज यांना मठासाठी २१ हजार रुपये, तसेच संस्थेने वैद्यकीय मदत, शैक्षणिक मदत, अनाथांना मदत इ. माध्यमातून ७८ हजार रुपयांची मदत केली आहे. या सर्वांवर एकूण १३ लाख ५१ हजार रुपये खर्च करण्यात आला आहे. हा खर्च उद्योगपती नरेश राऊत यांनी स्वत: केला असल्याचे प्रा. गोर्डे यांनी सांगितले.

नवी आशा नवी दिशा
शनिवार दि. २४ ऑगस्ट २०१३
सार्वमत
अहमदनगर अंक २१६ वा वर्ष ३८ वे ■ शनिवार दि. २४ ऑगस्ट २०१३ ■ पाने १६ ■ किंमत

# नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने १००० विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

## प्रा. गोर्डे यांच्याकडून ३२ हजार रुपयांची बक्षिसे



**अस्तगाव (वार्ताहर)**- स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांनी त्यांच्या मातोश्री कै. भामाबाई देवराम गोर्डे यांच्या स्मरणार्थ केलवड येथील पहिली ते १० वी पर्यंतच्या प्रत्येक वर्गातील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना रोख स्वरूपाची बक्षीसे व १००० विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

बालवाडी ते दहावी पर्यंतच्या केलवड मधील १ हजार विद्यार्थ्यांना एकुण ३२ हजार रुपयांचे बिस्कीट पुडचांचे वितरण स्वातंत्र्यदिनाच्या निमीत्ताने श्री. गोर्डे यांनी केले. तर १ ली ते १० पर्यंत प्रत्येक तुकडीत प्रथम क्रमांकास २०१ रुपये, द्वितीय क्रमांकासाठीचे १५१ रुपयांचे, तर तृतीय क्रमांकासाठीचे १०१ रुपयांचे बक्षीसे ८८ विद्यार्थ्यांना यावेळी विविध मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आली. श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या ३३ विद्यार्थ्यांना, गमे गोठा प्राथमिक शाळेच्या १२ विद्यार्थ्यांना, राऊत वस्ती भागातील शाळेतील १२ विद्यार्थी, तर केलवड प्राथमिक शाळेतील ३२ विद्यार्थ्यांना हे बक्षीस वितरण करण्यात आले.

त्याच प्रमाणे रामभाऊ माधव गमे यांनीही श्री ज्ञानेश्वर विद्यालयातील ३३ विद्यार्थ्यांना वरील प्रमाणेच बक्षिसांचे वितरण केले. हे बक्षीस वितरण गावचे पोलीस पाटील सुभाषराव गमे पाटील, पोलीस पाटील सुरेशराव गमे पाटील, माजी सरपंच बाबासाहेब गमे, सरपंच लक्ष्मणराव सोनवणे, उपसरपंच नामदेवराव घोरपडे, पी. डी. गमे, ॲड. नकुलराव वाघे, रमेश शिंदे, बाळासाहेब गमे, भास्करराव घोरपडे, बाळासाहेब गमे, लक्ष्मण कांदळकर, देवराम कांदळकर, नाना वैद्य, संजय सोनवणे, तंटामुक्तीचे अध्यक्ष पुंडलिकराव वाघे, भाऊसाहेब गमे, भिकाजी घोरपडे, दत्तात्रय गुंजाळ, श्री. ठोंबरे, मुख्याध्यापक डी. एम. वाघे, केंद्र प्रमुख श्रीमती मंदाकिनी पुजारी, श्रीमती रोहिणी घाटे, कामगार तलाठी बाळासाहेब कोळगे, माजी सरपंच सिताराम रजपुत आदिंसह उपस्थित ग्रामस्थांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

दिनांक :- ०८/०९/२०१३

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
अहमदनगर अंक २३१ वा वर्ष ३८ वे ■ रविवार दि. ८ सप्टेंबर २०१३ ■ पाने १२+१६ ■ किंमत ₹ ४

## नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने केलवडला सुरु झाले वाचनालय

**अस्तगाव (वार्ताहर)**–राहाता तालुक्यातील केलवड येथे नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने वाचनालय सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे सामुहिक वृत्तपत्र वाचनाचे केलवड सारख्या ग्रामीण भागात सोय झाली आहे.

नरेश राऊत फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत, तसेच सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचे संकल्पनेतुन हे वाचनालय सुरु करण्यात आले आहे. या वाचनालयात दररोज सर्वच वृत्तपत्र ग्रामस्थांना वाचण्यास मिळणार आहे. अशी माहिती प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

केलवड ग्रामस्थांनी या वाचनालयास चांगला प्रतिसाद दिला आहे. लवकरच केलवड येथील श्री ज्ञानेश्वर विद्यालयतही विद्यार्थ्यांना वृत्तपत्र वाचनासाठी ठेवण्यात येणार आहे. केलवड वाचनालयासाठी खास पगारी माणसाची सोय केली आहे. असेही श्री. गोर्डे यांनी सांगितले.



वाचनालयचे उद्घाटन चांगदेव गोर्डे, परसराम रावण गमे, पुंजाहरी रंभा राऊत, नाना वैद्य, नामदेव अगस्ती गमे, बाबासाहेब घन्सी गमे, नाना देवराम गोर्डे, अभिषेक गोर्डे, सचिन वाघे, किशोर गमे, योगेश गोसावी, संदिप गायकवाड, रामनाथ भिकाजी घोरपडे, ठोंबरे, मच्छिंद्र वाघे, शिवाजी गमे, संजय सोनवणे, गणपत ओहळ, अदिंसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक :- ०८/०९/२०१३

दिनांक :- ३०/०९/२०१३

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अहमदनगर अंक २५२ वा वर्ष ३८ वे ■ सोमवार दि. ३० सप्टेंबर २०१३ ■ पाने १४ ■ किंमत ₹४



# उद्योपती नरेश राऊत यांच्यावतीने राहाता देवस्थानला देणगी



अस्तगाव (वार्ताहर)– मुंबईस्थित उद्योगपती नरेश राऊत यांनी राहाता येथील श्री विरभद्र सार्वजनिक उत्सव ट्रस्टला २१ हजारांची देणगी नुकतीच दिली. नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गार्डे पाटील यांनी ती नुकतीच देवस्थानच्या ट्रस्टकडे सुपुर्द केली.

यावेळी गणेश कारखान्याचे अध्यक्ष ॲड. नारायणराव कार्ले पाटील, माजी संचालक व देवस्थानचे ट्रस्टी भागुनाथ गाडेकर, उपाध्यक्ष दत्तात्रय सदाफळ, विश्वस्त बाळासाहेब राधुजी बोठे पा., भाऊसाहेब नानाभाऊ जेजुरकर, बाळासाहेब पुंडलिक सदाफळ, ज्ञानेश्वर निवृत्ती गाडेकर, राजेंद्र सुकदेव गाडेकर, विरेश जानबा बोठे, रावसाहेब भडांगे, सहकार अधिकारी रमेश शिंदे, सक्रेटरी एकनाथ लोहाटे, विरभद्र मंदिराचे भगत सर्जेराव भगत, केलवडचे मुख्याध्यापक डी. एम. वाघे, नारायण भुजबळ, विजय कार्ले, नरेश राऊत फाऊंडेशनचे सेवकवृंद नानासाहेब गोर्डे, गणेश ओव्हळ, संदीप गायकवाड, योगेश गोसावी, सचिन वाघे, किशोर गमे, यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

गणेश कारखान्याचे अध्यक्ष ॲड. कार्ले पाटील यांनी या देवस्थानला देगणी दिल्याबद्दल उद्योगपती नरेश राऊत व प्रा. गोडे यांचे आभार मानले. व एका मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी देणगी द्यावी, अशी मागणी ट्रस्टसह श्री. कार्ले यांनी केली. प्रा. गोर्डे यांनी यानंतर उर्वरित रक्कमेचा चेक जाहिर कार्यक्रमात प्रदान करण्यात येईल असे, अश्वासन त्यांना दिले.

पुणे ★ । शुक्रवार, १८ ऑक्टोबर २०१३ । किंमत ₹ ३

सकाळ

# केलवडचे प्रा. गोर्डे रोज शिकवतात मोफत गणित

## गावाला चार महिने केला पाणीपुरवठा; आता मुलींना संगणक प्रशिक्षणाचाही उपक्रम

काही निवडक काही सुखद



केलवड : प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या पुढाकारातून नरेश राऊत फाउंडेशनने महिलांसाठी मोफत संगणक प्रशिक्षणाचा उपक्रम हाती घेतला आहे.

**राहाता, ता. १७ :** तालुक्यातील केलवड येथे प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने महिला व मुलींसाठी गेल्या दोन वर्षांपासून मोफत संगणक प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. याशिवाय प्रा. गोर्डे गावातील दहावी-बारावीच्या सुमारे शंभर विद्यार्थ्यांना दररोज गणित हा विषय मोफत शिकवतात. त्यांच्या पुढाकारातून गेल्या दुष्काळात गावात चार महिने टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा करण्यात आला.

मुंबईतील कामाची जबाबदारी सांभाळत केलवडसारख्या खेडेगावात त्यांनी विविध उपक्रम हाती घेतले; मात्र तत्पूर्वी प्रा. गोर्डे यांनी केलेला संघर्षही इतरांना प्रेरणादायी आहे. गणित विषय घेऊन 'एम. एस्सी.' झाल्यानंतर त्यांनी मुंबई गाठली. त्यांच्या पत्नी सुनीता शेतात मजुरी करत आणि गोर्डे नोकरीचा शोध घेत फिरत. उद्योजक नरेश राऊत यांनी त्यांच्यातील गुण हेरले आणि त्यांच्यावर मुंबईतील मराठी उद्योजकांमध्ये सुसंवाद ठेवण्याची जबाबदारी सोपविली. चर्चासत्रे व परिसंवादाचे नियोजन करण्याचे काम ते करतात. पुढे नरेश राऊत फाउंडेशनच्या सचिवपदी त्यांची नियुक्ती झाली. उद्योजकांमध्ये सुसंवाद साधण्याचे त्यांचे कसब लक्षात घेऊन त्यांना मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे सन्माननीय सदस्यत्वही बहाल करण्यात आले.

'गरिबीचे चटके मी सहन केले. रयत शिक्षण संस्थेच्या राहाता येथील शारदा विद्यामंदिर संकुलात शिकता आले. त्यातून पुढे संधी मिळाली. ग्रामीण भागातील शाळांना प्रत्येकाने मदत करावी, असे मला वाटते.''
– प्रा. लक्ष्मण गोर्डे

या कामाचा व्याप सांभाळून प्रा. गोर्डे केलवड या साडेसात हजार लोकसंख्येच्या गावात नरेश फाउंडेशनच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत आहेत. प्राथमिक शाळेसाठी कूपनलिका व एलसीडी प्रोजेक्टर त्यांनी मिळवून दिला. रयत शिक्षण संस्थेच्या राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुलास जेवणाच्या ताटांसाठी ३५ हजार रुपयांची मदत मिळवून दिली. मुंबईतील उद्योजकांना ग्रामीण भागात आणून त्यांचा व विद्यार्थ्यांचा संवाद घडवण्याचे काम ते करतात. त्यांच्याच पुढाकारातून उद्योजक नरेश राऊत यांनी येथील काही शाळांना भेट देऊन आर्थिक मदतही दिली.

दिनांक :- २४/१०/२०१३

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अहमदनगर गुरुवार दि. २४ ऑक्टोबर २०१३ पान १४

# राजकारणाचे जोडे बाजूला ठेवा प्रा. गोर्डे

## नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने भजनी मंडळास २१ हजाराचा धनादेश प्रदान



अस्तगाव (वार्ताहर)- नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने राहाता तालुक्यातील केलवड येथील भजनी मंडळास साहित्य घेण्यासाठी २१ हजार रुपयांचा धनादेश नुकताच फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांनी भजनीमंडळास प्रदान केला. यावेळी २०० हून अधिक ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रा. गोर्डे यांनी हा धनादेश भजनीमंडळास दिला. यावेळी कामगार पोलीस पाटील सुभाषराव गमे, पी. डी. गमे, आर. आर. गमे, नारायणराव गारकर, नारायण गमे, सोपानराव गमे, मच्छिंद्र वाघे, शिवाजी गमे, तुकाराम गमे, मच्छिंद्र गमे, गंगाधर गमे, भागवत वाघे, ठमाजी ठोंबरे, धोंडिबा गुंजाळ, सुकदेव कांदळकर, विठ्ठल गमे, विठ्ठल माळवे, बाबासाहेब घन्ती गमे, नानासाहेब गोर्डे, यांचेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ग्रामस्थांसमोर बोलतांना प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, केलवड ग्रामस्थांचे माझ्यावर मोठे प्रेम आहे. उद्योगपती नरेश राऊत यांचेही केलवडवर प्रेम असल्याने सेवाभावी वृत्तीने गावाला सहकार्याची भावना ठेवू, या माध्यमातून केवळ समाजकार्य असून राजकारण करण्याचा हेतू नाहीच. ग्रामस्थांनी एकोप्याने विकासासाठी मदत मागा त्यासाठी सहकार्य करु, त्यात कोणी राजकारण आणले तर मदत मिळणार नाही.

**अल्प रक्कमेत मंडप!**

नरेश राऊत फाऊंडेशनच्या माध्यमातुन अर्थीक ऐपत नसरणाऱ्यांसाठी अल्प रक्कमेत एखाद्या घरगुती कार्यक्रमासाठी मंडप तसेच स्पिकर उपलब्ध करुन दिला जाणार आहे. हे साहित्य फाऊंडेशनने आणले आहे. त्याचा लाभ ग्रामस्थांनी घ्यावा, असे आवाहन प्रा. गोर्डे यांनी केले आहे.

दिनांक :- २४/१०/२०१३

दिनांक :- ०४/११/२०१३



नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अहमदनगर अंक २८७ वा वर्ष ३८ वे सोमवार दि. ४ नोव्हेंबर २०१३ ■ पाने १४ ■ किंमत ₹ ४

# नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने सराला बेटासाठी ५१ हजाराची मदत



अस्तगाव (वार्ताहर)- राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने सराला बेटाचे प्रमुख महंत रामगिरी महाराज यांना ५१ हजार रुपयांचा धनादेश नुकताच प्रदान करण्यात आला.

नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या निवासस्थानास रामगिरी महाराजांनी भेट दिली. त्याप्रसंगी प्रा. गोर्डे व सौ. सुनिता गोर्डे यांनी महंत रामगिरी यांची पूजा करुन त्यांना ५१ हजाराचा धनादेश बेटाच्या विकासासाठी प्रदान करण्यात आला, तसेच महाराजांच्या वाहनासाठी ५ हजार रुपयांचे डिझेल देण्यात आले. यावेळी अभिषेक गोर्डे, मधुकर महाराज कडलग, अस्तगावकर सराफचे अशोकराव बोऱ्हाडे, सुभाषराव गमे, सहकार अधिकारी रमेश शिंदे, प्राचार्य राजेंद्र बर्डे, कामगार तलाठी बाळासाहेब कोळगे, प्रा. बी. डी. गमे, नरेश राऊत, गणेश ओव्हळ, कु. कावेरी गोर्डे, कु. सुरेखा गोर्डे आदी उपस्थित होते.

दिनांक :- ०८/११/२०१३

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अहमदनगर शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०१३ पान १४

# नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने खडकेवाके येथे मोफत वाचनालय

खडकेवाके (वार्ताहर)- राहाता तालुक्यातील खडकेवाके येथेनरेशराऊत फाऊंडेशनच्यावतीने मोफत वाचनालय सुरु झाले आहे. ना. विखे पाटील यांचे अशिर्वादाने हे वाचनालय सुरु करण्यात आल्याचे नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सांगितले.

यापुर्वी केलवड येथे मोफत वाचनालय फाऊंडेशनच्या वतीने सुरु करण्यात आले आहे. आता खडकेवाके येथे सुरु करण्यात आले आहे. खडकेवाके चे पोलिस पाटील श्री. लावरे, सरपंच पोकळे, मांजी सरपंच बी. टी. लावरे, लावरे वायरमन, सोपानराव गमे, अॅड. अनिल गमे यांचे हस्ते फित कापुन या वाचनालयाचे उद्घघाटन करण्यात आले.यावेळी ग्रामस्थांनी प्रा. गोर्डे यांचा सत्कार करत नरेश राऊत फाऊंडेशनच्या कामाचे कौतुक केले. याप्रसंगी प्रा. संदिप गायकवाड, प्रा. योगेश गोसावी, मच्छिंद्र वाघे, सचिन वाघे, किशोर गमे, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक :- ०८/११/२०१३

दिनांक :- २९/११/२०१३

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
अहमदनगर अंक ३११ वा वर्ष ३८ वे शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर २०१३ ■ पाने १४ ■ किंमत ₹ ४

## दै. सार्वमत व अस्तगाव ग्रामपंचायत यांच्या संयुक्त सहकार्याने
# नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने अस्तगावला मोफत वाचनालय



अस्तगाव (वार्ताहर)- दै. सार्वमत व ग्रामपंचायत अस्तगाव यांचे सहकार्याने राहाता तालुक्यातील अस्तगाव येथे नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने मोफत सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात आले आहे. नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी हे वाचनालय सुरु केले आहे.

या वाचनालयासाठी अस्तगाव ग्रामपंचायतीने खास इमारत उपलब्ध करुन दिली आहे. नुकतेच या इमारतील राहाता पंचायत समितीचे सभापती निवास त्रिभुवन व प्रा. गोर्डे यांचे हस्ते या मोफत वाचनालयाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बाजार समितीचे संचालक ज्ञानदेव चोळके, माजी संचालक वाल्मिकराव गोर्डे, गणेशचे संचालक नारायण चोळके, माजी संचालक दत्तात्रय जेजुरकर, जनसेवा मंडळाचे अध्यक्ष जे. आर. चोळके, माजी उपसरपंच कैलास जेजुरकर, माजी सरपंच अशोकराव नळे, माजी उपसरपंच भाउसाहेब जेजुरकर, राष्ट्रवादीचे संतोष गोर्डे, अस्तगाव सोसायटीचे उपाध्यक्ष संतराम जेजुरकर, नरेश राऊत फाऊंडेशनचे विश्वस्त गणपत आव्हाळ, संचालक विठ्ठलराव गमे, शिवाजीराजे गमे, रामनाथ घोरपडे, प्रा. संदिप गायकवाड, किशोर गमे, संजय सोनवणे, सचिन वाघे, यांचेसह १०० हुन अधिक ग्रामस्थ उपस्थित होते.

**सार्वमतने कौतुक केल्याने उत्साह!**

सुरुवातीला आपल्या कामाचे कौतुक दै. सार्वमतने केले. ही कौतुकाची थाप पडल्याने आपणाला उत्साह आल्याचे प्रा. लक्ष्मण गोर्डे यावेळी सांगितले. आपल्या कामाच्या विस्तरात सार्वमतचा मोठा वाटा असल्याचे श्री. गोर्डे म्हणाले.

यावेळी प्रा. गोर्डे यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने माजी उपसरपंच कैलास जेजुरकर व अशोकराव नळे यांनी सत्कार केला. तर भजनी मंडळाच्यावतीने सिताराम जेजुरकर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना प्रा. गोर्डे म्हणाले, वाचनालयाचा वापर ग्रामस्थांनी करावा, उद्योगपती नरेश राऊत यांनी सामजिक बांधिलकी जपली असल्याने समाजउपयोगी कामे केली जात आहे. अस्तगाव च्या भजनी मंडळाला मदत करु, तसेच देवी मंदिराच्या परिसर विकासासाठी मदत करण्याचे अश्वासन प्रा. गोर्डे यांनी दिले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक माजी सरपंच अशोकराव नळे यांनी केले तर आभार कुंडलिकराव तरकसे यांनी मानले. याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष दशरथ गव्हाणे, पोलिस पाटील राजेश त्रिभुवन, रामनाथ चोळके, नवनाथ नळे, महेंद्र गोर्डे, राजेंद्र तांबे, ग्रामविकास अधिकारी सुपे, ज्ञानदेव गोर्डे, अविनाश जेजुरकर, देवराम जेजुरकर, प्रा. एन. के. नळे, बाळासाहेब घोरपडे, रावसाहेब गवांदे, राजेंद्र गव्हाणे, संजय बागुल, दत्तात्रय जेजुरकर, नारायण सापते, नामदेव जेजुरकर, विश्वनाथ जेजुरकर, चांगदेव तांबे, दत्तात्रय सापते, सुंदर त्रिभुवन, रंजन त्रिभुवन, संदिप चोळके, प्रा. संजय चोळके, सुंदरबापु जेजुरकर, रावसाहेब गोर्डे, शिरीष त्रिभुवन, साहेबराव गोर्डे, यांचेसह ग्रामस्थ भजनी मंडळाचे सदस्य, रिक्शा चालक मालक संघटनेचे प्रतिनिधी, तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

दिनांक :- २३/१२/२०१३

www.esakal.com
सकाळ
पुणे ★। सोमवार, २३ डिसेंबर २०१३ । किंमत ₹ ३



राहाता : नरेश राऊत फाउंडेशनतर्फे शारदा शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांसाठी वृत्तपत्र वाचनालय सुरू करण्यात आले.

(छायाचित्र : सतीश वैजापूरकर)

# नरेश राऊत फाउंडेशनतर्फे वृत्तपत्र वाचनालय सुरू

राहाता, ता. २२ : रयत शिक्षण संस्थेच्या शारदा शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांसाठी नरेश राऊत फाउंडेशनतर्फे वृत्तपत्र वाचनालय सुरू करण्यात आले.

या वेळी फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी, वृत्तपत्रे समाजजीवनाचा आरसा असून, विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून वृत्तपत्रे वाचण्याची सवय ठेवावी, असे आवाहन केले. अध्यक्षस्थानी सल्लागार समितीचे प्रमुख रमेश शिंदे होते. प्राचार्य राजेंद्र बर्डे, डॉ. पी. जी. गुंजाळ, वासंती चौधरी आदी उपस्थित होते. डॉ. गुंजाळ यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. प्राचार्य बर्डे यांनी स्वागत केले. डांगे यांनी सूत्रसंचालन केले.

दिनांक :- २७/१२/२०१३

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

अहमदनगर अंक ३३९ वा वर्ष ३८ वे शुक्रवार दि. २७ डिसेंबर २०१३ ■ पाने १४ ■ किंमत ₹४

## नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने

# पिंपळस सप्ताहास ५१ हजाराची देणगी

अस्तगाव (वार्ताहर)- राहाता तालुक्यातील पिंपळस येथे सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व भव्य तुलसी रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास केलवड येथील प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांनी नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने ५१ हजार रुपयांची देणगी दिली. नुकताच हा धनादेश अखंड हरिनाम सप्ताह समितीच्या सदस्यांकडे सुपुर्त केला.



राहाता तालुक्यातील पिंपळस येथे सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व भव्य तुलसी रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास केलवड येथील प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांनी नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने ५१ हजार रुपयांची देणगी दिली.

सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात आपले महत्वाचे योगदान देणाऱ्या नरेश राऊत फाऊंडेशनने धार्मिक क्षेत्रातही आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे. नरेश राऊत फाऊंडेशनचे अध्यक्ष उद्योगपती नरेश राऊत यांचे मार्गदर्शनाखाली या फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे हे विविध उपक्रम राबवित आहेत. नुकताच या फाऊंडेशनने पिंपळस येथील भव्य स्वरुपात होत असलेल्या तुलसी रामकथेस ५१ हजार रुपयांचा धनादेश समितीतील सदस्य नितीनराव कापसे पाटील, अण्णासाहेब निरगुडे, शांताराम कदम, नामदेवराव राहाणे, प्रभाकर निमसे, यांचेसह गणेश कारखान्याचे अध्यक्ष ॲड. नारायणराव कार्ले पाटील, रमेश शिंदे, केलवडचे पोलीस पाटील सुरेश गमे, भास्कर घोरपडे, बाळासाहेब गमे, गणेश ओव्हळ, संजय सोनवणे, शिवाजी गमे, विठ्ठल गमे, यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

दिनांक :- ०५/०५/२०१४

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

5 मे - 2014

## नरेश राऊत फौंडेशन तर्फे राहाता पोलिस ठाण्याला वॉटर कुलर

# पोलिसदादांना मिळाले थंडगार पाणी!

गणेशनगर/प्रतिनिधी

नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने राहाता पोलिस ठाण्याला आरओ आणि कुलर भेट दिले आहे. पोलिसदादांना यामुळे थंडगार पाणी मिळणार आहे.

नरेश राऊत फौंडेशन विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे. मुंबईस्थित उद्योगपतींनी एकत्र येवुन उद्योगश्री या एनजीओ संघटनेची स्थापना केली आहे. उद्योगपती नरेश राऊत यांनी नरेश राऊत फौंडेशनची स्थापना करुन केलवड येथील प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांची सेक्रेटरी म्हणुन नेमणुक केली आहे. प्रा. गोर्डे केलवड परिसरात विविध उपक्रम राबवित आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन राहाता पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी, कर्मचारी यांना धावपळीच्या जिवनात शुध्द पाणी मिळावे आणि उन्हाळा असल्यामुळे थंडगार पाणी मिळावे म्हणुन प्रा. गोर्डे यांनी ४३ हजार रुपये खर्चुन राहाता पोलिस ठाण्याला आरओ व कुलर यंत्रणा बसविली आहे. आणि ती कार्यान्वतही करण्यात आली आहे.



काल सहकार अधिकारी रमेश शिंदे, पोलिस निरीक्षक राम सोमवंशी यांचे हस्ते या यंत्रणेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नरेश राऊत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, केलवडचे पोलिस पाटील सुभाषराव गमे, पोलिस पाटील सुरेश गमे, पोलिस नाईक नानासाहेब शेंडगे, पो. कॉं. सुभाष फड, फौंडेशनचे संचालक गणेश ओहळ, प्राचार्य राजेंद्र बर्डे, महेंद्र जेजुरकर, संचालक विठ्ठलराव गमे, शिवाजी गमे, अदिनाथ गमे, रामनाथ घोरपडे, यांचेसह केलवड येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थत होते. यावेळी यंत्रणेसाठीचा ४३ हजार रुपयांचा धनादेश श्री. शिंदे व श्री. सोमवंशी, प्रा. गोर्डे यांचेहस्ते साई समर्थ वॉटर सोल्युशन चे मालक योगेश आग्रे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी जितेंद्र गुंजाळ, बाळासाहेब घोरपडे, नानासाहेब गोर्डे, अभिषेक गोर्डे, अमोल कहांडळ, संजय सोनवणे, संदिप गायकवाड, योगेश गोसावी, किशोर गमे, किशोर ढगे, सचिन वाघे, यांचेसह केलवड ग्रामस्थ तसेच पोलिस ठाण्यातील कर्मचारी उपस्थत होते.

ई पेपर : epunyanagari.com

# पुण्य नगरी

वर्ष :१५, अंक : ४३ पाने : १२+४ किंमत : ४ रुपये    रविवार, १८ मे २०१४    घराघरात... मनामनात...

# नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने शेतकरी संवाद व कृषी प्रदर्शन

**राहाता/प्रतिनिधी**

जळगाव हे चांगले विचार, संस्काराचे शिक्षण देणारे विद्यापिठ आहे. गाव विकासासाठी गटतट विसरुन सर्वजण एकत्र येतात, आणि एक आगळा वेगळा आदर्श ठेवतात. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व विचारवंत अॅड. रावसाहेब शिंदे यांनी केले.

राहाता तालुक्यातील जळगाव येथें नरेश राऊत फौंडेशन च्या वतीने शेतकरी संवाद व कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानावरुन अॅड. शिंदे बोलत होते. उद्योगपती नरेश राऊत, सौ. मिना राऊत, कृषीतज्ञ मकरंद चुरी, कृषीभुषण सौ. अंजली चुरी, डॉ. राजीव चुरी, प्राचार्य ज्ञानदेव म्हस्के, रमेश शिंदे, गंगाधर चौधरी, जिल्हा देखरेख संघाचे अध्यक्ष अण्णासाहेब चौधरी, भाउसाहेब चौधरी, सरपंच संपतराव चौधरी, एम. टी. चौधरी, फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, प्राचार्य राजेंद्र बर्डे, यांचेसह शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आपल्या भाषणात अॅड. रावसाहेब शिंदे म्हणाले, जळगावने एकोपा टिकविला आहे. बोरावके महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरे घेवुन खऱ्या अर्थाने या गावाला दिशा देण्याचे काम केले. एकोपा असल्याने हे गाव आदर्श ठरेल. कर्तुत्ववान माणसे येथे आहेत. असे सांगुन श्री. शिंदे पुढे म्हणाले, आपण आपल्या आयुष्यात सत्ता, संपत्ती आणि मान यापासुन दुर राहिलो. वकिलीत मिळविले ते समाज कार्यासाठी वापरले. माणसाने जगण्याच्या पलिकडे जावुन समाजासाठी काहीतरी केले पाहिजे. तत्वहिन राजकारण हे सामजिक पाप आहे. प्रत्येकाला घबाड मिळाले पाहिजे म्हणुन प्रयत्न होतांना दिसतात. जळगावने पावसाचा प्रत्येक थेंब जिरविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असेही ते म्हणाले. उद्योजक नरेश राउत म्हणाले, शेतीमालाला उत्पादनावर येणाऱ्या खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे. जळगाव मध्ये एकी आहे. भाजी पाल्याचे उत्पादन शेतकऱ्यांनी घ्यावे, फौंडेशन त्यांना सहकार्य करेल.

कृषीभुषण सौ. अंजली चुरी म्हणाल्या, भाजीपाला क्षेत्रात सध्या भारत हा सर्व देशांना सांभाळणारा देश आहे. शेतीतुन चांगले उत्पादन मिळु शकते, चांगली अर्थप्राप्ती होवु शकते. मग शेतीला दुय्यम स्थान का? असा सवाल करुन त्या म्हणाल्या आपल्या शेतात आपण ८४ प्रकारच्या भाज्या पिकवितो. जगात वेगवेगळ्या प्रकारचे वातावरण आहे. आपल्याकडे त्या तुलनेत चांगले आहे. आपला देश मध्यवर्ती आहे. संपुर्ण जगाला भाज्या पुरवु शकतो. भारतीय भाज्यांना चांगली मागणी असते. जळगांव ने नियोजन करुन १५० ते २०० प्रकारच्या भाज्या पिकवु शकता. यासाठी आपण मार्गदर्शन करु. यावेळी गंगाधर चौधरी, अण्णसाहेब चौधरी, भाउसाहेब चौधरी, प्राचार्य राजेंद्र बर्डे, कु. शुभांगी चौधरी, कु. शितल चौधरी यांची भाषणे झाली. आभार संपतराव चौधरी यांनी मानले. यावेळी प्राचार्य एल. डी. भोरे, माजी प्राचार्य टी. ई. शेळके, प्रा. बाबुराव उपाध्ये, सौ. सुनिता गोर्डे, सौ. अर्चना शिंदे, सौ. शिंदे, चंद्रभान चौधरी, दिलीप चौधरी, पंडीत चौधरी, बाळासाहेब चौधरी, विजय चौधरी, सुरेश चौधरी, शिवाजी गमे, गणपत ओव्हळ, अभिषेक गोर्डे, यांचेसह ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक :- १८/०५/२०१४

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अंक ३१५ वा। वर्ष ३९ वे। शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०१४। पाने १४

## केलवडला आज

# टॅलेंट सर्च उपक्रम

अस्तगाव (वार्ताहर)- नरेश राऊत फाउंडेशन व पंचायत समिती शिक्षण विभाग राहाता यांच्या संयुक्त विद्यमाने राहाता तालुक्यातील केलवड येथे आज शुक्रवार दि. ५ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता टॅलेंट सर्च उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती राहाता पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी उमेश डॉंगरे व नरेश राउत फाँडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

केलवड येथील गोर्डे वस्तीवर या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे उद्घाटन मुंबई येथील उद्योजक नरेश राऊत यांचे हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी राहाता पंचायत समितीच्या सभापती सौ. सुरेखा इनामके असतील तर प्रमुख अतिथी म्हणुन उपसभापती दिपक तुकरणे, माजी सभापती निवास त्रिभुवन, सदस्य पोपटराव वाणी, गटविकास अधिकारी कमलाकर रणदिवे, राहाताचे पोलिस निरीक्षक सुरेश बेंद्रे हे उपस्थित राहाणार आहेत.

या उपक्रमप्रसंगी तज्ञ म्हणून राष्ट्रपती पुरस्कार विजेते मुख्याध्यापक प्रकाश गरड, तसेच जिल्हा परिषदेच्या निरंतरचे शिक्षणाधिकारी पी. एस. काळे हे मार्गदर्शन करणार आहेत. या समारंभासाठी शिक्षण प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे, विस्तार अधिकारी राजेश पावसे, प्रकल्प प्रमुख सुनिल गायकवाड, प्रा. लक्ष्मण गोर्डे अर्दिनी केले आहे.

शनिवार, ६ डिसेंबर २०१४ । किंमत ₹ ३

सकाळ

# विद्यार्थ्यांसाठी 'टॅलेंट सर्च' फायदेशीर : राऊत

**राहाता, ता. ५ :** "जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता शोधण्यासाठी हाती घेतलेला 'टॅलेंट सर्च' उपक्रम फायदेशीर ठरेल," असे प्रतिपादन उद्योजक नरेश राऊत यांनी दिली.

पंचायत समिती व नरेश राऊत फाउंडेशनतर्फे 'टॅलेंट सर्च' उपक्रमाची सुरवात राऊत यांच्या हस्ते झाली. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सभापती सुरेखा इनामके होत्या. पोलिस निरीक्षक सुरेश बेंद्रे, उद्योजिका मीना राऊत, उपसभापती दीपक तुरकणे, फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, प्राचार्य राजेंद्र बर्डे, शिक्षणाधिकारी पी. एस. काळे, उमेश डोंगरे, प्रकाश गरड, लक्ष्मण सोनावणे, भरत राऊत, सुभाष गमे, पी. डी. गमे, सुनील गायकवाड, सुरेश गमे आदी या वेळी उपस्थित होते.




**केलवड : टॅलेंट सर्च उपक्रमाच्या प्रारंभी मार्गदर्शन करताना उद्योजक नरेश राऊत. समवेत मीना राऊत, पोलिस निरीक्षक सुरेश बेंद्रे, सुरेखा इनामके, दीपक तुरकणे, प्रा. लक्ष्मण गोर्डे.** (छायाचित्र : सतीश वैजापूरकर)

मीना राऊत म्हणाल्या, "या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना पुढे येण्याची संधी मिळेल. शिष्यवृत्ती परीक्षा दिल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यादृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा आहे."

चौथीचे तीन हजार ६५२ व सातवीचे ५९६ मुले, या उपक्रमात सहभागी होणार आहेत. त्यांच्या पूर्वतयारीसाठी तीन परीक्षा होतील. शिष्यवृत्ती परीक्षेत दीडशेहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. त्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी दोन दिवसांचा अभ्यासवर्ग होईल. निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश गरड व पोपट काळे यांनी त्यांना मार्गदर्शन केले.

पुणे, ★ मंगळवार, ९ डिसेंबर २०१४ । किंमत ₹ ३

सकाळ

# 'टॅलेंट सर्च'मुळे हुशार विद्यार्थ्यांना संधी : रणदिवे

**राहाता, ता. ८ :** ''प्राथमिक शाळांतील चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या टॅलेंट सर्च उपक्रमाच्या माध्यमातून हुशार विद्यार्थ्यांना पुढे येण्याची संधी मिळेल. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून नरेश राऊत फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला,'' असे प्रतिपादन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कमलाकर रणदिवे यांनी केले.

टॅलट सर्च उपक्रमाच्या समारोप सत्रात ते बोलत होते. फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे, निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश गरड, मुख्याध्यापक डी. एम. वाघे या वेळी उपस्थित होते.



**केलवड : नरेश राऊत फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित टॅलेंट सर्च उपक्रमामध्ये बोलताना गटविकास अधिकारी कमलकार रणदिवे. समवेत प्रा. लक्ष्मण गोर्डे व इतर.**

प्रा. गोर्डे म्हणाले, ''प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासून त्यापैकी गुणवंतांना विशेष प्रशिक्षण देण्याच्या उद्देश या उपक्रमामागे आहे. त्यामुळे फाउंडेशनने या प्रकल्पाची जबाबदारी स्वीकारली. त्यात सहभागी झालेल्या शिक्षकांनी येथे तज्ज्ञांकडून मिळालेल्या मार्गदर्शनाचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी करावा. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी हा उपक्रम मोलाचा आहे. शिक्षकांनी जीव ओतून प्रयत्न केल्यास गुणवंत विद्यार्थ्यांची नवी पिढी तयार होऊ शकेल.''

निवृत्त मुख्याध्यापक गरड यांनी शिक्षकांना या उपक्रमातील बारकावे समजून सांगितले. तसेच विद्यार्थी घडविण्यासाठी काय करावे, याचे धडे दिले. गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे यांनीही मार्गदर्शन केले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक १६ । वर्ष ४० वे । बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०१५ । पाने १४

# शिक्षण जनजागृती रथयात्रेचे केलवडला स्वागत



अस्तगाव (वार्ताहर)- राहाता पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या शिक्षण हक्क अधिनियम-२००९ अंतर्गत जनजागृती रथयात्रेचे स्वागत नुकतेच केलवड येथे करण्यात आले.

राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कमलाकर रणदिवे व गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे यांचे मार्गदर्शनाखाली तालुक्यात जनजागृती रथयात्रा सुरु आहे. या रथयात्रेचे केलवड येथील नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या कार्यालयाजवळ आगमन होताच राहाता पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेश बेंद्रे यांनी नारळ वाढवुन या अभियानाचे स्वागत केले. यावेळी नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, सौ. सुनिता गोर्डे, गणेश विद्या प्रसारक मंडळाच्या सेवकांच्या पतसंस्थेचे संचालक शिवाजीराव गमे, रामभाऊ गमे,पोलिस उपनिरीक्षक दहिफळे, पोलिस हेड कॉन्स्टेबल बाबा सांगळे, काकडे यावेळी उपस्थितीत होते.

वर्ष : १३५

Regd. No. PCW/002/2015-2017 RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

● अंक ५२ ● पृष्ठे : ८ + रविवार पुरवणी ● तीन रुपये ● रविवार, २२ फेब्रुवारी २०१५, पुणे C (अहमदनगर जनता आवृत्ती)★★

# नरेश राऊत फौंडेशनचे कार्य कौतुकास्पद

राहाता, (वार्ताहर) : नरेश राऊता फौंडेशनचे कार्य सेवाभावी वृत्तीचे असून सरला बेट देवस्थानाला त्यांनी साडेचार लाखापर्यंत मदत केली आहे. आपले जीवन सुखी असताना दुसऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे फौंडेशनचे कार्य कौतुकास्पद व चांगले असल्याचे प्रतिपादन सरला बेटचे महंत रामगिरी महाराज यांनी केले.

राहाता तालुक्यातील केलवड येथे नरेश राऊत फौंडेशन या सेवाभावी संस्थेच्यावतीने अध्यात्मिक क्षेत्रासाठीचा 'अध्यात्मरत्न' पुरस्कार सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांना, सामाजिक क्षेत्रातील 'समाजभूषण' पुरस्कार युवा नेते डॉ. सुजय विखे यांना, आदर्श शैक्षणिक संकुलाचा पुरस्कार राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुलास, आदर्श ग्रामपंचायत पुरस्कार जळगाव ग्रामपंचायतीस, आदर्श सामजिक संस्था पुरस्कार दाढ येथील श्रध्दा प्रतिष्ठाण यांना या सोहळ्यात नरेश राऊत फौंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत, सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे हस्ते प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी महंत रामगिरी महाराज बोलत होते.

या प्रसंगी राहाता पंचायत समितीच्या सभापती सुरेखा इनामके, राहात्याच्या नगराध्यक्षा लताताई मेहेत्रे, उपनगराध्यक्ष संजय सदाफळ, ताराचंद कोते, रमेश शिंदे, पोपट वाणी, सुभाष गमे, केलवडचे सरपंच लक्ष्मण सोनवणे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना महंत रामगिरी महाराज म्हणाले, संत जीवन हे पुरस्कारासाठी नसते तर परोपकारासाठी असते. समाजाच्या आनंदासाठी ते पुरस्कार स्वीकारतात. त्याग हाच संत जीवननाचा खरा पुरस्कार आहे.

यावेळी राहाता पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बेंद्र, नरेश राऊत, प्रा. गोर्डे, प्राचार्य राजेंद्र बर्डे, योगेश तांबे, जळगावचे सरपंच संपत चौधरी, आदींनी आपले विचार मांडले. कार्यक्रमास सुनिता गोर्डे, केलवड माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक डी. एम. वाघे, रोहिणी घाटे, भाऊसाहेब चौधरी, दशरथ तुपे आदि उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
। अंक ५४ । वर्ष ४० वे । रविवार, दि. १५ मार्च २०१५ । पाने १०+१२

# राहाता तालुक्यात शिष्यवृत्ती शिबिरे




अस्तगाव (वार्ताहर) – केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या माध्यामातून राहाता तालुक्यातील ५ प्रशिक्षण केंद्रांवरुन २९१ विद्यार्थ्यांना टॅलेंट सर्च उपक्रमांतर्गत अनिवासी शिष्यवृत्ती केंद्र सुरू करण्यात आले आहेत. राहाता पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविला जात आहे. जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात या स्वरूपाचा हा पहिलाच उपक्रम असावा, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे यांनी दिली.

नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या सहकार्यातून हा पथदर्शी प्रकल्प राबविला जात आहे. इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वीच्या शिष्यवृत्ती परिक्षेस बसलेल्या निवडक विद्यार्थ्यांसाठी अनिवासी शिष्यवृत्ती शिबिरास प्रारंभ झाला आहे. सहा दिवस हे शिबिर चालणार आहे. चौथीचे चार तर सातवीसाठी एक अशा पाच केंद्रावर हे शिबिर सुरू आहे.

लोणी येथे ४८, बाभळेश्वर येथे ६०, केलवड येथे ७३ व शिर्डी येथे सातवीचे ४९ असे एकूण २९१ विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले आहेत. शिबिरात सहभागी होण्याकरीता विद्यार्थ्यांच्या दोन २ सराव परीक्षा घेण्यात आल्या. या शिबिरात विद्यार्थ्यांना तालुक्यातील, जिल्ह्यातील व राज्यस्तरावरील तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन होत आहे. नरेश राऊत फौंडेशनने या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा चाहपान, भोजन, तसेच प्रवास खर्च व सराव प्रश्नपत्रिका छपाई, या सर्वांचा खर्च नरेश राऊत फौंडेशनने उचलला आहे. दरम्यान गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे व नरेश राऊत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सर्व प्रशिक्षण केंद्रांना भेट देऊन मार्गदर्शन केले. हा जिल्ह्यात आगळा वेगळा उपक्रम असल्याने पालक तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, सदस्यांना या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ६६ । वर्ष ४० वे । शुक्रवार, दि. २७ मार्च २०१५ । पाने १४

## नरेश राऊत फाऊंडेशन च्या वतीने

# केलवडला सीईटीचा अभ्यासक्रम मोफत

अस्तगाव (वार्ताहर)– केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने इयत्ता बारावी सायन्सची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरिंग व मेडिकल साठी आवश्यक असणारी व इतर उच्च शिक्षणासाठी आवश्यक असणारी सीईटी चा अभ्यासक्रम मोफत शिकविला जात आहे. अशी माहिती नरेश राउत फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

केलवड येथील नरेश राउत फौंडेशनच्या शैक्षणिक संकुलात पाच अनुभवी प्राध्यापकांच्या मदतीने हा उपक्रम राबविला आहे. सध्या दोन दिवसांपासुन सीईटीचा अभ्यासक्रम शिकविणे सुरु झाले आहे. इतर ठिकाणी विद्यार्थ्यांकडून फ़ी मोठ्या प्रमाणात घेतली जाते. मात्र फौंडेशन विद्यार्थ्यांकडून एक रुपया ही घेणार नाही. असे श्री. गोर्डे यांनी सांगितले. महिलांसाठी संगणक शिक्षण, मोफत क्लास, याच बरोबर आता सीईटी चा अभ्यासक्रम मोफत शिकविला जात आहे.

लोकमत
महाराष्ट्राचा मानबिंदू
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ३.०० अहमदनगर, सोमवार, दि. ३० मार्च २०१५

## मोफत मार्गदर्शन

लोणी : केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने अभियांत्रिकी, तसेच वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी द्याव्या लागणाऱ्या सीईटीचे मोफत मार्गदर्शन करण्यात येत आहे, अशी माहिती फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

Regd. No. PCW/002/2015-2017 RNI No. 1755/57
वर्ष : १३५
केसरी
राष्ट्रीय ठेवा
● अंक ८७ ● पृष्ठे : ६ + ४ ● तीन रुपये ● सोमवार, ३० मार्च २०१५, पुणे C (अहमदनगर जनता आवृत्ती)★★

## सीईटीचा अभ्यासक्रम मोफत, नरेश फौंडेशनचा उपक्रम

राहाता (वार्ताहर) : केलवड येथील नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने बारावी सायन्सची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरिंग व मेडिकल प्रवेशासाठी आवश्यक असणारी सीईटीचा अभ्यासक्रम मोफत शिकविला जात आहे, अशी माहिती नरेश राऊत फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली. नरेश राऊत फौंडेशनच्या केलवड येथील शैक्षणिक संकुलात ५ अनुभवी व प्रशिक्षित प्राध्यापकांच्या मदतीने हा उपोक्रम राबविला आहे. सध्या २ दिवसांपासून सीईटीचा अभ्यासक्रम शिकविणे सुरू झाले आहे. इतर ठिकाणी विद्यार्थ्यांकडून फी मोठ्या प्रमाणावर घेतली जाते. मात्र फौंडेशन विद्यार्थ्यांकडून १ रुपयादेखील फी घेणार नाही, असे गोर्डे यांनी सांगितले. महिलांसाठी संगणक शिक्षण, मोफत क्लास, चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च प्रोग्राम याचबरोबर आता १२ वी सायन्सची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी सीईटीचा अभ्यासक्रम मोफत शिकविला जात आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी
www.gavakar
शनिवार, ४ एप्रिल २०१५
अहमदनगर
वर्ष ७२ अंक ६२ किंमत रु. २.०० पाने ८

# भोजडे येथे श्री.नरेश राउत फांउडेशन संचलित मोफत वाचनालयाचे उद्घाटन



कोपरगाव (ता.प्र.) भोजडे येथे श्री.नरेश फांउडेशन केलवड संचलित मोफत वाचनालयाचे उद्घाटन फांउडेशनचे सचिव प्रा.लक्ष्मण गोडे यांच्या अध्यक्षतेखाली व राहाता येथील शारदा विद्यामंदिरचे प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रकाश गायकवाड, चारुदत्त सिनगर व मुकुंद सिनगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.गोर्डे सर व उदघाटक प्रा.बर्डे सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. फांउडेशनच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. फांउडेशनच्या वतीने यावेळी धोत्रे येथील श्री.विरुभद्र विद्यालयास पिण्याचे पाण्यासाठी बोअरमध्ये मोटार बसविणेसाठी रु१५०००/-ची देणगी देण्यात आली.

यावेळी अशोक मंचरे यांनी सर्वांचे स्वागत केले व व्यंकट घट यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन केले, कार्यक्रमाला दिलीप देवकर, संदिप मंचरे, पुजाराम धट, ज्ञानेश्वर नरोडे, गंगाधर वाबळे, फारुक पटेल, विक्रम सिनगर, भाउसाहेब मंचरे, दादासाहेब नाईकवाडे, भाउसाहेब सिनगर, गवजीराम मंचरे, यांच्यासह धोत्रे व भोजडे येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करणेसाठी वाचनालयाच्या वतीने राजमाता अहिल्याबाई होळकर मित्रमंडळ.

ई पेपर : epunyanagari.com

पुण्य नगरी

अहमदनगर, शनिवार,४ एप्रिल २०१५ वर्ष :१४, अंक : ४ पाने : १२+४ किंमत : ४ रुपये

# भोंजडे येथे मोफत वाचनालय

**राहाता/प्रतिनिधी**

श्री. नरेश राऊत फाऊंडेशन केलवड संचलित मोफत सार्वजनिक वाचनालय भोजडे येथे सुरू करण्यात आलेले आहे. फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे व प्राचार्य राजेंद्र बर्डे ,शारदा शैक्षणिक संकुल राहाता व सरपंच यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गोर्डे होते.

यावेळी धोत्रे येथील विरभद्र हायस्कूल मुलांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल मोटार व इलेक्ट्रीक साहित्यासाठी रू. १५ हजारांची देणगी देण्यात आली. सूत्रसंचालन व्यंकट धट यांनी केले. पाहुण्यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. संदीप कैलास मंचरे यांच्या प्रेरणेने हे वाचनालय सुरू झाले. यावेळी मुकूंद सिनगर, दिलीप देवकर, चारूदत्त क्षीरसागर, फौंडेशनचे कर्मचारी संजय सोनवणे, सचिन वाघे व अभिषेक गोर्डे उपस्थित होते. यावेळी प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, अशोक मंचरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारूक पटेल, कैलास घट, निवृत्ती सिनगर, दादासाहेब नाईकवाडे, बाबासाहेब मंचरे उपस्थित होते. सदर वाचनालयाचे व इतर योजनेचे कामकाज अशोक मंचरे पाहणार आहेत.

पुणे ★ रविवार, ५ एप्रिल २०१५ । किंमत ₹ ४

सकाळ



भोजडे : नरेश राऊत फाउंडेशनने सुरू केलेल्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्‌घाटन करताना प्रा. लक्ष्मण गोर्डे. समवेत प्राचार्य राजेंद्र बर्डे, संजय सिनगर.

# राऊत फाउंडेशनतर्फे शाळेला वीजपंप

**शिर्डी, ता. ४ :** नरेश राऊत फाउंडेशनतर्फे घोत्रे प्राथमिक शाळेतील कूपनलिकेसाठी विद्युतपंप व इतर साहित्यासाठी १५ हजार रुपयांची मदत देण्यात आली. फाउंडेशनने ग्रामीण भागातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विविध सुविधा देण्यावर भर दिला आहे, अशी माहिती सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

फाउंडेशनतर्फे भोजडे येथे सुरू करण्यात आलेल्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्‌घाटन प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी प्रा. गोर्डे बोलत होते. या वेळी उपसरपंच संजय सिनगर, संदीप मंचरे, मुकुंद सिनगर, चारुदत्त क्षीरसागर, संजय सोनावणे, सचिन वाघे, अभिषेक गोर्डे आदी उपस्थित होते.

प्राचार्य बर्डे म्हणाले, "उद्योगपती नरेश राऊत यांनी सामाजिक बांधिलकीतून ग्रामीण मुलांसाठी शैक्षणिक उपक्रम हाती घेतले. सचिव प्रा. गोर्डे यांच्या पुढाकारातून सहा गावात सार्वजनिक वाचनालये सुरू केली. विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक प्रशिक्षण दिले जाते. गुणवत्ता शोध व सुधार प्रकल्प राबविला जातो."

या वेळी प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारुक पटेल, कैलास धट, निवृत्ती सिनगर आदी उपस्थित होते.

स्थापना १९३९
७५
अमृतमहोत्सवी दैनिक
अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com
नगर
सोमवार | ६ एप्रिल २०१५ | स्थापना वर्ष ७७ वे | आवृत्ती वर्ष ९ | मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाच वेळी प्रसिद्ध



राहाता : राहाता येथील नरेश फाउंडेशनच्यातीने केलवड येथे सुरू केलेल्या वाचनालयाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. लक्ष्मण गोर्डे, प्राचार्य राजेंद्र बर्डे आदी.

## राऊत फाऊंडेशनच्यावतीने वाचनालय सुरू

राहाता : श्री नरेश राऊत फाऊंडेशन केलवड संचलित मोफत सार्वजनिक वाचनालय भोजाडे येथे सुरू करण्यात आलेले आहे. फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे व प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते या वाचनालयाचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. यावेळी धोत्रे येथील वीरभद्र हायस्कूल मुलांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल मोटार व इलेक्ट्रीक साहित्यासाठी १५ हजारांची देणगी देण्यात आली. यावेळी मुकुंद सिनगर, दिलीप देवकर, चारूदत्त क्षीरसागर, फाऊंडेशनचे कर्मचारी संजय सोनवणे, सचिन वाघे व अभिषेक गोर्डे तसेच ग्रामस्थ प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, अशोक नवरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारूक पटेल, कैलास घट, निवृत्ती सिनगर, दादासाहेब नाईकवाडी आदी उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन व्यंकट घट यांनी केले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

मंगळवार, दिनांक २८ एप्रिल २०१५

नरेश राऊत फौंडेशनचा उपक्रम

# महिलांना मोफत प्रशिक्षण

**अस्तगाव (वार्ताहर)** – आदर्श गाव योजनेकडे वाटचाल सुरु असलेले राहाता तालुक्यातील जळगाव हे नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने दत्तक घेतले आहे. या गावात महिलांसाठी मोफत शिवणकाम, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, संगणक या प्रशिक्षणाचे उद्घाटन फौंडेशनच्या उपाध्यक्षा सौ. मिना राउत यांच्या सह २० महिला उद्योजिकांनी केले. यावेळी फौंडेशनच्या वतीन येथील प्राथमिक शाळेला तसेच स्मशानभुमिला पाण्याच्या टाक्या स्टँडसह देण्यात आल्या.

जळगावला नरेश राउत फौंडेशनच्या वतीने भव्य महिला मेळावा ही घेण्यात आला. प्रारंभी नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, तसेच त्यांचे सर्व कर्मचारी, मुंबईतील उद्योजिका यांचे जळगाव च्या वतीने स्वागत करण्यात आले. ढोल, ताशा, लेझीम पथकासह गावातुन मिरवणुक काढण्यात आली.

यावेळी झालेल्या महिला मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच सौ. सुनिता सुरेश चौधरी या होत्या. फौंडेशनच्या उपाध्यक्षा सौ. मिनाताई राउत, सौ. लता चुरी, सौ. उमा राउत, कु. शुभांगी चौधरी, सौ. वैजयंती चौधरी, अक्षदा चौधरी, सरपंच संपतराव चौधरी, तंटामुक्तीचे अध्यक्ष गंगाधर चौधरी, गणेश कारखान्याचे माजी संचालक भाउसाहेब चौधरी, राहाता येथील शारदा संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे, यांचेसह ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ७८ । वर्ष ४० वे । बुधवार, दि. ८ एप्रिल २०१५ । पाने १४

# धोत्रे येथे मोफत वाचनालय सुरु



अस्तगाव (वार्ताहर)- केलवड येथील नरेश राउत फाऊंडेशनच्या माध्यामातुन धोत्रे येथे मोफत सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात आले आहे. फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे व शारदा शैक्षणिक संकुलांचे प्राचार्य राजेंद्र बर्डे यांचे हस्ते या वाचनालयाचे उद्‌घाटन करण्यात आले.

यावेळी धोत्रे येथील विरभद्र विद्यालयाच्या मुलांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल मोटार व इलेक्ट्रिक साहित्यासाठी १५ हजाराची देणगी देण्यात आली. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मुकूंद सिनगुर, दिलीप देवकर, चारुदत्त क्षिरसागर, फौंडेशनचे कर्मचारी संजय सोनवणे, संचिन वाघे, व अभिषेक गोर्डे उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य राजेंद्र बर्डे यांचेही भाषण झाले. सुत्रसंचालन व्यंकट धट यांनी केले. संदिप मचरे यांच्या प्रयत्नातुन धोत्रे येथे वाचनालय सुरु झाले.

याप्रसंगी प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, अशोक मंचरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारुकभाई पटेल, कैलास धट, निवृत्ती सिनगर, दादासाहेब नाईकवाडे, बाबसाहेब मंचरे, अदि उपस्थित होते.

वर्ष : १३५

Regd. No. PCW/002/2015-2017 RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

● अंक ९७ ● पृष्ठे : ६ + ४ ● तीन रुपये ● गुरुवार, ९ एप्रिल २०१५, पुणे C (अहमदनगर जनता आवृत्ती)★★





केलवड येथील नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने भोजडे येथे मोफत सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन शारदा शैक्षणिक संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. लक्ष्मण गोर्डे व भोजडे ग्रामपंचायतीचे सरपंच उपस्थित होते. (छाया : शुभम करमासे)

# भोजडे येथे नरेश फौंडेशनने सुरू केले सार्वजनिक वाचनालय

राहाता (वार्ताहर) : तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने भोजडे येथे सार्वजनिक वाचनालय सुरू करण्यात आले असून, त्याचबरोबर प्राथमिक शाळेतील कूपनलिकेसाठी विद्युत पंप व इतर इलेक्ट्रीक साहित्यासाठी १५ हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे, अशी माहिती फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

फौंडेशनच्यावतीने भोजडे येथे सुरु करण्यात आलेल्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी उपसरपंच संजय सिनगर, संदीप मंचरे, दिलीप देवकर, चारुदत्त क्षीरसागर, संजय सोनवणे, सचिन वाघे, अभिषेक गोर्डे आदी उपस्थित होते.

प्राचार्य बर्डे यावेळी बोलताना म्हणाले, नरेश राऊत फौंडेशनने सामाजिक बांधिलकीतून ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम हाती घेतले आहेत. प्रा. गोर्डे यांच्या पुढाकारातून सार्वजनिक वाचनालये सुरु केली आहेत. विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक प्रशिक्षण दिले जाते. टॅलेंट सर्च उपक्रमातून शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबीर राबविण्यात आले आहे.

यावेळी प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, अशोक मंचरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारुकभाई पटेल, कैलास धट, निवृत्ती सिनगर, दादासाहेब नाईकवाडे,. बाबासाहेब मंचरे उपस्थित होते.

नवीं आशा नवीं दिशा
सार्वमत
अहमदनगर
मंगळवार, दिनांक १८ ऑगस्ट २०१५

## नरेश राऊत फाउंडेशन महिलांसाठी

# केलवडला सॅनिटरी नॅपकिन प्रकल्प उभारणार : प्रा. गोर्डे



अस्तगाव (वार्ताहर)- नरेश राउत फाउंडेशन केलवड येथे महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन प्रकल्प उभारणार आहे. ना नफा ना तोटा या तत्वावर हा प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. यावेळी फाउंडेशनच्या महिला विभागाच्या अध्यक्षा सौ. सुनीता लक्ष्मण गोर्डे या उपस्थित होत्या.

ग्रामीण भागात फाउंडेशनच्या माध्यामातुन विविध सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक उपक्रम राबवुन फाउंडेशन सामाजिक उपक्रमांत अग्रेसर ठरत आहे. महिलांसाठी मोफत संगणक क्लास, शालेय मोफत क्लास, इतर उपक्रम ही राबविले जात आहेत. आता महिलांना रोजगार मिळावा, तसेच महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन निर्मीती प्रकल्प उभारण्याचे फाउंडेशनने निश्चीत केले आहे. त्याची माहिती देतांना प्रा. गोर्डे म्हणाले, नरेश राऊत फाउंडेशनने निव्वळ ग्रामीण भागातच आपले उपक्रम राबविलेले नाहीत तर गुजरात राज्यातील डांग जिल्ह्यात ही आदिवासीसांठी काही उपक्रम सुरू केले आहेत. असेच ते अदिवासी भागात फिरत असताना त्यांना त्या भागात काही कपड्यांतून दुर्गंधी येत असल्याची जाणवली. त्याबाबत माहिती घेत त्यांनी या माहिलांना मोफत सॅनिटरी नॅपकिन देण्याची मनाशी खुणगाठ बांधली. आणि फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांना याबाबातचा विचार सांगून त्यांनी हा महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन बनविण्याचा प्रकल्प उभारण्याचे ठरविण्यात येऊन त्यादृष्टीने हालचाली सुरू केल्या. केलवड येथे यासाठी खास इमारत उभारणी करून त्यात हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यातून महिलांना रोजगार ही उपलब्ध होणार आहे.

२३ सप्टेंबरपासुन या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल असा विश्वास प्रा.गोर्डे यांनी व्यक्त केला.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अंक ३५९ । वर्ष ४० वे । सोमवार, दि. १८ जानेवारी २०१६ । पाने १६

## नरेश राऊत फाउंडेशनचे पुरस्कार जाहीर

## पोपटराव पवारांना महाराष्ट्र रत्न

# विखे कारखान्यास आदर्श कारखाना पुरस्कार

अस्तगाव (वार्ताहर) – राहाता तालुक्यातील केलवड येथील श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध संस्थांना दिले जाणारे पुरस्कार जाहीर झाले आहेत. आदर्शगाव हिवरे बाजार येथील पोपटराव पवार यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार तर अशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्यास आदर्श कारखाना पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

हे पुरस्कार गुरुवार दि. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता केलवड येथे सराला बेटाचे प्रमुख महंत रामगिरी महाराज, आदर्श ग्राम योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, उद्योजक नरेश राऊत आदींच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहे.

श्री. पवार व पद्मश्री विखे पाटील कारखान्यांसह राहात्याचे तहसीलदार सुभाष दळवी यांना आदर्श महसूल कार्य प्रणालीबद्दल पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच राहाता पंचायत समिती आदर्श पुरस्कार देण्यात येणार असून तो सभापती सौ. बेबीताई आगलावे स्वीकारणार आहेत. राहाता तालुका प्रेस क्लबला आदर्श पत्रकारिता पुरस्कार देण्यात येणार आहे.

सर्वोत्तम सारथी हा पुरस्कार सरला बेटातील मधुकर महाराज यांना देण्यात येणार आहे. तसेच उद्योगपती रमाकांत बारी यांनी उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. आदर्श शैक्षणिक संकूल पुरस्कार सात्रळच्या रयतच्या श्री नानासाहेब सहादू कडू पाटील विद्यालयास देण्यात येणार आहे. राहात्याच्या स्त्री शक्ती लोकसंचालित साधना केंद्रास आम्ही सावित्रीच्या लेकी हा पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच आदर्श यात्रा कमिटी म्हणून केलवडच्या बिरोबा यात्रा कमिटीचा गौरव करण्यात येणार आहे. आदर्श गाव नियोजन हा पुरस्कार जळगाव ग्रामपंचायतीला देण्यात येणार आहे, असे ११ पुरस्कारांचे यावेळी वितरण होणार आहे.

ट्रॉफी व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. या सोहळ्यास गटविकास अधिकारी सुदर्शन तुपे, पोलीस निरीक्षक सुरेश बेंद्रे, माजी कामगार पोलीस पाटील सुभाषराव गमे पा., शारदा संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे आदी उपस्थित राहाणार आहेत. या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उद्योजक नरेश राऊत, सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी केले आहे.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
। अंक ४६ । वर्ष ४१ वे । शनिवार, दि. ५ मार्च २०१६ । पाने १४

# केलवड शाळेला आयएसओ

**अस्तगाव (वार्ताहर) –** राहाता तालुक्यातील केलवड येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला आयएसओ मानांकन मिळाले आहे. केलवड ग्रामस्थ तसेच नरेश राउत फाउंडेशनच्यावतीने या शाळेला मदत करण्यात आली होती.

शाळांना लोकसहभागातून भौतिक सुविधा उपलब्धता झाल्यानंतर शाळांना आयएसओ मानांकन मिळते. शाळेच्या शिक्षकांनी तसेच स्थानिक शाळा समितीच्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नातून शाळेला विविध सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. या शाळेला पिण्याच्या पाण्यासाठी सबमर्सिबल विद्युत पंप आदी सुविधा देगणीदारांच्या माध्यमातून प्राप्त झाल्या.



केलवड शाळेला मदत सुपूर्द करताना ग्रामस्थ.

या शाळेत नुकताच देणगी प्रदान व दानशूर व्यक्तिंचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पंचायत समितीच्या सभापती सौ. सुवर्णाताई आगलावे, पंचायत समितीचे सदस्य पोपटराव वाणी, गटशिक्षणाधिकारी श्रीमती मीना शिवगुंडे, शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर वाकचौरे, लक्ष्मण गोर्डे, कामगार पोलिस पाटील सुरेश गमे, बाजार समितीचे संचालक प्रा. सुनील गमे, बाबासाहेब गमे, भारत राउत, काळू रजपूत, केलवड सेवा संस्थेचे अध्यक्ष गंगाधर गमे, बापुसाहेब राउत, अंजाबापू जटाड, दत्तात्रेय गोसावी, संजय गोडगे, शाळा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत गमे, केंद्र प्रमुख चंद्रकांत शिंदे, ज्ञानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एम. वाघे, अण्णासाहेब गमे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विलास वाकचौरे यांचेसह शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी लक्ष्मण गोर्डे यांनी शाळेला देनगी दिली.

अहमदनगर । सोमवार, १४ मार्च २०१६ । वर्ष : १४ । अंक : ३४३ । किंमत : ४.०० । पाने : १२+४

पुण्य नगरी

# राऊत फाऊंडेशनतर्फे मोफत टँकरने पाणीपुरवठा



राहाता/प्रतिनिधी

नरेश राऊत फाऊंडेशन, केलवड यांच्या मार्फत विकत पाणी घेऊन जळगाव (ता.राहाता) येथे मोफत टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. मोफत पाणीपुरवठा टँकरचे उद्घाटन फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. जळगाव हे गाव फाऊंडेशनने दत्तक घेतले आहे. फाऊंडेश्नचे विधायक व सामाजिक कार्य खूपच पारदर्शी आहे, असे ज्येष्ठ नेते गंगाधर भिवाजी चौधरी चौधरी, भाऊसाहेब चौधरी व इतर ग्रामस्थांनी आपल्या भाषणात सूचित केले.

यावेळी माजी सरपंच सुमनताई वैराळ, तंटामुक्तीचे अध्यक्ष संपतराव चौधरी, जबाजी चौधरी, सुरेश चौधरी व सर्व ग्रामपंचायत सदस्य, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रभात

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

पुणे । सोमवार । दि. १४ मार्च २०१६ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९, वर्ष ८५, अंक : ७३ । www.epr




प्रभात सोमवार, दि. १४ मार्च २०१६

## नरेश राऊत फाऊंडेशनचा पाणी टँकर




राहाता : तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनकडून तालुक्यातील जळगाव येथे टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा सुरू आहे. पाणी वाटपाची सुरुवात प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या हस्ते नुकतीच करण्यात आली. यावेळी गंगाधर चौधरी, भाऊसाहेब चौधरी, सरपंच सुमन वैराळ, तंटामुक्ती अध्यक्ष नाथाजी चौधरी, जबाजी चौधरी, सुरेश चौधरी आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रभात

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

पुणे । सोमवार । दि. २८ मार्च २०१६

PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८५, अंक : ८६ । W

# केलवड येथे राऊत फाऊंडेशनकडून पाणी पुरवठा




राहाता, दि. २७ (प्रतिनिधी) - राहाता तालुक्यातील केलवड येथे नरेश राऊत फाऊंडेशनने टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा सुरू केला आहे. राऊत फाऊंडेशनने केलवड येथील ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठे योगदान दिल्याचे यावेळी सांगितले.

विखे कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे यावेळी उपस्थित होते. नरेश राऊत फाऊंडेशनद्वरे गेल्या काही दिवसांपासून केलवड गावासाठी मोफत पिण्याचे पाणी टँकरद्वारे पुरविले जाते. या उपक्रमाला युवा नेते सुजय विखे यांनी भेट देऊन फाऊंडेशनचे सचिव प्राध्यापक लक्ष्मण गोर्डे यांचे कौतुक केले. नरेश राऊत फाऊंडेशनद्वारे अनेक प्रकारचे विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण, महिलांसाठी ब्युटी पार्लर कोर्सेस, जळगाव हे विकासकामांसाठी राऊत फाऊंडेशनने दत्तक घेतले आहे. तेथे ही अनेक प्रकारचे संस्थेचे उपक्रम सुरू आहेत. याबाबतची माहिती प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी विखे यांना दिली. यावेळी केलवंड गावातील सुभाष गमे, सुरेश गमे, भास्कर घोरपडे, बाळासाहेब गमे, अयोध्या युवक संघटनेचे कार्यकर्ते, नरेश राऊत फाऊंडेशनचे कर्मचारी व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अंक ६८ । वर्ष ४१ वे । सोमवार, दि. २८ मार्च २०१६ । पाने १६

# केलवडला शिवजयंती साजरी



केलवड येथे डॉ. सुजय विखे यांच्या हस्ते शिवरायांचे पुतळयाचे पूजन करण्यात आले. यावेळी नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे आदी उपस्थित होते.

**अस्तगाव (वार्ताहर)** - राहाता तालुक्यातील केलवड येथे. अयोध्या युवक संघटनेच्या पुढाकाराने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवनेरी ते केलवड शिवज्योत आणण्यात आली होती. युवा नेते डॉ. सुजय विखे यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

अयोध्येत युवक संघटनेच्या ३५ कार्यकर्त्यांनी पायी शिवज्योत आणली. या ज्योतीचे केलवड गावात भव्य स्वागत होऊन शिवज्योतीची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत युवा नेते डॉ. सुजय विखे, नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, यांच्यासह ग्रामस्थ सहभागी झाले होते. डॉ. विखे यांनी अयोध्या संघटनेचे अध्यक्ष विशाल वाघे, उपाध्यक्ष दत्तात्रय गोर्डे, कार्याध्यक्ष दीपक वाघे, सचिव संतोष गमे, खजिनदार सिध्देश्वर शेपाळ, सल्लागार अंजाबापू जटाड, संदीप वाघे व त्यांच्या सर्व सदस्यांचे कौतुक केले. या संघटनेला नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सहकार्य केले.

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
| अंक ८३ | वर्ष ४१ वे | मंगळवार, दि. १२ एप्रिल २०१६ | पाने १२

## डॉ. सुजय विखे, नरेश राऊत फाउंडेशनच्या मदतीमुळे

# केलवडचा साठवण तलाव भरला

अस्तगाव (वार्ताहर) - पाण्याची तीव्र टंचाई असलेल्या केलवडच्या पाणी योजनेच्या साठवण तलावात गोदावरी कालव्यातून पाणी सोडल्याने या गावाचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न किमान दोन महिन्यांसाठी तरी सुटला आहे. गोदावरी कालव्यावरून या साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी युवा नेते डॉ. सुजय विखे पाटील यांनी जनरेटर व डिझेल ची सोय केल्याने या तलावात पाणी सुटू शकले. नरेश राउत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनीही डिझेलसाठी ५० हजारांची मदत दिल्याने मोठा आधार मिळाला आहे. विशेष म्हणजे पाण्याच्या प्रश्नावर केलवडकर मंडळी गटतट सोडून एकत्र आली आहेत.



केलवडच्या साठवण तलावात गोदावरी कालव्यातून पाणी सोडले आहे. (छाया : अमोल कहांडळ)

गोदावरी कालव्यातून या केलवडच्या पाणी योजनेच्या साठवण तलावात सरळ पाणी सोडण्याची सुविधा नाही. परिणामी जलसिंचन योजनेमार्फत हा साठवण तलाव भरला जातो. परंतु पिण्याच्या पाण्याच्या आवर्तन काळात वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने या योजनेचे विद्युतपंप सुरू होत नाहीत. परिणामी योजना बंद राहते. तीव्र दुष्काळी टापूत असलेल्या या गावाच्या पाणी योजनेत पाणी जाऊ शकत नाही. यासाठी गेल्या दोन तीन वर्षांपासून युवा नेते डॉ. सुजय विखे पाटील हे या योजनेसाठी जनरेटर, तसेच त्यासाठी लागणारे डिझेल पुरवितात. यावर्षीही त्यांनी ग्रामस्थांच्या आग्रहानुसार ते पुरविले. केलवड चे नरेश राउत फाउंडेशननेही केलवडकरांना दुष्काळात मदत व्हावी म्हणुन दररोज टँकरद्वारे पाणी विकत घेऊन ते तीन खेपा पिण्याच्या पाण्याच्या करतात. यासाठी लाखाहून अधिक रक्कम त्यांची खर्ची पडली आहे. याशिवाय साठवण तलावात पाणी आणण्यासाठी जनरेटरला त्यांनी ५० हजार रुपये खर्च केले आहेत. केलवडचा हा साठवण तलाव जवळपास भरत आला आहे, अशी माहिती सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

दरम्यान गावातील साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य एकत्र येवुन ते रात्रभर कालव्यावर पंपहाउस जवळ थांबुन राहातात. पाण्यासाठी सर्व गाव एकवटले असल्याचे चित्र आहे. उपसरपंच सौ. जिजाबाई काळु रजपुत यांचेसह सर्व सदस्यांनी डॉ. विखे व नरेश राउत फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचे आभार मानले आहे. सदस्य भारत राऊत, दीपक कांदळकर, गोरख वाघे, आप्पा सोनवणे, संजय गोडगे, रमेश घोरपडे, दत्तू गोसावी, शिवाजी गमे, बी. टी. गमे, भागवतराव कांदळकर, राजेंद्र रोहोम आदींनी पाण्यासाठी प्रयत्न केले.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अंक ८७ । वर्ष ४१ वे । शनिवार, दि. १६ एप्रिल २०१६ । पाने १६

## केलवडला डॉ. आंबेडकर जयंतीनिमित उपक्रम

# सव्वा लाख लिटर पाणी वाटप



केलवड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त स्मारक समितीने सव्वा लाख लीटर पाण्याचे मोफत वाटप केले. यावेळी नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, पोलीस निरीक्षक सुरेश बेंद्रे व मान्यवर.

अस्तगाव (वार्ताहर)– राहाता तालुक्यातील केलवड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित सव्वा लाख लिटर पिण्याच्या पाण्याचे मोफत वाटप केले.

केलवडच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्यावतीने हे पाणी वाटप टँकरद्वारे केले. केलवड गावठाण तसेच वाड्या वस्त्यांवर टँकर नेऊन तेथे पाण्याचे वाटप ११ टँकरद्वारे केले. दुष्काळात आगळा वेगळा उपक्रम नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी जयंती सोहळ्यास ३१ हजार रुपये यावेळी दिले. केलवडच्या ब्ल्यू डायमंड ग्रुपने येवला ते केलवड अशी भीमज्योत आणली या ज्योतीचे स्वागत नरेश राउत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी स्वागत केले. श्रीज्ञानेश्वर विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन यावेळी करण्यात आले. तर केलवड गावात डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन राहात्याचे तहसीलदार सुभाष दळवी, पोलीस निरीक्षक सुरेश बेंद्रे, सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या हस्ते पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गणेशचे संचालक बबनराव बनसोडे, मुख्याध्यापक डी. एम. वाघे, सुभाषराव गमे पाटील, पोलीस पाटील सुरेशराव गमे पाटील, संजय गोडगे, आप्पासाहेब सोनवणे, भाउसाहेब कोळगे, दिलीप सोनवणे, बबनराव गोडगे, विजय सोनवणे, माजी सरपंच लक्ष्मण सोनवणे, बौध्दाचार्य निवृत्ती सोनवणे, नामदेव सोनवणे, संजय सोनवणे, ग्रामपंचायतीचे उपसरपंच, व सर्व सदस्य, ग्रामस्थ, सेवा संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.

ई पेपर : epunyanagari.com

पुण्य नगरी

अहमदनगर, बुधवार, १३ मे २०१५ वर्ष :१४, अंक : ४२ पाने : १२+४ किंमत : ४ रुपये

# जळगाव घेतले नरेश राऊत फाऊंडेशनने दत्तक

राहाता/प्रतिनिधी

नरेश राऊत फाऊंडेशन या संस्थेने तालुक्यातील जळगाव हे गाव दत्तक घेतले असून येथे भव्य महिला मेळाव्याचे आयोजन केले. या मेळाव्यासाठी संस्थेच्या उपाध्यक्ष मीना राऊत, लता चुरी, उमा राऊत यांच्यासह मुंबई येथून सुमारे २० महिला उद्योजकांनी सहभाग घेतला. ग्रामस्थांनी सर्व पाहुण्यांचे ढोल ताशाच्या गजरात जंगी स्वागत केले. दत्तक म्हणून घेतल्या या जळगाव गावात शाळेच्या पाण्याची टाकी, अमरधामची सोय मुलींसाठी, ब्युटी पार्लर, शिवणकाम व संगणक शिक्षण देणारे महिला प्रशिक्षण केंद्र फाऊंडेशनच्या वतीने सुरू करून त्याचे उद्घाटन करण्यात आले. सरपंच सुनिता चौधरी यांनी नरेश राऊत फाऊंडेशनच्या कार्याचा गौरव करीत महिलांनी स्वावलंबी बनावे, असा संदेश व्यक्त केला. फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा मीनाताई राऊत यांनी जळगाव येथील ग्रामस्थांचे सहकार्य व कामाचे कौतुक केले.

याप्रसंगी गंगाधर चौधरी, संपत चौधरी, गणेशचे संचालक भाऊसाहेब चौधरी फाऊंडेशनचे सचिव लक्ष्मण गोर्डे, शारदाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे आदी उपस्थित होते. भाऊसाहेब चौंधरी यांनी आभार व्यक्त केले.



राहाता- नरेश राऊत फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने तालुक्यातील जळगाव हे गाव दत्तक घेतले. तेथील पाण्याच्या टाकीचे उद्घाटन करताना संस्थेच्या पदाधिकारी व ग्रामस्थ महिला.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
पुणे । गुरुवार । दि. १४ मे २०१५
PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९, वर्ष ८४, अंक : १३१ । www.epra

# महिलांनी स्वावलंबी व्हावे: चौधरी

## महिला मेळावा : राऊत फाउंडेशनकडून जळगाव दत्तक

राहाता, दि. १३ (प्रतिनिधी) - 'या संगणक युगात आधुनिक तंत्रज्ञानाची साधने विकसित होत असताना महिलांनी विविध क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. पुरुषांच्या बरोबरीने महिलांनी कार्यक्षमता सिद्ध करून स्वावलंबी व्हावे,' असे आवाहन सरपंच सुनीता चौधरी यांनी केले.



राहाता तालुक्यातील जळगाव हे गाव नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने दत्तक घेण्यात आले. त्यावेळी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते; यावेळी जळगावच्या सरपंच चौधरी बोलत होत्या. त्यांनी नरेश राऊत फाउंडेशनच्या कार्याचा गौरव केला. यावेळी फाउंडेशनच्या उपाध्यक्षा मीनाताई राऊत यांनी जळगाव ग्रामस्थांचे कौतुक केले. मुंबई येथील मीना राऊत यांच्यासह लता चुरी, उमा राऊत यांसह सुमारे २० महिला उद्योजकांनी सहभाग नोंदविला. जळगावच्या ग्रामस्थांनी मेळाव्याला आलेल्या महिलांचे ढोलताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतषबाजीत व गुलालाची उधळण करीत उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

उद्योजक नरेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कार्य हाती घेण्यात येते. गावात शाळेला पाण्याची टाकी देण्यात आली. तर, अमरधाममध्ये पाण्याची टाकी बसविण्यात आली. मुलींसाठी ब्युटीपार्लर, शिवणकाम व संगणक शिक्षण देण्यात येणार असून फाउंडेशनच्या वतीने महिला प्रशिक्षण केंद्र सुरू केले. सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, गंगाधर चौधरी, संपत चौधरी, भाऊसाहेब चौधरी, प्राचार्य राजेंद्र बर्डे, उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ११५ । वर्ष ४३ वे । बुधवार, १६ मे २०१८ । पाने १६

# नरेश राऊत फाउंडेशनच्या पुढाकाराने ऑगस्टमध्ये सॅनेटरी नॅपकिन निर्मिती

अस्तगाव (वार्ताहर) – नरेश राऊत फाउंडेशनच्या मार्फत केलवड येथे सॅनेटरी नॅपकिन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यासाठी लागणाऱ्या मशिनरींची खरेदी केली असून हा प्रकल्प ऑगस्टच्या दरम्यान प्रत्यक्षात कार्यान्वित होईल, अशी माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.



नरेश राऊत फाउंडेशन ही सामाजिक संस्था आहे. भारत स्वच्छता अभियानांतर्गत सामाजिक दायित्व म्हणून महिलांची जनजागृती यासाठी फाउंडेशन हा प्रकल्प ना नफा ना तोटा या तत्वावर राबविणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून २५० महिलांना रोजगार मिळणार आहे.

केलवड सारख्या ग्रामीण भागातील मुली महिलांना या नॅपकिनचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. राहाता तालुक्यातील सर्व कॉलेज, विद्यालयांना १० टक्के मोफत देण्यात येणार आहे. अन्यत्र नाममात्र शुल्क घेऊन ना नफा ना तोटा तत्वावर हे नॅपकिन वितरित करण्यात येणार आहे. या नॅपकिनसाठी लागणारा कापूस मलेशियातून आयात करण्यात येणार आहे. तसेच सॅनेटरी नॅपकिनची विक्री होण्यासाठी वितरक स्वत: होऊन याठिकाणी येऊन खरेदी करणार आहेत. शासनस्तरावर ग्रामपंचायतींना याबाबत अनुदान मिळत असेल तर ग्रामपंचायतींना पुरवठा करण्यात येईल. या प्रकल्पासाठी फाउंडेशनने इमारत उभारणी सुरू केली आहे. हे काम अंतिम टप्प्यात आहे. यंत्र खरेदी केली आहे. सुरुवातीला काही महिने कोईमतुर वरून खास तज्ज्ञ येणार असून ते महिलांना प्रशिक्षित करणार आहेत. दिवसाला तीन हजार पॅडची निर्मिती होऊ शकते. अशी या प्रकल्पाची क्षमता आहे. नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत, तसेच उपाध्यक्षा सौ. मीनाताई यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य या सामाजिक कामासाठी लाभत आहे. त्यांच्याच कल्पक विचारातून हा प्रकल्प साकारत आहे.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
। अंक ११९ । वर्ष ४१ वे । गुरुवार, दि. १९ मे २०१६ । पाने १६

# नरेश राऊत फाउंडेशनच्या शिबिराचा १७५ रुग्णांनी घेतला लाभ



नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने केलवड येथे आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिरप्रसंगी रुग्णांची तपासणी करताना डॉ. दुर्शिंग. समवेत उद्योजक नरेश राऊत.

**अस्तगाव (वार्ताहर)** – राहाता तालुक्यातील केलवड येथील श्री. नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने घेण्यात आलेल्या मोफत नेत्र चिकित्सा शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. या शिबिरात सुमारे १७५ रुग्णांनी लाभ घेतला.

या शिबिराचे उद्‌घाटन फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. आर. डी. दुर्शिंग व सौ. दुर्शिंग यांनी डोळ्यांची तपासणी केली. त्यांनी मोतीबिंदू, काचबिंदू तपासणी करणे तसेच इतर किरकोळ डोळ्यांच्या विकारावर उपचार करणे, डोळ्यातून पाणी येणे, डोळ्यांतील खुपऱ्या, चष्म्याद्वारे दृष्टी दोष घालविणे आदी नेत्र आजारावर उपचार केले.

नरेश राऊत म्हणाले, आजारी व्यक्तीची सेवा हीच ईश्वर सेवा होय. त्याच प्रेरणेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी फाउंडेशन राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, फाउंडेशनने विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले असून ग्रामीण भागात समाजसेवा करणे हाच या मागचा हेतू आहे. उद्योजक राऊत यांना समाजसेवेची आवड असल्याने फाउंडेशन विविध उपक्रम राबवित आहे.

या कार्यक्रमास बाजार समितीचे संचालक प्रा. सुनील गमे, सरपंच पती रमेश घोरपडे, शिवाजी गमे, अप्पासाहेब सोनवणे, दत्तात्रय गोसावी, बाळासाहेब तुळशीराम गमे तसेच सुभाष गमे, तबाजी घोरपडे, पी. डी. गमे, बाबासाहेब गमे, संदीप गमे, नरेश राऊत फाउंडेशनचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी
www.gavakari.net
सोमवार दि. २० जून २०१६ ■ वर्ष ७२ ■ अंक २८७ ■ किंमत रु. २.०० ■ पाने ८ ■ अहमदनगर

# नरेश राऊत फौऊंडेशनच्यावतीने जळगावला जलक्रांती अभियान



राहाता (प्रतिनिधी)- राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राउत फौंडेशन व जळगाव ग्रामस्थ यांच्या सहभागातून जळगावला जलक्रांती अभियान राबविण्यात आले आहे, ही माहिती नरेश राऊत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

राहाता तालुक्यात ग्रामस्थांचा एकोपा असलेले आदर्श ग्राम [illegible]वच्या ग्रामस्थांसह नरेश राऊत फौंडेशनने दुष्काळावर मात करण्यासाठी हा सामाजिक उपक्रम राबविला आहे. या गावातील ग्रामस्थांनीही या उपक्रमास भरभरुन प्रतिसाद दिला आहे.

प्रति एकरी ५०० रुपये या प्रमाणे निधी ग्रामस्थांनी गोळा केला. उर्वरित निधीची जबाबदारी नरेश राउत फौंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी उचलला. नरेश राउत फौंडेशनने जळगाव हे गाव दत्तक घेतले आहे. विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. जलसंधारण कामात तरुणांनी पुढाकार घेतला आहे. गेले १५ दिवसांपासून जलसंधारणाचे काम आहोरात्र सुरु असून आतापर्यंत २.५ किमी लांबीचा नाला ३५ फूट रुंद व ५ फूट खोलीचा पूर्ण झाला आहे. उर्वरित २.५ किमी लांबीच्या नाल्याचे काम येत्या ८ दिवसात पूर्ण होणार आहे.

तसेच गावातील छोटी मोठी धरुन एकुण १२ बंधारे त्यांच्या खोलिकरणाचे काम करण्यात येणार आहे. माझे गाव, माझे पाणी, या उक्तीप्रमाणे वरुणराजाने कृपा केल्यास जलसमृध्द ग्रामच्या दिशेने जळगावची वाटचाल सुरु होणार आहे. जळगावला सहकार्य करणारे नरेश राउत फौंडेशनचे अध्यक्ष नरेश राउत व सेक्रेटरी प्रा.लक्ष्मण गोर्डे हे गावाच्या दृष्टीकोनातून जलदुतच ठरले आहेत.

प्रभात

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

पुणे । रविवार । दि. १९ जून २०१६ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८५, अंक : १६८ ।


# जळगावला जलक्रांती अभियानांतर्गत जलसंधारणाची कामे

## लक्ष्मण गोर्डे यांची माहिती : नरेश राऊत फाऊंडेशन, ग्रामस्थांचा सहभाग

राहाता, दि. १८ (प्रतिनिधी) - राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राउत फाऊंडेशन व जळगाव ग्रामस्थ यांच्या सहभागातून जलक्रांती अभियान राबविण्यात येऊन जलसंधारणाची कामे सुरू असल्याची माहिती नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

ग्रामस्थांचा एकोपा असलेले अ[illegible]ाम जळगावच्या ग्रामस्थांसह नरेश राउत फाऊंडेशनने दुष्काळावर मात करण्यासाठी हा सामाजिक उपक्रम राबविला आहे. ग्रामस्थांनीही

**२.५ किमीच्या नाल्याचे ८ दिवसात काम पूर्ण होणार**

या उपक्रमास भरभरुन प्रतिसाद दिला आहे. प्रति एकरी ५०० रुपये या प्रमाणे निधी ग्रामस्थांनी गोळा केला. उर्वरित निधीची जबाबदारी नरेश राउत फाऊंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राउत, फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी उचलला. नरेश राउत फौंडिशनने जळगाव दत्तक घेतले आहे. विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. जलसंधारण कामात तरुणांनी पुढाकार घेतला आहे. गेल्या १५ दिवसांपासून जलसंधारणाचे काम आहोरात्र सुरू आहे. आतापर्यंत २.५ किमी लांबीचा नाला ३५ फूट रुंद व ५ फूट खोलीचे काम पूर्ण झाले आहे.

उर्वरित २.५ किमी लांबीच्या नाल्याचे काम येत्या ८ दिवसात पूर्ण होणार आहे. तसेच गावातील छोटी मोठी असे एकूण १२ बंधारे त्यांच्या खोलिकरणाचे काम करण्यात येणार आहे. माझे गाव, माझे पाणी, या




उक्तीप्रमाणे वरुण राजाने कृपा केल्यास जलसमृध्द ग्रामच्या दिशेने जळगावची वाटचाल सुरू होणार आहे.

जळगावला सहकार्य करणारे नरेश राउत व प्रा.लक्ष्मण गोर्डे हे गावाच्या दृष्टीकोनातून जलदूतच ठरले आहेत.

प्रभात
Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे



# राऊत फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांना खाऊ

राहाता, दि. २० (प्रतिनिधी) - तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने विविध शाळांतील विद्यार्थ्यांना खाऊ आणि स्पर्धेतील बक्षीस म्हणून ५० हजार रुपयांचे वाटप करण्यात आले.

स्वातंत्र्यदिनी हा उपक्रम राबवण्यात आला. विविध विद्यालयांना खाऊ आणि चित्रकला स्पर्धेसाठी दिलेली रक्कम पुढीलप्रमाणे : ज्ञानेश्वर विद्यालय- बालचित्रकला स्पर्धा-१ हजार ३३२ रुपये-खाऊसाठी ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना ६ हजार ३८३ रुपये, एलम बालविकास मंडळ आणि मल्हार ज्युनिअर कॉलेज (वाकडी)- प्रथम तीन क्रमांक-४ हजार ३८० रुपये-खाऊसाठी-४ हजार ३२४ रुपये, जिल्हा परिषद शाळा गमे गोठा-बक्षीस रक्कम आणि खाऊसाठी १ हजार ६२२ रुपये, जिल्हा परिषद शाळा-राऊत वस्ती-पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना

## चित्रकला स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे

पहिल्या तीन क्रमांकासाठी १ हजार ५२२ रुपये, अस्तगाव माथा कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय- खाऊसाठी १० हजार रुपयांची रक्कम, जळगाव जिल्हा परिषद शाळा-प्रथम तीन क्रमांक आणि खाऊसाठी-३ हजार ३३२ रुपये, खडकेवाके जिल्हा परिषद शाळा-४५० रुपये, जिल्हा परिषद वाळकी शाळा-१ हजार रुपये, जिल्हा परिषद शाळा, वाकडी-१ हजार ५०० रुपये, कोऱ्हाळे साईराम कनिष्ठ महाविद्यालय-१ हजार रुपये, केलवड ज्ञानेश्वर विद्यालयाला शिक्षक महेंद्र जेजुरकर यांनी ३ हजार ५५१ रुपये रोख बक्षीस दिले.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
गांवकरी
www.gavakari.net
सोमवार दि. २२ ऑगस्ट २०१६ ■ वर्ष ७२ ■ अंक ३४९ ■ किंमत रु. २.०० ■ पाने ८ ■ अहमदन



### राहाता तालुक्यातील विविध शाळांना

# नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने ५० हजारांचे खाऊ वाटप

राहाता (प्रतिनिधी) - केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेच्यावतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून राहाता तालुक्यातील विविध शाळांना सुमारे ५० हजारांच्या खाऊचे वाटप करण्यात आले आहे, अशी माहिती फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

केलवड ग्रामपंचायतीच्या झेंडावंदनाच्या खांबासाठी ८५०० रुपये दिले. अस्तगांव केंद्रातील केलवडच्या ज्ञानेश्वर विद्यालयात नुकत्याच घेण्यात आलेल्या बालचित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना १३३२ रुपयांची बक्षिसे दिली. तसेच याच विद्यालयातील ५वी ते १० वी पर्यंतच्या प्रत्येक तुकडीतील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली व खाऊसाठी ६३८३ रुपये दिले. एलम बालविकास मंडळ व मल्हार ज्युनिअर कॉलेज वाकडी यांनाही प्रथम तीन क्रमांकासाठी तसेच खाऊसाठी ४३८० रुपये दिले. जि.प. शाळा केलवड यांना पहिल्या तीन विद्यार्थ्यांना बक्षिस रुपाने रोख रक्कम व खाऊसाठी ४३२४ रुपये अशी रककम देण्यात आली. जि.प.शाळा गमे गोटा यांनाही प्रत्येक वर्गासाठी प्रथम तीन बक्षिसे व खाऊसाठी १६२२ रुपये दिले. जि.प. शाळा राऊत वस्ती केलवड १ ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांना पहिल्या तीन क्रमांकासाठी तसेच खाऊसाठी १५२२ रुपयांची मदत दिली. अस्तगांव माथ्यावरील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला खाऊसाठी १० हजारांची रक्कम दिली.

> केलवड येथील नरेश राऊत फौंडिशनचे संस्थापक नरेश राऊत व फौंडिशनचे सचिव प्राध्यापक लक्ष्मणराव गोर्डे हे अनेक गरजू विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या निधीद्वारे मदत करत असतात. तसेच केलवड व जळगांव या गावांसाठी जलक्रांती अभियानामध्ये त्यांनी मोठा सहभाग घेतला आहे. नरेश राऊत फौंडिशनला गेल्या अनेक वर्षापासून विविध पारितोषिक देवून सन्मान करण्यात येत आहे.

जळगांव येथील जि.प. शाळेसाठी प्रथम तीन क्रमांकासाठी तसेच खाऊसाठी ३३३२ रुपये दिले. जि.प. शाळा खडकेवाके येथील विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्गातील तीन विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे व खाऊसाठी ४५० रुपये रोख देण्यात आले. जि.प. शाळा वाळकी यांना खाऊसाठी १००० रुपये, जि.प. शाळा वाकडीला १५०० रुपये तसेच कोऱ्हाळे येथील साईराम कनिष्ठ महाविद्यालयाला खाऊसाठी १००० रुपये देण्यात आले. तसेच केलवडच्या ज्ञानेश्वर विद्यालयातील १०वीचा निकाल १०० टक्के लागल्याबद्दल प्रोत्साहन म्हणून विज्ञान शिक्षक महेंद्र जेजूरकर यांना ३५५१ रुपये रोख रक्कम दिली व त्यांचा गौरव केला. जेजूरकर यांनी ती रक्कम केलवड विद्यालयातील पाण्याच्या टाकीसाठी दिली असे एकूण जवळपास ५० हजारांचे वाटप केले असल्याची माहिती प्रा. गोर्डे यांनी दिली.

पुण्य नगरी

अहमदनगर, रविवार, ९ ऑक्टोबर २०१६

4 रविवार, ९ ऑक्टोबर २०१६

राऊत फाऊंडेशनच्या सहकार्यातून उभारलेल्या

# साठवण तलावाचे जलपूजन



जळगाव : येथे नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने उभारण्यात आलेल्या तलावातील पाण्याचे पूजन करताना फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत, सहा.पो.नि. देवीदास पवार, प्रा. लक्ष्मण गोर्डे आदी.

राहता/प्रतिनिधी

राहाता तालुक्यातील जळगाव येथे नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने साकारण्यात आलेल्यां तलावाचे जलपूजन फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांच्या हस्ते करण्यात आल्याची माहिती फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

सामाजिक कार्याबरोबरच नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने जळगाव हे गाव दत्तक घेतले आहे. या गावात विविध छोटे मोठे उपक्रम राबविले जात आहेत. ग्रामस्थांच्या सहकार्यातून २.५ कि.मी. लांब व ३५ फूट रुंद व १० फूट खोल असा जळगाव ते पुणतांबा शिवेपर्यंत खोदाई करून बंधारा केला. या तलावात पावसामुळे पाणी साठवल्याने त्याचे जलपूजन फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांच्या हस्ते झाले. यावेळी विश्वस्त उद्योजक निखिल राऊत, अभिजीत राऊत, मीना राऊत, प्राचार्य चंद्रकांत सावे, मीना सावे, राहाता पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास पवार, प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी नरेश राऊत म्हणाले, जलशिवार योजनेचा जळगावसाठी पुढील टप्पा दिवाळीनंतर घेण्यात येणार आहे. जलशिवार योजनेस फाऊंडेशनमार्फत ५ लाखांची मदत करण्यात आली आहे. या तलावामुळे गावाचा शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. यावेळी संपत चौधरी, नितीन चौधरी, गंगाधर चौधरी, अण्णासाहेब चौधरी, प्राचार्य गडाख, सरपंच सुमन वैरागळ, उपसरपंच चौधरी, राजेंद्र बर्डे, तंटामुक्तीचे अध्यक्ष चौधरी व ग्रामस्थ उपस्थित होते. भाऊसाहेब चौधरी यांनी आभार मानले.

पुणे ★ बुधवार, ८ नोव्हेंबर २०१७ । किंमत ₹ ३

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

# जळगावमध्ये झाली जलक्रांती

## नरेश राऊत फाउंडेशनच्या पुढाकाराने जलसंधारणाची कामे

**आशादायक**

सकाळ वृत्तसेवा

शिर्डी, ता. ७ : राहाता तालुक्यातील जळगाव येथे नरेश राऊत फाउंडेशनच्या सहकार्याने सुमारे अडीच किलोमीटर लांबीच्या चराचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात आले. त्यात यंदा पावसाचे पाणी साठल्याने शंभराहून अधिक शेतकऱ्यांच्या विहिरी तुडुंब भरल्या. गावानजीकच्या गणेश बंधाऱ्याचे विस्तारीकरण करण्यात आले. त्याशेजारी विहीर खोदून गावाची पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली.



जळगाव (ता. राहाता) : जलसंधारणाच्या कामांमुळे काही भागातील विहिरी अशा तुडुंब भरल्या आहेत. त्यांची पाहणी करताना उद्योजक नरेश राऊत व सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे आदी.

याबाबत माहिती देताना नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, "जळगाव हे शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचे गाव म्हणून ओळखले जाते. उद्योजक नरेश राऊत यांना येथील एकोप्याचे वातावरण व आधुनिक शेती करण्याची शेतकऱ्यांची धडपड आवडली. त्यांनी हे गाव दत्तक घेतले. आम्ही लोकसहभागातून अडीच किलोमीटर लांबीच्या चराची खोदाई व रुंदीकरण केले. यंदा चांगला पाऊस झाला. चरात पाणी साठले. शेजारच्या विहिरी तुडुंब भरल्या. एका बंधाऱ्याचे रुंदीकरण केले. त्यात पाणी साठले. शेजारी विहीर खोदून ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याची सोय केली."

"या गावात आम्ही मुलींसाठी शिवणकामाचा कोर्स सुरू केला. वाचनालय सुरू केले. स्मशानभूमी व प्राथमिक शाळेसाठी जलकुंभ भेट दिले. मागील उन्हाळ्यात येथे आम्ही टँकरने पिण्याचे पाणी पुरवीत होतो. जलसंधारणाच्या कामामुळे या भागात आता पुढील दीड ते दोन वर्षे पाणीटंचाई जाणवणार नाही, अशी स्थिती आहे. ग्रामस्थांच्या सहभागातून येथे हा फार मोठा बदल झाला आहे," असे त्यांनी सांगितले.

स्थापना १९३९

अमृतमहोत्सवी

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

www.pudhari.com

नगर

शुक्रवार । १० नोव्हेंबर २०१७ । स्थापना वर्ष ७९ वे । आवृत्ती वर्ष १२ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर,

# जलक्रांती अभियान इतर गावांतही राबविणार

## उद्योजक नरेश राऊत

**राहाता : प्रतिनिधी**

केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशन यांनी राबविलेल्या जलक्रांती अभियानाची पाहणी नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांनी केली. फाउंडेशनद्वारे जलक्रांती अभियानाची कामे इतर गावातही सुरू करून गावातील पिण्याचे पाणी टंचाई दूर करण्यासाठी प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया फाउंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी केली.



**राहाता : राहाता तालुक्यात नरेश फौंडेशनच सहकार्याने तयार करण्यात आलेल्या तळे तसेच चरांची पाहणी करताना उद्योजक नरेश राऊत आदी.**

राहाता तालुक्यात नरेश फाउंडेशनच सहकार्याने जळगाव येथे अडीच किलोमीटर लांबीच्या चराची खोलीकरण व रुंदीकरण करून दुष्काळाच्या काळात पिण्याच्या पाणी टंचाईला दूर करण्यासाठी साठवण तलाव खोदण्यात आले होते. यावर्षी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वरुण राजाची कृपा झाल्याने हे बंधारे तुडुंब भरले आहेत. त्यांच्या शेजारी गावातील ग्रामस्थांच्या सहकार्याने विहीर खोदून गावासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाल्याने ग्रामस्थांनी नरेश राऊत फाउंडेशनचे अभिनंदन केले आहे.

याबाबत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सांगितले की, नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांची अनेक दिवसांपासून दत्तक घेतलेल्या गावांची पिण्याचे पाणी टंचाई दूर व्हावी व पावसाचे पाणी अडवून त्याचा फायदा गावातील ग्रामस्थांना व्हावा, अशी अनेक वर्षांपासून इच्छा होती. तसेच ना. राधाकृष्ण विखे पाटील व युवा नेते सुजय विखे यांनी तालुक्यातील गावांची पिण्याचे पाणी टंचाई दूर व्हावी, यासाठी जिल्ह्यात प्रथम राहत्यात जलक्रांती अभियान सुरू केले. प्रवरा कारखान्याकडून गावातील चर खोदण्यासाठी फोकलँड मशीन व्यवस्था करण्यात आली. तसेच जनसेवा फाउंडेशन लोणी यांच्याकडून यासाठी निधी देण्यात आला. त्या त्या गावांतील ग्रामस्थांनी निधी जमवून जलक्रांती अभियान राबविले.

नरेश राऊत फाउंडेशनने केलवड व जळगाव या दत्तक घेतलेल्या गावांना यासाठी भरीव असा निधी दिल्याने पाणीटंचाई दूर करण्यासाठी गावाला मोठी मदत झाली. युवा नेते डॉ. सुजय विखे यांनी केलवड व जळगाव येथे या कामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. दवाखाना व कोर्सेसही सुरू केल्याचे गोर्डे यांनी सांगितले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

।अंक २९८ ।वर्ष ४१ वे ।गुरुवार, दि. १७ नोव्हेंबर २०१६ ।पाने १६

# केलवडला अल्पदरात वैद्यकीय सुविधा

## नरेश राऊत फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम




केलवड येथे नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने नाममात्र धर्मार्थ शुल्क आकारुन दवाखाना सुरू करण्यात आला आहे. त्याप्रसंगी राहाता पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक देविदास पवार, सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, डॉ. दुशिंग, सरपंच रमेश घोरपडे आदी.

अस्तगाव (वार्ताहर)- अवघ्या ३० रुपये नाममात्र धर्मार्थ शुल्क घेवुन नरेश राउत फौंडेशनने केलवड येथे दवखाना सुरू केला आहे. या ३० रुपयांत तपासणी, इंजेक्शन, तसेच औषधही दिले जात आहे. आजूबाजूच्या खेड्यांची तसेच वाड्या वस्त्यांवरील गोरगरिबांची चांगली सोय झाली आहे, अशी माहिती नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

नुकतेच या दवाखान्याचे उद्घाटन राहाता पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक देविदास पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी पोलीस पाटील सुभाषराव गमे, सुरेशराव गमे, सरपंच रमेश घोरपडे, संदीप फकिरा गमे, अण्णासाहेब वाघे, शिवाजी गमे, भारत साबदे, भारत राउत, अप्पासाहेब सोनवणे, विठ्ठल ग्रुपचे विठ्ठलराव गमे, बाळासाहेब गमे, डॉ. दुशिंग, शिवाजी वाघे, नरेश राउत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, सेवक वृंद, प्रा. योगेश गोसावी, नानासाहेब गोर्डे, व्यवस्थापक सचिन वाघे, नवनाथ रजपूत, संजय सोनवणे, सुनील गमे, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सोसायट्यांचे पदाधिकारी, सर्व संघटनांचे सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याबाबत माहिती देताना प्रा. गोर्डे म्हणाले, या दवाखान्यात केलवडसह खडकेवाके, काकडी, कोऱ्हाळे, डांगेवाडी, मल्हारवाडी, वरझडी, आडगाव अदी जिरायती टापूतील सर्वसामान्य गरीब रुग्ण येत आहेत. दररोज ५० ते ५५ पेशंट येत असतात. नाममात्र धर्मार्थ शुल्क अत्यल्प असल्याने रुग्णांना त्याचा फायदा होत आहे. या दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. दुशिंग हे काम पाहत आहेत. ते मिलिट्री रिटायर्ड आहेत, याशिवाय प्रवरा ग्रामीण रुग्णालयात त्यांनी २० वर्षे सेवा केली आहे. फाउंडेशनने अनुभवी डॉक्टरांची नेमणूक केली आहे. दोन तीन दिवसात या दवाखान्यासाठी महिला डॉक्टर, तसेच नर्सची नेमणूक करण्यात येणार असल्याचे प्रा. गोर्डे यांनी सांगितले.

बाहेर भरमसाट फी घेतात, ती रुणांना परवडेलच असे नाही. मात्र जिरायती टापूतील गावांतील गरीब रुग्णांना सामाजिक बांधिलकी म्हणून आधार देण्याचा हा फाउंडेशनचा प्रयत्न असल्याचे प्रा. गोर्डे म्हणाले. इंजेक्शन, औषध, तपासणी या सुविधा अल्प धर्मार्थ शुल्कात मिळत आहेत. नरेश राउत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांचे जिरायती भागावर तसेच गरीब लोकांवर खूप प्रेम आहे. त्याचाच भाग म्हणून आपण हा केलवड येथे उपक्रम सुरू केल्याचे श्री. गोर्डे यांनी सांगितले.

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com

आजच्या अंकास
बहा
आठ पानी पुरव

वे | आवृत्ती वर्ष १२ | मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध

# राऊत फाउंडेशनचा टॅलेंट सर्च उपक्रम सुरू

**राहाता : प्रतिनिधी**

नरेश राऊत फाउंडेशनने ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च उपक्रम सुरु करून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम केले. जिल्ह्यातील इतर सामाजिक संस्थांनी राऊत फाउंडेशनसारखा उपक्रम राबवून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी या उपक्रमाद्वारे कसा फायदा होईल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

तालुक्यातील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी सात दिवसांचे टॅलेंट रिसर्च या उपक्रमाचे केलवड येथे काल जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे शिक्षण विभाग प्रमुख रमाकांत काठमोरे, पं. स. सभापती हिराबाई कातोरे, गट शिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे, शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर वाकचौरे, सरपंच उषा घोरपडे, पंचायत समितीच्या सदस्य काळू रजपूत, माजी पोलिस पाटील सुभाष गमे, नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला.

यावेळी ना. विखे म्हणाल्या की, ग्रामीण विद्यार्थी हे अभ्यासात हुशार असतात. परंतु त्यांना चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. ते या फाउंडेशनने ओळखून या विद्यार्थ्यांसाठी हे शिबीर आयोजित करून प्रेरणा देण्याचे काम केले. या उपक्रमाचा या विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल. पाचवी व आठवीसाठी होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत २० ते २५ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले तर हे शिबीर नक्कीच साध्य होईल, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी फाउंडेशन राबवित असलेल्या सामाजिक कामांची माहिती दिली. फाउंडेशन दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करतो. यावर्षी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शालिनीताई विखे यांना फाउंडेशनच्यावतीने समाजरत्न पुरस्कार देऊन गौरव करणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, केलवडचे माजी पोलिस पाटील सुभाषराव गमे आदींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते.



**राहाता : टॅलेंट सर्च उपक्रमाचा प्रारंभ जि.प. अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या हस्ते करण्यात आला.**

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ४६ । वर्ष ४२ वे । सोमवार, ६ मार्च २०१७ । पाने १६

# केलवड येथे एमएससीआयटीला मान्यता

## नरेश राऊत फाउंडेशनचा उपक्रम

अस्तगाव (वार्ताहर) - नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने यावर्षी एमएससीआयटी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.. महाराष्ट्र शासनाची तशी परवानगी मिळाली असल्याचे फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

एमकेसीएलचा हा अभ्यासक्रम असून थोड्याच दिवसात हा कोर्स फाउंडेशन सुरु करणार आहे. त्यामुळे केलवड सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषत: मुलींना या कोर्ससाठी इतरत्र जाण्याची गरज नाही. सुरुवातीपासून नरेश राऊत फाउंडेशनने महिलांसाठी मोफत संगणक शिक्षण देणे सुरु केलेले आहे. तसेच १० वी इतर वर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी, गणित तसेच भूमिती विषयांचे मोफत क्लास सुरु आहेत. त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरु आहे. जळगाव येथे महिलांसाठी मोफत संगणक, तसेच शिवणक्लास सुरु केलेले आहेत. फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांच्या संकल्पनेतून महिलांसाठी विविध उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

एमएससीआयटी बरोबरच टॅली, इंग्रजी, मराठी टायपिंग, एमकेसीएलचे क्लीक कोर्स सुरू करंण्यात आलेले आहेत. यासाठी केलवड येथे फाउंडेशनने अद्यायावत अशी संगणक लॅब उभारली आहे. फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमाचाच हा भाग आहे. आवश्यक ती शासनाचे शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागते. बहुतांशी मात्र मोफत शिक्षण दिले जात आहे. फाउंडेशनने अल्पदरात वैद्यकीय सोय केलवड येथे उपलब्ध करून दिली आहे. त्याचा फायदा केलवड पंचक्रोशीतील गरीब व गरजू असे सर्व थरांतील पेशंट लाभ घेत आहेत, असेही प्रा. गोर्डे यांनी सांगितले.

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com

# राऊत फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

**राहाता : प्रतिनिधी**

केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्यावतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून राहाता तालुक्यातील विविध शाळांना सुमारे ५० हजारांच्या खाऊचे वाटप करण्यात आले. अशी माहिती फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली. केलवड ग्रामपंचायतीच्या झेंडावंदनाच्या खांबासाठी ८ हजार ५०० रुपये दिले. अस्तगाव केंद्रातील केलवडच्या ज्ञानेश्वर विद्यालयात नुकत्याच घेण्यात आलेल्या बालचित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना १ हजार ३३२ रुपयांची बक्षिसे दिली. तसेच याच विद्यालयातील ५ वी ते १० वीपर्यंतच्या प्रत्येक तुकडीतील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली व खाऊसाठी ६ हजार ३८३ रुपये दिले. एलम बालविकास मंडळ व मल्हार ज्युनिअर कॉलेज वाकडी यांनाही प्रथम तीन क्रमांकासाठी, तसेच खाऊसाठी ४ हजार ३८० रुपये दिले. जि.प. शाळा केलवड यांना पहिल्या तीन विद्यार्थ्यांना बक्षीस रुपाने रोख रक्कम व खाऊसाठी ४ हजार ३२४ रुपये अशी रक्कम देण्यात आली. जि. प. शाळा गमे गोठा यांनाही प्रत्येक वर्गासाठी प्रथम तीन बक्षिसे व खाऊसाठी १ हजार ६२२ रुपये दिले. जि.प. शाळा राऊतवस्ती केलवड पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना पहिल्या तीन क्रमांकासाठी, तसेच खाऊसाठी १ हजार ५२२ रुपयांची मदत दिली. अस्तगाव माथ्यावरील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला खाऊसाठी १० हजारांची रक्कम दिली.

अहमदनगर । गुरुवार, १६ मार्च २०१७

। वर्ष : १५ । अंक : ३४३ । किंमत : ४ । पाने १२+४

# पुण्य नगरी

www.epunyanagari.com



# नाममात्र शुल्काच्या वैद्यकीय सेवेचा ग्रामीण रुग्णांना आधार

## नरेश राऊत फौंडेशनचा उपक्रम

श्रीरामपूर/प्रतिनिधी

अपवाद वगळता वैद्यकीय सेवेच्या नावाखाली सुरु असलेल्या नफेखोरीमुळे सामान्य माणसाची आर्थिकदृष्ट्या होणारी लुट, दुसरीकडे उपचाराचा खर्च भागविण्यातून झालेला कर्जाचा डोंगर हे आजच्या आजाराला बळी पडलेल्या सामान्य माणसाचे वास्तव. हे हेरुन आजारपणामुळे व उपचाराअभावी जनसामान्याचे कुटुंब उघड्यावर पडू नये म्हणून सामाजिक कामात नेहमी अग्रेसर असलेल्या नरेश राऊत फौंडेशनने केलवडमध्ये नाममात्र शुल्कावर ओ.पी.डी. सुरु केली आहे. गेल्या वर्षभरापासून सुरू असलेली फौंडेशनच्या डॉक्टर राजकुमार दुशिंग यांची ओ.पी.डी. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी आधार ठरली आहे.

नरेश राऊत फौंडेशनने केलवड सारख्या दुष्काळी गावात सामाजिक व्रत मानून महिला व मुलींसाठी मोफत संगणक प्रशिक्षण, गावाला टँकरद्वारे पाणी पुरवठा, मोफत वाचनालय आदी सामाजिक उपक्रम यशस्वी राबविले. ग्रामीण भागात वैद्यकीय सुविधा उपलब्ध झाल्या असल्या तरी वैद्यकीय सेवा व औषधांचे वाढलेले दर यामुळे सामान्य, कष्टकरी घरातील कर्ता माणूस आजारी पडला तर त्याच्या उपचारासाठी त्याच्या कुटुंबियांना कर्ज काढावे लागते.

### लवकरच नांदुर्खीलाही ओपीडी

केलवड मधील फौंडेशनच्या ओ.पी.डी.ला रुग्णांचा मिळालेला उत्स्फुर्त प्रतिसाद बघता ग्रामीण भागातील रुग्णांच्या सोयीसाठी फौंडेशनच्या माध्यमातून ५ एप्रिल पासून नांदुर्खी येथेही ओ.पी.डी.सुरु करण्यात येणार आहे. त्याचा रुग्णांना लाभ घ्यावा असे आवाहन प्रा.गोर्डे यांनी केले आहे.

नाहीतर मोडकातोडका संसार विकून उपचाराचा खर्च भागवावा लागतो. हे वैद्यकीय सेवेबाबतचे वास्तव हेरून फौंडेशनचे अध्यक्ष उद्योगपती नरेश राऊत व सचिव प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी केलवडमध्ये गेल्या एक वर्षापासून नाममात्र शुल्कावर ओ.पी.डी.सुरू केली आहे. ज्येष्ठ डॉ.राजकुमार दुशिंग वर्षभरापासून रुग्णांना तपासत आहेत. अवघ्या ३० रुपये शुल्कात तपासणी, इंजेक्शन व औषधे फौंडेशनकडून रुग्णांना दिली जातात. या वैद्यकीय सेवेचा लाभ केलवड लगतच्या दुष्काळी पट्ट्यातील खडके वाके, आरडगाव, तळेगाव आदींसह अनेक गावातून येणाऱ्या रुग्णांनी घेतला आहे. ज्या रुग्णांना गरजेनुसार शस्त्रक्रिया किंवा पुढील उपचारासाठी गरजेनुसार फौंडेशन आर्थिक मदतही उपलब्ध करून देते. फौंडेशनच्या वतीने औरंगाबाद जिल्ह्यातील



जाटवाडा येथे लम्हाण समाजासाठी मोफत नेत्रतपासणी शिबीरही आयोजित करण्यात आले होते. उपचाराअभावी गोरगरीब, निराधार व कष्टकऱ्यांची अडवणूक होवू नये. त्यांना वेळेवर उपचार मिळावा या उद्देशाने फौंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांच्या दूरदृष्टीतून आम्ही ही ओ.पी.डी. चालवित आहोत, असे प्रतिष्ठानचे सचिव प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी सांगितले.

अमृतमहोत्सवी
पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com

२१ मार्च २०१८



राहाता : नरेश फाउंडेशनच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात क्लासेस सुरू झाले आहेत.

# विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात सीईटी क्लासेस

**राहाता : प्रतिनिधी**

तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फौंडिशन यांनी विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात सीईटी क्लासेस सुरु केले आहेत. याचा फायदा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन नरेश राऊत फौंडिशनचे सचिव प्रा. लक्ष्मणराव गोर्डे यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व क्लासेससाठी बाहेरगावी जावे लागते. त्यामुळे विशेषतः विद्यार्थीनींना या क्लासेसपासून वंचित रहावे लागते. तसेच या क्लासेससाठी विद्यार्थ्यांना दुसऱ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पैसे द्यावे लागतात. या सर्व गोष्टींचा विचार करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण जवळच उपलब्ध व्हावे, यासाठी नरेश राऊत फौंडिशनने हा उपक्रम प्रथमच सुरु केला आहे. पहिल्याच दिवशी या क्लाससाठी २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अल्पदरात शिक्षण व क्लासेस घेणारे हे एकमेव फौंडिशन आहे. नरेश फौंडिशनने क्लास बरोबरच- इंग्रजी व मराठी विषयाची टायपिंग क्लासेस, टॅली कोर्सेस, तसेच महिलांसाठी सॅनेटरी नॅपकिन प्रकल्प, ब्युटी पार्लर कोर्सेस, केलवड व जळगांव येथे मोफत संगणक प्रशिक्षण आदी कोर्सेस विद्यार्थ्यांसाठी विनामोबदला सुरु केले आहे. दुष्काळादरम्यान या फौंडिशनने केलवड व जळगाव या गावांना मोफत पिण्याच्या पाण्याचे टॅंकर उपलब्ध करुन दिले. जलक्रांती अभियान राबवुन पाण्याची समस्या दुर करण्यासाठी मोठी मदत केली आहे. अशा अनेक प्रकारच्या विविध योजना या फौंडिशनने राबविल्या आहेत.

## विविध योजनांचा लाभ घ्यावा: प्रा. गोर्डे

नरेश राऊत फाउंडेशनमार्फत राबविल्या जाणाऱ्या शिक्षण विषयाच्या विविध योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जवळच शिक्षण उपलब्ध व्हावे, अशी संकल्पना उद्योजक नरेश राऊत यांची आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात.

प्रा. लक्ष्मणराव गोर्डे, सचिव, नरेश राऊत फाउंडेशन

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
बुधवार, १३ डिसेंबर २०१७

# नरेश राऊत फाउंडेशनचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## सराला बेटाला आदर्श आध्यात्मिक संस्था, सौ. शालिनीताई विखे यांना समाजभूषण तर कृष्णप्रकाश यांना आदर्श पोलीस अधिकारी पुरस्कार

अस्तगाव (वार्ताहर) - राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने दिले जाणारे पुरस्कार जाहीर झाले असून महंत रामगिरी महाराज अध्यक्ष असलेल्या सरला बेटाला आदर्श आध्यात्मिक संस्था पुरस्कार, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे यांना समाजरत्न, तर मुंबईचे विशेष पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश यांना आदर्श पोलीस अधिकारी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. ही माहिती नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

रविवार दि.२४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता या पुरस्काराचे वितरण केलवड येथे होणार आहे. महंत रामगिरी महाराज, उद्योजक श्री. मंडलेचा, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे, उद्योजक व फाउंडेशनचे अध्यक्ष, उद्योगपती नरेश राउत, दैनिक सार्वमतचे कार्यकारी संपादक अनंत पाटील आदींच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार असून या सोहळ्यासाठी मुंबईचे विशेष पोलिस महानिरीक्षक कृष्णप्रकाश, राहाता बाजार समितीचे सभापती बापूसाहेब आहेर, पंचायत



महंत रामगिरी महाराज, सौ. शालिनीताई विखे, विशेष पो.महानिरीक्षक कृष्णप्रकाश

समितीच्या सभापती सौ. हिराबाई कातोरे, पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम, प्राचार्य डॉ. बी. के. सलालकर, तहसीलदार माणिकराव आहेर, प्राचार्य राजेंद्र बर्डे, कामगार पोलीस पाटील संघटनेचे माजी अध्यक्ष सुभाष गमे, गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे आदी उपस्थित राहणार आहे.

या सोहळ्यात विविध क्षेत्रातील एकूण २२ जणांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार- आदर्श आध्यात्मिक संस्था म्हणून सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी गौरविण्यात येणार आहे. समाजरत्न पुरस्काराने जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे यांना गौरविण्यात येणार आहे.

आदर्श पोलीस अधिकारी म्हणून मुंबईचे पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश यांना, उद्योगरत्न पुरस्कार नाशिक चे उद्योजक मंडलेचा यांना, आदर्श कृषी उत्पन्न बाजार समिती राहाता साठी सभापती बापुसाहेब आहेर यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. अभ्यासू पत्रकारीतेसाठी राहाता येथील जेष्ठ पत्रकार सतीश वैजापूरकर, आदर्श लेखापाल हा पुरस्कार गणेश तोरमल यांना, आदर्श उपक्रमशील मुख्याध्यापक म्हणून रयत च्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक जी. टी. गमे यांना, आदर्श सामाजिक कार्य हा पुरस्कार शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास कोते यांना,

समाजभूषण पुरस्कार विजय कोते यांना, आदर्श वैद्यकीय सेवा हा पुरस्कार श्रीरामपूरचे डॉ. रविंद्र कुटे व राहाता येथील सामाजिक क्षेत्रातील कार्य करणारे व वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. बापुसाहेब पानगव्हाणे यांना, आदर्श शैक्षणिक संकूलाचा पुरस्कार अस्तगाव येथील रयत च्या न्यु इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक सर्जेराव मते यांना, आदर्श शैक्षणिक संस्था हा पुरस्कार कोऱ्हाळे येथील गणेश शैक्षणिक संकूलाचे प्रमुख प्रा. विजय शेटे यांना, स्त्री अस्मिता हा पुरस्कार प्रसिध्द शिवचरित्राच्या व्याख्यात्या सौ. अनिता उत्तम नळे यांना, आदर्श शैक्षणिक संकूलाचा पुरस्कार औरंगबादच्या जटवाडा येथील सौ. रुपाली विक्रम राठोड यांना, आदर्श सामजिक संस्थेसाठी संतोष पवार, आदर्श संघटनेसाठी केलवड चे विशाल वाघे यांना, आदर्श सामाजिक कार्य हा पुरस्कार प्रसन्न प्रकाश धुमाळ यांना, उत्कृष्ट जलसंधारक म्हणून जळगावचे गंगाधर चौधरी यांना सन्मानित करण्यात येणार आहे. केलवड येथील प्राथमिक शाळेला आदर्श जिल्हा परिषद शाळा पुरस्कार, तर समाज भूषण पुरस्कार सुनिता तांबे यांना देण्यात येणार आहे.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ३३५ । वर्ष ४२ वे । सोमवार, २५ डिसेंबर २०१७ । पाने १६

# लोकांच्या सेवेपेक्षा कोणताही मोठा धर्म नाही : कृष्णप्रकाश

## नरेश राऊत फौंडेशनचे पुरस्कार वितरण, फौंडेशनचे काम चांगले : महंत रामगिरी महाराज



केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्यावतीने जि.प. अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे यांना समाजरत्न पुरस्कार देतांना महंत रामगिरी महाराज, विशेष पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश, कैलास कोते, सार्वमतचे कार्यकारी संपादक अनंत पाटील, पं.स. सभापती हिराबाई कातोरे, विजय कोते, समर्थ शेवाळे.

अस्तगाव (वार्ताहर) - स्वार्थासाठी नव्हे तर मानवी कल्याण, समाज व राष्ट्रसेवेसाठी झटतात तीच माणसं खऱ्या अर्थाने जीवन जगतात लोकांच्या सेवेपेक्षा कोणताही मोठा धर्म नाही. अशाच प्रकारे जनसेवेचे निःस्वार्थी कार्य करणाऱ्या विविध क्षे[illegible]त सेवकांचा नरेश राऊत फाउंडेशनने केलेला गुणगौरव समाज सेवेसाठी अधिक प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन मुंबईचे विशेष पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश यांनी केले

राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने विविध पुरस्काराचे वितरण सोहळा तसेच विद्यार्थिनी वसतिगृह आणि सॅनेटरी नॅपकिन प्रोजेक्ट बांधकामाचा पायाभरणी समारंभ महंत रामगिरी महाराज, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शालिनीताई विखे, उद्योजक नरेश राऊत व सार्वमतचे कार्यकारी संपादक अनंत पाटील यांच्या हस्ते झाला. आदर्श पोलीस अधिकारी म्हणून त्यांना गौरविण्यात आले. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना कृष्णप्रकाश बोलत होते. यावेळी उद्योजक मंडलेचा, फाउंडेशनच्या उपाध्यक्षा मीनाताई राऊत, सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, बाजार समितीचे सभापती बापूसाहेब आहेर, उपसभापती वाल्मिक गोर्डे, पंचायत समितीच्या सभापती हिराबाई कातोरे, गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, कामगार पोलीस पाटील संघटनेचे सुभाषराव गमे, प्राचार्य डॉ. बी. के. सलालकर, प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्यासह तालुक्यातील कार्यकर्ते, केलवड ग्रामस्थ उपस्थित होते.

### यांना मिळाले पुरस्कार

▸ आदर्श अध्यात्मिक संस्था- महंत रामगिरी महाराज, समाजरत्न- सौ. शालिनीताई विखे, आदर्श पोलिस अधिकारी - कृष्णप्रकाश, उद्योगरत्न- संतोष मंडलेचा, आदर्श कृषी उत्पन्न बाजार समिती- बापुसाहेब आहेर, अभ्यासु पत्रकार- सतीश वैजापुरकर, आदर्श लेखापाल- गणेश तोरमल, आदर्श उपक्रमशिल मुख्याध्यापक- प्राचार्य जी. टी. गमे, आदर्श सामाजिक कार्य- कैलास बापु कोते, समाजभुषण- विजय कोते, आदर्श वैद्यकिय सेवा डॉ. बापुसाहेब पानगव्हाणे, आदर्श शैक्षणिक संकूल अस्तगाव- प्राचार्य सर्जेराव मते, आदर्श शैक्षणिक संस्था- प्राचार्य विजय शेटे, स्त्री अस्मिता- सौ. अनिता नळे, आदर्श शैक्षणिक संकूल- सौ. रुपाली विक्रम राठोड, आदर्श सामाजिक संस्था- संतोष पवार, आदर्श संघटना- विशाल वाघे, आदर्श सामाजिक कार्यकर्ता- प्रसन्न धुमाळ, उत्कृष्ट जलसंधारण- गंगाधर चौधरी, आदर्श जिप शाळा केलवड, समाजभुषण- सौ. सुनिता तांबे अदिंनी गौरविण्यात आले.

कृष्णप्रकाश म्हणाले, ज्या क्षेत्रात काम करता, त्या क्षेत्रात निष्ठेने काम केले तरच आपण परमेश्वरापर्यंत जातो.

### घरातला पुरस्कार : सौ. विखे

जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे म्हणाल्या, आपण बरेच पुरस्कार घेतले, पण हा घरातला पुरस्कार आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यात काम करण्याची संधी मिळाली. महिलांसाठी बचतगटांच्या माध्यमातून जिल्हाभर काम केले. ना. राधाकृष्ण विखे पाटील, सुजय विखे पाटील यांनी या भागात चांगले काम केले.

### पुरस्कार उर्जा देतात : पाटील

'सार्वमत'चे कार्यकारी संपादक अनंत पाटील म्हणाले, पुरस्कार ही प्रेरणा, ऊर्जा देतात. पुरस्कार निमित्त असले तरी ते समाजात चांगुलपणा पेरण्याचे काम करतात. पुरस्कार पात्र माणसे शोधून काढणे सोपे नाही, प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी ते काम केले.

आशिर्वादपर भाषणात महंत रामगिरी महाराज म्हणाले, जो सत् कार्य करतो त्याचा समाज सत्कार करतो. अज्ञानाला सज्ञान करा, धनाचा सदुपयोग करा, जे परमेश्वराने आपल्याला दिले त्याचा चांगला उपयोग करा.

याप्रसंगी उद्योजक नरेश राऊत, संतोष मंडलेचा, रुपाली राठोड यांची भाषणे झाली.

प्रास्तविकात सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, फाउंडेशनने हे उद्योजक नरेश राऊत यांच्या आर्थिक योगदानातून काम करते. आम्ही सामाजिक काम करतो, इतरांनीही करावे, यासाठी प्रोत्सहान म्हणून हे पुरस्कार देत आहोत असेही गोर्डे म्हणाले.

सूत्रसंचालन प्रसन्न धुमाळ यांनी केले तर आभार सुभाषराव गमे यांनी मानले.

यावेळी प्रा. सुनिल गमे, अशोकराव नळे, पोलीस निरीक्षक देविदास पवार, बाबासाहेब गमे, शिवाजी गमे, सुनिल गायकवाड, विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर वाकचौरे, सार्वमतचे उपसंपादक नानासाहेब शेळके, अस्तगावकर सराफचे अशोकराव बोऱ्हाडे, संपतराव चौधरी, गंगाधर चौधरी, माजी सभापती निवास त्रिभुवन, कैलास जेजुरकर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष दशरथ गव्हाणे, शिर्डीचे काँग्रेसचे गटनेते अशोकराव गोंदकर, भाउसाहेब कातोरे, बाळासाहेब जपे, विजय अंभोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

www.esakal.com

सकाळ

• अग्रलेख : पेटलेल्या पाण्याचे राजकारण • पहाटपावलं : यशाची गुरुकिल्ली

# डांगे, घंगाळे व गुंजाळ राहात्याचे वैभव

## खासदार सदाशिव लोखंडे; प्रेस क्लब व नरेश राऊत फाउंडेशनतर्फे गौरव



राहाता : प्रेस क्लबतर्फे आयोजित कार्यक्रमात खासदार सदाशिव लोखंडे यांच्या हस्ते मानपत्र देऊन प्राचार्य इंद्रभान डांगे, डॉ. महादेव घंगाळे व डॉ. पी. जी. गुंजाळ यांचा सत्कार करण्यात आला. समवेत प्रा. लक्ष्मण गोर्डे व प्रेस क्लबचे अध्यक्ष रामकृष्ण लोंढे.

राहाता, ता. १० : "'डांगे पॅटर्न'च्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण करणारे प्राचार्य इंद्रभान डांगे, सरकारी सेवेत एक लाखावर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करणारे डॉ. पी. जी. गुंजाळ व केवळ दोन रुपये फी घेऊन रुग्णसेवा करणारे डॉ. महादेव घंगाळे राहात्याचे वैभव आहेत. त्यांचा सत्कार करण्याची संधी मिळणे, हे मी भाग्य समजतो," असे प्रतिपादन खासदार सदाशिव लोखंडे यांनी केले.

राहाता प्रेस क्लब व नरेश राऊत फाउंडेशनतर्फे आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे होते. प्राचार्य इंद्रभान डांगे, डॉ. पी. जी. गुंजाळ व डॉ. महादेव घंगाळे यांना प्रेस क्लबतर्फे लोखंडे यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्राचार्य डांगे म्हणाले, "केवळ अडीच खड्डू आणि फळा, एवढ्या भांडवलावर सुरू केलेल्या साध्वी प्रीतिसुधाजी शाळेचे रूपांतर आज १५ एकरांवर विस्तारलेल्या अद्ययावत शैक्षणिक संकुलात झाले आहे. 'डांगे पॅटर्न'पासून प्रेरणा घेऊन २५ शाळा सुरू झाल्या. माझा संघर्ष यशस्वी झाला. या सत्काराने त्यावर शिक्कामोर्तब झाले."

डॉ. गुंजाळ म्हणाले, "सरकारी सेवेत असताना रात्रंदिवस झपाटल्यासारखे काम केले. त्यात पत्नीची मोलाची साथ लाभली. राहातेकरांनी नेहमीच मला पाठबळ दिले." डॉ. घंगाळे यांचेही भाषण झाले. प्रेस क्लबचे उपाध्यक्ष दिलीप खरात यांनी स्वागत केले. पत्रकार राजेंद्र भुजबळ, महेंद्र जेजूरकर व सुहास वैद्य यांनी मानपत्राचे वाचन केले. या वेळी प्रा. लक्ष्मण गोर्डे व संदीप दंडवते यांचीही भाषणे झाली. पत्रकार सीताराम चांडे यांनी आभार मानले.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ७० । वर्ष ४३ वे । शनिवार, ३१ मार्च २०१८ । पाने १६

## केलवड शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

### स्नेहसंमेलने विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची : प्रा. गोर्डे



केलवड येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाप्रसंगी प्रा. लक्ष्मण गोर्डे, काळू रजपूत, गोरक्षनाथ वाघे, सरपंच सौ. घोरपडे, गटशिक्षणाधिकारी श्रीमती शिवगुंडे आदी.

अस्तगाव (वार्ताहर) - वार्षिक स्नेहसंमेलने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची आहेत, असे प्रतिपादन नरेश राउत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी केले.

राहाता तालुक्यातील केलवड येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्सहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समितीचे सदस्य काळू रजपूत व नरेश राउत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती मीना शिवगुंडे, शिक्षण विस्तार अधिकारी डी. के. राऊत, पोलीस पाटील संघटनेचे तालुकाध्यक्ष सुभाषराव गमे, सरपंच सौ. उषा घोरपडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भागवतराव गमे, सौ. बेबीताई राऊत अदी उपस्थित होते.

यावेळी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी स्नेहसंमेलने ही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महत्वाची आहेत. सुप्त गुणांचा विकास साधण्याचे काम या माध्यमातून होते. ग्रामीण भागातील शाळांचे विद्यार्थ्यांसाठी चांगले योगदान असल्याचे ते म्हणाले. यावेळी गटशिक्षणाधिकारी श्रीमती मिना शिवगुंडे यांचेही भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्तविक मुख्याध्यापक अशोक आहेर यांनी केले.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध कलाकृती सादर करत उपस्थितांची मने जिंकली. नरेश राउत फाउंडशनच्या माध्यमातून प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी मंडप, साउंड सिस्टीमची सोय केली होती. तर सुरेशराव गमे यांचे तर्फे बैठक व्यवस्था, स्टेजची व्यवस्था संजय गोडगे, तर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अनिल गुंजाळ यांनी केली होती. याप्रसंगी सर्जेराव घोडके, शांताराम शेळके, बाबासाहेब गमे, गोरक्षनाथ वाघे, रमेश घोरपडे, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आलका सापते, रेश्मा पवार, विष्णू होन, इम्नाती शेळके, सय्यद मन्सूर, कैलास मुरादे, परसराम बोडखे, अदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन बाळासाहेब गमे, नंदकिशोर भांड यांनी केले. कैलास ससाणे यांनी आभार मानले.

# लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १२+४+१६ = ३२, किंमत : ₹ ४.००

अहमदनगर, सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०१५


## सामाजिक कार्याचा आधारवड

# श्री नरेश राऊत फौंडेशन

-यमन पुलाटे

सर्वसामान्य जनतेला आधार देण्यासाठी अनेक सेवाभावी संस्था काम करतात. यातून गावाबरोबर गोरगरीब जनतेला आधार मिळत असतो. राहाता तालुक्यातील श्री नरेश राऊत फौंडेशनचे सामाजिक कार्य अनेकांना आधार देणारे असे ठरल्यामुळे तालुक्यातील अनेक गावामध्ये वाचनालय, दत्तक ग्राम योजना, शैक्षणिक, वैद्यकीय, धार्मिक महिला जागृती आदी सेवाभावी कार्यामुळे समाजाला मोठा आधार मिळाला आहे.

केलवड (ता.राहाता) येथे मुंबईचे उद्योगपती नरेश राऊत यांनी स्थापन केलेल्या श्री नरेश राऊत फौंडेशनच्या माध्यमातून संस्थेचे सचिव प्रा.लक्ष्मण गोर्डे सर यांनी समाजसेवेचे व्रत स्वीकारुन अनेकांना मदतीचा हात दिला. या फौंडेशनच्या माध्यमातून विविध उपक्रमातून अनेकांना आधार तर अनेकांना आशेचा किरण लाभला.

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन- वाचाल तर वाचाल अशी एक म्हण आहे. वाचनामुळे प्रत्येकाला नवनवीन माहिती मिळते म्हणून नरेश फौंडेशनच्या वतीने राहाता, केलवड, जळगाव शारदा शैक्षणिक संकुल, राहाता पोलीस स्टेशन अशा अनेक ठिकाणी मोफत वाचनालय सुरु आहेत.

दत्तक ग्राम उपक्रम- जळगाव येथील दत्तक ग्राम उपक्रम अनेक गावांना नवी दिशा देणारे ठरत आहे. संस्थेचे संस्थापक नरेश राऊत यांच्या संकल्पनेतून जळगाव येथे कृषी, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासासाठी नियोजनबद्ध उपक्रम सुरु आहे. येथील नाना-नानी पार्क तर अनेक वृद्धांना आधारवडच ठरले आहे. शैक्षणिक कार्य- शैक्षणिक कार्यात देखील नरेश फौंडेशनचे काम शिक्षण क्षेत्राला चालना देणारे आहे. केलवड येथील ज्ञानेश्वर विद्यालय, जिल्हा परिषद शाळा राहाता येथे एलसीडी प्रोजेक्टर, परिसरातील अंगणवाड्यांना माध्यान्ह भोजनासाठी जेवणाची ताटे, सात्रळ, पुणतांबा, प्रवरानगर येथील शाळांना देणग्या देण्याबरोबरच संस्थेच्या वतीने ५ ते १० वी पर्यंतच्या मुलांना मोफत गणित, विज्ञान, इंग्रजीचे जादा तास घेतले जातात. मोफत संगणक सीईटी आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळावे, विविध परीक्षा, रोजगार त्याचबरोबर सीईटी आणि स्पर्धा परीक्षेची माहिती मिळविण्यासाठी दरवर्षी या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण मुलांना मोफत प्रशिक्षण देण्यासाठी सुसज्ज संगणक प्रयोगशाळा यासाठी उभी करण्यात आली आहे.

महिला जागृती- महिला बचत गट, महिलांच्या विविध समस्या, कुटुंब सल्ला मार्गदर्शन यासह महिलांसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षणाचे आयोजन करुन त्यांना सक्षमपणे उभे करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

वैद्यकीय उपक्रम- प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रवरा मेडिकल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या वतीने मोफत सर्वरोग निदान शिबिर, आरोग्य शिक्षण, ग्रामस्वच्छता याबरोबर गरजूंना आरोग्यासाठी नरेश राऊत फौंडेशन नेहमीच मदत करत असते.

# श्री. नरेश राऊत फाऊंडेशन
# सामाजिक कार्याचा अविरत वसा

संस्थेचे सचिव यांनी श्री. नरेशजी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने केलवड हे गाव दत्तक घेऊन या विविध सामाजिक उपक्रम राबविले. यामध्ये प्रामुख्याने गावासाठी पाणी टंचाई काळामध्ये पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरु केला. गेल्या दोन वर्षापासून दरवर्षी पाणी टंचाईला मात करण्यासाठी टंचाई काळात या संस्थेमार्फत गावासाठी पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरु केला जातो. शाळेतील विद्यार्थ्यांसाठीही या टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जाते. गरीबांना मदत, जळीतांसाठी मदत, मुलींच्या विवाहासाठी मदत यासारखे उपक्रम या गावामध्ये संस्थेच्या माध्यमातून राबविले जातात. गावातील ग्रामसेवक व तलाठी यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना रोख स्वरुपात पुरस्कार संस्थेने दिले आहे. तसेच गटविकास अधिकारी, पं.स. राहाता व तहसीलदार राहाता यांना रोख पुरस्काराने संस्थेने सन्मानित केले आहे.

## दत्तक ग्राम जळगाव

तालुक्यातील मौजे जळगाव, येथील ग्रामपंचायतीच्या व लोक आग्रहास्तव संस्थेने जळगाव दत्तक गाव घेतले आहे. या गावातही विविध विकासाच्या योजना राबविल्या जातात. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक बोलावून येथील शेतकरी वर्गाला आधुनिक शेती बद्दल मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे येथील शेती व्यवसायाला गती मिळाली आहे. जळगाव येथे महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र वाचनालय सुरु करण्यात आलेले आहेत. शिवाय नाना-नानी पार्कही जळगावमध्ये संस्थेच्या मदतीने खुले झाले आहे.

## शैक्षणिक

केलवड येथील श्री ज्ञानेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी जेवणाची ताटे या संस्थेचे पुरविली आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शालेय इमारत, प्रयोगशाळा साहित्य व इतरही शैषणिक उपक्रमांसाठी या संस्थेने भरीव सहाय्य दिले आहे. केलवड येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बोअरवेल, मोटार त्याचप्रमाणे त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी या दृष्टीने रोख बक्षिस योजना सुरु केली. दरवर्षी स्वात्र्यदिन व प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी केलवड येथील प्राथमिक व माध्यमिक शाळा व सर्व अंगणवाडीतील त्याचप्रमाणे पंचक्रोशीतील अनेक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले जाते.

जि.प. शाळा राहाता यांना एलसीडी प्रोजेक्टर, मुजमुले वस्ती शाळा, खडकेवाडे यांचेसाठी बोअरवेल या संस्थेने पुरविला आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर व्हावी तसेच त्यांचा औद्योगीकतेकडे कल वाढावा या दृष्टीने तज्ज्ञांची व्याख्याने संस्थेच्या माध्यमातून आयोजित केली जातात. राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुल येथील वद्यिार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी ताटे तसेच न्यू इंग्लिश स्कूल सात्रळ, पुणतांबा येथील शाळानना उपक्रमांसाठी देणग्या दिल्या. या शैक्षणिक मदतीतून शाळेच्या अड्चणी दूर झाल्या.

रयत शिक्षण संस्थेच्या सात्रळ येथील वसतिगृहाला संस्थेच्या माध्यमातून दर महिन्याला मदत केली जाते. संस्थेच्या माध्यमातून गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली जाते.

## मोफत संगणक प्रशिक्षण केंद्र

खेड्यातील मुला-मुलींना संगणक प्रशिक्षण घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असे,


मा. नरेश राऊत


मा. लक्षमण गोर्डे

यमन पुलाटे

विद्यार्थ्यांची गरज ओळखून संस्थेच्या माध्यमातून केलवड येथे मोफत संगणक प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. अद्ययावत इमारतीसह अनेक अद्ययावत सुविधा या संगणक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या आहेत. या प्रशिक्षण केंद्रामध्ये एम.एस.सी.आय.टी. व सी.सी.सी. या शासनमान्य कोर्सचे प्रशिक्षण दिले जाते.

## मोफत क्लासेस

संस्थेच्या माध्यमातून इ. ५ वी, ६ वी, ९ वी, व इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी गणित, भूमिती, इंग्रजी व विज्ञान या विषयांसाठी मोफत क्लासेस घेतले जातात. या क्लासेससाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे.

## मोफत वाचनालय

संस्थेच्या माध्यमातून केलवड, जळगाव, ता.रहाता, शारदा शैक्षणिक संकुल राहाता, पोलीस स्टेशन राहाता, माध्यमिक विद्यालय सात्रळ या ठिकाणी मोफत वाचनालय सुरु आहेत.

## वैद्यकीय

संस्थेच्या माध्यमातून मोफत मोतीबिंदू चिकित्सा शिबिर घेऊन त्याचा गावातील अनेक रुग्णांना लाभ मिळाला आहे. गावातील व पंचक्रोशीतील विविध गरजू लोकांना विविध आजारांवर उपचारासाठी संस्थेच्या माध्यमातून मदत दिली जाते.

## धार्मिक कार्य

धार्मिक विकासासाठी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत केली जाते. केलवड येथील मारुती मंदिर, राहता येथील विरभद्र मंदिर, पिंपळस येथील महालक्ष्मी मंदिर, सरला बेट येथील समाधी मंदिर यांच्या बांधकामासाठी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक तसेच मस्जिद बांधकामासाठी संस्थेने हातभार लावला आहे. केलवड येथील गणपती मंदिरास संस्थेने मदत केली आहे. गावातील पायी दिंडी सोहळा तसेच भजनी मंडळासाठी मानधन यासारख्या योजना संस्थेच्या माध्यमातून सुरु आहेत.

## सामाजिक कार्याचे विकत वेड घेतलेली माणसे!

प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी संस्थेच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले आहे. सामाजिक कार्य करता करता त्यांचा प्रवाह वाढला आहे. सामाजिक कार्यात विकत वेड घेतलेली माणसे या संस्थेच्या माध्यमातून दिसून येतात. उद्योजक श्री.नरेशजी राऊत व प्रा.लक्ष्मण गोर्डे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलेले आहे.

### श्री.नरेश राऊत फाऊंडेशन केलवड, ता.राहाता, जि.अ.नगर या सेवाभावी संस्थेने दिलेले पुरस्कार. पुरस्कारार्थींचे नाव

१) मा.महंत श्री.रामगिरीजी महाराज - अध्यात्म रत्न
२) मा.डॉ.सुजयदादा विखे साहेब- समाजभूषण
३) मा.उद्योगपती श्री.राम भोगले - उद्योगरत्न
४) ग्रामपंचायत जळगाव - आदर्श ग्रामपंचायत
५) शारदा शैक्षणिक संकुल - आदर्श शैक्षणिक संकूल
६) श्रद्धा प्रतिष्ठान दाढ - आदर्श सामाजिक संस्था.

१. महाराष्ट्र शासन- टॅलेंट सर्च उपक्रम, शिक्षण विभाग, संपूर्ण राहाता तालुका. २. दत्तक गावे - जळगाव व केलवड (सर्व योजनांसाठी मोफत) ३. श्री.नरेश राऊत फाऊंडेशन संचलित निवासी मुलींचे वसतिगृह सात्रळ हायस्कूल (मोफत वसतिगृह) ४. श्री.नरेश राऊत फाऊंडेशन मोफत वाचनालय १) राहाता शारदा विद्या मंदिर, २) केलवड, ता.राहाता, ३) जळगाव, ता.राहाता, ४) सात्रळ हायस्कूल. ५. मोफत पाणी पुरवठा केलवड. (फक्त टंचाई काळात - केलवड व पिंप्री लोकाई) ६. मोफत एमएस-सीआयटी (एमकेसीएल) प्रशिक्षण केंलवड. १) संगणक १६, २) अद्ययावत इमारत. ७. मोफत सी.सी.सी. चे अद्ययावत केंद्र (केंद्र शासन मान्यताप्राप्त) ८. वैद्यकीय मदत (फक्त गरजूंसाठी) ९. शैषणिक मदत (फक्त गरजूंसाठी) १०. धार्मिक व धर्मादाय मदत (सरला बेट, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर. ११. मोफत महिला संगणक प्रशिक्षण केंद्र. १२. सांस्कृतिक मदत. (भजनी मंडळ केलवड) १३. जळीत, विवाह व इतर कार्ये. १४. नियोजिंत उपक्रम : मोफत महिला कुटीर उद्योग केंद्र केलवड (पुर्तता सुरु) १५. नियोजित उपक्रम : आश्रमशाळा. (प्रस्ताव सादर) १६. नियोजित उपक्रम : कॅन्सर निर्मूलन प्रकल्प. १७. १२ वी (जेईटी अँण्ड सीईटी) मोफत क्लासेस सुरु.

# બ્રહ્માંડમાં જીવનની શોધ

વિજ્ઞાન જગત

ડૉ. જે. જે. રાવલ



પ્રાચીન સમયમાં લોકો માનતા કે પૃથ્વી વિશ્વના કેન્દ્રમાં છે અને પૂરું વિશ્વ તેની ફરતે ફરે છે. પૃથ્વી જ દુનિયા અને તેની ઉપર તારા ભરેલો ગુંબજ. લોકો માનતાં કે મહાન પુરુષ મૃત્યુ પામે છે ત્યારે ઈશ્વર તેને તારાના રૂપમાં રાત્રિ આકાશમાં સ્થાન આપે છે. સૂર્ય, ચંદ્ર અને ગ્રહો બુધ, શુક્ર, મંગળ, ગુરુ અને શનિ દેવતા છે. ત્યારે શનિ સુધીના ગ્રહો જ જાણીતા હતા.

પછી ખબર પડી કે પૃથ્વી પોતાની ધરી પર પશ્ચિમથી પૂર્વ તરફ ગોળ ગોળ ઘૂમે છે. માટે આકાશ પૂર્વથી પશ્ચિમ તરફ ગોળ ગોળ ફરતું લાગે છે. હકીકતમાં આકાશના તારા તો સ્થિર છે. લોકો જળ, વાયુ, પૃથ્વી, અગ્નિ અને આકાશને પંચમહાભૂત માનતા. વાયુની જળની અગ્નિની શોધ થયા પછી અગ્નિની પ્રચંડ તાકાત તેમને સમજમાં આવી હતી. આકાશને પણ તેમને પંચમહાભૂતમાંના એક તત્વ તરીકે લીધું તે બહુ મોટી વાત ગણાય. છાંદોગ્ય ઉપનિષદમાં આપણા ઋષિ-મુનિઓએ લખ્યું છે કે અંતરીક્ષમાંથી બધું ઉત્પન્ન થાય છે અને અંતરીક્ષમાં સમાય છે. જળને પ્રાચીન ઋષિઓ દેવતા માનતા, કારણકે જળથી જ જીવન શક્ય છે. અગ્નિની અગત્ય તેમને સમજાઈ હતી માટે અગ્નિને પણ તેઓ દેવતા માનતા હતા. વાયુને પણ દેવતા માનતા હતા.

તેઓ પૃથ્વી પરની બધી જ વસ્તુ, પશુ-પંખી, પ્રાણી, વનસ્પતિને એક કુટુંબ જ માનતા. તેઓએ માટે જ સૂત્ર આપેલું કે વસુધૈવ કુટુંબકમ્ અર્થાત્ વસુધા એ જ કુટુંબ. પૂરી વસુધા એક કુટુંબ છે.

અઢી હજાર વર્ષ પહેલાં પ્રાચીન વિદ્વાનોને ખબર પડી કે પૃથ્વીની ધરી ઝૂકેલી છે અને તે ૨૩.૫ અંશે ઝૂકેલી છે અને એક તારો હંમેશાં સ્થિર રહે છે. તેને ધ્રુવ નામ આપ્યું.


છેક ઈશુની સોળમી સદીમાં કોપરનિકસે કહ્યું કે પૃથ્વી વિશ્વના કેન્દ્રમાં નથી પણ સૂર્ય વિશ્વના કેન્દ્રમાં છે. તે સમયે લોકો આપણી આકાશપિંડોને તેમની બધી જ અદ્ભુતતામાં જોયાં અને તેને માલૂમ પડ્યું છે કે એ બધાં જ આપણી પૃથ્વી જેવી દુનિયા છે. દૂરબીને ખગોળશાસ્ત્ર એક નવો યુગ શરૂ કર્યો. આકાશીપિંડોને આપણે તેમનાં સાચાં રૂપમાં સમજતા થયા.

તારાના અભ્યાસે દર્શાવ્યું કે આકાશગંગાના ૫૦૦ અબજ તારામાં પચાસ ટકા તારા તો આપણા સૂર્ય જેવા જ છે. જો સૂર્યને ગ્રહમાળા હોય અને પૃથ્વી જેવો જીવનસભર ગ્રહ હોય તો આ બધા તારાને પણ ગ્રહમાળા હોવી જોઈએ અને તેની ફરતે પૃથ્વી જેવો જીવનસભર ગ્રહ પરિક્રમા કરતો હોવો જોઈએ. આમ બ્રહ્માંડમાં આપણી આકાશગંગાની જગ્યાએ જીવન હોવું જોઈએ તેવી માન્યતા દૃઢ બનતી ચાલી.

ગેલિલિયોએ દૂરબીન બનાવ્યું અને બ્રહ્માંડને આપણી નજીક લાવી દીધું. આપણને ખબર પડી કે ચંદ્ર, મંગળ વગેરે આકાશીપિંડો આપણી દુનિયા જેવા જ છે. હવે માનવીને ત્યાં જવાની તમન્ના જાગવા લાગી. ચંદ્ર, મંગળ, શુક્રની દુનિયામાં ઊતરવાની તમન્ના જાગી.

કેપ્લરના નિયમોએ આપણને ગ્રહગતિના નિયમો સમજાવ્યાં આ નિયમોનો અભ્યાસ કરતાં ન્યૂટનને લાગ્યું કે એવું એક બળ છે જે ગ્રહોને સૂર્ય ફરતે પરિક્રમા કરવા મજબૂર કરે છે. ન્યૂટને ગતિના નિયમો આપ્યાં અને છેવટે ગુરુત્વાકર્ષણના નિયમો આપ્યાં. હવે આપણને બ્રહ્માંડ સમજવાની ચાવી મળી ગઈ. વિજ્ઞાન હવે કૂદકે અને ભૂસકે આગળ વધતું ગયું.

માનવીને આકાશમાં ઊડવાની ખૂબ જ તમન્ના રહી છે. છેવટે તે વિમાનમાં આકાશમાં ઊડ્યો, પણ વિમાન તો પૃથ્વીની નજીકમાં જ



મંદાકિની આકાશગંગાને જ પૂરું વિશ્વ માનતા અને માનતા કે સૂર્ય તેના કેન્દ્રમાં છે. જ્યારે કોપરનિકસે જાહેર કર્યું કે સૂર્ય વિશ્વના કેન્દ્રમાં છે અને પૃથ્વી સહિતના બધા જ ગ્રહો સૂર્યની પરિક્રમા કરે છે. ત્યારે પ્રશ્ન ઊઠ્યો કે બુધ, શુક્ર, મંગળ ગુરુ, શનિ બધાં જ જો ગ્રહો હોય અને પૃથ્વી પણ ગ્રહ હોય અને પૃથ્વી પર જીવન છે તો આ બધા ગ્રહો પર પણ જીવન હોવું જ જોઈએ. તે આપણાથી ઊંચે આકાશમાં છે. માટે ત્યાં ઉચ્ચ પ્રકારનું જીવન હશે એવી માન્યતા ફેલાણી.

પ્રાચીન વિદ્વાનો માનતા કે આકાશમાં આપણી પૃથ્વી જેવી બીજી ઘણી દુનિયા હોવી જોઈએ. ડેમોક્રાઈટસ નામના ગ્રીક વિદ્વાને કહ્યું કે વિશાળ ખેતરમાં આપણે જુવારના દાણા વાવીએ અને માત્ર એકજ છોડ ઊગે તેવું બને જ નહીં. ખેતરમાં કેટલાય છોડ ઊગે અને ઊગે જ. તેમ પૂરા બ્રહ્માંડમાં માત્ર પૃથ્વી જેવી જ જીવનસભર દુનિયા હોય તેવું બને જ નહીં. બ્રહ્માંડમાં ઠેર ઠેર પૃથ્વી જેવી જીવનસભર દુનિયાઓ હોવી જોઈએ.

પછી ખબર પડી કે સૂર્ય તો એક તારો છે અને બધા તારા સૂર્ય. પછી ખબર પડી કે સૂર્ય આપણી મંદાકિનીનાં કેન્દ્રમાં નથી પણ તે આપણી આકાશગંગા મંદાકિનીનાં કેન્દ્રથી બે તૃતિયાંશ દૂર છે. અને બ્રહ્માંડમાં આપણી મંદાકિની જેવી ૧૦૦ અબજ મંદાકિનીઓ છે. આપણી આકાશગંગા મંદાકિનીમાં ૫૦૦ અબજ તારા છે. ૫૦૦ અબજ સૂર્ય છે. આ બધું સદીઓના ખગોળવિજ્ઞાનીઓના આકાશ નિરીક્ષણથી શક્ય બન્યું. તે પછી પ્રશ્ન થયો કે જો સૂર્ય એક તારો હોય અને તેની ફરતે ગ્રહમાળા હોય તો બીજા તારા પણ સૂર્યો જ છે. તેમની ફરતે પણ ગ્રહમાળા હોવી જોઈએ અને તેમાં ઓછામાં ઓછો એક ગ્રહ પૃથ્વી જેવો હોય જ્યાં જીવનની સંભાવના હોય.

ગેલિલિયોએ પોતાનું દૂરબીન બનાવી અને આકાશ તરફ માંડ્યું તો તેણે ચંદ્ર અને ગ્રહોની સપાટી જોઈ. આ બધાં નજીકના

ઊડી શકે. તે ૩,૮૪,૦૦૦ કિલોમીટર દૂર સ્થિત ચંદ્ર પર ન જઈ શકે. તે માટે માનવીએ મોટા મોટા રૉકેટો બનાવ્યાં. ન્યૂટનના નિયમો તો છે કારમાં પેટ્રોલ નાખો તો તે ન્યૂટનના નિયમો વડે ચાલે. પણ પેટ્રોલ નાખવું પડે. ચંદ્ર પર જવા પેટ્રોલ તો ઈંધણ તરીકે ચાલે નહીં. રસાયણશાસ્ત્ર અસ્તિત્વમાં આવ્યું. રસાયણશાસ્ત્રની મદદ વડે માનવી વાયુઓને સમજી શક્યો. તેની પ્રવાહિતાને સમજી શક્યો. અને તેના ગુણધર્મોને સમજી શક્યો. હાઈડ્રોજન અને ઓક્સિજનના તેણે રૉકેટના ઈંધણ તરીકે વાપર્યું અને રૉકેટને ચંદ્ર સુધી જવા સક્ષમ બનાવ્યાં. ન્યૂટનના નિયમો શોધાયા પછી છેક ૨૭૦ વર્ષ પછી રૉકેટ આકાશમાં ઊડ્યું.

આ તરફ મોટા મોટા દૂરબીનો બનતા ગયા ખગોળવિજ્ઞાનીઓએ ગ્રહો, ચંદ્રો, તારાનો અભ્યાસ કર્યો. આપણે સૂર્યમાળાના આકાશીપિંડોને ઘણા નજીકથી સમજતા થયાં. ૧૯૫૭નાં ઑક્ટોબર મહિનાની ચોથી તારીખે રૂસી વિજ્ઞાનીઓએ અંતરીક્ષમાં પ્રથમવાર સ્પૂટનિક નામનો કૃત્રિમ ઉપગ્રહ છોડ્યો. પછી યુરી ગાગારીનું અંતરીક્ષમાં પૃથ્વીની પરિક્રમા કરી આવ્યો. માનવીને હવે લાગ્યું કે તે બીજા ગ્રહ પર ઊતરી શકશે. ચંદ્ર પર ઊતરી શકશે. ચંદ્ર કેવો હશે તે જાણવાની માનવીને તાલાવેલી લાગી. શું ચંદ્ર પર કોઈ જાતનું જીવન હશે? જોકે, પૃથ્વી પર બેઠાં બેઠાં જ વિજ્ઞાનીઓએ જાણી લીધું હતું કે ચંદ્રને વાતાવરણ નથી. તેથી નીલ આર્મસ્ટ્રોંગ ઓક્સિજનના નળાકારો લઈને તેના સહકાર્યકર આલ્વીન આલ્ડ્રીન સાથે ચંદ્ર પર ઊતર્યા. તેણે ચંદ્રની અદ્ભુત દુનિયા જોઈ. ચંદ્ર પરથી પૃથ્વીને જોઈ. ચંદ્ર ખાલીખમ દુનિયા છે. પછી તેજ થયું કે કદાચ મંગળ પર કોઈક જાતનું જીવન હશે. વિજ્ઞાનીઓ માનતાં કે ચંદ્ર પર નદીઓ છે માટે મંગળનો તાગ કાઢવા બે વાઈકિંગ યાનો મંગળ પર ઊતર્યાં. તેણે દર્શાવ્યું કે મંગળ પર કોઈ જાતનું જીવન નથી.



# જનારાને શ્રદ્ધાંજલિ

સમાજ દર્પણ

મીરા ભટ્ટ



હજુ તો એ પાંખો ફફડાવતો, ભરજોબનમાંથી પસાર થતો થનગનતો યુવાન હતો. એની આંખોમાં એક સપનું અંજાયેલું હતું કે સમસ્ત દુનિયામાં ગુજરાતી ભાષાના સર્વોત્તમને પહોંચાડતા રહેવું. એની 'રીડ ગુજરાતી' વેબસાઈટે વિદેશમાં વસતા અનેક ગુર્જરજનોને ગુજરાતી ભાષામાં રસ લેતા કર્યા હતા.

એ આમ જ એક ભરબપોરે મારે ત્યાં આવી ચઢ્યો હતો. મારા એક પુસ્તકના એક પ્રકરણને એને વેબસાઈટ પર મૂકવું હતું, એની સંમતિ લેવા. 'સાત પગલાં સાથે' પુસ્તકનું એ પ્રથમ મુલાકાત પ્રકરણ હતું. બે લગ્નોત્સુક યુવા-યુવતી પહેલી મુલાકાતમાં જે પરસ્પર આદાન-પ્રદાન કરે છે, ભાવિ જીવનનો નકશો દોરે છે તેની વાત એ પ્રકરણમાં હતી. એ વાંચીને એને થયેલું કે મીરાબહેન કોઈ આવી જ સ્વપ્નશીલ નવયુવતી હશે, પરંતુ આવીને જોયું તો પંચોતેરના આરે પહોંચેલી શ્વેતકેશી માતૃતુલ્ય મહિલા! પણ એકાદ કલાકની વાતચીત પછી તો સાચે જ હું એની એવી માતૃતુલ્ય બની ગઈ કે એના મા-બાપ પાસે પણ જે વાતો ન ખોલાઈ હોય એ અમારી પાસે ખોલતો થઈ ગયો.

ગમે ત્યાંથી શોધીને મારા લેખો દુનિયાને પહોંચાડતો રહ્યો અને એના પ્રતિસાદમાં આવતા સંદેશાઓને પણ પહોંચાડતો રહ્યો. ઉપરોક્ત પ્રકરણના અનુસંધાને તો બત્રીસ જેટલા પ્રતિસાદ આવેલા. 'રીડ ગુજરાતી' ઉપરાંત અમારા બન્ને વચ્ચેની એક મજબૂત કડી હતી મોરારિબાપુની. 'અસ્મિતાપર્વ' સાથે એ વર્ષોથી જોડાયેલો અને મોરારિબાપુ એના શ્રદ્ધેય સ્થાને હતા. બાપુની સેવાગ્રામ-કથા વખતે મને પવનાર સુધી પહોંચાડવાનું કામ બાપુએ મૃગેશને સોંપ્યું હતું!

હા, મૃગેશ એનું નામ. મૃગેશ ધનંજય શાહ. પિતા-પુત્ર બન્ને સદ્ભાવનાથી ભર્યા ભર્યા, પણ બન્ને ગભરુ ગભરુ લાગે! એમની કોઈ પણ નવી દિશા દબાતા પગલે જ ખૂલે, પરંતુ ઈશ્વરી કૃપા એવી કે બધું સમુંસૂતરું ચાલતું હતું. એનું કામ નિરંતર આગળ ધપે જતું હતું. એના આંગણે હવે ગાડી પણ આવી ગઈ હતી અને પપ્પા સાથે દુબઈ-સિંગાપોર જેવાં પર્યટને પણ એ જઈ આવ્યો હતો.

પરંતુ અચાનક કોણ જાણે શું થયું. આ વખતની શ્રીનાથજીની યાત્રા એના માટે જીવલેણ બની ગઈ! માથા પર ગરમી ચઢી ગઈ હોય કે અન્ય કોઈ કારણસર અચાનક એ એવો બેભાન થઈ ગયો કે પછી એણે આંખો જ ન ખોલી. આઠ-દસ દિવસ દવાખાનામાં રહ્યો. ધીરે ધીરે શરીરની તમામ ક્રિયાઓ જાણે સમેટાતી રહી અને એક દિવસ ડૉક્ટરે કહી દીધું કે આમ તો ઘણા દિવસ લાંબુ ખેંચી-તાણી શકાય, પણ પાછા ફરવાનાં કોઈ લક્ષણ જણાતા નથી! પરિવારમાં માત્ર પિતા હતા. એમને જ કાળો નિર્ણય કરવાનો હતો. પણ 'જેવી ઈશ્વરની ઈચ્છા' કહીને પિતા એને સ્વસ્થતાપૂર્વક ઘેર પણ લઈ આવ્યા અને બે દિવસમાં તો બાકીની લીલા પણ સંકેલાઈ ગઈ.

મૃત્યુ પોતે જ અજ્ઞાત પ્રદેશનું અચાનક આવી પડતું આગંતુક, એમાં અકાળે આવતું અણધાર્યું મોત તો માણસને જાણે અજ્ઞાતના મહાસાગરનાં ઊંડાં જળમાં ડુબાડી દે છે! પરંતુ આપણા માટે જે અકસ્માત, તે નિયતિ માટે તો નિત્યનાં વિધિવિધાન જ છે! માણસ કશું જ ગૃહિત ધારીને જીવી ન શકે. એણે તો હર પળ અકસ્માત માટે તૈયાર રહેવું પડે. એ ઘટના અ-કસ્માત્ ક્યાંથી આવી પડે છે તેનાથી અજાણ હોઈએ છીએ ત્યારે તો એ 'અકસ્માત' કહેવાય છે.

'સાવધાન!' ઈશ્વરની સૂચના આપવાની આ રીત છે. અવધાનતા સાથે જીવવું તે સાવધાની, ધ્યાન જુદી ચીજ છે. અવધાનતા જુદી ચીજ છે. અવધાન એટલે પ્રતિપળ વર્તુ સમેટીને જીવવું. લક્ષાર્થ માટે પણ કેન્દ્ર પરથી નજર ન હટે. જે સતત ન હોય તે સાવધાનીજ ન કહેવાય. સૂરજ સતત તપે છે, નદી સતત વહે છે, પૃથ્વી સતત ઘૂમે છે. ચાંદ-તારા-નક્ષત્રો સતત ઘૂમતા રહે છે. તો જીવનની પ્રતિક્ષણની આ સાવધાની પણ સાતત્ય માગી લે છે.

હવે સાવધાની અને સ્મરણ સતત મરણનાં કરવાનાં કે પ્રભુનાં- એ આપણી પસંદગીનો વિષય છે. સદ્નસીબે પ્રભુ જો 'પ્રીતમ પ્યારો' બન્યો હશે તો આ સાવધાની વરદાનરૂપ બની જશે. એક બાજુ, પ્રીતમનું નિત્ય મધુર સ્મરણ, બીજી બાજુ એની બનાવેલી દુનિયાના સૌ જીવાત્મા સાથે પ્રેમભર્યા સંબંધની સેવના! આવા અભિગમથી પૃથ્વીલોક અને પ્રભુલોક બંને લોક સધાશે. આપણી સાથે પૃથ્વી પરના સ્નેહીજનોની પ્રેમસંપદા પણ આવશે, જે આપણા ગયા પછી ફૂલની મીઠી સુગંધ બનીને પૃથ્વી પર વહેતી રહેશે. પરંતુ ઘણા લોકોને માટે આ જ્ઞાન 'સ્મશાન જ્ઞાન' જેટલું ક્ષણિક નીવડે છે. આ નિરંતર યાદ નથી રહેતું. એટલે ભગવાન અને મૃત્યુ નિત્ય-સ્મરણનો વિષય છે. જે રીતે શ્વાસ લેવા-મૂકવાનું યાદ કરવું પડતું નથી, એવો જ ભગવાન હૈયા વગો થઈ જવો જોઈએ. શ્વાસે શ્વાસે રામ કહો, બિના નામ નહીં સાંસ! હકીકતે, ભગવાન યાદ કરવાની ચીજ નથી. ભગવાન યાદ આવવાની ચીજ છે. એ સતત યાદ આવતો રહેવો જોઈએ.

મૃત્યુ સતત યાદ આવતું થઈ જાય તે માટે વિનોબાએ આપણી નિત્ય નિદ્રાને મૃત્યુનો પૂર્વપ્રયોગ બનાવી દેવાની ભલામણ કરી છે.

બસ, દિવસ વિરમ્યો, સાંજ પડી અને રાતનાં ઓળાં ઊતરી આવે ત્યાં રોજના દૈનિક જીવનનો વીંટો વાળીને ગર્ભાગારમાં મૂકી પ્રીતમને ઓવારે પહોંચવાની તૈયારી કરવી.

સજીવજીને શય્યા પર પડ્યા કે તરત આંખો મીંચાતા જ પ્રભુ સાથે દૃષ્ટિ-મિલન સધાઈ જાય! ગાઢ નિદ્રા એ પૃથ્વી પરના જીવલોકનું મહામૂલું ઘરેણું છે. પરમ શૂન્યતાથી...

આમ તો પળે-પળે લાખો જીવ મરતા હશે, પરંતુ આપણને સ્પર્શી જનારાં મોત પણ આમ જ હવાની લહેરની જેમ અકસ્માત આવી પડે છે! જીવનનું સ્વરૂપ જ આવું છે, એ જેટલું વધારે આત્મસાત્ થાય તેટલું વધારે સહ્ય બની શકે. આપણી અસહ્યતાનું મુખ્ય કારણ-વિયોગ છે. જીવનમાં વિયોગને પચાવવો એ મોટો જીવનયોગ છે. આ પાચનપ્રક્રિયા રોજેરોજ ચાલે તો જ આ વાત પચી શકે તેવી છે. એ માટે 'લગોલગ, છતાંય અલગ' હોવાની મનોવૃત્તિ કેળવવી પડે છે. ઈશ્વરે આપણા માટે આ 'એકલતા' એટલા માટે સર્જી છે કે એ એકાકીતમાંથી સર્વાભિમુખતા કેળવાય. આપણી પોતાની એકાકીતામાં ડૂબી જવું તે પૂરતું નથી. જેવી રીતે બી ધરતીના પેટાળના એકાંતિ અંધારામાં ફૂટીને અનેક બનવા તરફ આગળ વધે છે, એ રીતે આપણી એકાકીતાએ પણ નિજાત્મામાં ડૂબીને અનેકતાને પેદા કરવાની છે.

જ્ઞાનેશ્વર મહારાજે કહ્યું છે કે આ નરબીજ એ બ્રહ્મબીજ છે. બ્રહ્મ એટલે જ અનંત-વ્યાપ્તિ! આપણા જન્મ-જન્માંતરનાં એક પછી એક આવતાં મરણ જો આપણને બ્રહ્મ-બીજત્વની પ્રાપ્તિ ન કરાવે તો આપણા ફેરા વ્યર્થ ગણાશે.


વિશ્વની ઘણી ભાષામાં અનેક પ્રકારના તહેવારોની ઉજવણી થાય છે, પરંતુ ભારત સિવાય બીજા કોઈ પણ દેશમાં મૃત્યુને ડેથ-ફેસ્ટિવલ, એટલે કે 'પ્રયાણોત્સવ' કહેવાયો નથી. આ ભારતીય સંસ્કૃતિ છે જ્યાં મૃત્યુનો પણ મહોત્સવ રચાય છે. અને મૃતકને આપવાની અંજલિને 'શ્રદ્ધાંજલિ' કહેવાય છે! આ જ તો ખૂબી છે ભારતીય સંસ્કૃતિની. અહીં મરણાંજલિ પણ શ્રદ્ધાંજલિ બની જાય છે. આ શ્રદ્ધાંજલિ માનવની આ શ્રદ્ધાને રૂઢ કરાવવા માટે છે કે જે ગયું છે, તેનો માત્ર દેહ ગયો છે. એની અનંત યાત્રા હજુ ચાલુ જ છે અને પ્રભુનાં ચરણોમાં શ્રદ્ધાપૂર્વક એ જ નિવેદન છે કે એની યાત્રાને એની મંઝિલ સુખરૂપેણ પ્રાપ્ત થઈ જાય! જનાર માટેની આવી શ્રદ્ધા એ જ સાચું શ્રાદ્ધ છે. એ જ સાચું તર્પણ છે! ભાઈ મૃગેશ અને ભરતભાઈ બન્નેની સ્મૃતિમાં આ શ્રદ્ધાંજલિના શબ્દફૂલ પાથરીને સૌની શાંતિ માટે પ્રાર્થું છું.

# શિરડીમાં સેવાધૂપની સુગંધ

શબ્દવેધ

રજનીકુમાર પંડ્યા

rajnikumarp@gmail.com



ઈ વાર આકાશમાં બે ગ્રહોની યુતિ રચાય છે જે અતિ ઉત્તમ પરિણામો લાવે છે એમ કહેવાય છે, પણ કોઈ વાર એકબીજાથી સાવ અજાણ્યા એવા બે માણસોની અણધારી યુતિ થાય તો? યુતિશાસ્ત્ર કહે છે કે યુતિ કોની કોની થાય છે તેના કરતાં વધુ મહત્વનું એ છે કે યુતિ પૃથ્વીના કયા સ્થાને (યુતિશાસ્ત્રમાં એને 'સ્થલવિશેષ' કહેવામાં આવ્યું છે) થાય છે તે વધુ મહત્વનું છે., મહારાષ્ટ્રમાં આવેલા સાંઈબાબાનું યાત્રાધામ શિરડી કદાચ એવું 'સ્થલવિશેષ' છે, એની તદ્દન નજીક એના જ સગર્ભ જેવા ગામ કેલવડમાં કોઈ એક પ્રસંગે એવી બે વ્યક્તિઓની યુતિ થઈ કે જેના પરિણામે એ આખા વિસ્તારની કાયાપલટ થઈ રહી છે.

પુના યુનિવર્સિટીના મેથેમેટિક્સ શાખેના સાયન્સ ગ્રેજ્યુએટ લક્ષ્મણ દેવરામ ગોરે હવે ચુમ્માલીસ વર્ષના છે. વંશપરંપરાગત વ્યવસાય ખેતીનો છે, તેર એકર જમીનમાં શેરડી, બાજરો, જુવાર જેવા પાક લેતા હતા. પરંતુ વિશેષ ધ્યાન નાની-મોટી વ્યક્તિગત સમાજસેવા ભણી રહેતું હતું. ખેતી પર થોડું ધ્યાન આપવાની સાથે શિક્ષકની નોકરી પણ કરતા હતા. કેલવડની શાળામાં ધોરણ દસથી બારના વિદ્યાર્થીઓને ગણિત ભણાવતા હતા. લોકોમાં લાડીલા 'ગોરે સર' ગરીબ વિદ્યાર્થીઓને પોતાને ઘેર બોલાવીને મફત ટ્યુશન આપતા હતા, કોઈ કોઈ જરૂરતમંદોને થોડી ઘણી આર્થિક મદદ કરતા રહેતા હતા, કોઈના ઝીણા મોટા કામ આટોપી આપતા હતા. ગામમાં વાંચનાલય ચલાવતા હતા. કોઈ બીમાર પડી ગયું હોય અને સેવાસુશ્રૂષાની જરૂર હોય, કોઈની અંતિમયાત્રાની વ્યવસ્થા કરવાની હોય, તો એની ગોઠવણ પણ જાતે ગાંઠના ખર્ચીને એ કરી આપતા હતા. એકવાર નજીકના દુકાળપીડિત ગામમાં પીવાનાં પાણીની ભયંકર તંગી ઊભી થઈ ત્યારે સતત ચાર મહિના સુધી રોજ આઠ હજાર લિટર જેટલું પાણી જાતે ટેંકરમાં લઈ જઈને તેમણે પૂરું પાડ્યું હતું. આ બધું એમનામાં પડેલી જન્મજાત વૃત્તિને આભારી હતું. એ એમ કહેતા કે શિરડીના સાંઈબાબાએ જિંદગી આખી ગરીબોની સેવા માટે ખર્ચી નાખી, આ દેહ એ જ ભૂમિ પર વિચરે છે તો એનું એક હજારમાં ભાગનું અનુસરણ હું ના કરી શકું તો મને આ સેવા-ભક્તિના વિચાર તરંગોવાળી ભૂમિનો ત્યાગ કરી દેવો જોઈએ. એકવાર સુભાષ દાંડેકરના ઉદ્યોગશ્રી ઈન્ડસ્ટ્રીઅલ ગ્રુપના કોઈ ઉદ્યોગશ્રી સમારંભમાં શિરડી ગયા. એકબીજાની પિછાણ કરતાં કરતાં એમની મુલાકાત ૨૦૦૭ માં દાનવીર ઉદ્યોગપતિ નરેશ રાઉત સાથે થઈ.



મુંબઈના ઉદ્યોગપતિ નરેશ રાઉતની સદ્ અને ભાગ્યશીળ કથા સમાંતરે જ ચાલી આવે છે. ૧૯૪૭ના સપ્ટેંબરની ૧૯મીએ ગુજરાતના ડહાણુ તાલુકાના બોરડી ગામે જન્મેલા નરેશ રાઉતે ૧૯૮૭માં મુંબઈના જોગેશ્વરીમાં માત્ર ચાર કામગારોથી શરૂ કરેલી એક નાનકડી ફેક્ટરીથી આજે પોતાના ઉદ્યોગને મલ્ટિલેવલ ઑર્ગેનિઝેશન સુધી પહોંચાડ્યો છે, તેમની ફેક્ટરીઓ દાદરા-નગર હવેલી, સેલવાસ, ચારકોપ-કાંદિવલી, આંબડ નાસિક, મેગ્રુસ (પૂને), કાંચીપુરમ (ચેન્નઈ) જેવાં સ્થળોએ તેમની ઉદ્યોગ શાખાઓ છે. પરંતુ કમનસીબ એ કે એમના એક પછી એક એમ બન્ને પુત્રો વિકલાંગ જન્મ્યા, પણ હિંમત હાર્યા વગર એમણે બન્ને પુત્રોને એન્જિનિયર બનાવ્યા. બન્નેના અત્યારે લગ્ન પણ થઈ ગયા. નરેશ રાઉત શરૂથી જ સેવાવૃત્તિ ભાવના ધરાવે છે. ગોરે સર સાથે એમની મુલાકાત ખરેખર શુભયુતિ સાબિત થઈ. ગોરે સરે એમને શિરડી (કેલવડ) આવવાનું નિમંત્રણ આપ્યું, કારણકે એ નરેશ રાઉતે એમના વતન બોરડીમાં કરેલી શુભ પ્રવૃત્તિઓથી વાકેફ હતા. ૧૯૮૪ માં એમણે બોરડીમાં પ્રેરણા લાઈબ્રેરીની સ્થાપના કરી હતી, ૧૯૮૭માં નરેશ રાઉત ફાઉંડેશનના નામથી બોરીવલીમાં સમતોલ ટ્રસ્ટની કામગીરી કરી હતી, એ ઉપરાંત એમના કામની સુવાસ ગોરે સર સુધી પહોંચી હતી. એટલે કાંઈક વિચારીને જ ગોરે સરે નરેશભાઈને કેલવડ આવવાનું નિમંત્રણ આપ્યું, ૨૦૦૭ માં એ ગોરે સરને ઘેર આવ્યા અને એમની સાથે ગામડાઓમાં ફર્યા પણ ખરા, ગોરે સરનું કામ પણ જોયું અને સંસ્થાગત છત્રના અભાવે કરીને એમને નડતી મર્યાદાઓ પણ એ જોઈ શક્યા. બેઉએ ભેગા મળીને આ આખા ગ્રામ્ય વિસ્તારની અનેકવિધ ક્ષેત્રે સેવાઓ કરવાનો નિર્ધાર કર્યો અને પરંપરાગતને બદલે નવતર સેવા પ્રવૃત્તિઓનો આરંભ કરી દીધો.

તેમણે જોયું કે આ ગ્રામ્ય પ્રદેશની મહિલાઓમાં કેળવણીનું પ્રમાણ બહુ નીચું છે, પણ અત્યારના યુગની આવશ્યકતા તેમને પરંપરાગત નહિ પણ રોજગારલક્ષી તાલીમ આપવાની છે. આના ઉકેલના પ્રથમ કદમ રૂપે સૌથી પ્રથમ મહિલા કમ્પ્યુટર કેન્દ્રની સ્થાપના કરી જેમાં નરેશ રાઉતે પોતાના એકલા તરફથી અગિયાર જેટલા કમ્પ્યુટરસેટ આપ્યા અને મહિલાઓને નિઃશુલ્ક તાલીમ આપવાની વ્યવસ્થા કરી. એ પહેલાં એ સગવડ માત્ર દૂર દૂરનાં ગામોમાં જ હતી અને ભારે ફી સાથે હતી. જેથી કન્યાઓ તેનો લાભ લઈ શકતી નહોતી. હવે આ કેન્દ્રના આરંભથી એ સમસ્યા હલ થઈ ગઈ છે. હવે તો સમાજના સહકારથી ત્યાં વીસ કમ્પ્યુટર છે. માત્ર કન્યાઓ જ નહિ, છોકરાઓ પણ ત્યાં તાલીમ મેળવે છે. આ તાલીમ પણ ડીટીપી, સીસીપી અને એમ.સી.આઇ.ટી જેવી રોજગારલક્ષી છે. આને કારણે બેકારીનું પ્રમાણ આ વિસ્તારમાં બહુ ઘટી ગયું છે.

સરકાર તરફથી શાળાઓમાં મધ્યાહ્ન ભોજન આપવામાં આવે છે. અનેક શાળાઓમાં તેમણે ભોજન લેવા માટે થાળી, વાટકા અને ચમચીના સેંકડો સેટ્સ આપ્યા. કેટલીક શાળાઓમાં વિદ્યાર્થીઓને બચતની પ્રેરણા મળે તે વાસ્તે વિદ્યાર્થીઓના બચત જૂથ રચી આપ્યા.

પણ આખરે તો એકલા નરેશ રાઉત કે ગોરે સરથી આનો બોજો ના ઉઠાવી શકાય તે સ્વાભાવિક જ છે. સમાજનો પણ ભરપૂર સહયોગ આમાં જોઈએ જ. અને તે માટે સંસ્થાનું રજિસ્ટ્રેશન કરાવવું અનિવાર્ય હતું. છેવટે એ માટેની કાર્યવાહી પણ સંપન્ન કરવામાં આવી અને ૨૦૧૩ના ઑગસ્ટની ૨૨મીએ ચેરિટી કમિશનર દ્વારા તેને ચેરિટેબલ ટ્રસ્ટનો દરજ્જો પણ પ્રાપ્ત થયો.

એ પછી પ્રવૃત્તિનો વ્યાપ વધ્યો. ખેતીમાં અવનવા પ્રયોગો કરીને નવી દિશાઓ ખોલી આપનાર ખોખનાર તાલુકાના ગામ જળગાંવને આર્થિક તથા ટેકનિકલ મદદ પૂરી પાડવાના હેતુથી દત્તક લેવામાં આવ્યું, કેલવડમાં જ કવ્ય વિધાયક સંસ્થાની સ્થાપના કરી અને તેમાં એલસીડી પ્રોજેક્ટર ભેટ આપ્યું અને ચારસો જેટલા વિદ્યાર્થીઓને માટે બોરવેલ, ઇલેક્ટ્રિક મોટર અને તેને લગતી સામગ્રી ઉપલબ્ધ કરાવી, વિજ્ઞાન શિક્ષણ માટેનાં સાધનો લઈ આપ્યાં, શાળા જતી બાળાઓને મફત ગણવેશ આપવાથી માંડીને તેમને રમતગમત અને અભ્યાસમાં ઉત્તમ પરિણામો લાવવા બદલ પ્રોત્સાહક ઇનામો આપવા જેવી અનેક પ્રવૃત્તિઓ પણ આદરી.

હવે તેમનો પ્લાન મહિલાઓ માટે કુટિર ઉદ્યોગ શરૂ કરવાનો છે, અત્યારે પણ પાપડ, મસાલા અને અન્ય ગૃહોપયોગી વસ્તુઓનું ઉત્પાદન તો ચાલુ જ છે પરંતુ હવે જો કોઈ દાતા આગળ આવે તો પેપરડીશ, પતરાળી અને નાયલોન દોરી બનાવવાના ત્રણ મશીનો વસાવવાનાં છે. એની કિંમત અંદાજે પચાસથી સાઠ હજાર થાય છે, એમ તો લોકોનો આર્થિક સહયોગ મળે તો રખડતી-ભટકતી જાતિના અનાથ થઈ ગયેલાં બાળકો માટે અનાથાશ્રમ ઊભું કરવાનું આયોજન છે. ગોરે સરે એ માટે પોતાની પચાસથી સાઠ લાખની કિંમતની જમીન પણ આ ફાઉંડેશનને દાનમાં આપી દીધી છે, "કેલવડકર રત્ન" તરીકે લોકોમાં ઓળખાતા ગોરે સર અને શ્રેષ્ઠી નરેશ રાઉત એને માટે ભંડોળ ઊભું કરવા પ્રયત્નશીલ છે. આવકવેરાની કલમ ૮૦ જી મુજબનું સર્ટિફિકેટ પાઈપલાઈનમાં છે.

સંસ્થાનો સંપર્ક - શ્રી નરેશ રાઉત ફાઉંડેશન, મુ.પોસ્ટ-કેલવડ. તા. રાહાતા. જિ. અહમદનગર-પિન-૪૨૩૧૦૭/ ગોરે સર-૦૯૫૨૭૩૩૫૯૧૨/ નરેશ રાઉત, મુંબઈ-૦૯૮૨૦૯૨૨૬૩૩/ E mail- nrfoundation13@gmail.com / support@shrinareshfoundation.co/ સંસ્થાની તે જ નામથી વેબસાઈટ પણ છે.


जि.प.प्राथ.शाळा, केलवड व्यवस्थापन समिती सदस्य व
नरेश राऊत फौंडेशनचे सेक्रेटरी मा.प्रा.लक्ष्मण देवराम गोर्डे
यांचे शाळेला दिलेल्या योगदानाबद्दल
जाहिर आभार..!
केलेले सहकार्य
४० इंची L.E.D. व इन्व्हर्टरसाठी ५०,०००/-
पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवे- इलेक्ट्रीक मोटार, जेवणाची ताटे व पाईप लाईनसाठी २१,०००/-
१५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ
दिपावली निमित्त सर्व मुलांना खाऊ दिला.
ऑफिस फर्निचरसाठी रू.२१,०००/-
श्रीमती रोहिणी घाटे
मुख्याध्यापिका जि.प.केलवड
सौ.सविता रावसाहेब वाघे
उपाध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती
श्री.चंद्रकांत पुंजाजी गमे
अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती
सदस्य-
साळबा रजपूत, बाबासाहेब ठोंबरे, मच्छिंद्र रजपूत, आण्णासाहेब खंडागळे, सौ.उषा गोडगे,
वृषाली कांदळकर, सौ.वंदना बढे, सौ.विद्या गमे, सौ.मंदा रजपूत,श्री.प्रा.लक्ष्मण गोर्डे,
सरिता सोनवणे, संपदा गमे, संदेश घोरपडे, वाल्मीक गमे,
,सन-२००७-०८.
,केलवड.
सर्व शिक्षा

दैनिक पुढारी
अहमदनगर
शुक्रवार, दि. ७ एप्रिल, २०१७

# वेध.. ग्रामीण विकासाचा!

# सामाजिक बांधिलकी जपणारे 'नरेश फौउंडेशन'



उद्योगपती
मा. नरेश राऊत



सचिव
प्रा. लक्ष्मणराव गोर्डे

*केलवड सारख्या ग्रामीण भागात जिथे नागरिकांना पिण्यासाठी पाणी नाही. हा संपुर्ण परिसर जिरायत परिसर म्हणून ओळखला जातो. अशाठिकाणी समाजातील गरजू घटकांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे अशी संकल्पना बाळगणारे मुंबई येथील उद्योजक नरेश राऊत यांच्या माध्यमातून उच्चशिक्षीत असलेले प्राध्यापक लक्ष्मणराव गोर्डे यांनी नरेश राऊत फौंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजु घटकांसाठी विविध योजना राबवुन जिल्ह्यात नव्हे तर राज्यात नरेश राऊत फौंडेशनची ओळख निर्माण केली आहे.*

ेब सोनवणे

समाजातील गरीब व गरजू व्यक्तींकरिता आपण काहीतरी केले पाहिजे याची मनात जिद्द लहानपणापासुनच मनात बाळगून प्राध्यापक लक्ष्मण गोर्डे यांनी अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत सायकलवरुन जावून बी.एस्सी. पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. त्यानंतर त्यांनी केलवड येथील ग्रामीण भागात १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत क्लास घेण्यास सुरुवात केली. १० वीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देत असतांना आपण समाजातील गरजू व्यक्तींना शिक्षणासाठी मदत केली पाहिजे अशी आशा मनाशी बाळगुन असलेल्या प्रा. गोर्डे यांची मुंबई येथील उद्योगपती नरेश राऊत यांच्याबरोबर भेट झाली. मुंबईत काही उद्योगपती एकत्र येवून त्यांनी नरेश राऊत फौंडेशनची स्थापना केली. त्यांनी सुरुवातीच्या काळात मुंबई येथे जाण्यासाठी उशिरा बसने प्रवास करुन अनेकवेळा मुंबई येथे रेल्वे स्टेशनला झोपावे लागले. परंतू मनाशी जिद्द असल्यामुळे त्यांनी मुंबई येथील उद्योगपती नरेश राऊत यांच्या माध्यमातून गरजू नागरिकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवुन त्यांना उत्पादनाचे साधन कसे उपलब्ध होईल व गरजु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगांवी न जाता ग्रामीण भागात याचा कसा उपयोग होईल याची संकल्पना मनाशी बाळगुन त्यांनी केलवड येथे नरेश राऊत फौंडेशनची स्थापना सन २०१३ साली केली. ग्रामीण भागातील महिलांनी आपल्या स्वत:चा व्यवसाय करुन स्वत:च स्वावलंबी व्हावे. दुसऱ्यावर अवलंबुन न राहता महिलांनीही व्यवसायात पुरुषांच्या बरोबरीने रहावे यासाठी महिलांना मोफत संगणक प्रशिक्षण, मोफत सॅनिटरी नॅपकिन प्रकल्प, मोफत ब्युटी पार्लर कोर्सेस असे महिलांसाठी विविध प्रकारचे कोर्सेस फौंडेशन मार्फत संपुर्ण जिल्ह्यात व राज्यात सुरु केले.

या उपक्रमाचे तालुक्याचे शिल्पकार ना. राधाकृष्ण विखे पाटील, युवा नेते सुजय विखे व जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी अनेकदा कौतुक केले आहे. प्राध्यापक गोर्डे यांनी नरेश राऊत फौंडेशनच्या मार्फत अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी भरीव मदत दिली आहे. मागील वर्षी दुष्काळादरम्यान ना. विखे पाटील यांच्या संकल्पनेतून तालुक्यात राबविलेल्या जलक्रांती अभियानात नरेश राऊत फौंडेशनने केलवड व जळगाव हे दोन गावे दत्तक घेवून तेथील पिण्याचा पाणी प्रश्न सोडविण्यास मोठा वाटा उचलला. तसेच तालुक्यातील अनेक गरजू नागरीकांसाठी केलवड येथे मोफत सर्व रोगांचे निदान व्हावे यासाठी अभ्यासु व अनुभव असलेल्या डॉक्टरांची व्यवस्था करुन येथे दवाखाना सुरु केला. दररोज या दवाखान्यामध्ये ग्रामीण भागातील शेकडो रुग्ण येवून मोफत औषधोपचार घेतात. फौंडेशनच्या माध्यमातून जळीत झालेल्या घरांना मदतीचा हात दिला आहे. पंचक्रोशीतील विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले आहे. या उपक्रमासाठी निधी मिळविण्याची धडपड नरेश राऊत फौंडेशनचे सचिव गोर्डे हे नेहमीच करीत असतात. त्यांची काम करण्याची धडपड, चिकाटी व कष्ट यामुळेच आज नरेश राऊत फौंडेशन जिल्ह्यात नव्हे तर राज्यात नावारुपास आले आहे. अशा एक ना अनेक योजना सर्व सामान्यांसाठी प्राध्यापक लक्ष्मणराव गोर्डे राबवत आहेत. यापुढेही त्यांच्या कार्याची घोडदौड अशीच सुरु राहणार आहे.




राहाता : नरेश राऊत फाऊंडेशनने केलवड येथे ग्रामीण भागात सुरू केलेला मोफत वैद्यकीय दवाखाना.

शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०१५

अध्यक्ष



मा. नरेश राऊत साहेब, उद्योगपती

सचिव



प्रा. लक्ष्मण गोर्डे (सर)

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

वर्धापनदिनास

हार्दिक शुभेच्छा!

# श्री नरेश राऊत फाऊंडेशन

## सामाजिक सेवेत मोलाचा सहभाग असणारी संस्था

### विविध उपक्रम

- केलवड येथे मोफत पाणी पुरवठा
- केलवड, जळगांव दत्तक ग्राम
- केलवड, जळगाव, राहाता मोफत वाचनालय सुविधा
- वैद्यकीय क्षेत्रात भरीव मदत
- शैक्षणिक क्षेत्रात भरीव मदत




### श्री नरेश राऊत संगणक प्रशिक्षण केंद्र

- महिलांसाठी मोफत संगणक प्रशिक्षणाची सोय
- आधुनिक सुविधेसह सुसज्ज संगणक कार्यशाळा
- MS-CIT
- C.C.C



### नियोजित उपक्रम

- महिलांसाठी कुटीरउद्योग
- पोस्ट बेसिक आश्रम शाळा
- केलवड, जळगाव, राहाता (भटक्या व विमुक्त जातींसाठी)



E-mail- nrfoundation13@gmail.com
----- our website'-----
shrinareshrautfoundation.com




लोकमत सोमवार दि. २८ मार्च २०१६

# श्री. नरेश राऊत फाऊंडेशन

# सामाजिक कार्याचा अविरत वसा



मा. नरेश राऊत



मा. लक्ष्मण गोर्डे

संस्थेचे सचिव यांनी श्री. नरेशजी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने केलवड हे गाव दत्तक घेऊन या गावात विविध सामाजिक उपक्रम राबविले. यामध्ये प्रामुख्याने गावासाठी पाणी टंचाई काळामध्ये पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरु केला. गेल्या दोन वर्षापासून दरवर्षी पाणी टंचाईवर मात करण्यासाठी टंचाई काळात या संस्थेमार्फत गावासाठी पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरु केला जातो. शाळेतील विद्यार्थ्यांसाठीही या टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जाते. गरीबांना मदत, जळीतांसाठी मदत, मुलींच्या विवाहासाठी मदत यांसारखे उपक्रम या गावामध्ये संस्थेच्या माध्यमातून राबविले जातात. गावातील ग्रामसेवक व तलाठी यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना रोख स्वरुपात पुरस्कार संस्थेने दिले आहेत. तसेच गटविकास अधिकारी, पं. स. राहाता व तहसीलदार, राहाता यांना रोख पुरस्काराने संस्थेने सन्मानित केले आहे.

## दत्तक ग्राम जळगाव

तालुक्यातील मौजे जळगाव येथील ग्रामपंचायतीच्या व लोक आग्रहास्तव संस्थेने जळगाव दत्तक गाव घेतले आहे. या गावातही विविध विकासाच्या योजना राबविल्या जातात. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक बोलावून येथील शेतकरी वर्गाला आधुनिक शेतीबद्दल मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे येथील शेती व्यवसायाला गती मिळाली आहे. जळगाव येथे महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र वाचनालय सुरु करण्यात आलेले आहेत. शिवाय नाना-नानी पार्कही जळगावमध्ये संस्थेच्या मदतीने खुले झाले आहे.

## शैक्षणिक

केलवड येथील श्री. ज्ञानेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी जेवणाची ताटे या संस्थेने पुरविली आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शालेय इमारत, प्रयोगशाळा साहित्य व इतरही शैक्षणिक उपक्रमांसाठी या संस्थेने भरीव सहाय्य दिले आहे. केलवड येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बोअरवेल, मोटार त्याचप्रमाणे त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी, या दृष्टीने रोख बक्षीस योजना सुरु केली. दरवर्षी स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी केलवड येथील प्राथमिक व माध्यमिक शाळा व सर्व अंगणवाडीतील त्याचप्रमाणे पंचक्रोशीतील अनेक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले जाते.

जि. प. शाळा राहाता यांना एलसीडी प्रोजेक्टर, मुजमुले वस्ती शाळा, खडकेवाडे यांच्यासाठी बोअरवेल या संस्थेने पुरविला आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी तसेच त्यांचा औद्योगिकतेकडे कल वाढावा, या दृष्टीने तज्ज्ञांची व्याख्याने संस्थेच्या माध्यमातून आयोजित केली जातात. राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुल येथील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी ताटे तसेच न्यू इंग्लिश स्कूल सात्रळ, पुणतांबा येथील शाळांना उपक्रमांसाठी देणग्या दिल्या. या शैक्षणिक मदतीतून शाळेच्या अडचणी दूर झाल्या.

रयत शिक्षण संस्थेच्या सात्रळ येथील वसतिगृहाला संस्थेच्या माध्यमातून दर महिन्याला मदत केली जाते. संस्थेच्या माध्यमातून गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली जाते.

## मोफत संगणक प्रशिक्षण केंद्र

खेड्यातील मुला-मुलींना संगणक प्रशिक्षण घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असे, विद्यार्थ्यांची गरज ओळखून संस्थेच्या माध्यमातून केलवड येथे मोफत संगणक प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. अद्ययावत इमारतीसह अनेक अद्ययावत सुविधा या संगणक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिल्या आहेत. या प्रशिक्षण केंद्रामध्ये एम.एस.सी.आय.टी. व सी.सी.सी. या शासनमान्य कोर्सचे प्रशिक्षण दिले जाते.

## मोफत क्लासेस

संस्थेच्या माध्यमातून इ. ५ वी, ८ वी, ९ वी व इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी गणित, भूमिती, इंग्रजी व विज्ञान या विषयांसाठी मोफत क्लासेस घेतले जातात. या क्लासेससाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे.

## मोफत वाचनालय

संस्थेच्या माध्यमातून केलवड, जळगाव ता. राहाता, शारदा शैक्षणिक संकुल राहाता, पोलीस स्टेशन राहाता, माध्यमिक विद्यालय, सात्रळ या ठिकाणी मोफत वाचनालय सुरु आहेत.

## वैद्यकीय

संस्थेच्या माध्यमातून मोफत मोतीबिंदू चिकित्सा शिबिर घेऊन त्याचा गावातील अनेक रुग्णांना लाभ मिळाला आहे. गावातील व पंचक्रोशीतील विविध गरजू लोकांना विविध आजारांवर उपचारासाठी संस्थेच्या माध्यमातून मदत दिली जाते.

## धार्मिक कार्य

धार्मिक विकासासाठी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत केली जाते. केलवड येथील मारुती मंदिर, राहता येथील विरभद्र मंदिर, पिंपळस येथील महालक्ष्मी मंदिर, सराला बेट येथील समाधी मंदिर यांच्या बांधकामासाठी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक तसेच मस्जिद बांधकामासाठी संस्थेने हातभार लावला आहे. केलवड येथील गणपती मंदिरास संस्थेने मदत केली आहे. गावातील पायी दिंडी सोहळा तसेच भजनी मंडळासाठी मानधन यासारख्या योजना संस्थेच्या माध्यमातून सुरु आहेत.

## सामाजिक कार्याचे विकत वेड घेतलेली माणसे!

प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी संस्थेच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले आहे. सामाजिक कार्य करता करता त्यांचा प्रवाह वाढला आहे. सामाजिक-कार्यात विकत वेड घेतलेली माणसे या संस्थेच्या माध्यमातून दिसून येतात. उद्योजक श्री.नरेशजी राऊत व प्रा.लक्ष्मण गोर्डे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलेले आहे.

यमन पुळाटे

दिनांक :- ३०/०१/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

30 जानेवारी 2015

# नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने केलवडला भरीव मदत

## प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचा पुढाकार, टँकरसाठीही देणगी



**अस्तगाव (वार्ताहर)**– मुंबई स्थित उद्योगपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने केलवड गावाला दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्यासाठी ५१ हजार रुपयांची देणगी नुकतीच उद्योगश्रीचे समन्वयक प्रा. लक्ष्मण गार्डे यांचे हस्ते सरपंच लक्ष्मण सोनवणे यांना सुपूर्द करण्यात आली. केलवडच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयास प्रत्येकी २१ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेशही श्री. गोर्डे यांचे हस्ते देण्यात आला.

यापूर्वी ही प्राथमिक शाळेला एलईडी तसेच श्री ज्ञानेश्वर विद्यालयास ५१ हजारांची देणगी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी शाळा प्रमुखांकडे दिली आहे. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून त्यांनी केलवड गावाला पिण्याच्या पाण्याच्या टँकरसाठी ५१ हजार रुपये, प्राथमिक शाळेला इंधनविहीरीवर विद्युतपंप बसविण्यासाठी २१ हजार रुपयांचा धनादेश मुख्याध्यापिका श्रीमती रोहिणी घाटे यांचे कडे सुपुर्द केला. तर श्री ज्ञानेश्वर विद्यालयास शालेय पोषण आहारासाठी प्रत्येक विद्यार्थ्यास एक चमचा व एक ताट घेण्यासाठी २१ हजार रुपयांच्या देणगीचा धनादेश स्थानिक शाळा समितीचे अध्यक्ष सुरेशराव गमे यांचेकडे सुपुर्द करण्यात आला.

यावेळी या दोन्ही शाळांच्यावतीने तसेच ग्रामपंचायतीच्या वतीने प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचा सत्कार करण्यात आला. नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने या सर्व देणग्यांसह ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सर्व शाळा, अंगणवाड्यांमधील मुलांना प्रत्येकास एक बिस्किटचा पुडा खाऊ म्हणुन वाटप करण्यात आला. यात श्री. गोर्डे यांना महत्वाची भूमिका बजावली.

श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या वतीने माजी मुख्याध्यापक व्ही. एस. घोरपडे, प्राथमिक शाळेच्या वतीने केंद्रप्रमुख श्रीमती मंदाकिनी पुजारी, तर ग्रामपंचायतीच्यावतीने सरपंच लक्ष्मण सोनवणे यांनी श्री. गोर्डे यांचा सत्कार केला. सत्काराला उत्तर देतांना प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, गावाला मदत करण्यात आनंद वाटतो. उद्योगपती नरेशजी राऊत हे दूरदृष्टी असणारे असल्याने त्यांनी केलवडला मदत केली आहे. ज्ञानेश्वर विद्यालयाच्या ५ खोल्यांचा प्रस्ताव सादर करावा, त्याच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करु, असेही ते म्हणाले.

यावेळी कामगार पोलीस पाटील सुभाष पाटील गमे, माजी सरपंच बाबासाहेब गमे, सरपंच लक्ष्मण सोनवणे, उपसरपंच नामदेव घोरपडे, पी. डी. गमे, कामगार तलाठी श्री. कोळगे, गणेश चे संचालक बबनराव बनसोडे, सुरेशराव गमे, आण्णासाहेब वाघे, भिकाजी घोरपडे, मुख्याध्यापिका रोहिणी घाटे, मुख्याध्यापक नानासाहेब राहाणे, भाऊसाहेब गमे, कुंडलिकराव वाघे, माजी मुख्याध्यापक यादवराव हासे, प्रकाश जोशी, आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक :- १८/०३/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

18 मार्च 2013

# टँकरचे पाणी पाहून विद्यार्थ्यांचे चेहेरे खुलले!

**अस्तगाव (वार्ताहर)**- जिरायती गाव...पिण्याच्या पाण्याची तिव्र टंचाई... शाळकरी मुलांनाही पिण्याच्या पाण्याची टंचाई...मात्र मुंबई चे उद्योगपती नरेश राऊत यांनी त्यांच्या नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने शाळेला एक पाण्याचा टँकर दिला! आता तहान भागणार म्हणून मुलांच्या चेहेरे खुलून गेले.

राहाता तालुक्यातील केलवड हे जिरायती गाव आहे. त्या गावात श्री ज्ञानेश्वर विद्यालय केलवड हे विद्यालय, शाळेकडे इंधनविहीर आहे. पण ती ही गुळण्यावर आलेली. विजेचाही खेळखंडोबा आणि त्यातून विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी येत होत्या. अडातच नाही तर पोहऱ्यात येणार कुठून! अशी अवस्था. घरुन आणलेले पाणी तेही बाटलीत, सारखी सारखी तहान लागते त्यामुळे बाटली केंव्हाच रिकामी व्हायची. त्यामुळे पिण्याच्या पाण्यासाठी अडचणी उभ्या राहायच्या. प्रा. लक्ष्मण गोर्डे हे मुंबई च्या उद्योगश्री ची संबंधीत आहेत. उद्योगपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फाऊंडेशनचे ते सचिव आहेत. त्यांच्या मार्फत शाळेने संपर्क साधला. आणि प्रा. गोर्डे यांचे मार्फत शाळेला मदतही मिळवून दिली. प्रा. गोर्डे यांनी ही परिस्थिती उद्योगपती नरेश राऊत यांना सांगितली आणि त्यांना क्षणातच मुलांना पिण्यासाठी पाणी द्या, अशी सूचना गोर्डे यांना केली. गोर्डे यांनी तशी व्यवस्था केली.



(छाया- अमोल कहांडळ)

पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासत असतानाच त्यावर उपाय काढण्यासही तेथील मंडळी तरबेज आहेत. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी या गावाला टंचाई आढावा बैठकीत पाण्याच्या टाक्या देण्यात येतील असे सांगितले होते. ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, व सदस्यांनी ना. विखे पाटील यांनी दिलेली एक हजार लिटरची पाण्याची टाकी शाळेला दिली.

ना. विखे पाटील यांनी दिलेली टाकी शाळेला ग्रामपंचायतीने दिली. या टाकीत पिण्यासाठी पाणी सोडण्यासाठी श्री. गोर्डे यांनी पाहणी करुन शाळेसाठी व शाळे शेजारी असणाऱ्या वस्तीसाठी त्यांनी पाण्याचा टँकर दिला. नरेश राऊत फाऊंडेशन च्या वतीने हा टँकर मिळाला. शुक्रवारी दुपारी टँकर आला त्यातून त्या टाकीत पाणी सोडण्यात आले. टँकर आल्याचे पाहून मुलांना आनंद झाला. टँकर पाहून मुलांची तहानच भागली. यावेळी प्रा. लक्ष्मण गोर्डे, भारत राऊत, संजय सोनवणे, नानासाहेब गोर्डे, यांचेसह शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक नानासाहेब राहाणे यांचेसह सर्व शिक्षक उपस्थित होते

cmyk

दिनांक :- ०१/०४/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

1 एप्रिल 2013

## उद्योगपती राऊत यांचे दान

# केलवडात भागविते अनेकांची तहान!

**अस्तगाव (वार्ताहर)**– मुंबईस्थित उद्योगपती व नरेश राऊत फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी केलवड सारख्या जिरयती भागातील पिण्याच्या पाण्यासाठी दिलेल्या दानातून अनेकांची तहान भागत आहे.

शिर्डीपासून जवळच असलेल्या राहाता तालुक्यातील केलवड गाव हे दुष्काळी टापूतील गाव आहे. संपूर्ण शेती जिरायती आहे. सातत्याने दुष्काळाचे चटके सहन करत आलेल्या या गावाला उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची कमतरता भेडसावते आहे. यावर्षीही या गावाला पिण्याचे पाण्याचे दुर्भिक्ष जाणवत आहे. केलवड येथील सुपूत्र प्रा. लक्ष्मण गोर्डे हे मुंबईतील उद्योगपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फाऊंडेशनचे सचिव आहेत. त्यांनी श्री. राऊत यांना दुष्काळाची कल्पना दिली. त्यावर श्री. राऊत यांनी तात्काळ पिण्याच्या पाण्यासाठी टँकर दिला. या टँकरचा सर्व खर्च श्री. राऊत हे करत आहेत. केलवड विद्यालय तसेच विद्यालयाच्या आजूबाजुच्या वस्त्यांवर टँकरने पाणी पुरवठा सुरु आहे. श्री. राऊत यांचे दानाने केलवडकरांची तहान भागते आहे.

दररोज या टँकरद्वारे केलवड विद्यालयाच्या जवळील वस्त्यांना टँकरने पाणी पुरवठा केला जातो आहे. केलवड येथील रहिवाश्यांना पाण्यासाठी पायपीट करण्यासाठी जवळपास पाण्याचे स्त्रोत नाहीत. श्री. राऊत यांनी दिलेला टँकर राहाता येथून पाणी भरुन आणतो. विंधनविहीरीचे पाणी टँकरमध्ये भरुन ते केलवडला आणून तेथील रहिवाश्यांना पाणीपुरवठा केला जात आहे. त्यामुळे रहिवाशियांना मोठा आधार मिळाला आहे. प्रा. लक्ष्मण गोर्डे स्वत: या यंत्रणेवर लक्ष ठेवून आहेत.



दिनांक :- ०३/०४/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत



3 एप्रिल 2013

# केलवडला पाणपोई सुरु

**अस्तगाव (वार्ताहर)-** राहाता तालुक्यातील केलवड येथे मुंबईस्थित उद्योगपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने केलवड येथे पाणपोई सुरु करण्यात आली. केलवडमध्ये तीन ठिकाणी पाणपाई सुरु करण्यात आली आहे.


या पाणपोईचे उद्घाटन कामगार तलाठी श्री. कोळगे, सरपंच लक्ष्मण सोनवणे, ग्रामसेवक श्री. गाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, माजी उपसरपंच बाबासाहेब गमे, अंजाबापू जटाड, पोलीस मित्र संघटनेचे तालुका कार्याध्यक्ष संजय सोनवणे, शाखाध्यक्ष बाबुराव गोर्डे, संपतराव गोर्डे, योगेश गोसावी, नामदेव सोनवणे, लक्ष्मण कांदळकर, सुकदेव लिंबाजी गमे, सुनिल हारकु गमे, श्री. रजपूत, नानासाहेब गोर्डे, भारत राऊत, भाऊसाहेब कोळगे, सोमनाथ घन्सी गमे, किशोर गमे, गलांडे, सचिन वाघे, संदीप गायकवाड, श्री. गमे, श्री. घोरपडे, श्री. वाघे यांच्यासह सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते. या पाणपोईसाठी खास टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. हे १० रांजण भरण्यासाठी तसेच त्याची देखभाल करण्यासाठी खास पगारी माणसाची नियुक्ती करण्यात आली आहे. या पाणपोईमुळे ग्रामस्थांची तसेच वाटसरुंची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होणार असल्याने श्री. राऊत तसेच श्री. गार्डे यांना केलवड ग्रामस्थांनी धन्यवाद दिले आहेत.

वृत्तमानस
वर्ष:१६, अंक: २५७ ■ मुंबई, सोमवार, २२ एप्रिल २०१३ ■ पाने - ८ ■ किंमत :२ रुपये कार्यकारी संपादक-जी. एम. गोसावी

# दुष्काळग्रस्तांसाठी धावला मराठी उद्योजक

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार : मुंबई येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक व उद्योगश्री पारितोषिक विजेते, गुणवंत नागरिक पुरस्कार विजेते, अभिजित डाय अॅण्ड टूल्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, सोमवंशी क्षत्रिय समाजाचे आधारस्तंभ व आदर्श कवच विधायक सेवा संस्थेचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी नुकतीच मु.पो. केलवड -शिर्डी, जि.अहमदनगर येथे भेट दिली व ७ ते ८ हजार जनता पाण्यावाचून दुष्काळाने होरपळत असताना नरेश फाऊंडेशनतर्फे गावात दररोज टँकरने पाणी पुरवठा केला जातो. येथील विद्यार्थ्यांसाठी १२ नवीन संगणक भेट म्हणून दिले. गणेश विद्या प्रसारक मंडळ, ज्ञानेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद शाळेस प्रयोगशाळा, इमारतीसाठी वगैरे कामास्तव लाखो रुपयांची मदत व देणग्या नरेश राऊत फाऊंडेशनतर्फे कवच उद्योग समूह, संगणक प्रशिक्षण केंद्र, मोफत क्लासेस, कार्यशाळा, गावात सर्वत्र पाणपोईची स्थापना, ग्रामपंचायतींना आर्थिक मदत, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, शेतकरी मेळावे, जनजागृती शिबीर, आदिवासी कल्याण केंद्रे, महिला संस्था, गरीब व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वह्या, पुस्तकांचे वाटप व ज्यांची घरे जळाली त्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांची मदत देण्यात आली. गावातील पोलीस संघटना, ग्रामपंचायत, शाळा, धनगर समाज, साखर कारखाने या संस्थांनी उद्योगपती नरेश राऊत, समाजसेविका मीना राऊत, पत्रकार व समाजसेवक - जगन्नाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर राऊत, महेंद्र सावे, उद्योजक नितीन रांगणेकर, लक्ष्मण गारडेसर या मान्यवरांचा शाल, श्रीफळ, गुच्छ, साईबाबांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. गावात गावकऱ्यांनी मिरवणूक काढून - फटाके, डफ, बॅन्डपथक, ढोल-ताशा, धनगर नृत्य व गाणी गावून मानवंदना देण्यात आली. यावेळी शासकीय सेवक वर्ग, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीगणेश साखर कारखान्याचे चेअरमन अॅड. नारायणराव कार्ले-पाटील, पोलीसपाटील सुभाष गमे, सरपंच -लक्ष्मण सोनावणे, समाजसेवक - पुंडलिक गमे, अॅड. अनिल गमे, महेंद्र जेजुरकर, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळे, समाजसेवक यांची यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. उद्योजक नरेश राऊत यांनी दुष्काळाने पिडलेल्यांना सर्वतोपरी मदत, साईबाबांच्या रूपाने वावरून गावाची सतत सेवा केली आहे व करीत आहेत. दुष्काळात होरपळत असलेल्या पीडितांची तन, मन, धन रूपाने मदत करीत आहेत. उद्योगपती -समाजसेवक हे महाराष्ट्राचे नव्हे तर देशाचे भूषण आहेत, असे विचार गावकऱ्यांनी व्यक्त केले आहेत.



पुढारी

मुंबई, सोमवार २२ एप्रिल, २०१३

## दुष्काळ : मराठी उद्योजकाची मदत

**मुंबई :** अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथील केलवड गावातील दुष्काळग्रस्त जनतेच्या मदतीसाठी मराठी उद्योजकाने मदत पुरवली. अभिजित डाय अॅण्ड टूल्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, सोमवंशी क्षत्रिय समाजाचे आधारस्तंभ व आदर्श कवच विधायक सेवा संस्थेचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी वरील गावात जाऊन तेथील ८ हजार दुष्काळग्रस्त जनतेची पिण्याच्या पाण्याची सोय केली.गावात टँकरने दररोज पाणीपुरवठा सुरू केला. तर विद्यार्थ्यांसाठी १२ संगणक भेट दिले. गणेश विद्या प्रसारक मंडळ,ज्ञानेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद शाळेस प्रयोगशाळा,मोफत क्लासेस,कार्यशाळा,गावात सर्वत्र पाणपोईची सोय, शेतकऱ्यांचे मेळावे घेऊन ग्रामपंचायतींना आर्थिक मदत पुरविली; तर गावात जनजागृती शिबिरे राबविली आहेत.

मुंबई, गुरुवार, २५ एप्रिल २०१३ वृत्तमानस



मुंबईचे प्रसिद्ध उद्योजक व उद्योगश्री पारितोषिक विजेते अभिजित डाय अॅन्ड टूर्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक नरेश राऊत यांनी मु. पो. केलवड, शिर्डी, जि. अहमदनगर येथे आठ हजार जनता पाण्यापासून होरपळत असताना गावात सर्वत्र टँकरने मोफत पाणी पुरवून पाणपोई स्थापन केल्या. याप्रसंगी समाजसेविका मीना राऊत, पत्रकार जगन्नाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते महेंद्र सावे, चंद्रशेखर राऊत, गाडेसर व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

दिनांक :- २२/०४/२०१३

वृत्तमानस

दिनांक - 22 एप्रिल 2013

# दुष्काळग्रस्तांसाठी धावला मराठी उद्योजक

वृत्तमानस 22 एप्रिल 2013

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार : मुंबई येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक व उद्योगश्री पारितोषिक विजेते, गुणवंत नागरिक पुरस्कार विजेते, अभिजित डाय अॅण्ड टूल्स कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, सोमवंशी क्षत्रिय समाजाचे आधारस्तंभ व आदर्श कवच विधायक सेवा संस्थेचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी नुकतीच मु.पो. केलवड -शिर्डी, जि.अहमदनगर येथे भेट दिली व ७ ते ८ हजार जनता पाण्यावाचून दुष्काळाने होरपळत असताना नरेश फाऊंडेशनतर्फे गावात दररोज टँकरने पाणी पुरवठा केला जातो. येथील विद्यार्थ्यांसाठी १२ नवीन संगणक भेट म्हणून दिले. गणेश विद्या प्रसारक मंडळ, ज्ञानेश्वर विद्यालय व जिल्हा परिषद शाळेस प्रयोगशाळा, इमारतीसाठी वगैरे कामास्तव लाखो रुपयांची मदत व देणाऱ्या नरेश राऊत फाऊंडेशनतर्फे कवच उद्योग समूह, संगणक प्रशिक्षण केंद्र, मोफत क्लासेस, कार्यशाळा, गावात सर्वत्र पाणपोईची स्थापना, ग्रामपंचायतींना आर्थिक मदत, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था, शेतकरी मेळावे, जनजागृती शिबीर, दिवासी कल्याण केंद्रे, महिला संस्था, गरीब व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, वह्या, पुस्तकांचे वाटप व ज्यांची घरे जळाली त्यांना प्रत्येकी १० हजार रुपयांची मदत देण्यात आली. गावातील पोलीस संघटना, ग्रामपंचायत, शाळा, धनगर समाज, साखर कारखाने या संस्थांनी उद्योगपती नरेश राऊत, समाजसेविका मीना राऊत, पत्रकार व समाजसेवक - जगन्नाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर राऊत, महेंद्र सावे, उद्योजक नितीन रांगणेकर, लक्ष्मण गारडेसर या मान्यवरांचा शाल, श्रीफळ, गुच्छ, साईबाबांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. गावात गावकऱ्यांनी मिरवणूक काढून - फटाके, डफ, बॅन्डपथक, ढोल-ताशा, धनगर नृत्य व गाणी गावून मानवंदना देण्यात आली. यावेळी शासकीय सेवक वर्ग, ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी श्रीगणेश साखर कारखान्याचे चेअरमन अॅड. नारायणराव कार्ले-पाटील, पोलीसपाटील सुभाष गमे, सरपंच -लक्ष्मण सोनावणे, समाजसेवक - पुंडलिक गमे, अॅड. अनिल गमे, महेंद्र जेजुरकर, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळे, समाजसेवक यांची यावेळी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. उद्योजक नरेश राऊत यांनी दुष्काळाने पिडलेल्यांना सर्वतोपरी मदत, साईबाबांच्या रूपाने वावरून गावाची सतत सेवा केली आहे व करीत आहेत. दुष्काळात होरपळत असलेल्या पीडितांची तन, मन, धन रूपाने मदत करीत आहेत. उद्योगपती -समाजसेवक हे महाराष्ट्राचे नव्हे तर देशाचे भूषण आहेत, असे विचार गावकऱ्यांनी व्यक्त केले आहेत.



ई पेपर : epunyanagari.com

पुण्य नगरी

वीज बील भरणा, मोबाईल, टि.व्हि. डिश रिचार्ज, मागणी सेतू चालकांकडून होत आहे. अन्य साहित्य चोरीस गेले आहे.

24 मे 2013 दैनिक पुण्य नगरी

# दुष्काळात होरपळणाऱ्या केलवडला राऊत फाऊंडेशनची मदत

**राहाता /प्रतिनिधी**

राहाता तालुक्यातील केलवड सारख्या ग्रामीण भागात मुंबईस्थित उद्योपती नरेश राऊत यांचे नरेश राऊत फाऊंडेशनचे वतीने दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याच्या टँकरसाठी, संगणक प्रशिक्षणासाठी, शाळांना मदत, नैसर्गिक आपत्तीत मदत यासह विविध समाजउपयोगी उपक्रमांसाठी सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांचे मार्फत ९ लाख रुपयांची मदत करण्यात आली. केलवडकरांना या मदतीमुळे मोठा दिलासा मिळाला आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणून हे फाऊंडेशन केलवड सारख्या जिरायती भागात महत्वपुर्ण काम करत आहे. तेथील युवक प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी उद्योगपती नरेश राऊत यांचे माध्यमातुन हे उपक्रम ते राबवित आहे. विशेषत: शैक्षणिक कामात त्यांनी मोठे योगदान दिले आहे.केलवड सारख्या ग्रामीण भागात प्रा. गोर्डे यांनी महिलांसाठी संगणक शिक्षण मिळावे म्हणुन स्वत: ५० हजार रुपये खर्च करुन महिला संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु केले. या प्रशिक्षण वर्गात ३४ मुली मोफत संगणक शिक्षण घेत आहे.

प्रा. गोर्डे यांनी या फाऊंडेशनच्या माध्यामातुन केलवड येथील प्राथमिक शाळेला एलसीडी प्रोजेक्टर दिला. ४०० मुलांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी त्यांना एक इंधनविहीर घेवुन दिली. त्यावर विद्युत मोटार तसेच त्याचे सर्व साहित्य घेवुन दिले. प्राथमिक शाळेच्या मुलांना पोषण आहारासाठी ताटे व चमचे यासाठी ७५ हजार रुपयांची मदत केली. केलवड येथीलच ज्ञानेश्वर विद्यालयासाठी विज्ञान साहित्यासाठी निधी दिला. इयत्ता पाचवी ते आठवी च्या सर्व ३२० विद्यार्थ्यांना पोषण आहारासाठी तसेच इतर मदत म्हणुन १ लाख ७० हजाराची मदत त्यांनी दिली. शिवाय वाकडी, रुई, अस्तगाव यांना प्रत्येकी २१ हजार रुपयांची मदत केलेली आहे.

केलवड येथील मारुती मंदिराच्या जिर्णोध्दरासाठी ३३ हजार रुपयांची देणगी त्यांनी दिली.

केलवड गांव दुष्काळी टापुत असल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या लक्षात घेवुन नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने केलवड ग्रामपंचायतीला ५१ हजार रुपयांचा धनादेश पाणी पुरवठ्यासाठी दिला. केलवड येथे पाच ठिकाणी पाणपोई सुरु केल्या. केलवड चे ग्रामसेवक व तलाठी यांनी दुष्काळी परिस्थितीत चांगले काम केल्याबद्दल त्यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचे प्रोत्साहनपर बक्षीस दिले.तसेच केलवड गावात ५०० लिटरच्या पाच टाक्या पाच ठिकाणी ठेवुन त्यातुन पाणी पुरवठा केला. ८००० लिटर क्षमतेच्या टँकरद्वारे त्यांनी गावातील काही भागाला मोफत पाणी वाटप केले. एका टँकरच्या दररोज ३ खेपा ते करत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासुन त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. राहाता येथुन पाणी विकत घेवुन प्रा. गोर्डे यांनी यांनी गावाला मोफत पाणी पुरवठा केला. दुष्काळी परिस्थितीत गावाची तहान भागविण्याचे काम त्यांनी केले. त्या अनुषंगाने दि. २७ मे रोजी त्यांना भास्कर अॅवार्ड ने गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर, माजी मुख्यमंत्री विरोधी पक्षनेते प्रतापसिंग राणे, भाई वैद्य, गायिका अनुराधा पौडवाल, गायिका उषा मंगेशकर यांचे उपस्थितीत गोव्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

दिनांक :- २४/०५/२०१३

दिनांक :- २४/०५/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

# नरेश राऊत फाऊंडेशनचे सहकार्य

24 मे 2013 दैनिक सार्वमत

## केलवडला टँकरसाठी आणि महिला प्रशिक्षणासाठी ९ लाखांची मदत

अस्तगाव (वार्ताहर)- राहाता तालुक्यातील केलवड सारख्या ग्रामीण भागात नरेश राऊत फाऊंडेशनचेवतीने दुष्काळी परिस्थितीत पिण्याच्या पाण्याच्या टँकरसाठी, संगणक प्रशिक्षणासाठी, शाळांना मदत, नैसर्गिक आपत्तीत मदत व आजार पणासाठी, लग्नकार्यासाठी असे विविध समाजउपयोगी उपक्रमांसाठी या फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांच्या प्रयत्नातुन ९ लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणुन हे फाऊंडेशन केलवड सारख्या जिरायती भागात महत्वपुर्ण काम करत आहे. तेथील युवक प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी उद्योगपती नरेश राऊत यांचे माध्यमातुन हे उपक्रम ते राबवित आहे. विशेषत: शैक्षणिक कामात त्यांनी मोठे योगदान दिले आहे. केलवड सारख्या ग्रामीण भागात प्रा. गोर्डे यांनी महिलांसाठी संगणक शिक्षण मिळावे म्हणुन स्वत: ५० हजार रुपये खर्च करुन महिला संगणक प्रशिक्षण केंद्र सुरु केले. या प्रशिक्षण वर्गात ३४ मुली मोफत संगणक शिक्षण घेत आहे. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी खास शिक्षकाची नियुक्ती केली आहे. या प्रशिक्षण वर्गात ज्यांची फी भरुन संगणक शिक्षण घेण्याची ऐपत नाही त्यांना या संगणक वर्गात प्रवेश देवुन मोफत प्रशिक्षण दिले जात आहे.

केलवड येथील मारुती मंदिराच्या जिर्णोध्दरासाठी ३३ हजार रुपयांची देणगी त्यांनी दिली. प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या शिक्षकांच्या केंद्र संमेलनासाठी १२ हजार ५०० रुपयांचा निधी भोजनासाठी दिला. केलवड येथील चांगदेव गोर्डे व कल्याणी गोर्डे यांचे राहाते घर जळाले. त्यांच्या कुटुंबियांना तातडीची १० हजार रुपये, घराच्या बांधकामासाठी १० हजार रुपये, मुलांच्या शिक्षणासाठी ३ हजार रुपये, तसेच आईवडिलांच्या उपचारासाठी ५ हजार अशी मदत प्रा. गोर्डे यांनी फाऊंडेशनच्या वतीने मिळवुन दिली.

नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने केलवड ग्रामपंचायतीला ५१ हजार रुपयांचा धनादेश पाणी पुरवठ्यासाठी दिला. केलवड गावात ५०० लिटरच्या पाच टाक्या पाच ठिकाणी ठेवुन त्यातुन पाणी पुरवठा केला. ८००० लिटर क्षमतेच्या टँकरद्वारे त्यांनी गावातील काही भागाला मोफत पाणी वाटप केले. एका टँकरच्या दररोज ३ खेपा ते करत आहेत. गेल्या अनेक दिवसांपासुन त्यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. राहाता येथुन पाणी विकत घेवुन प्रा. गोर्डे यांनी यांनी गावाला मोफत पाणी पुरवठा केला.

महिला संगणक प्रशिक्षणासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी ९ लाख रुपये खर्च त्यांनी केले आहेत. यांची दखल मुंबई येथील उद्योग विश्वाने घेवुन त्यांची पुरस्कारासाठी शिफारस केली होती. त्या अनुषंगाने दि. २७ मे रोजी त्यांना भास्कर ॲवार्ड ने गोव्याचे मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर, विरोधी पक्षनेते प्रतापसिंग राणे, भाई वैद्य, गायिका अनुराधा पौडवाल, गायिका उषा मंगेशकर यांचे उपस्थितीत गोव्यात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

दिनांक :- ०६/०७/२०१३

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

दैनिक सार्वमत 6 जुलै 2013

## नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने

# समाजोपयोगी कामासाठी साडेतेरा लाखांची मदत-प्रा. गोर्डे

**अस्तगाव (वार्ताहर)**- नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने ग्रामीण भागात विविध समाजोपयोगी कामांसाठी १३ लाख ५१ हजार रुपये खर्च करण्यांत आले आहे.अशी माहिती फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

मुंबई स्थित उद्योपती नरेश राऊत यांनी समाजाच्या हितासाठी हे फाऊंडेशन सन १९९७ मध्ये स्थापन केले आहे. ही संस्था सामाजिक व विधायक स्वरुपाचे कार्य सन २००८ पासून ग्रामीण भागात करत आहे. केलवड येथील सेंटर मार्फत केलवड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेसाठी एलसीडी प्रोजेक्टर, ४०० मुलांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी विंधनविहीर, विद्युतपंप, व त्याचे साहित्य आणि मुलांना जेवणाची ताटे व चमचे यासाठी ७५ हजार रुपये, तसेच केलवड येथीलच श्री ज्ञानेश्वर विद्यालयास विज्ञान साहित्य, इयत्ता ५ वी ते ८ वी च्या ३२० विद्यार्थ्यांसाठी जेवणाची ताटे व चमचे यासाठी ७५ हजार रुपये दिले आहेत. तसेच केलवड येथील मारुती मंदिरास ३३ हजार रुपये दिले आहेत.केलवडमध्ये दुष्काळ निवारणासाठी पाणपोई उभारावी. पाण्याच्या टाक्या द्याव्या, यासाठी १ लाख ६५ हजाराची मदत दिली.

गेल्या प्रजासत्ताक दिनास १००० विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. तसेच जिल्हा परिषद तसेच माध्यमिक विद्यालयास केंद्र समेलन समारंभास १० हजार रुपयांची मदत दिली आहे. २ डिसेंबर २०१२ रोजी केलवड येथील चांगदेव गोर्डे व कल्याणी गोर्डे यांच्या राहात्या छप्पराचे जळीत झाले. सर्व संसारोपयोगी साहित्य नष्ट झाले. त्यासाठी उद्योगपती नरेश राऊत यांनी या कुटुंबास १० हजार रुपयांची मदत केली आहे. त्यांच बरोबर घराच्या बांधकामासाठी १० हजार रुपये, मुलांच्या शिक्षणासाठी ३ हजार रुपये, त्यांच्या आईवडिलांच्या उपचारासाठी ५००० रुपयांची मदत केली आहे. पंढरीनाथ गोडगे यांनाही जळितासाठी ५००० रुपयांची मदत केली आहे.

वाकडी, अस्तगाव खुर्द येथील शाळांना प्रत्येकी २१ हजार रुपयांची मदत केली. रुई यासाठी आतापर्यंत १ लाख १२ हजार रुपयांची मदत दिली आहे. सराला बेटास महंत रामगिरी महाराज यांना मठासाठी ५१ हजार रुपये, अडबंगनाथ संस्थान भामाठाण महंत अरुणगिरी महाराज यांना मठासाठी २१ हजार रुपये, तसेच संस्थेने वैद्यकीय मदत, शैक्षणिक मदत, अनाथांना मदत इ. माध्यमातून ७८ हजार रुपयांची मदत केली आहे. या सर्वांवर एकूण १३ लाख ५१ हजार रुपये खर्च करण्यात आला आहे. हा खर्च उद्योगपती नरेश राऊत यांनी स्वत: केला असल्याचे प्रा. गोर्डे यांनी सांगितले.

नवी आशा नवी दिशा

शनिवार दि. २४ ऑगस्ट २०१३

# सार्वमत

अहमदनगर अंक २१६ वा वर्ष ३८ वे ■ शनिवार दि. २४ ऑगस्ट २०१३ ■ पाने १६ ■ किंम

## नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने १००० विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

### प्रा. गोर्डे यांच्याकडून ३२ हजार रुपयांची बक्षिसे



**अस्तगाव (वार्ताहर)**- स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांनी त्यांच्या मातोश्री कै. भामाबाई देवराम गोर्डे यांच्या स्मरणार्थ केलवड येथील पहिली ते १० वी पर्यंतच्या प्रत्येक वर्गातील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना रोख स्वरूपाची बक्षीसे व १००० विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.

बालवाडी ते दहावी पर्यंतच्या केलवड मधील १ हजार विद्यार्थ्यांना एकुण ३२ हजार रुपयांचे बिस्कीट पुडयांचे वितरण स्वातंत्र्यदिनाच्या निमीत्ताने श्री. गोर्डे यांनी केले. तर १ ली ते १० पर्यंत प्रत्येक तुकडीत प्रथम क्रमांकास २०१ रुपये, द्वितीय क्रमांकासाठीचे १५१ रुपयांचे, तर तृतीय क्रमांकासाठीचे १०१ रुपयांचे बक्षीसे ८८ विद्यार्थ्यांना यावेळी विविध मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आली. श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या ३३ विद्यार्थ्यांना, गमे गोठा प्राथमिक शाळेच्या १२ विद्यार्थ्यांना, राऊत वस्ती भागातील शाळेतील १२ विद्यार्थी, तर केलवड प्राथमिक शाळेतील ३२ विद्यार्थ्यांना हे बक्षीस वितरण करण्यात आले.

त्याच प्रमाणे रामभाऊ माधव गमे यांनीही श्री ज्ञानेश्वर विद्यालयातील ३३ विद्यार्थ्यांना वरील प्रमाणेच बक्षिसांचे वितरण केले. हे बक्षीस वितरण गावचे पोलीस पाटील सुभाषराव गमे पाटील, पोलीस पाटील सुरेशराव गमे पाटील, माजी सरपंच बाबासाहेब गमे, सरपंच लक्ष्मणराव सोनवणे, उपसरपंच नामदेवराव घोरपडे, पी. डी. गमे, ॲड. नकुलराव वाघे, रमेश शिंदे, बाळासाहेब गमे, भास्करराव घोरपडे, बाळासाहेब गमे, लक्ष्मण कांदळकर, देवराम कांदळकर, नाना वैद्य, संजय सोनवणे, तंटामुक्तीचे अध्यक्ष पुंडलिकराव वाघे, भाऊसाहेब गमे, भिकाजी घोरपडे, दत्तात्रय गुंजाळ, श्री. ठोंबरे, मुख्याध्यापक डी. एम. वाघे, केंद्र प्रमुख श्रीमती मंदाकिनी पुजारी, श्रीमती रोहिणी घाटे, कामगार तलाठी बाळासाहेब कोळगे, माजी सरपंच सिताराम रजपुत आदिंसह उपस्थित ग्रामस्थांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

दिनांक :- ०८/०९/२०१३


नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

अहमदनगर अंक २३१ वा वर्ष ३८ वे ■ रविवार दि. ८ सप्टेंबर २०१३ ■ पाने १२+१६ ■ किंमत ₹ ४


## नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने केलवडला सुरु झाले वाचनालय

**अस्तगाव (वार्ताहर)**–राहाता तालुक्यातील केलवड येथे नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने वाचनालय सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे सामुहिक वृत्तपत्र वाचनाचे केलवड सारख्या ग्रामीण भागात सोय झाली आहे.

नरेश राऊत फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत, तसेच सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचे संकल्पनेतुन हे वाचनालय सुरु करण्यात आले आहे. या वाचनालयात दररोज सर्वच वृत्तपत्र ग्रामस्थांना वाचण्यास मिळणार आहे. अशी माहिती प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

केलवड ग्रामस्थांनी या वाचनालयास चांगला प्रतिसाद दिला आहे. लवकरच केलवड येथील श्री ज्ञानेश्वर विद्यालयतही विद्यार्थ्यांना वृत्तपत्र वाचनासाठी ठेवण्यात येणार आहे. केलवड वाचनालयासाठी खास पगारी माणसाची सोय केली आहे. असेही श्री. गोर्डे यांनी सांगितले.



वाचनालयचे उद्घाटन चांगदेव गोर्डे, परसराम रावण गमे, पुंजाहरी रंभा राऊत, नाना वैद्य, नामदेव अगस्ती गमे, बाबासाहेब घन्सी गमे, नाना देवराम गोर्डे, अभिषेक गोर्डे, सचिन वाघे, किशोर गमे, योगेश गोसावी, संदिप गायकवाड, रामनाथ भिकाजी घोरपडे, ठोंबरे, मच्छिंद्र वाघे, शिवाजी गमे, संजय सोनवणे, गणपत ओहळ, अदिंसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक :- ०८/०९/२०१३

दिनांक :- ३०/०९/२०१३

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अहमदनगर अंक २५२ वा वर्ष ३८ वे ■ सोमवार दि. ३० सप्टेंबर २०१३ ■ पाने १४ ■ किंमत ₹४



# उद्योपती नरेश राऊत यांच्यावतीने राहाता देवस्थानला देणगी



अस्तगाव (वार्ताहर)- मुंबईस्थित उद्योगपती नरेश राऊत यांनी राहाता येथील श्री विरभद्र सार्वजनिक उत्सव ट्रस्टला २१ हजारांची देणगी नुकतीच दिली. नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गार्डे पाटील यांनी ती नुकतीच देवस्थानच्या ट्रस्टकडे सुपुर्द केली.

यावेळी गणेश कारखान्याचे अध्यक्ष अ‍ॅड. नारायणराव कार्ले पाटील, माजी संचालक व देवस्थानचे ट्रस्टी भागुनाथ गाडेकर, उपाध्यक्ष दत्तात्रय सदाफळ, विश्वस्त बाळासाहेब राधुजी बोठे पा., भाऊसाहेब नानाभाऊ जेजुरकर, बाळासाहेब पुंडलिक सदाफळ, ज्ञानेश्वर निवृत्ती गाडेकर, राजेंद्र सुकदेव गाडेकर, विरेश जानबा बोठे, रावसाहेब भडांगे, सहकार अधिकारी रमेश शिंदे, सक्रेटरी एकनाथ लोहाटे, विरभद्र मंदिराचे भगत सर्जेराव भगत, केलवडचे मुख्याध्यापक डी. एम. वाघे, नारायण भुजबळ, विजय कार्ले, नरेश राऊत फाऊंडेशनचे सेवकवृंद नानासाहेब गोर्डे, गणेश ओव्हळ, संदीप गायकवाड, योगेश गोसावी, सचिन वाघे, किशोर गमे, यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

गणेश कारखान्याचे अध्यक्ष अ‍ॅड. कार्ले पाटील यांनी या देवस्थानला देगणी दिल्याबद्दल उद्योगपती नरेश राऊत व प्रा. गोडे यांचे आभार मानले. व एका मंदिराच्या जिर्णोध्दारासाठी देणगी द्यावी, अशी मागणी ट्रस्टसह श्री. कार्ले यांनी केली. प्रा. गोर्डे यांनी यानंतर उर्वरित रक्कमेचा चेक जाहिर कार्यक्रमात प्रदान करण्यात येईल असे, अश्वासन त्यांना दिले.

पुणे ★ । शुक्रवार, १८ ऑक्टोबर २०१३ । किंमत ₹ ३

सकाळ

# केलवडचे प्रा. गोर्डे रोज शिकवतात मोफत गणित

## गावाला चार महिने केला पाणीपुरवठा; आता मुलींना संगणक प्रशिक्षणाचाही उपक्रम

काही निवडक काही सुखद

**राहाता, ता. १७ :** तालुक्यातील केलवड येथे प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने महिला व मुलींसाठी गेल्या दोन वर्षांपासून मोफत संगणक प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. याशिवाय प्रा. गोर्डे गावातील दहावी-बारावीच्या सुमारे शंभर विद्यार्थ्यांना दररोज गणित हा विषय मोफत शिकवतात. त्यांच्या पुढाकारातून गेल्या दुष्काळात गावात चार महिने टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा करण्यात आला.



**केलवड : प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या पुढाकारातून नरेश राऊत फाउंडेशनने महिलांसाठी मोफत संगणक प्रशिक्षणाचा उपक्रम हाती घेतला आहे.**

मुंबईतील कामाची जबाबदारी सांभाळत केलवडसारख्या खेडेगावात त्यांनी विविध उपक्रम हाती घेतले; मात्र तत्पूर्वी प्रा. गोर्डे यांनी केलेला संघर्षही इतरांना प्रेरणादायी आहे. गणित विषय घेऊन 'एम. एस्सी.' झाल्यानंतर त्यांनी मुंबई गाठली. त्यांच्या पत्नी सुनीता शेतात मजुरी करत आणि गोर्डे नोकरीचा शोध घेत फिरत. उद्योजक नरेश राऊत यांनी त्यांच्यातील गुण हेरले आणि त्यांच्यावर मुंबईतील मराठी उद्योजकांमध्ये सुसंवाद ठेवण्याची जबाबदारी सोपविली. चर्चासत्रे व परिसंवादाचे नियोजन करण्याचे काम ते करतात. पुढे नरेश राऊत फाउंडेशनच्या सचिवपदी त्यांची नियुक्ती झाली. उद्योजकांमध्ये सुसंवाद साधण्याचे त्यांचे कसब लक्षात घेऊन त्यांना मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे सन्माननीय सदस्यत्वही बहाल करण्यात आले.

**'गरिबीचे चटके मी सहन केले. रयत शिक्षण संस्थेच्या राहाता येथील शारदा विद्यामंदिर संकुलात शिकता आले. त्यातून पुढे संधी मिळाली. ग्रामीण भागातील शाळांना प्रत्येकाने मदत करावी, असे मला वाटते.''**
**– प्रा. लक्ष्मण गोर्डे**

या कामाचा व्याप सांभाळून प्रा. गोर्डे केलवड या साडेसात हजार लोकसंख्येच्या गावात नरेश फाउंडेशनच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत आहेत. प्राथमिक शाळेसाठी कूपनलिका व एलसीडी प्रोजेक्टर त्यांनी मिळवून दिला. रयत शिक्षण संस्थेच्या राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुलास जेवणाच्या ताटांसाठी ३५ हजार रुपयांची मदत मिळवून दिली. मुंबईतील उद्योजकांना ग्रामीण भागात आणून त्यांचा व विद्यार्थ्यांचा संवाद घडवण्याचे काम ते करतात. त्यांच्याच पुढाकारातून उद्योजक नरेश राऊत यांनी येथील काही शाळांना भेट देऊन आर्थिक मदतही दिली.

दिनांक :- २४/१०/२०१३

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
अहमदनगर गुरुवार दि. २४ ऑक्टोबर २०१३ पान १४

# राजकारणाचे जोडे बाजूला ठेवा : प्रा. गोर्डे

## नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने भजनी मंडळास २१ हजाराचा धनादेश प्रदान



अस्तगाव (वार्ताहर)- नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने राहाता तालुक्यातील केलवड येथील भजनी मंडळास साहित्य घेण्यासाठी २१ हजार रुपयांचा धनादेश नुकताच फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांनी भजनीमंडळास प्रदान केला. यावेळी २०० हून अधिक ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रा. गोर्डे यांनी हा धनादेश भजनीमंडळास दिला. यावेळी कामगार पोलीस पाटील सुभाषराव गमे, पी. डी. गमे, आर. आर. गमे, नारायणराव गारकर, नारायण गमे, सोपानराव गमे, मच्छिंद्र वाघे, शिवाजी गमे, तुकाराम गमे, मच्छिंद्र गमे, गंगाधर गमे, भागवत वाघे, ठमाजी ठोंबरे, धोंडिबा गुंजाळ, सुकदेव कांदळकर, विठ्ठल गमे, विठ्ठल माळवे, भाऊसाहेब घन्सी गमे, नानासाहेब गोर्डे, यांचेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ग्रामस्थांसमोर बोलतांना प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, केलवड ग्रामस्थांचे माझ्यावर मोठे प्रेम आहे. उद्योगपती नरेश राऊत यांचेही केलवडवर प्रेम असल्याने सेवाभावी वृत्तीने गावाला सहकार्याची भावना ठेवू, या माध्यमातून केवळ समाजकार्य असून राजकारण करण्याचा हेतू नाहीच. ग्रामस्थांनी एकोप्याने विकासासाठी मदत मागा त्यासाठी सहकार्य करु, त्यात कोणी राजकारण आणले तर मदत मिळणार नाही.

### अल्प रक्कमेत मंडप!

नरेश राऊत फाऊंडेशनच्या माध्यमातुन अर्थीक ऐपत नसरणाऱ्यांसाठी अल्प रक्कमेतएखाद्या घरगुती कार्यक्रमासाठी मंडप तसेच स्पिकर उपलब्ध करुन दिला जाणार आहे. हे साहित्य फाऊंडेशनने आणले आहे. त्याचा लाभ ग्रामस्थांनी घ्यावा, असे आवाहन प्रा. गोर्डे यांनी केले आहे.

दिनांक :- ०४/११/२०१३



नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अंक २८७ वा वर्ष ३८ वे सोमवार दि. ४ नोव्हेंबर २०१३ ■ पाने १४ ■ किंमत ₹ ४

# नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने सराला बेटासाठी ५१ हजाराची मदत



अस्तगाव (वार्ताहर)- राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने सराला बेटाचे प्रमुख महंत रामगिरी महाराज यांना ५१ हजार रुपयांचा धनादेश नुकताच प्रदान करण्यात आला.

नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या निवासस्थानास रामगिरी महाराजांनी भेट दिली. त्याप्रसंगी प्रा. गोर्डे व सौ. सुनिता गोर्डे यांनी महंत रामगिरी यांची पूजा करुन त्यांना ५१ हजाराचा धनादेश बेटाच्या विकासासाठी प्रदान करण्यात आला, तसेच महाराजांच्या वाहनासाठी ५ हजार रुपयांचे डिझेल देण्यात आले. यावेळी अभिषेक गोर्डे, मधुकर महाराज कडलग, अस्तगावकर सराफचे अशोकराव बोऱ्हाडे, सुभाषराव गमे, सहकार अधिकारी रमेश शिंदे, प्राचार्य राजेंद्र बर्डे, कामगार तलाठी बाळासाहेब कोळगे, प्रा. बी. डी. गमे, नरेश राऊत, गणेश ओव्हळ, कु. कावेरी गोर्डे, कु. सुरेखा गोर्डे आदी उपस्थित होते.

दिनांक :- ०८/११/२०१३

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अहमदनगर शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०१३ पान १४

# नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने खडकेवाके येथे मोफत वाचनालय

खडकेवाके (वार्ताहर)- राहाता तालुक्यातील खडकेवाके येथेनरेशराऊतफाऊंडेशनच्यावतीने मोफत वाचनालय सुरु झाले आहे. ना. विखे पाटील यांचे अशिर्वादाने हे वाचनालय सुरु करण्यात आल्याचे नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सांगितले.

यापुर्वी केलवड येथे मोफत वाचनालय फाऊंडेशनच्या वतीने सुरु करण्यात आले आहे. आता खडकेवाके येथे सुरु करण्यात आले आहे. खडकेवाके चे पोलिस पाटील श्री. लावरे, सरपंच पोकळे, माजी सरपंच बी. टी. लावरे, लावरे वायरमन, सोपानराव गमे, अॅड. अनिल गमे यांचे हस्ते फित कापुन या वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी ग्रामस्थांनी प्रा. गोर्डे यांचा सत्कार करत नरेश राऊत फाऊंडेशनच्या कामाचे कौतुक केले. याप्रसंगी प्रा. संदिप गायकवाड, प्रा. योगेश गोसावी, मच्छिंद्र वाघे, सचिन वाघे, किशोर गमे, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक :- ०८/११/२०१३

दिनांक :- २९/११/२०१३

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

अहमदनगर अंक ३११ वा वर्ष ३८ वे शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर २०१३ ■ पाने १४ ■ किंमत ₹ ४

## दै. सार्वमत व अस्तगाव ग्रामपंचायत यांच्या संयुक्त सहकार्याने

# नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने अस्तगावला मोफत वाचनालय



अस्तगाव (वार्ताहर)- दै. सार्वमत व ग्रामपंचायत अस्तगाव यांचे सहकार्याने राहाता तालुक्यातील अस्तगाव येथे नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने मोफत सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात आले आहे. नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी हे वाचनालय सुरु केले आहे.

या वाचनालयासाठी अस्तगाव ग्रामपंचायतीने खास इमारत उपलब्ध करून दिली आहे. नुकतेच या इमारतील राहाता पंचायत समितीचे सभापती निवास त्रिभुवन व प्रा. गोर्डे यांचे हस्ते या मोफत वाचनालयाची सुरुवात करण्यात आली. यावेळी बाजार समितीचे संचालक ज्ञानदेव चोळके, माजी संचालक वाल्मिकराव गोर्डे, गणेशचे संचालक नारायण चोळके, माजी संचालक दत्तात्रय जेजुरकर, जनसेवा मंडळाचे अध्यक्ष जे. आर. चोळके, माजी उपसरपंच कैलास जेजुरकर, माजी सरपंच अशोकराव नळे, माजी उपसरपंच भाउसाहेब जेजुरकर, राष्ट्रवादीचे संतोष गोर्डे, अस्तगाव सोसायटीचे उपाध्यक्ष संतराम जेजुरकर, नरेश राऊत फाऊंडेशनचे विश्वस्त गणपत आव्हळ, संचालक विठ्ठलराव गमे, शिवाजीराजे गमे, रामनाथ घोरपडे, प्रा. संदिप गायकवाड, किशोर गमे, संजय सोनवणे, सचिन वाघे, यांचेसह १०० हुन अधिक ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी प्रा. गोर्डे यांचा ग्रामपंचायतीच्या वतीने माजी उपसरपंच कैलास जेजुरकर व अशोकराव नळे यांनी सत्कार केला. तर भजनी मंडळाच्यावतीने सिताराम जेजुरकर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना प्रा. गोर्डे म्हणाले, वाचनालयाचा वापर ग्रामस्थांनी करावा, उद्योगपती नरेश राऊत यांनी सामजिक बांधिलकी जपली असल्याने समाजउपयोगी कामे केली जात आहे. अस्तगाव च्या भजनी मंडळाला मदत करु, तसेच देवी मंदिराच्या परिसर विकासासाठी मदत करण्याचे अश्वासन प्रा. गोर्डे यांनी दिले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक माजी सरपंच अशोकराव नळे यांनी केले तर आभार कुंडलिकराव तरकसे यांनी मानले. याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष दशरथ गव्हाणे, पोलिस पाटील राजेश त्रिभुवन, रामनाथ चोळके, नवनाथ नळे, महेंद्र गोर्डे, राजेंद्र तांबे, ग्रामविकास अधिकारी सुपे, ज्ञानदेव गोर्डे, अविनाश जेजुरकर, देवराम जेजुरकर, प्रा. एन. के. नळे, बाळासाहेब घोरपडे, रावसाहेब गवांदे, राजेंद्र गव्हाणे, संजय बागुल, दत्तात्रय जेजुरकर, नारायण सापते, नामदेव जेजुरकर, विश्वनाथ जेजुरकर, चांगदेव तांबे, दत्तात्रय सापते, सुंदर त्रिभुवन, रंजन त्रिभुवन, संदिप चोळके, प्रा. संजय चोळके, सुंदरबापु जेजुरकर, रावसाहेब गोर्डे, शिरीष त्रिभुवन, साहेबराव गोर्डे, यांचेसह ग्रामस्थ भजनी मंडळाचे सदस्य, रिक्शा चालक मालक संघटनेचे प्रतिनिधी, तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

**सार्वमतने कौतुक केल्याने उत्साह!**

सुरुवातीला आपल्या कामाचे कौतुक दै. सार्वमतने केले. ही कौतुकाची थाप पडल्याने आपणाला उत्साह आल्याचे प्रा. लक्ष्मण गोर्डे यावेळी सांगितले. आपल्या कामाच्या विस्तरात सार्वमतचा मोठा वाटा असल्याचे श्री. गोर्डे म्हणाले.

दिनांक :- २३/१२/२०१३


www.esakal.com

सकाळ

पुणे ★। सोमवार, २३ डिसेंबर २०१३ । किंमत ₹ ३






राहाता : नरेश राऊत फाउंडेशनतर्फे शारदा शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांसाठी वृत्तपत्र वाचनालय सुरू करण्यात आले.

(छायाचित्र : सतीश वैजापूरकर)

# नरेश राऊत फाउंडेशनतर्फे वृत्तपत्र वाचनालय सुरू

राहाता, ता. २२ : रयत शिक्षण संस्थेच्या शारदा शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांसाठी नरेश राऊत फाउंडेशनतर्फे वृत्तपत्र वाचनालय सुरू करण्यात आले.

या वेळी फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी, वृत्तपत्रे समाजजीवनाचा आरसा असून, विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून वृत्तपत्रे वाचण्याची सवय ठेवावी, असे आवाहन केले. अध्यक्षस्थानी सल्लागार समितीचे प्रमुख रमेश शिंदे होते. प्राचार्य राजेंद्र बर्डे, डॉ. पी. जी. गुंजाळ, वासंती चौधरी आदी उपस्थित होते. डॉ. गुंजाळ यांनी या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. प्राचार्य बर्डे यांनी स्वागत केले. डांगे यांनी सूत्रसंचालन केले.

दिनांक :- २७/१२/२०१३


नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

अहमदनगर अंक ३३९ वा वर्ष ३८ वे शुक्रवार दि. २७ डिसेंबर २०१३ ■ पाने १४ ■ किंमत ₹ ४


## नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने

# पिंपळस सप्ताहास ५१ हजाराची देणगी

अस्तगाव (वार्ताहर)- राहाता तालुक्यातील पिंपळस येथे सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व भव्य तुलसी रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास केलवड येथील प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांनी नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने ५१ हजार रुपयांची देणगी दिली. नुकताच हा धनादेश अखंड हरिनाम सप्ताह समितीच्या सदस्यांकडे सुपुर्त केला.



राहाता तालुक्यातील पिंपळस येथे सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व भव्य तुलसी रामकथा ज्ञानयज्ञ सोहळ्यास केलवड येथील प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांनी नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने ५१ हजार रुपयांची देणगी दिली.

सामाजिक तसेच शैक्षणिक क्षेत्रात आपले महत्वाचे योगदान देणाऱ्या नरेश राऊत फाऊंडेशनने धार्मिक क्षेत्रातही आपले महत्वपूर्ण योगदान दिले आहे. नरेश राऊत फाऊंडेशनचे अध्यक्ष उद्योगपती नरेश राऊत यांचे मार्गदर्शनाखाली या फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे हे विविध उपक्रम राबवित आहेत. नुकताच या फाऊंडेशनने पिंपळस येथील भव्य स्वरुपात होत असलेल्या तुलसी रामकथेस ५१ हजार रुपयांचा धनादेश समितीतील सदस्य नितीनराव कापसे पाटील, अण्णासाहेब निरगुडे, शांताराम कदम, नामदेवराव राहाणे, प्रभाकर निमसे, यांचेसह गणेश कारखान्याचे अध्यक्ष ॲड. नारायणराव कार्ले पाटील, रमेश शिंदे, केलवडचे पोलीस पाटील सुरेश गमे, भास्कर घोरपडे, बाळासाहेब गमे, गणेश ओव्हळ, संजय सोनवणे, शिवाजी गमे, विठ्ठल गमे, यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

दिनांक :- ०५/०५/२०१४

नवी आशा नवी दिशा
सार्वमत

8 मे - 2014

नरेश राऊत फौंडेशन तर्फे राहाता पोलिस ठाण्याला वॉटर कुलर

# पोलिसदादांना मिळाले थंडगार पाणी!

गणेशनगर/प्रतिनिधी

नरेश राऊत फ‍ौंडेशनच्या वतीने राहाता पोलिस ठाण्याला आरओ आणि कुलर भेट दिले आहे. पोलिसदादांना यामुळे थंडगार पाणी मिळणार आहे.



नरेश राऊत फ‍ौंडेशन विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे. मुंबईस्थित उद्योगपतींनी एकत्र येवुन उद्योगश्री या एनजीओ संघटनेची स्थापना केली आहे. उद्योगपती नरेश राऊत यांनी नरेश राऊत फ‍ौंडेशनची स्थापना करुन केलवड येथील प्रा. लक्ष्मण देवराम गोर्डे यांची सेक्रेटरी म्हणुन नेमणुक केली आहे. प्रा. गोर्डे केलवड परिसरात विविध उपक्रम राबवित आहेत. त्याचाच एक भाग म्हणुन राहाता पोलिस ठाण्यातील पोलिस अधिकारी, कर्मचारी यांना धावपळीच्या जिवनात शुध्द पाणी मिळावे आणि उन्हाळा असल्यामुळे थंडगार पाणी मिळावे म्हणुन प्रा. गोर्डे यांनी ४३ हजार रुपये खर्चुन राहाता पोलिस ठाण्याला आरओ व कुलर यंत्रणा बसविली आहे. आणि ती कार्यान्वतही करण्यात आली आहे.

काल सहकार अधिकारी रमेश शिंदे, पोलिस निरीक्षक राम सोमवंशी यांचे हस्ते या यंत्रणेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नरेश राऊत फ‍ौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, केलवडचे पोलिस पाटील सुभाषराव गमे, पोलिस पाटील सुरेश गमे, पोलिस नाईक नानासाहेब शेंडगे,पो. काँ. सुभाष फ‍ड, फ‍ौंडेशनचे संचालक गणेश ओहळ, प्राचार्य राजेंद्र बर्डे, महेंद्र जेजुरकर, संचालक विठ्ठलराव गमे, शिवाजी गमे, अदिनाथ गमे, रामनाथ घोरपडे, यांचेसह केलवड येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी यंत्रणेसाठीचा ४३ हजार रुपयांचा धनादेश श्री. शिंदे व श्री. सोमवंशी, प्रा. गोर्डे यांचेहस्ते साई समर्थ वॉटर सोल्युशन चे मालक योगेश आग्रे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी जितेंद्र गुंजाळ, बाळासाहेब घोरपडे, नानासाहेब गोर्डे, अभिषेक गोर्डे, अमोल कहांडळ, संजय सोनवणे, संदिप गायकवाड, योगेश गोसावी, किशोर गमे, किशोर ढगे, सचिन वाघे, यांचेसह केलवड ग्रामस्थ तसेच पोलिस ठाण्यातील कर्मचारी उपस्थित होते.

ई पेपर : epunyanagari.com

# पुण्य नगरी

वर्ष :१५, अंक : ४३ पाने : १२+४ किंमत : ४ रुपये    रविवार,१८ मे २०१४    घराघरात... मनामनात...

# नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने शेतकरी संवाद व कृषी प्रदर्शन

**राहाता/प्रतिनिधी**

जळगाव हे चांगले विचार, संस्काराचे शिक्षण देणारे विद्यापिठ आहे. गाव विकासासाठी गटतट विसरुन सर्वजण एकत्र येतात, आणि एक आगळा वेगळा आदर्श ठेवतात. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष व विचारवंत अॅड. रावसाहेब शिंदे यांनी केले.

राहाता तालुक्यातील जळगाव येथे नरेश राऊत फौंडेशन च्या वतीने शेतकरी संवाद व कृषी प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानावरुन अॅड. शिंदे बोलत होते. उद्योगपती नरेश राऊत, सौ. मिना राऊत, कृषीतज्ञ मकरंद चुरी, कृषीभुषण सौ. अंजली चुरी, डॉ. राजीव चुरी, प्राचार्य ज्ञानदेव म्हस्के, रमेश शिंदे, गंगाधर चौधरी, जिल्हा देखरेख संघाचे अध्यक्ष अण्णासाहेब चौधरी, भाउसाहेब चौधरी, सरपंच संपतराव चौधरी, एम. टी. चौधरी, फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, प्राचार्य राजेंद्र बर्डे, यांचेसह शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आपल्या भाषणात अॅड. रावसाहेब शिंदे म्हणाले, जळगावने एकोपा टिकविला आहे. बोरावके महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिरे घेवुन खऱ्या अर्थाने या गावाला दिशा देण्याचे काम केले. एकोपा असल्याने हे गाव आदर्श ठरेल. कर्तुत्ववान माणसे येथे आहेत. असे सांगुन श्री. शिंदे पुढे म्हणाले, आपण आपल्या आयुष्यात सत्ता, संपत्ती आणि मान यापासुन दुर राहिलो. वकिलीत मिळविले ते समाज कार्यासाठी वापरले. माणसाने जगण्याच्या पलिकडे जावुन समाजासाठी काहीतरी केले पाहिजे. तत्वहिन राजकारण हे सामजिक पाप आहे. प्रत्येकाला घबाड मिळाले पाहिजे म्हणुन प्रयत्न होतांना दिसतात. जळगावने पावसाचा प्रत्येक थेंब जिरविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असेही ते म्हणाले. उद्योजक नरेश राउत म्हणाले, शेतीमालाला उत्पादनावर येणाऱ्या खर्चावर आधारित भाव मिळाला पाहिजे. जळगाव मध्ये एकी आहे. भाजी पाल्याचे उत्पादन शेतकऱ्यांनी घ्यावे, फौंडेशन त्यांना सहकार्य करेल.

कृषीभुषण सौ. अंजली चुरी म्हणाल्या, भाजीपाला क्षेत्रात सध्या भारत हा सर्व देशांना सांभाळणारा देश आहे. शेतीतुन चांगले उत्पादन मिळु शकते. चांगली अर्थप्राप्ती होवु शकते. मग शेतीला दुय्यम स्थान का? असा सवाल करुन त्या म्हणाल्या आपल्या शेतात आपण ८४ प्रकारच्या भाज्या पिकविलो. जगात वेगवेगळ्या प्रकारचे वातावरण आहे. आपल्याकडे त्या तुलनेंत चांगले आहे. आपला देश मध्यवर्ती आहे. संपुर्ण जगाला भाज्या पुरवु शकतो. भारतीय भाज्यांना चांगली मागणी असते. जळगांव ने नियोजन करुन १५० ते २०० प्रकारच्या भाज्या पिकवु शकता. यासाठी आपण मार्गदर्शन करु. यावेळी गंगाधर चौधरी, अण्णसाहेब चौधरी, भाउसाहेब चौधरी, प्राचार्य राजेंद्र बर्डे, कु. शुभांगी चौधरी, कु. शितल चौधरी यांची भाषणे झाली. आभार संपतराव चौधरी यांनी मानले. यावेळी प्राचार्य एल. डी. भोरे, माजी प्राचार्य टी. ई. शेळके, प्रा. बाबुराव उपाध्ये, सौ. सुनिता गोर्डे, सौ. अर्चना शिंदे, सौ. शिंदे, चंद्रभान चौधरी, दिलीप चौधरी, पंडीत चौधरी, बाळासाहेब चौधरी, विजय चौधरी, सुरेश चौधरी, शिवाजी गमे, गणपत ओव्हळ, अभिषेक गोर्डे, यांचेसह ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दिनांक :- १८/०५/२०१४

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अंक ३१५ वा । वर्ष ३९ वे । शुक्रवार, दि. ५ डिसेंबर २०१४ । पाने १४

## केलवडला आज

# टॅलेंट सर्च उपक्रम

अस्तगाव (वार्ताहर)– नरेश राऊत फाउंडेशन व पंचायत समिती शिक्षण विभाग राहाता यांच्या संयुक्त विद्यमाने राहाता तालुक्यातील केलवड येथे आज शुक्रवार दि. ५ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता टॅलेंट सर्च उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. ही माहिती राहाता पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे व नरेश राउत फाँडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

केलवड येथील गोर्डे वस्तीवर या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे उद्घाटन मुंबई येथील उद्योजक नरेश राऊत यांचे हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी राहाता पंचायत समितीच्या सभापती सौ. सुरेखा इनामके असतील तर प्रमुख अतिथी म्हणुन उपसभापती दिपक तुकरणे, माजी सभापती निवास त्रिभुवन, सदस्य पोपटराव वाणी, गटविकास अधिकारी कमलाकर रणदिवे, राहाताचे पोलिस निरीक्षक सुरेश बेंद्रे हे उपस्थित राहाणार आहेत.

या उपक्रमप्रसंगी तज्ञ म्हणून राष्ट्रपती पुरस्कार विजेते मुख्याध्यापक प्रकाश गरड, तसेच जिल्हा परिषदेच्या निरंतरचे शिक्षणाधिकारी पी. एस. काळे हे मार्गदर्शन करणार आहेत. या समारंभासाठी शिक्षण प्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे, विस्तार अधिकारी राजेश पावसे, प्रकल्प प्रमुख सुनिल गायकवाड, प्रा. लक्ष्मण गोर्डे अदिंनी केले आहे.

शनिवार, ६ डिसेंबर २०१४ । किंमत ₹ ३

सकाळ

# विद्यार्थ्यांसाठी 'टॅलेंट सर्च' फायदेशीर : राऊत

**राहाता, ता. ५ :** ''जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांमधील गुणवत्ता शोधण्यासाठी हाती घेतलेला 'टॅलेंट सर्च' उपक्रम फायदेशीर ठरेल,'' असे प्रतिपादन उद्योजक नरेश राऊत यांनी दिली.

पंचायत समिती व नरेश राऊत फाउंडेशनतर्फे 'टॅलेंट सर्च' उपक्रमाची सुरवात राऊत यांच्या हस्ते झाली. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सभापती सुरेखा इनामके होत्या. पोलिस निरीक्षक सुरेश बेंद्रे, उद्योजिका मीना राऊत, उपसभापती दीपक तुरकणे, फाउंडेशनचे सचिव प्रा.




**केलवड : टॅलेंट सर्च उपक्रमाच्या प्रारंभी मार्गदर्शन करताना उद्योजक नरेश राऊत. समवेत मीना राऊत, पोलिस निरीक्षक सुरेश बेंद्रे, सुरेखा इनामके, दीपक तुरकणे, प्रा. लक्ष्मण गोर्डे.** (छायाचित्र : सतीश वैजापूरकर)

लक्ष्मण गोर्डे, प्राचार्य राजेंद्र बर्डे, शिक्षणाधिकारी पी. एस. काळे, उमेश डोंगरे, प्रकाश गरड, लक्ष्मण सोनावणे, भरत राऊत, सुभाष गमे, पी. डी. गमे, सुनील गायकवाड, सुरेश गमे आदी या वेळी उपस्थित होते.

मीना राऊत म्हणाल्या, ''या उपक्रमामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना पुढे येण्याची संधी मिळेल. शिष्यवृत्ती परीक्षा दिल्याने त्यांचा आत्मविश्वास वाढेल. त्यादृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा आहे.''

चौथीचे तीन हजार ६५२ व सातवीचे ५९६ मुले, या उपक्रमात सहभागी होणार आहेत. त्यांच्या पूर्वतयारीसाठी तीन परीक्षा होतील. शिष्यवृत्ती परीक्षेत दीडशेहून अधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण दिले जाईल. त्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी दोन दिवसांचा अभ्यासवर्गात निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश गरड व पोपट काळे यांनी त्यांना मार्गदर्शन केले.


पुणे, ★ मंगळवार, ९ डिसेंबर २०१४ । किंमत ₹ ३

सकाळ

# 'टॅलेंट सर्च'मुळे हुशार विद्यार्थ्यांना संधी : रणदिवे

**राहाता, ता. ८ :** "प्राथमिक शाळांतील चौथी व सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या टॅलेंट सर्च उपक्रमाच्या माध्यमातून हुशार विद्यार्थ्यांना पुढे येण्याची संधी मिळेल. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून नरेश राऊत फाउंडेशनने हा उपक्रम सुरू केला," असे प्रतिपादन पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कमलाकर रणदिवे यांनी केले.

टॅलट सर्च उपक्रमाच्या समारोप सत्रात ते बोलत होते. फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे, निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश गरड, मुख्याध्यापक डी. एम. वाघे या वेळी उपस्थित होते.



**केलवड : नरेश राऊत फाउंडेशनच्या सहकार्याने आयोजित टॅलेंट सर्च उपक्रमामध्ये बोलताना गटविकास अधिकारी कमलकार रणदिवे. समवेत प्रा. लक्ष्मण गोर्डे व इतर.**

प्रा. गोर्डे म्हणाले, "प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासून त्यापैकी गुणवंतांना विशेष प्रशिक्षण देण्याच्या उद्देश या उपक्रमामागे आहे. त्यामुळे फाउंडेशनने या प्रकल्पाची जबाबदारी स्वीकारली. त्यात सहभागी झालेल्या शिक्षकांनी येथे तज्ज्ञांकडून मिळालेल्या मार्गदर्शनाचा उपयोग विद्यार्थ्यांसाठी करावा. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी हा उपक्रम मोलाचा आहे. शिक्षकांनी जीव ओतून प्रयत्न केल्यास गुणवंत विद्यार्थ्यांची नवी पिढी तयार होऊ शकेल."

निवृत्त मुख्याध्यापक गरड यांनी शिक्षकांना या उपक्रमातील बारकावे समजून सांगितले. तसेच विद्यार्थी घडविण्यासाठी काय करावे, याचे धडे दिले. गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे यांनीही मार्गदर्शन केले.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक १६ । वर्ष ४० वे । बुधवार, दि. ४ फेब्रुवारी २०१५ । पाने १४

## शिक्षण जनजागृती रथयात्रेचे केलवडला स्वागत



अस्तगाव (वार्ताहर)- राहाता पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या शिक्षण हक्क अधिनियम-२००९ अंतर्गत जनजागृती रथयात्रेचे स्वागत नुकतेच केलवड येथे करण्योत आले.

राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी कमलाकर रणदिवे व गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे यांचे मार्गदर्शनाखाली तालुक्यात जनजागृती रथयात्रा सुरु आहे. या रथयात्रेचे केलवड येथील नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या कार्यालयाजवळ आगमन होताच राहाता पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेश वेंद्रे यांनी नारळ वाढवुन या अभियानाचे स्वागत केले. यावेळी नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, सौ. सुनिता गोर्डे, गणेश विद्या प्रसारक मंडळाच्या सेवकांच्या पतसंस्थेचे संचालक शिवाजीराव गमे, रामभाऊ गमे,पोलिस उपनिरीक्षक दहिफळे, पोलिस हेड कॉन्स्टेबल बाबा सांगळे, काकडे यावेळी उपस्थितीत होते.

वर्ष : १३५

Regd. No. PCW/002/2015-2017 RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

● अंक ५२ ● पृष्ठे : ८ + रविवार पुरवणी ● तीन रुपये ● रविवार, २२ फेब्रुवारी २०१५, पुणे C (अहमदनगर जनता आवृत्ती)★★

# नरेश राऊत फौंडेशनचे कार्य कौतुकास्पद

राहाता, (वार्ताहर) : नरेश राऊता फौंडेशनचे कार्य सेवाभावी वृत्तीचे असून सरला बेट देवस्थानाला त्यांनी साडेचार लाखापर्यंत मदत केली आहे. आपले जीवन सुखी असताना दुसऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे फौंडेशनचे कार्य कौतुकास्पद व चांगले असल्याचे प्रतिपादन सरला बेटचे महंत रामगिरी महाराज यांनी केले.

राहाता तालुक्यातील केलवड येथे नरेश राऊत फौंडेशन या सेवाभावी संस्थेच्यावतीने अध्यात्मिक क्षेत्रासाठीचा 'अध्यात्मरत्न' पुरस्कार सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांना, सामाजिक क्षेत्रातील 'समाजभूषण' पुरस्कार युवा नेते डॉ. सुजय विखे यांना, आदर्श शैक्षणिक संकुलाचा पुरस्कार राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुलास, आदर्श ग्रामपंचायत पुरस्कार जळगाव ग्रामपंचायतीस, आदर्श सामजिक संस्था पुरस्कार दाढ येथील श्रध्दा प्रतिष्ठाण यांना या सोहळ्यात नरेश राऊत फौंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत, सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे हस्ते प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी महंत रामगिरी महाराज बोलत होते.

या प्रसंगी राहाता पंचायत समितीच्या सभापती सुरेखा इनामके, राहात्याच्या नगराध्यक्षा लताताई मेहेत्रे, उपनगराध्यक्ष संजय सदाफळ, ताराचंद कोते, रमेश शिंदे, पोपट वाणी, सुभाष गमे, केलवडचे सरपंच लक्ष्मण सोनवणे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना महंत रामगिरी महाराज म्हणाले, संत जीवन हे पुरस्कारासाठी नसते तर परोपकारासाठी असते. समाजाच्या आनंदासाठी ते पुरस्कार स्वीकारतात. त्याग हाच संत जीवननाचा खरा पुरस्कार आहे.

यावेळी राहाता पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बेंद्र, नरेश राऊत, प्रा. गोर्डे, प्राचार्य राजेंद्र बर्डे, योगेश तांबे, जळगावचे सरपंच संपत चौधरी, आदींनी आपले विचार मांडले. कार्यक्रमास सुनिता गोर्डे, केलवड माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक डी. एम. वाघे, रोहिणी घाटे, भाऊसाहेब चौधरी, दशरथ तुपे आदि उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ५४ । वर्ष ४० वे । रविवार, दि. १५ मार्च २०१५ । पाने १०+१२

## राहाता तालुक्यात शिष्यवृत्ती शिबिरे




**अस्तगाव (वार्ताहर)** - केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या माध्यामातून राहाता तालुक्यातील ५ प्रशिक्षण केंद्रांवरुन २९१ विद्यार्थ्यांना टॅलेंट सर्च उपक्रमांतर्गत अनिवासी शिष्यवृत्ती केंद्र सुरू करण्यात आले आहेत. राहाता पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविला जात आहे. जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात या स्वरूपाचा हा पहिलाच उपक्रम असावा, अशी माहिती गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे यांनी दिली.

नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या सहकार्यातून हा पथदर्शी प्रकल्प राबविला जात आहे. इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वीच्या शिष्यवृत्ती परिक्षेस बसलेल्या निवडक विद्यार्थ्यांसाठी अनिवासी शिष्यवृत्ती शिबिरास प्रारंभ झाला आहे. सहा दिवस हे शिबिर चालणार आहे. चौथीचे चार तर सातवीसाठी एक अशा पाच केंद्रावर हे शिबिर सुरू आहे.

लोणी येथे ४८, बाभळेश्वर येथे ६०, केलवड येथे ७३ व शिर्डी येथे सातवीचे ४९ असे एकूण २९१ विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले आहेत. शिबिरात सहभागी होण्याकरीता विद्यार्थ्यांच्या दोन २ सराव परीक्षा घेण्यात आल्या. या शिबिरात विद्यार्थ्यांना तालुक्यातील, जिल्ह्यातील व राज्यस्तरावरील तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन होत आहे. नरेश राऊत फौंडेशनने या विद्यार्थ्यांचा व शिक्षकांचा चाहपान, भोजन, तसेच प्रवास खर्च व सराव प्रश्नपत्रिका छपाई, या सर्वांचा खर्च नरेश राऊत फौंडेशनने उचलला आहे. दरम्यान गटशिक्षणाधिकारी उमेश डोंगरे व नरेश राऊत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सर्व प्रशिक्षण केंद्रांना भेट देऊन मार्गदर्शन केले. हा जिल्ह्यात आगळा वेगळा उपक्रम असल्याने पालक तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष, सदस्यांना या उपक्रमाचे कौतुक केले आहे.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ६६ । वर्ष ४० वे । शुक्रवार, दि. २७ मार्च २०१५ । पाने १४

### नरेश राऊत फाऊंडेशन च्या वतीने

# केलवडला सीईटीचा अभ्यासक्रम मोफत

अस्तगाव (वार्ताहर)– केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने इयत्ता बारावी सायन्सची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरिंग व मेडिकल साठी आवश्यक असणारी व इतर उच्च शिक्षणासाठी आवश्यक असणारी सीईटी चा अभ्यासक्रम मोफत शिकविला जात आहे. अशी माहिती नरेश राउत फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

केलवड येथील नरेश राउत फौंडेशनच्या शैक्षणिक संकुलात पाच अनुभवी प्राध्यापकांच्या मदतीने हा उपक्रम राबविला आहे. सध्या दोन दिवसांपासुन सीईटीचा अभ्यासक्रम शिकविणे सुरु झाले आहे. इतर ठिकाणी विद्यार्थ्यांकडून फ़ी मोठ्या प्रमाणात घेतली जाते. मात्र फौंडेशन विद्यार्थ्यांकडून एक रुपया ही घेणार नाही. असे श्री. गोर्डे यांनी सांगितले. महिलांसाठी संगणक शिक्षण, मोफत क्लास, याच बरोबर आता सीईटी चा अभ्यासक्रम मोफत शिकविला जात आहे.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ३.००
अहमदनगर, सोमवार, दि. ३० मार्च २०१५

## मोफत मार्गदर्शन

लोणी : केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने अभियांत्रिकी, तसेच वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी द्याव्या लागणाऱ्या सीईटीचे मोफत मार्गदर्शन करण्यात येत आहे, अशी माहिती फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

Regd. No. PCW/002/2015-2017 RNI No. 1755/57
वर्ष : १३५
केसरी
राष्ट्रीय ठेवा
● अंक ८७ ● पृष्ठे : ६ + ४ ● तीन रुपये ● सोमवार, ३० मार्च २०१५, पुणे C (अहमदनगर जनता आवृत्ती)★★

## सीईटीचा अभ्यासक्रम मोफत, नरेश फौंडेशनचा उपक्रम

राहाता (वार्ताहर) : केलवड येथील नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने बारावी सायन्सची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी इंजिनिअरिंग व मेडिकल प्रवेशासाठी आवश्यक असणारी सीईटीचा अभ्यासक्रम मोफत शिकविला जात आहे, अशी माहिती नरेश राऊत फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली. नरेश राऊत फौंडेशनच्या केलवड येथील शैक्षणिक संकुलात ५ अनुभवी व प्रशिक्षित प्राध्यापकांच्या मदतीने हा उपोक्रम राबविला आहे. सध्या २ दिवसांपासून सीईटीचा अभ्यासक्रम शिकविणे सुरू झाले आहे. इतर ठिकाणी विद्यार्थ्यांकडून फी मोठ्या प्रमाणावर घेतली जाते. मात्र फौंडेशन विद्यार्थ्यांकडून १ रुपयादेखील फी घेणार नाही, असे गोर्डे यांनी सांगितले. महिलांसाठी संगणक शिक्षण, मोफत क्लास, चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च प्रोग्राम याचबरोबर आता १२ वी सायन्सची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी सीईटीचा अभ्यासक्रम मोफत शिकविला जात आहे.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

गांवकरी

www.gavakai

अहमदनगर

शनिवार, ४ एप्रिल '२०१५

वर्ष ७२ ■ अंक ६२ ■ किंमत रु. २.०० ■ पाने ८

# भोजडे येथे श्री.नरेश राउत फांउडेशन संचलित मोफत वाचनालयाचे उद्घाटन

कोपरगाव (ता.प्र.) भोजडे येथे श्री.नरेश फांउडेशन केलवड संचलित मोफत वाचनालयाचे उद्घाटन फांउडेशनचे सविच प्रा.लक्ष्मण गोडे यांच्या अध्यक्षतेखाली व राहाता येथील शारदा विद्यामंदिरचे प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रकाश गायकवाड, चारुदत्त सिनगर व मुकूंद सिनगर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.गोर्डे सर व उद्घाटक प्रा.बर्डे सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. फांउडेशनच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. फांउडेशनच्या वतीने यावेळी धोत्रे येथील श्री.विरुभद्र विद्यालयास पिण्याचे पाण्यासाठी बोअरमध्ये मोटार बसविणेसाठी रु१५०००/-ची देणगी देण्यात आली.

यावेळी अशोक मंचरे यांनी सर्वांचे स्वागत केले व व्यंकट घट यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन केले, कार्यक्रमाला दिलीप देवकर, संदिप मंचरे, पुजाराम धट, ज्ञानेश्वर नरोडे, गंगाधर वाबळे, फारुक पटेल, विक्रम सिनगर, भाउसाहेब मंचरे, दादासाहेब नाईकवाडे, भाउसाहेब सिनगर, गवजीराम मंचरे, यांच्यासह धोत्रे व भोजडे येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करणेसाठी वाचनालयाच्या वतीने राजमाता अहिल्याबाई होळकर मित्रमंडळ.



ई पेपर : epunyanagari.com

पुण्य नगरी

अहमदनगर, शनिवार,४ एप्रिल २०१५ वर्ष :१४, अंक : ४ पाने : १२+४ किंमत : ४ रुपये

# भोंजडे येथे मोफत वाचनालय

**राहाता/प्रतिनिधी**

श्री. नरेश राऊत फाऊंडेशन केलवड संचलित मोफत सार्वजनिक वाचनालय भोजडे येथे सुरू करण्यात आलेले आहे. फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे व प्राचार्य राजेंद्र बर्डे ,शारदा शैक्षणिक संकुल राहाता व सरपंच यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. गोर्डे होते.

यावेळी धोत्रे येथील विरभद्र हायस्कूल मुलांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल मोटार व इलेक्ट्रीक साहित्यासाठी रू. १५ हजारांची देणगी देण्यात आली. सूत्रसंचालन व्यंकट धट यांनी केले. पाहुण्यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला. संदीप कैलास मंचरे यांच्या प्रेरणेने हे वाचनालय सुरू झाले. यावेळी मुकूंद सिनगर, दिलीप देवकर, चारूदत्त क्षीरसागर, फौंडेशनचे कर्मचारी संजय सोनवणे, सचिन वाघे व अभिषेक गोर्डे उपस्थित होते. यावेळी प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, अशोक मंचरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारूक पटेल, कैलास घट, निवृत्ती सिनगर, दादासाहेब नाईकवाडे, बाबासाहेब मंचरे उपस्थित होते. सदर वाचनालयाचे व इतर योजनेचे कामकाज अशोक मंचरे पाहणार आहेत.

पुणे ★ रविवार, ५ एप्रिल २०१५ । किंमत ₹ ४

सकाळ



भोजडे : नरेश राऊत फाउंडेशनने सुरू केलेल्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्‌घाटन करताना प्रा. लक्ष्मण गोर्डे. समवेत प्राचार्य राजेंद्र बर्डे, संजय सिनगर.

# राऊत फाउंडेशनतर्फे शाळेला वीजपंप

**शिर्डी, ता. ४ :** नरेश राऊत फाउंडेशनतर्फे धोत्रे प्राथमिक शाळेतील कूपनलिकेसाठी विद्युतपंप व इतर साहित्यासाठी १५ हजार रुपयांची मदत देण्यात आली. फाउंडेशनने ग्रामीण भागातील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी विविध सुविधा देण्यावर भर दिला आहे, अशी माहिती सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

फाउंडेशनतर्फे भोजडे येथे सुरू करण्यात आलेल्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्‌घाटन प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी प्रा. गोर्डे बोलत होते. या वेळी उपसरपंच संजय सिनगर, संदीप मंचरे, मुकुंद सिनगर, चारुदत्त क्षीरसागर, संजय सोनावणे, सचिन वाघे, अभिषेक गोर्डे आदी उपस्थित होते.

प्राचार्य बर्डे म्हणाले, ''उद्योगपती नरेश राऊत यांनी सामाजिक बांधिलकीतून ग्रामीण मुलांसाठी शैक्षणिक उपक्रम हाती घेतले. सचिव प्रा. गोर्डे यांच्या पुढाकारातून सहा गावात सार्वजनिक वाचनालये सुरू केली. विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक प्रशिक्षण दिले जाते. गुणवत्ता शोध व सुधार प्रकल्प राबविला जातो.''

या वेळी प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारुक पटेल, कैलास धट, निवृत्ती सिनगर आदी उपस्थित होते.

अमृतमहोत्सवी
स्थापना १९३९ ७५ अमृतमहोत्सवी दैनिक
# पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com
नगर
सोमवार | ६ एप्रिल २०१५ | स्थापना वर्ष ७७ वे | आवृत्ती वर्ष ९ | मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाच वेळी प्रसिद्ध



राहाता : राहाता येथील नरेश फाउंडेशनच्यातीने केलवड येथे सुरू केलेल्या वाचनालयाच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. लक्ष्मण गोर्डे, प्राचार्य राजेंद्र बर्डे आदी.

## राऊत फाऊंडेशनच्यावतीने वाचनालय सुरू

राहाता : श्री नरेश राऊत फाऊंडेशन केलवड संचलित मोफत सार्वजनिक वाचनालय भोजाडे येथे सुरू करण्यात आलेले आहे. फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे व प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते या वाचनालयाचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले. यावेळी धोत्रे येथील वीरभद्र हायस्कूल मुलांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल मोटार व इलेक्ट्रीक साहित्यासाठी १५ हजारांची देणगी देण्यात आली. यावेळी मुकुंद सिनगर, दिलीप देवकर, चारूदत्त क्षीरसागर, फाऊंडेशनचे कर्मचारी संजय सोनवणे, सचिन वाघे व अभिषेक गोर्डे तसेच ग्रामस्थ प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, अशोक नवरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारूक पटेल, कैलास घट, निवृत्ती सिनगर, दादासाहेब नाईकवाडी आदी उपस्थित होते. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन व्यंकट घट यांनी केले.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
मंगळवार, दिनांक २८ एप्रिल २०१५

नरेश राऊत फौंडेशनचा उपक्रम

# महिलांना मोफत प्रशिक्षण

**अस्तगाव (वार्ताहर)** - आदर्श गाव योजनेकडे वाटचाल सुरु असलेले राहाता तालुक्यातील जळगाव हे नरेश राऊत फौंडेशनच्या वतीने दत्तक घेतले आहे. या गावात महिलांसाठी मोफत शिवणकाम, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, संगणक या प्रशिक्षणाचे उद्घाटन फौंडेशनच्या उपाध्यक्षा सौ. मिना राउत यांच्या सह २० महिला उद्योजिकांनी केले. यावेळी फौंडेशनच्या वतीने येथील प्राथमिक शाळेला तसेच स्मशानभुमिला पाण्याच्या टाक्या स्टँडसह देण्यात आल्या.

जळगावला नरेश राउत फौंडेशनच्या वतीने भव्य महिला मेळावा ही घेण्यात आला. प्रारंभी नरेश राउत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, तसेच त्यांचे सर्व कर्मचारी, मुंबईतील उद्योजिका यांचे जळगाव च्या वतीने स्वागत करण्यात आले. ढोल, ताशा, लेझीम पथकासह गावातुन मिरवणुक काढण्यात आली.

यावेळी झालेल्या महिला मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माजी सरपंच सौ. सुनिता सुरेश चौधरी या होत्या. फौंडेशनच्या उपाध्यक्षा सौ. मिनाताई राउत, सौ. लता चुरी, सौ. उमा राउत, कु. शुभांगी चौधरी, सौ. वैजयंती चौधरी, अक्षदा चौधरी, सरपंच संपतराव चौधरी, तंटामुक्तीचे अध्यक्ष गंगाधर चौधरी, गणेश कारखान्याचे माजी संचालक भाउसाहेब चौधरी, राहाता येथील शारदा संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे, यांचेसह ग्रामस्थ महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ७८ । वर्ष ४० वे । बुधवार, दि. ८ एप्रिल २०१५ । पाने १४

## धोत्रे येथे मोफत वाचनालय सुरु



**अस्तगाव (वार्ताहर)**- केलवड येथील नरेश राउत फाऊंडेशनच्या माध्यामातुन धोत्रे येथे मोफत सार्वजनिक वाचनालय सुरु करण्यात आले आहे. फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे व शारदा शैक्षणिक संकुलांचे प्राचार्य राजेंद्र बर्डे यांचे हस्ते या वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी धोत्रे येथील विरभद्र विद्यालयाच्या मुलांच्या पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवेल मोटार व इलेक्ट्रिक साहित्यासाठी १५ हजाराची देणगी देण्यात आली. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. मुकूंद सिनगर, दिलीप देवकर, चारुदत्त क्षिरसागर, फौंडेशनचे कर्मचारी संजय सोनवणे, संचिन वाघे, व अभिषेक गोर्डे उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य राजेंद्र बर्डे यांचेही भाषण झाले. सुत्रसंचालन व्यंकट धट यांनी केले. संदिप मचरे यांच्या प्रयत्नातुन धोत्रे येथे वाचनालय सुरु झाले.

याप्रसंगी प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, अशोक मंचरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारुकभाई पटेल, कैलास धट, निवृत्ती सिनगर, दादासाहेब नाईकवाडे, बाबसाहेब मंचरे, अदि उपस्थित होते.

वर्ष : १३५

Regd. No. PCW/002/2015-2017 RNI No. 1755/57

केसरी

राष्ट्रीय ठेवा

● अंक ९७ ● पृष्ठे : ६ + ४ ● तीन रुपये ● गुरुवार, ९ एप्रिल २०१५, पुणे C (अहमदनगर जनता आवृत्ती)★★





केलवड येथील नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने भोजडे येथे मोफत सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन शारदा शैक्षणिक संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. लक्ष्मण गोर्डे व भोजडे ग्रामपंचायतीचे सरपंच उपस्थित होते. (छाया : शुभम करमासे)

# भोजडे येथे नरेश फौंडेशनने सुरू केले सार्वजनिक वाचनालय

राहाता (वार्ताहर) : तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने भोजडे येथे सार्वजनिक वाचनालय सुरू करण्यात आले असून, त्याचबरोबर प्राथमिक शाळेतील कूपनलिकेसाठी विद्युत पंप व इतर इलेक्ट्रीक साहित्यासाठी १५ हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे, अशी माहिती फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

फौंडेशनच्यावतीने भोजडे येथे सुरू करण्यात आलेल्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी उपसरपंच संजय सिनगर, संदीप मंचरे, दिलीप देवकर, चारुदत्त क्षीरसागर, संजय सोनवणे, सचिन वाघे, अभिषेक गोर्डे आदी उपस्थित होते.

प्राचार्य बर्डे यावेळी बोलताना म्हणाले, नरेश राऊत फौंडेशनने सामाजिक बांधिलकीतून ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम हाती घेतले आहेत. प्रा. गोर्डे यांच्या पुढाकारातून सार्वजनिक वाचनालये सुरू केली आहेत. विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक प्रशिक्षण दिले जाते. टॅलेंट सर्च उपक्रमातून शालेय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबीर राबविण्यात आले आहे.

यावेळी प्रकाश गायकवाड, अशोक गिरे, अशोक मंचरे, ज्ञानेश्वर नरोडे, फारुकभाई पटेल, कैलास धट, निवृत्ती सिनगर, दादासाहेब नाईकवाडे, बाबासाहेब मंचरे उपस्थित होते.

नवीं आशा नवीं दिशा

सार्वमत

अहमदनगर

मंगळवार, दिनांक १८ ऑगस्ट २०१५

## नरेश राऊत फाउंडेशन महिलांसाठी

# केलवडला सॅनिटरी नॅपकिन प्रकल्प उभारणार : प्रा. गोर्डे



अस्तगाव (वार्ताहर)- नरेश राउत फाउंडेशन केलवड येथे महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन प्रकल्प उभारणार आहे. ना नफा ना तोटा या तत्वावर हा प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. यावेळी फाउंडेशनच्या महिला विभागाच्या अध्यक्षा सौ. सुनीता लक्ष्मण गोर्डे या उपस्थित होत्या.

ग्रामीण भागात फाउंडेशनच्या माध्यामातुन विविध सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक उपक्रम राबवुन फाउंडेशन सामाजिक उपक्रमांत अग्रेसर ठरत आहे. महिलांसाठी मोफत संगणक क्लास, शालेय मोफत क्लास, इतर उपक्रम ही राबविले जात आहेत. आता महिलांना रोजगार मिळावा, तसेच महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन निर्मीती प्रकल्प उभारण्याचे फाउंडेशनने निश्चीत केले आहे. त्याची माहिती देतांना प्रा. गोर्डे म्हणाले, नरेश राऊत फाउंडेशनने निव्वळ ग्रामीण भागातच आपले उपक्रम राबविलेले नाहीत तर गुजरात राज्यातील डांग जिल्ह्यात ही आदिवासींसाठी काही उपक्रम सुरु केले आहेत. असेच ते अदिवासी भागात फिरत असताना त्यांना त्या भागात काही कपड्यांतून दुर्गंधी येत असल्याची जाणवली. त्याबाबत माहिती घेत त्यांनी या माहिलांना मोफत सॅनिटरी नॅपकिन देण्याची मनाशी खुणगाठ बांधली. आणि फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांना याबाबातचा विचार सांगून त्यांनी हा महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन बनविण्याचा प्रकल्प उभारण्याचे ठरविण्यात येऊन त्यादृष्टीने हालचाली सुरू केल्या. केलवड येथे यासाठी खास इमारत उभारणी करून त्यात हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. यातून महिलांना रोजगार ही उपलब्ध होणार आहे.

२३ सप्टेंबरपासुन या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल असा विश्वास प्रा.गोर्डे यांनी व्यक्त केला.

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
अंक ३५९ । वर्ष ४० वे । सोमवार, दि. १८ जानेवारी २०१६ । पाने १६

## नरेश राऊत फाउंडेशनचे पुरस्कार जाहीर

## पोपटराव पवारांना महाराष्ट्र रत्न

# विखे कारखान्यास आदर्श कारखाना पुरस्कार

अस्तगाव (वार्ताहर) – राहाता तालुक्यातील केलवड येथील श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध संस्थांना दिले जाणारे पुरस्कार जाहीर झाले आहेत. आदर्शगाव हिवरे बाजार येथील पोपटराव पवार यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार तर अशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील साखर कारखान्यास आदर्श कारखाना पुरस्कार देण्यात येणार असल्याची माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

हे पुरस्कार गुरुवार दि. ४ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता केलवड येथे सराला बेटाचे प्रमुख महंत रामगिरी महाराज, आदर्श ग्राम योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, उद्योजक नरेश राऊत आदींच्या हस्ते वितरीत करण्यात येणार आहे.

श्री. पवार व पद्मश्री विखे पाटील कारखान्यांसह राहात्याचे तहसीलदार सुभाष दळवी यांना आदर्श महसूल कार्य प्रणालीबद्दल पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच राहाता पंचायत समिती आदर्श पुरस्कार देण्यात येणार असून तो सभापती सौ. बेबीताई आगलावे स्वीकारणार आहेत. राहाता तालुका प्रेस क्लबला आदर्श पत्रकारिता पुरस्कार देण्यात येणार आहे.

सर्वोत्तम सारथी हा पुरस्कार सरला बेटातील मधुकर महाराज यांना देण्यात येणार आहे. तसेच उद्योगपती रमाकांत बारी यांनी उद्योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. आदर्श शैक्षणिक संकूल पुरस्कार सात्रळच्या रयतच्या श्री नानासाहेब सहादू कडू पाटील विद्यालयास देण्यात येणार आहे. राहात्याच्या स्त्री शक्ती लोकसंचालित साधना केंद्रास आम्ही सावित्रीच्या लेकी हा पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच आदर्श यात्रा कमिटी म्हणून केलवडच्या बिरोबा यात्रा कमिटीचा गौरव करण्यात येणार आहे. आदर्श गाव नियोजन हा पुरस्कार जळगाव ग्रामपंचायतीला देण्यात येणार आहे, असे ११ पुरस्कारांचे यावेळी वितरण होणार आहे.

ट्राफी व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. या सोहळ्यास गटविकास अधिकारी सुदर्शन तुपे, पोलीस निरीक्षक सुरेश बेंद्रे, माजी कामगार पोलीस पाटील सुभाषराव गमे पा., शारदा संकुलाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे आदी उपस्थित राहाणार आहेत. या सोहळ्यासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उद्योजक नरेश राऊत, सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी केले आहे.

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
। अंक ४६ । वर्ष ४१ वे । शनिवार, दि. ५ मार्च २०१६ । पाने १४

# केलवड शाळेला आयएसओ

अस्तगाव (वार्ताहर) – राहाता तालुक्यातील केलवड येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला आयएसओ मानांकन मिळाले आहे. केलवड ग्रामस्थ तसेच नरेश राउत फाउंडेशनच्यावतीने या शाळेला मदत करण्यात आली होती.


केलवड शाळेला मदत सुपूर्द करताना ग्रामस्थ.

शाळांना लोकसहभागातून भौतिक सुविधा उपलब्धता झाल्यानंतर शाळांना आयएसओ मानांकन मिळते. शाळेच्या शिक्षकांनी तसेच स्थानिक शाळा समितीच्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नातून शाळेला विविध सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. या शाळेला पिण्याच्या पाण्यासाठी सबमर्सिबल विद्युत पंप आदी सुविधा देगणीदारांच्या माध्यमातून प्राप्त झाल्या.

या शाळेत नुकताच देणगी प्रदान व दानशूर व्यक्तिंचा कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी पंचायत समितीच्या सभापती सौ. सुवर्णाताई आगलावे, पंचायत समितीचे सदस्य पोपटराव वाणी, गटशिक्षणाधिकारी श्रीमती मीना शिवगुंडे, शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर वाक्चौरे, लक्ष्मण गोर्डे, कामगार पोलिस पाटील सुरेश गमे, बाजार समितीचे संचालक प्रा. सुनील गमे, बाबासाहेब गमे, भारत राउत, काळू रजपूत, केलवड सेवा संस्थेचे अध्यक्ष गंगाधर गमे, बापुसाहेब राउत, अंजाबापू जटाड, दत्तात्रेय गोसावी, संजय गोडगे, शाळा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत गमे, केंद्र प्रमुख चंद्रकांत शिंदे, ज्ञानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक डी. एम. वाघे, अण्णासाहेब गमे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विलास वाक्चौरे यांचेसह शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी लक्ष्मण गोर्डे यांनी शाळेला देनगी दिली.

अहमदनगर । सोमवार, १४ मार्च २०१६ । वर्ष : १४ । अंक : ३४३ । किंमत : ४.०० । पाने : १२+४

पुण्य नगरी

# राऊत फाऊंडेशनतर्फे मोफत टँकरने पाणीपुरवठा



राहाता/प्रतिनिधी

नरेश राऊत फाऊंडेशन, केलवड यांच्या मार्फत विकत पाणी घेऊन जळगाव (ता.राहाता) येथे मोफत टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. मोफत पाणीपुरवठा टँकरचे उद्घाटन फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले. जळगाव हे गाव फाऊंडेशनने दत्तक घेतले आहे. फाऊंडेश्नचे विधायक व सामाजिक कार्य खूपच पारदर्शी आहे, असे ज्येष्ठ नेते गंगाधर भिवाजी चौधरी चौधरी, भाऊसाहेब चौधरी व इतर ग्रामस्थांनी आपल्या भाषणात सूचित केले.

यावेळी माजी सरपंच सुमनताई वैराळ, तंटामुक्तीचे अध्यक्ष संपतराव चौधरी, जबाजी चौधरी, सुरेश चौधरी व सर्व ग्रामपंचायत सदस्य, महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रभात

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

पुणे । सोमवार । दि. १४ मार्च २०१६ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९, वर्ष ८५, अंक : ७३ । www.epr




## नरेश राऊत फाऊंडेशनचा पाणी टँकर




राहाता : तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनकडून तालुक्यातील जळगाव येथे टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा सुरू आहे. पाणी वाटपाची सुरुवात प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या हस्ते नुकतीच करण्यात आली. यावेळी गंगाधर चौधरी, भाऊसाहेब चौधरी, सरपंच सुमन वैराळ, तंटामुक्ती अध्यक्ष नाथाजी चौधरी, जबाजी चौधरी, सुरेश चौधरी आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रभात

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

पुणे । सोमवार । दि. २८ मार्च २०१६ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८५, अंक : ८६ । 

# केलवड येथे राऊत फाऊंडेशनकडून पाणी पुरवठा

राहाता, दि. २७ (प्रतिनिधी) - राहाता तालुक्यातील केलवड येथे नरेश राऊत फाऊंडेशनने टँकरद्वारे मोफत पाणी पुरवठा सुरू केला आहे. राऊत फाऊंडेशनने केलवड येथील ग्रामस्थांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठे योगदान दिल्याचे यावेळी सांगितले.

विखे कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे यावेळी उपस्थित होते. नरेश राऊत फाऊंडेशनद्वरे गेल्या काही दिवसांपासून केलवड गावासाठी मोफत पिण्याचे पाणी टँकरद्वारे पुरविले जाते. या उपक्रमाला युवा नेते सुजय विखे यांनी भेट देऊन फाऊंडेशनचे सचिव प्राध्यापक लक्ष्मण गोर्डे यांचे कौतुक केले. नरेश राऊत फाऊंडेशनद्वारे अनेक प्रकारचे विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना मोफत संगणक प्रशिक्षण, महिलांसाठी ब्युटी पार्लर कोर्सेस, जळगाव हे विकासकामांसाठी राऊत फाऊंडेशनने दत्तक घेतले आहे. तेथे ही अनेक प्रकारचे संस्थेचे उपक्रम



सुरू आहेत. याबाबतची माहिती प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी विखे यांना दिली. यावेळी केलवंड गावातील सुभाष गमे, सुरेश गमे, भास्कर घोरपडे, बाळासाहेब गमे, अयोध्या युवक संघटनेचे कार्यकर्ते, नरेश राऊत फाऊंडेशनचे कर्मचारी व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ६८ । वर्ष ४१ वे । सोमवार, दि. २८ मार्च २०१६ । पाने १६

# केलवडला शिवजयंती साजरी



केलवड येथे डॉ. सुजय विखे यांच्या हस्ते शिवरायांचे पुतळयाचे पूजन करण्यात आले. यावेळी नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे आदी उपस्थित होते.

**अस्तगाव (वार्ताहर)** - राहाता तालुक्यातील केलवड येथे, अयोध्या युवक संघटनेच्या पुढाकाराने शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शिवनेरी ते केलवड शिवज्योत आणण्यात आली होती. युवा नेते डॉ. सुजय विखे यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले.

अयोध्येत युवक संघटनेच्या ३५ कार्यकर्त्यांनी पायी शिवज्योत आणली. या ज्योतीचे केलवड गावात भव्य स्वागत होऊन शिवज्योतीची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत युवा नेते डॉ. सुजय विखे, नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, यांच्यासह ग्रामस्थ सहभागी झाले होते. डॉ. विखे यांनी अयोध्या संघटनेचे अध्यक्ष विशाल वाघे, उपाध्यक्ष दत्तात्रय गोर्डे, कार्याध्यक्ष दीपक वाघे, सचिव संतोष गमे, खजिनदार सिध्देश्वर शेपाळ, सल्लागार अंजाबापू जटाड, संदीप वाघे व त्यांच्या सर्व सदस्यांचे कौतुक केले. या संघटनेला नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सहकार्य केले.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ८३ । वर्ष ४१ वे । मंगळवार, दि. १२ एप्रिल २०१६ । पाने १२

## डॉ. सुजय विखे, नरेश राऊत फाउंडेशनच्या मदतीमुळे

# केलवडचा साठवण तलाव भरला

**अस्तगाव (वार्ताहर)** - पाण्याची तीव्र टंचाई असलेल्या केलवडच्या पाणी योजनेच्या साठवण तलावात गोदावरी कालव्यातून पाणी सोडल्याने या गावाचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न किमान दोन महिन्यांसाठी तरी सुटला आहे. गोदावरी कालव्यावरून या साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी युवा नेते डॉ. सुजय विखे पाटील यांनी जनरेटर व डिझेल ची सोय केल्याने या तलावात पाणी सुटू शकले. नरेश राउत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनीही डिझेलसाठी ५० हजारांची मदत दिल्याने मोठा आधार मिळाला आहे. विशेष म्हणजे पाण्याच्या प्रश्नावर केलवडकर मंडळी गटतट सोडून एकत्र आली आहेत.



केलवडच्या साठवण तलावात गोदावरी कालव्यातून पाणी सोडले आहे. (छाया : अमोल कहांडळ)

गोदावरी कालव्यातून या केलवडच्या पाणी योजनेच्या साठवण तलावात सरळ पाणी सोडण्याची सुविधा नाही. परिणामी जलसिंचन योजनेमार्फत हा साठवण तलाव भरला जातो. परंतु पिण्याच्या पाण्याच्या आवर्तन काळात वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने या योजनेचे विद्युतपंप सुरू होत नाहीत. परिणामी योजना बंद राहते. तीव्र दुष्काळी टापूत असलेल्या या गावाच्या पाणी योजनेत पाणी जाऊ शकत नाही. यासाठी गेल्या दोन तीन वर्षांपासून युवा नेते डॉ. सुजय विखे पाटील हे या योजनेसाठी जनरेटर, तसेच त्यासाठी लागणारे डिझेल पुरवितात. यावर्षीही त्यांनी ग्रामस्थांच्या आग्रहानुसार ते पुरविले. केलवड चे नरेश राउत फाउंडेशननेही केलवडकरांना दुष्काळात मदत व्हावी म्हणुन दररोज टँकरद्वारे पाणी विकत घेऊन ते तीन खेपा पिण्याच्या पाण्याच्या करतात. यासाठी लाखाहून अधिक रक्कम त्यांची खर्ची पडली आहे. याशिवाय साठवण तलावात पाणी आणण्यासाठी जनरेटरला त्यांनी ५० हजार रुपये खर्च केले आहेत. केलवडचा हा साठवण तलाव जवळपास भरत आला आहे, अशी माहिती सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

दरम्यान गावातील साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य एकत्र येवुन ते रात्रभर कालव्यावर पंपहाउस जवळ थांबुन राहातात. पाण्यासाठी सर्व गाव एकवटले असल्याचे चित्र आहे. उपसरपंच सौ. जिजाबाई काळु रजपुत यांचेसह सर्व सदस्यांनी डॉ. विखे व नरेश राउत फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचे आभार मानले आहे. सदस्य भारत राऊत, दीपक कांदळकर, गोरख वाघे, आप्पा सोनवणे, संजय गोडगे, रमेश घोरपडे, दत्तू गोसावी, शिवाजी गमे, बी. टी. गमे, भागवतराव कांदळकर, राजेंद्र रोहोम आदींनी पाण्यासाठी प्रयत्न केले.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अंक ८७ । वर्ष ४१ वे । शनिवार, दि. १६ एप्रिल २०१६ । पाने १६

## केलवडला डॉ. आंबेडकर जयंतीनिमित उपक्रम

# सव्वा लाख लिटर पाणी वाटप



केलवड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त स्मारक समितीने सव्वा लाख लीटर पाण्याचे मोफत वाटप केले. यावेळी नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, पोलीस निरीक्षक सुरेश बेंद्रे व मान्यवर.

**अस्तगाव (वार्ताहर)**– राहाता तालुक्यातील केलवड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित सव्वा लाख लिटर पिण्याच्या पाण्याचे मोफत वाटप केले.

केलवडच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्यावतीने हे पाणी वाटप टँकरद्वारे केले. केलवड गावठाण तसेच वाड्या वस्त्यांवर टँकर नेऊन तेथे पाण्याचे वाटप ११ टँकरद्वारे केले. दुष्काळात आगळा वेगळा उपक्रम नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. यावेळी सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी जयंती सोहळ्यास ३१ हजार रुपये यावेळी दिले. केलवडच्या ब्ल्यू डायमंड ग्रुपने येवला ते केलवड अशी भीमज्योत आणली या ज्योतीचे स्वागत नरेश राउत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी स्वागत केले. श्रीज्ञानेश्वर विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन यावेळी करण्यात आले. तर केलवड गावात डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याचे पूजन राहात्याचे तहसीलदार सुभाष दळवी, पोलीस निरीक्षक सुरेश बेंद्रे, सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या हस्ते पुतळ्याचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी गणेशचे संचालक बबनराव बनसोडे, मुख्याध्यापक डी. एम. वाघे, सुभाषराव गमे पाटील, पोलीस पाटील सुरेशराव गमे पाटील, संजय गोडगे, आप्पासाहेब सोनवणे, भाउसाहेब कोळगे, दिलीप सोनवणे, बबनराव गोडगे, विजय सोनवणे, माजी सरपंच लक्ष्मण सोनवणे, बौध्दाचार्य निवृत्ती सोनवणे, नामदेव सोनवणे, संजय सोनवणे, ग्रामपंचायतीचे उपसरपंच, व सर्व सदस्य, ग्रामस्थ, सेवा संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली होती.

ई पेपर : epunyanagari.com

पुण्य नगरी

अहमदनगर, बुधवार, १३ मे २०१५ वर्ष :१४, अंक : ४२ पाने : १२+४ किंमत : ४ रुपये

# जळगाव घेतले नरेश राऊत फाऊंडेशनने दत्तक

राहाता/प्रतिनिधी

नरेश राऊत फाऊंडेशन या संस्थेने तालुक्यातील जळगाव हे गाव दत्तक घेतले असून येथे भव्य महिला मेळाव्याचे आयोजन केले. या मेळाव्यासाठी संस्थेच्या उपाध्यक्ष मीना राऊत, लता चुरी, उमा राऊत यांच्यासह मुंबई येथून सुमारे २० महिला उद्योजकांनी सहभाग घेतला. ग्रामस्थांनी सर्व पाहुण्यांचे ढोल ताशाच्या गजरात जंगी स्वागत केले. दत्तक म्हणून घेतल्या या जळगाव गावात शाळेच्या पाण्याची टाकी, अमरधामची सोय मुलींसाठी, ब्युटी पार्लर, शिवणकाम व संगणक शिक्षण देणारे महिला प्रशिक्षण केंद्र फाऊंडेशनच्या वतीने सुरू करून त्याचे उद्घाटन करण्यात आले. सरपंच सुनिता चौधरी यांनी नरेश राऊत फाऊंडेशनच्या कार्याचा गौरव करीत महिलांनी स्वावलंबी



राहाता- नरेश राऊत फाऊंडेशन या संस्थेच्या वतीने तालुक्यातील जळगाव हे गाव दत्तक घेतले. तेथील पाण्याच्या टाकीचे उद्घाटन करताना संस्थेच्या पदाधिकारी व ग्रामस्थ महिला.

बनावे, असा संदेश व्यक्त केला. फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा मीनाताई राऊत यांनी जळगाव येथील ग्रामस्थांचे सहकार्य व कामाचे कौतुक केले.

याप्रसंगी गंगाधर चौधरी, संपत चौधरी, गणेशचे संचालक भाऊसाहेब चौधरी फाऊंडेशनचे सचिव लक्ष्मण गोर्डे, शारदाचे प्राचार्य राजेंद्र बर्डे आदी उपस्थित होते. भाऊसाहेब चौधरी यांनी आभार व्यक्त केले.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
पुणे । गुरुवार । दि. १४ मे २०१५
PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९, वर्ष ८४, अंक : १३१ । www.epra

# महिलांनी स्वावलंबी व्हावे: चौधरी

## महिला मेळावा : राऊत फाउंडेशनकडून जळगाव दत्तक

राहाता, दि. १३ (प्रतिनिधी) - 'या संगणक युगात आधुनिक तंत्रज्ञानाची साधने विकसित होत असताना महिलांनी विविध क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. पुरुषांच्या बरोबरीने महिलांनी कार्यक्षमता सिद्ध करून स्वावलंबी व्हावे,' असे आवाहन सरपंच सुनीता चौधरी यांनी केले.

राहाता तालुक्यातील जळगाव हे गाव नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने दत्तक घेण्यात आले. त्यावेळी महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते; यावेळी जळगावच्या सरपंच चौधरी बोलत होत्या. त्यांनी नरेश राऊत फाउंडेशनच्या कार्याचा गौरव केला. यावेळी फाउंडेशनच्या उपाध्यक्षा मीनाताई राऊत यांनी जळगाव ग्रामस्थांचे कौतुक केले. मुंबई येथील मीना राऊत यांच्यासह लता चुरी, उमा राऊत यांसह सुमारे २० महिला उद्योजकांनी सहभाग नोंदविला. जळगावच्या ग्रामस्थांनी मेळाव्याला आलेल्या महिलांचे ढोलताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतषबाजीत व गुलालाची उधळण करीत उत्स्फूर्तपणे स्वागत केले.



उद्योजक नरेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली फाउंडेशनच्या वतीने सामाजिक कार्य हाती घेण्यात येते. गावात शाळेला पाण्याची टाकी देण्यात आली. तर, अमरधाममध्ये पाण्याची टाकी बसविण्यात आली. मुलींसाठी ब्युटीपार्लर, शिवणकाम व संगणक शिक्षण देण्यात येणार असून फाउंडेशनच्या वतीने महिला प्रशिक्षण केंद्र सुरू केले. सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, गंगाधर चौधरी, संपत चौधरी, भाऊसाहेब चौधरी, प्राचार्य राजेंद्र बर्डे, उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ११५ । वर्ष ४३ वे । बुधवार, १६ मे २०१८ । पाने १६

# नरेश राऊत फाउंडेशनच्या पुढाकाराने ऑगस्टमध्ये सॅनेटरी नॅपकिन निर्मिती

अस्तगाव (वार्ताहर) – नरेश राऊत फाउंडेशनच्या मार्फत केलवड येथे सॅनेटरी नॅपकिन प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्यासाठी लागणाऱ्या मशिनरींची खरेदी केली असून हा प्रकल्प ऑगस्टच्या दरम्यान प्रत्यक्षात कार्यान्वित होईल, अशी माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.



नरेश राऊत फाउंडेशन ही सामाजिक संस्था आहे. भारत स्वच्छता अभियानांतर्गत सामाजिक दायित्व म्हणून महिलांची जनजागृती यासाठी फाउंडेशन हा प्रकल्प ना नफा ना तोटा या तत्वावर राबविणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून २५० महिलांना रोजगार मिळणार आहे.

केलवड सारख्या ग्रामीण भागातील मुली महिलांना या नॅपकिनचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. राहाता तालुक्यातील सर्व कॉलेज, विद्यालयांना १० टक्के मोफत देण्यात येणार आहे. अन्यत्र नाममात्र शुल्क घेऊन ना नफा ना तोटा तत्वावर हे नॅपकिन वितरित करण्यात येणार आहे. या नॅपकिनसाठी लागणारा कापूस मलेशियातून आयात करण्यात येणार आहे. तसेच सॅनेटरी नॅपकिनची विक्री होण्यासाठी वितरक स्वत: होऊन याठिकाणी येऊन खरेदी करणार आहेत. शासनस्तरावर ग्रामपंचायतींना याबाबत अनुदान मिळत असेल तर ग्रामपंचायतींना पुरवठा करण्यात येईल. या प्रकल्पासाठी फाउंडेशनने इमारत उभारणी सुरू केली आहे. हे काम अंतिम टप्प्यात आहे. यंत्र खरेदी केली आहे. सुरुवातीला काही महिने कोईमतुर वरून खास तज्ज्ञ येणार असून ते महिलांना प्रशिक्षित करणार आहेत. दिवसाला तीन हजार पॅडची निर्मिती होऊ शकते. अशी या प्रकल्पाची क्षमता आहे. नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत, तसेच उपाध्यक्षा सौ. मीनाताई यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य या सामाजिक कामासाठी लाभत आहे. त्यांच्याच कल्पक विचारातून हा प्रकल्प साकारत आहे.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ११९ । वर्ष ४१ वे । गुरुवार, दि. १९ मे २०१६ । पाने १६

# नरेश राऊत फाउंडेशनच्या शिबिराचा १७५ रुग्णांनी घेतला लाभ



नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने केलवड येथे आयोजित मोफत नेत्रतपासणी शिबिरप्रसंगी रुग्णांची तपासणी करताना डॉ. दुशिंग. समवेत उद्योजक नरेश राऊत.

अस्तगाव (वार्ताहर) – राहाता तालुक्यातील केलवड येथील श्री. नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने घेण्यात आलेल्या मोफत नेत्र चिकित्सा शिबिराला चांगला प्रतिसाद मिळाला. या शिबिरात सुमारे १७५ रुग्णांनी लाभ घेतला.

या शिबिराचे उद्घाटन फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. आर. डी. दुशींग व सौ. दुशींग यांनी डोळ्यांची तपासणी केली. त्यांनी मोतीबिंदू, काचबिंदू तपासणी करणे तसेच इतर किरकोळ डोळ्यांच्या विकारावर उपचार करणे, डोळ्यातून पाणी येणे, डोळ्यांतील खुपऱ्या, चष्म्याद्वारे दृष्टी दोष घालविणे आदी नेत्र आजारावर उपचार केले.

नरेश राऊत म्हणाले, आजारी व्यक्तीची सेवा हीच ईश्वर सेवा होय. त्याच प्रेरणेतून या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी फाउंडेशन राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले, फाउंडेशनने विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले असून ग्रामीण भागात समाजसेवा करणे हाच या मागचा हेतू आहे. उद्योजक राऊत यांना समाजसेवेची आवड असल्याने फाउंडेशन विविध उपक्रम राबवित आहे.

या कार्यक्रमास बाजार समितीचे संचालक प्रा. सुनील गमे, सरपंच पती रमेश घोरपडे, शिवाजी गमे, अप्पासाहेब सोनवणे, दत्तात्रय गोसावी, बाळासाहेब तुळशीराम गमे तसेच सुभाष गमे, तबाजी घोरपडे, पी. डी. गमे, बाबासाहेब गमे, संदीप गमे, नरेश राऊत फाउंडेशनचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

www.gavakari.net

सोमवार दि. २० जून २०१६ ■ वर्ष ७२ ■ अंक २८७ ■ किंमत रु. २.०० ■ पाने ८ ■ अहमदनगर

## नरेश राऊत फौऊंडेशनच्यावतीने जळगावला जलक्रांती अभियान



राहाता (प्रतिनिधी)- राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राउत फौंडेशन व जळगाव ग्रामस्थ यांच्या सहभागातून जळगावला जलक्रांती अभियान राबविण्यात आले आहे, ही माहिती नरेश राऊत फौंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

राहाता तालुक्यात ग्रामस्थांचा एकोपा असलेले आदर्श ग्राम ...ावच्या ग्रामस्थांसह नरेश राऊत फौंडेशनने दुष्काळावर मात करण्यासाठी हा सामाजिक उपक्रम राबविला आहे. या गावातील ग्रामस्थांनीही या उपक्रमास भरभरुन प्रतिसाद दिला आहे.

प्रति एकरी ५०० रुपये या प्रमाणे निधी ग्रामस्थांनी गोळा केला. उर्वरित निधीची जबाबदारी नरेश राउत फौंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राउत फौडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी उचलला. नरेश राउत फौंडेशनने जळगाव हे गाव दत्तक घेतले आहे. विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. जलसंधारण कामात तरुणांनी पुढाकार घेतला आहे. गेले १५ दिवसांपासून जलसंधारणाचे काम आहोरात्र सुरु असून आतापर्यंत २.५ किमी लांबीचा नाला ३५ फूट रुंद व ५ फूट खोलीचा पूर्ण झाला आहे. उर्वरित २.५ किमी लांबीच्या नाल्याचे काम येत्या ८ दिवसात पूर्ण होणार आहे.

तसेच गावातील छोटी मोठीं धरुन एकुण १२ बंधारे त्यांच्या खोलिकरणाचे काम करण्यात येणार आहे. माझे गाव, माझे पाणी, या उक्तीप्रमाणे वरुणराजाने कृपा केल्यास जलसमृध्द ग्रामच्या दिशेने जळगावची वाटचाल सुरु होणार आहे. जळगावला सहकार्य करणारे नरेश राउत फौंडेशनचे अध्यक्ष नरेश राउत व सेक्रेटरी प्रा.लक्ष्मण गोर्डे हे गावाच्या दृष्टीकोनातून जलदुतच ठरले आहेत.

# प्रभात

Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे

पुणे । रविवार । दि. १९ जून २०१६ PRABHAAT । प्रेस रजिस्ट्रेशन नं. १६३९/१९५७, वर्ष ८५, अंक : १६८ ।


## जळगावला जलक्रांती अभियानांतर्गत जलसंधारणाची कामे

### लक्ष्मण गोर्डे यांची माहिती : नरेश राऊत फाऊंडेशन, ग्रामस्थांचा सहभाग

**राहाता, दि. १८ (प्रतिनिधी)** - राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राउत फाऊंडेशन व जळगाव ग्रामस्थ यांच्या सहभागातून जलक्रांती अभियान राबविण्यात येऊन जलसंधारणाची कामे सुरू असल्याची माहिती नरेश राऊत फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

ग्रामस्थांचा एकोपा असलेले अ[illegible]ाम जळगावच्या ग्रामस्थांसह नरेश राउत फाऊंडेशनने दुष्काळावर मात करण्यासाठी हा सामाजिक उपक्रम राबविला आहे. ग्रामस्थांनीही

**२.५ किमीच्या नाल्याचे ८ दिवसात काम पूर्ण होणार**

या उपक्रमास भरभरुन प्रतिसाद दिला आहे. प्रति एकरी ५०० रुपये या प्रमाणे निधी ग्रामस्थांनी गोळा केला. उर्वरित निधीची जबाबदारी नरेश राउत फाऊंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राउत, फाऊंडेशनचे सेक्रेटरी प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी उचलला. नरेश राउत फौंडिशनने जळगाव दत्तक घेतले आहे. विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. जलसंधारण कामात तरुणांनी पुढाकार घेतला आहे. गेल्या १५ दिवसांपासून जलसंधारणाचे काम आहोरात्र सुरू आहे. आतापर्यंत २. ५ किमी लांबीचा नाला ३५ फूट रुंद व ५ फूट खोलीचे काम पूर्ण झाले आहे.

उर्वरित २.५ किमी लांबीच्या नाल्याचे काम येत्या ८ दिवसात पूर्ण होणार आहे. तसेच गावातील छोटी मोठी असे एकूण १२ बंधारे त्यांच्या खोलिकरणाचे काम करण्यात येणार आहे. माझे गाव, माझे पाणी, या




उक्तीप्रमाणे वरुण राजाने कृपा केल्यास जलसमृध्द ग्रामच्या दिशेने जळगावची वाटचाल सुरू होणार आहे.

जळगावला सहकार्य करणारे नरेश राउत व प्रा.लक्ष्मण गोर्डे हे गावाच्या दृष्टीकोनातून जलदूतच ठरले आहेत.

प्रभात
Download Apps : www.dainikprabhat.com or www.eprabhat.net प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे



# राऊत फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांना खाऊ

राहाता, दि. २० (प्रतिनिधी) - तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने विविध शाळांतील विद्यार्थ्यांना खाऊ आणि स्पर्धेतील बक्षीस म्हणून ५० हजार रुपयांचे वाटप करण्यात आले.

स्वातंत्र्यदिनी हा उपक्रम राबवण्यात आला. विविध विद्यालयांना खाऊ आणि चित्रकला स्पर्धेसाठी दिलेली रक्कम पुढीलप्रमाणे : ज्ञानेश्वर विद्यालय- बालचित्रकला स्पर्धा-१ हजार ३३२ रुपये-खाऊसाठी ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना ६ हजार ३८३ रुपये, एलम बालविकास मंडळ आणि मल्हार ज्युनिअर कॉलेज (वाकडी)- प्रथम तीन क्रमांक-४ हजार ३८० रुपये-खाऊसाठी-४ हजार ३२४ रुपये, जिल्हा परिषद शाळा गमे गोठा-बक्षीस रक्कम आणि खाऊसाठी १ हजार ६२२ रुपये, जिल्हा परिषद शाळा-राऊत वस्ती-पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना

## चित्रकला स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे

पहिल्या तीन क्रमांकासाठी १ हजार ५२२ रुपये, अस्तगाव माथा कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय- खाऊसाठी १० हजार रुपयांची रक्कम, जळगाव जिल्हा परिषद शाळा-प्रथम तीन क्रमांक आणि खाऊसाठी-३ हजार ३३२ रुपये, खडकेवाके जिल्हा परिषद शाळा-४५० रुपये, जिल्हा परिषद वाळकी शाळा-१ हजार रुपये, जिल्हा परिषद शाळा, वाकडी-१ हजार ५०० रुपये, कोऱ्हाळे साईराम कनिष्ठ महाविद्यालय-१ हजार रुपये, केलवड ज्ञानेश्वर विद्यालयाला शिक्षक महेंद्र जेजुरकर यांनी ३ हजार ५५१ रुपये रोख बक्षीस दिले.

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

www.gavakari.net

सोमवार दि. २२ ऑगस्ट २०१६ ■ वर्ष ७२ ■ अंक ३४९ ■ किंमत रु. २.०० ■ पाने ८ ■ अहमदन



## राहाता तालुक्यातील विविध शाळांना

# नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने ५० हजारांचे खाऊ वाटप

राहाता (प्रतिनिधी) - केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेच्यावतीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून राहाता तालुक्यातील विविध शाळांना सुमारे ५० हजारांच्या खाऊचे वाटप करण्यात आले आहे, अशी माहिती फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

केलवड ग्रामपंचायतीच्या झेंडावंदनाच्या खांबासाठी ८५०० रुपये दिले. अस्तगांव केंद्रातील केलवडच्या ज्ञानेश्वर विद्यालयात नुकत्याच घेण्यात आलेल्या बालचित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना १३३२ रुपयांची बक्षिसे दिली. तसेच याच विद्यालयातील ५वी ते १० वी पर्यंतच्या प्रत्येक तुकडीतील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली व खाऊसाठी ६३८३ रुपये दिले. एलम बालविकास मंडळ व मल्हार ज्युनिअर कॉलेज वाकडी यांनाही प्रथम तीन क्रमांकासाठी तसेच खाऊसाठी ४३८० रुपये दिले. जि.प. शाळा केलवड यांना पहिल्या तीन विद्यार्थ्यांना बक्षिस रुपाने रोख रक्कम व खाऊसाठी ४३२४ रुपये अशी रककम देण्यात आली. जि.प.शाळा गमे गोटा यांनाही प्रत्येक वर्गासाठी प्रथम तीन बक्षिसे व खाऊसाठी १६२२ रुपये दिले.

> केलवड येथील नरेश राऊत फौंडेशनचे संस्थापक नरेश राऊत व फौंडेशनचे सचिव प्राध्यापक लक्ष्मणराव गोर्डे हे अनेक गरजू विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या निधीद्वारे मदत करत असतात. तसेच केलवड व जळगांव या गावांसाठी जलक्रांती अभियानामध्ये त्यांनी मोठा सहभाग घेतला आहे. नरेश राऊत फौंडेशनला गेल्या अनेक वर्षापासून विविध पारितोषिक देवून सन्मान करण्यात येत आहे.

जि.प. शाळा राऊत वस्ती केलवड १ ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांना पहिल्या तीन क्रमांकासाठी तसेच खाऊसाठी १५२२ रुपयांची मदत दिली. अस्तगांव माथ्यावरील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला खाऊसाठी १० हजारांची रक्कम दिली.

जळगांव येथील जि.प. शाळेसाठी प्रथम तीन क्रमांकासाठी तसेच खाऊसाठी ३३३२ रुपये दिले. जि.प. शाळा खडकेवाके येथील विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्गातील तीन विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे व खाऊसाठी ४५० रुपये रोख देण्यात आले. जि.प. शाळा वाळकी यांना खाऊसाठी १००० रुपये, जि.प. शाळा वाकडीला १५०० रुपये तसेच कोऱ्हाळे येथील साईराम कनिष्ठ महाविद्यालयाला खाऊसाठी १००० रुपये देण्यात आले. तसेच केलवडच्या ज्ञानेश्वर विद्यालयातील १०वीचा निकाल १०० टक्के लागल्याबद्दल प्रोत्साहन म्हणून विज्ञान शिक्षक महेंद्र जेजूरकर यांना ३५५१ रुपये रोख रक्कम दिली व त्यांचा गौरव केला. जेजूरकर यांनी ती रक्कम केलवड विद्यालयातील पाण्याच्या टाकीसाठी दिली असे एकूण जवळपास ५० हजारांचे वाटप केले असल्याची माहिती प्रा. गोर्डे यांनी दिली.

पुण्य नगरी

अहमदनगर, रविवार, ९ ऑक्टोबर २०१६



## राऊत फाऊंडेशनच्या सहकार्यातून उभारलेल्या

# साठवण तलावाचे जलपूजन



जळगाव : येथे नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने उभारण्यात आलेल्या तलावातील पाण्याचे पूजन करताना फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत, सहा.पो.नि. देवीदास पवार, प्रा. लक्ष्मण गोर्डे आदी.

राहता/प्रतिनिधी

राहाता तालुक्यातील जळगाव येथे नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने साकारण्यात आलेल्यां तलावाचे जलपूजन फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांच्या हस्ते करण्यात आल्याची माहिती फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

सामाजिक कार्याबरोबरच नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने जळगाव हे गाव दत्तक घेतले आहे. या गावात विविध छोटे मोठे उपक्रम राबविले जात आहेत. ग्रामस्थांच्या सहकार्यातून २.५ कि.मी. लांब व ३५ फूट रुंद व १० फूट खोल असा जळगाव ते पुणतांबा शिवेपर्यंत खोदाई करून बंधारा केला. या तलावात पावसामुळे पाणी साठवल्याने त्याचे जलपूजन फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांच्या हस्ते झाले. यावेळी विश्वस्त उद्योजक निखिल राऊत, अभिजीत राऊत, मीना राऊत, प्राचार्य चंद्रकांत सावे, मीना सावे, राहाता पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास पवार, प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी नरेश राऊत म्हणाले, जलशिवार योजनेचा जळगावसाठी पुढील टप्पा दिवाळीनंतर घेण्यात येणार आहे. जलशिवार योजनेस फाऊंडेशनमार्फत ५ लाखांची मदत करण्यात आली आहे. या तलावामुळे गावाचा शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. यावेळी संपत चौधरी,' नितीन चौधरी, गंगाधर चौधरी, अण्णासाहेब चौधरी, प्राचार्य गडाख, सरपंच सुमन वैरागळ, उपसरपंच चौधरी, राजेंद्र बर्डे, तंटामुक्तीचे अध्यक्ष चौधरी व ग्रामस्थ उपस्थित होते. भाऊसाहेब चौधरी यांनी आभार मानले.

पुणे ★ बुधवार, ८ नोव्हेंबर २०१७ । किंमत ₹ ३

सकाळ

महाराष्ट्रातील नंबर 1 वृत्तपत्र

# जळगावमध्ये झाली जलक्रांती

## नरेश राऊत फाउंडेशनच्या पुढाकाराने जलसंधारणाची कामे

आशादायक

सकाळ वृत्तसेवा



जळगाव (ता. राहाता) : जलसंधारणाच्या कामांमुळे काही भागातील विहिरी अशा तुडुंब भरल्या आहेत. त्यांची पाहणी करताना उद्योजक नरेश राऊत व सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे आदी.

शिर्डी, ता. ७ : राहाता तालुक्यातील जळगाव येथे नरेश राऊत फाउंडेशनच्या सहकार्याने सुमारे अडीच किलोमीटर लांबीच्या चराचे खोलीकरण व रुंदीकरण करण्यात आले. त्यात यंदा पावसाचे पाणी साठल्याने शंभराहून अधिक शेतकऱ्यांच्या विहिरी तुडुंब भरल्या. गावानजीकच्या गणेश बंधाऱ्याचे विस्तारीकरण करण्यात आले. त्याशेजारी विहीर खोदून गावाची पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली.

याबाबत माहिती देताना नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, "जळगाव हे शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचे गाव म्हणून ओळखले जाते. उद्योजक नरेश राऊत यांना येथील एकोप्याचे वातावरण व आधुनिक शेती करण्याची शेतकऱ्यांची धडपड आवडली. त्यांनी हे गाव दत्तक घेतले. आम्ही लोकसहभागातून अडीच किलोमीटर लांबीच्या चराची खोदाई व रुंदीकरण केले. यंदा चांगला पाऊस झाला. चरात पाणी साठले. शेजारच्या विहिरी तुडुंब भरल्या. एका बंधाऱ्याचे रुंदीकरण केले. त्यात पाणी साठले. शेजारी विहीर खोदून ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्याची सोय केली."

"या गावात आम्ही मुलींसाठी शिवणकामाचा कोर्स सुरू केला. वाचनालय सुरू केले. स्मशानभूमी व प्राथमिक शाळेसाठी जलकुंभ भेट दिले. मागील उन्हाळ्यात येथे आम्ही टँकरने पिण्याचे पाणी पुरवीत होतो. जलसंधारणाच्या कामामुळे या भागात आता पुढील दीड ते दोन वर्षे पाणीटंचाई जाणवणार नाही, अशी स्थिती आहे. ग्रामस्थांच्या सहभागातून येथे हा फार मोठा बदल झाला आहे," असे त्यांनी सांगितले.

स्थापना १९३९

अमृतमहोत्सवी

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

www.pudhari.com

नगर

शुक्रवार । १० नोव्हेंबर २०१७ । स्थापना वर्ष ७९ वे । आवृत्ती वर्ष १२ । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर,

# जलक्रांती अभियान इतर गावांतही राबविणार

## उद्योजक नरेश राऊत

**राहाता : प्रतिनिधी**

केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशन यांनी राबविलेल्या जलक्रांती अभियानाची पाहणी नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांनी केली. फाउंडेशनद्वारे जलक्रांती अभियानाची कामे इतर गावातही सुरू करून गावातील पिण्याचे पाणी टंचाई दूर करण्यासाठी प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया फाउंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांनी केली.

राहाता तालुक्यात नरेश फाउंडेशनच सहकार्याने जळगाव येथे अडीच किलोमीटर लांबीच्या चराची खोलीकरण व रुंदीकरण करून दुष्काळाच्या काळात पिण्याच्या पाणी टंचाईला दूर करण्यासाठी साठवण तलाव खोदण्यात आले होते. यावर्षी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वरुण राजाची कृपा झाल्याने हे बंधारे तुडुंब भरले आहेत. त्यांच्या शेजारी गावातील ग्रामस्थांच्या सहकार्याने विहीर खोदून गावासाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाल्याने ग्रामस्थांनी नरेश राऊत फाउंडेशनचे अभिनंदन केले आहे.



**राहाता : राहाता तालुक्यात नरेश फौंडेशनच सहकार्याने तयार करण्यात आलेल्या तळे तसेच चरांची पाहणी करताना उद्योजक नरेश राऊत आदी.**

याबाबत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सांगितले की, नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांची अनेक दिवसांपासून दत्तक घेतलेल्या गावांची पिण्याचे पाणी टंचाई दूर व्हावी व पावसाचे पाणी अडवून त्याचा फायदा गावातील ग्रामस्थांना व्हावा, अशी अनेक वर्षांपासून इच्छा होती. तसेच ना. राधाकृष्ण विखे पाटील व युवा नेते सुजय विखे यांनी तालुक्यातील गावांची पिण्याचे पाणी टंचाई दूर व्हावी, यासाठी जिल्ह्यात प्रथम राहत्यात जलक्रांती अभियान सुरू केले. प्रवरा कारखान्याकडून गावातील चर खोदण्यासाठी फोकलँड मशीन व्यवस्था करण्यात आली. तसेच जनसेवा फाउंडेशन लोणी यांच्याकडून यासाठी निधी देण्यात आला. त्या त्या गावांतील ग्रामस्थांनी निधी जमवून जलक्रांती अभियान राबविले.

नरेश राऊत फाउंडेशनने केलवड व जळगाव या दत्तक घेतलेल्या गावांना यासाठी भरीव असा निधी दिल्याने पाणीटंचाई दूर करण्यासाठी गावाला मोठी मदत झाली. युवा नेते डॉ. सुजय विखे यांनी केलवड व जळगाव येथे या कामाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. दवाखाना व कोर्सेसही सुरू केल्याचे गोर्डे यांनी सांगितले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक २९८ । वर्ष ४१ वे । गुरुवार, दि. १७ नोव्हेंबर २०१६ । पाने १६

# केलवडला अल्पदरात वैद्यकीय सुविधा

## नरेश राऊत फाउंडेशनचा सामाजिक उपक्रम




केलवड येथे नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने नाममात्र धर्मार्थ शुल्क आकारुन दवाखाना सुरु करण्यात आला आहे. त्याप्रसंगी राहाता पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक देविदास पवार, सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, डॉ. दुशिंग, सरपंच रमेश घोरपडे आदी.

अस्तगाव (वार्ताहर)- अवघ्या ३० रुपये नाममात्र धर्मार्थ शुल्क घेवुन नरेश राउत फौंडेशनने केलवड येथे दवखाना सुरू केला आहे. या ३० रुपयांत तपासणी, इंजेक्शन, तसेच औषधही दिले जात आहे. आजूबाजूच्या खेड्यांची तसेच वाड्या वस्त्यांवरील गोरगरिबांची चांगली सोय झाली आहे, अशी माहिती नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

नुकतेच या दवाखान्याचे उद्घाटन राहाता पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक देविदास पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी पोलीस पाटील सुभाषराव गमे, सुरेशराव गमे, सरपंच रमेश घोरपडे, संदीप फकिरा गमे, अण्णासाहेब वाघे, शिवाजी गमे, भारत साबदे, भारत राउत, अप्पासाहेब सोनवणे, विठ्ठल ग्रुपचे विठ्ठलराव गमे, बाळासाहेब गमे, डॉ. दुशिंग, शिवाजी वाघे, नरेश राउत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, सेवक वृंद, प्रा. योगेश गोसावी, नानासाहेब गोर्डे, व्यवस्थापक सचिन वाघे, नवनाथ रजपूत, संजय सोनवणे, सुनील गमे, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सोसायट्यांचे पदाधिकारी, सर्व संघटनांचे सदस्य, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याबाबत माहिती देताना प्रा. गोर्डे म्हणाले, या दवाखान्यात केलवडसह खडकेवाके, काकडी, कोन्हाळे, डांगेवाडी, मल्हारवाडी, वरझडी, आडगाव अदी जिरायती टापूतील सर्वसामान्य गरीब रुग्ण येत आहेत. दररोज ५० ते ५५ पेशंट येत असतात. नाममात्र धर्मार्थ शुल्क अत्यल्प असल्याने रुग्णांना त्याचा फायदा होत आहे. या दवाखान्यात वैद्यकीय अधिकारी म्हणून डॉ. दुशिंग हे काम पाहत आहेत. ते मिलिट्री रिटायर्ड आहेत, याशिवाय प्रवरा ग्रामीण रुग्णालयात त्यांनी २० वर्षे सेवा केली आहे. फाउंडेशनने अनुभवी डॉक्टरांची नेमणूक केली आहे. दोन तीन दिवसात या दवाखान्यासाठी महिला डॉक्टर, तसेच नर्सची नेमणूक करण्यात येणार असल्याचे प्रा. गोर्डे यांनी सांगितले.

बाहेर भरमसाट फी घेतात, ती रुणांना परवडेलच असे नाही. मात्र जिरायती टापूतील गावांतील गरीब रुग्णांना सामाजिक बांधिलकी म्हणून आधार देण्याचा हा फाउंडेशनचा प्रयत्न असल्याचे प्रा. गोर्डे म्हणाले. इंजेक्शन, औषध, तपासणी या सुविधा अल्प धर्मार्थ शुल्कात मिळत आहेत. नरेश राउत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांचे जिरायती भागावर तसेच गरीब लोकांवर खूप प्रेम आहे. त्याचाच भाग म्हणून आपण हा केलवड येथे उपक्रम सुरू केल्याचे श्री. गोर्डे यांनी सांगितले.

अमृतमहोत्सवी
# पुढारी
प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
www.pudhari.com

आजच्या अंकास
बहा
आठ पानी पुरवण

वे | आवृत्ती वर्ष १२ | मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, अहमदनगर, नाशिक, सोलापूर, बेळगाव, गोवा येथून एकाचवेळी प्रसिद्ध

# राऊत फाउंडेशनचा टॅलेंट सर्च उपक्रम सुरू

**राहाता : प्रतिनिधी**

नरेश राऊत फाउंडेशनने ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च उपक्रम सुरु करून विद्यार्थ्यांना प्रेरणा देण्याचे काम केले. जिल्ह्यातील इतर सामाजिक संस्थांनी राऊत फाउंडेशनसारखा उपक्रम राबवून प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी या उपक्रमाद्वारे कसा फायदा होईल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

तालुक्यातील प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांसाठी सात दिवसांचे टॅलेंट रिसर्च या उपक्रमाचे केलवड येथे काल जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्ह्याचे शिक्षण विभाग प्रमुख रमाकांत काठमोरे, पं. स. सभापती हिराबाई कातोरे, गट शिक्षणाधिकारी मीना शिवगुंडे, शिक्षण विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर वाकचौरे, सरपंच उषा बोरपडे, पंचायत समितीच्या सदस्य काळू रजपूत, माजी पोलिस पाटील सुभाष गमे, नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला.

यावेळी ना. विखे म्हणाल्या की, ग्रामीण विद्यार्थी हे अभ्यासात हुशार असतात. परंतु त्यांना चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. ते या फाउंडेशनने ओळखून या विद्यार्थ्यांसाठी हे शिबीर आयोजित करून प्रेरणा देण्याचे काम केले. या उपक्रमाचा या विद्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल. पाचवी व आठवीसाठी होणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत २० ते २५ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले तर हे शिबीर नक्कीच साध्य होईल, असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला.



**राहाता : टॅलेंट सर्च उपक्रमाचा प्रारंभ जि.प. अध्यक्षा शालिनीताई विखे यांच्या हस्ते करण्यात आला.**

प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी फाउंडेशन राबवित असलेल्या सामाजिक कामांची माहिती दिली. फाउंडेशन दरवर्षी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करतो. यावर्षी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शालिनीताई विखे यांना फाउंडेशनच्यावतीने समाजरत्न पुरस्कार देऊन गौरव करणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. यावेळी गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, केलवडचे माजी पोलिस पाटील सुभाषराव गमे आदींनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ४६ । वर्ष ४२ वे । सोमवार, ६ मार्च २०१७ । पाने १६

## केलवड येथे एमएससीआयटीला मान्यता

### नरेश राऊत फाउंडेशनचा उपक्रम

अस्तगाव (वार्ताहर) - नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने यावर्षी एमएससीआयटी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.. महाराष्ट्र शासनाची तशी परवानगी मिळाली असल्याचे फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

एमकेसीएलचा हा अभ्यासक्रम असून थोड्याच दिवसात हा कोर्स फाउंडेशन सुरु करणार आहे. त्यामुळे केलवड सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषत: मुलींना या कोर्ससाठी इतरत्र जाण्याची गरज नाही. सुरुवातीपासून नरेश राऊत फाउंडेशनने महिलांसाठी मोफत संगणक शिक्षण देणे सुरु केलेले आहे. तसेच १० वी इतर वर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी, गणित तसेच भूमिती विषयांचे मोफत क्लास सुरु आहेत. त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरु आहे. जळगाव येथे महिलांसाठी मोफत संगणक, तसेच शिवणक्लास सुरु केलेले आहेत. फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांच्या संकल्पनेतून महिलांसाठी विविध उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

एमएससीआयटी बरोबरच टॅली, इंग्रजी, मराठी टायपिंग, एमकेसीएलचे क्लीक कोर्स सुरू करंण्यात आलेले आहेत. यासाठी केलवड येथे फाउंडेशनने अद्यायावत अशी संगणक लॅब उभारली आहे. फाउंडेशनच्या सामाजिक उपक्रमाचाच हा भाग आहे. आवश्यक ती शासनाचे शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागते. बहुतांशी मात्र मोफत शिक्षण दिले जात आहे. फाउंडेशनने अल्पदरात वैद्यकीय सोय केलवड येथे उपलब्ध करून दिली आहे. त्याचा फायदा केलवड पंचक्रोशीतील गरीब व गरजू असे सर्व थरांतील पेशंट लाभ घेत आहेत, असेही प्रा. गोर्डे यांनी सांगितले.

अमृतमहोत्सवी

पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

www.pudhari.com

# राऊत फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप

राहाता : प्रतिनिधी

केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशन या सेवाभावी संस्थेच्यावतीने स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून राहाता तालुक्यातील विविध शाळांना सुमारे ५० हजारांच्या खाऊचे वाटप करण्यात आले. अशी माहिती फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली. केलवड ग्रामपंचायतीच्या झेंडावंदनाच्या खांबासाठी ८ हजार ५०० रुपये दिले. अस्तगाव केंद्रातील केलवडच्या ज्ञानेश्वर विद्यालयात नुकत्याच घेण्यात आलेल्या बालचित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना १ हजार ३३२ रुपयांची बक्षिसे दिली. तसेच याच विद्यालयातील ५ वी ते १० वीपर्यंतच्या प्रत्येक तुकडीतील पहिल्या तीन विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली व खाऊसाठी ६ हजार ३८३ रुपये दिले. एलम बालविकास मंडळ व मल्हार ज्युनिअर कॉलेज वाकडी यांनाही प्रथम तीन क्रमांकासाठी, तसेच खाऊसाठी ४ हजार ३८० रुपये दिले. जि.प. शाळा केलवड यांना पहिल्या तीन विद्यार्थ्यांना बक्षीस रुपाने रोख रक्कम व खाऊसाठी ४ हजार ३२४ रुपये अशी रक्कम देण्यात आली. जि. प. शाळा गमे गोठा यांनाही प्रत्येक वर्गासाठी प्रथम तीन बक्षिसे व खाऊसाठी १ हजार ६२२ रुपये दिले. जि.प. शाळा राऊतवस्ती केलवड पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना पहिल्या तीन क्रमांकासाठी, तसेच खाऊसाठी १ हजार ५२२ रुपयांची मदत दिली. अस्तगाव माथ्यावरील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाला खाऊसाठी १० हजारांची रक्कम दिली.

अहमदनगर । गुरुवार, १६ मार्च २०१७ । वर्ष : १५ । अंक : ३४३ । किंमत : ४ [illegible] । पाने १२+४

# पुण्य नगरी

www.epunyanagari.com



# नाममात्र शुल्काच्या वैद्यकीय सेवेचा ग्रामीण रुग्णांना आधार

## नरेश राऊत फौंडेशनचा उपक्रम

श्रीरामपूर/प्रतिनिधी

अपवाद वगळता वैद्यकीय सेवेच्या नावाखाली सुरु असलेल्या नफेखोरीमुळे सामान्य माणसाची आर्थिकदृष्ट्या होणारी लुट, दुसरीकडे उपचाराचा खर्च भागविण्यातून झालेला कर्जाचा डोंगर हे आजच्या आजाराला बळी पडलेल्या सामान्य माणसाचे वास्तव. हे हेरुन आजारपणामुळे व उपचाराअभावी जनसामान्याचे कुटुंब उघड्यावर पडू नये म्हणून सामाजिक कामात नेहमी अग्रेसर असलेल्या नरेश राऊत फौंडेशनने केलवडमध्ये नाममात्र शुल्कावर ओ.पी.डी. सुरु केली आहे. गेल्या वर्षभरापासून सुरू असलेली फौंडेशनच्या डॉक्टर राजकुमार दुशिंग यांची ओ.पी.डी. ग्रामीण भागातील रुग्णांसाठी आधार ठरली आहे.

नरेश राऊत फौंडेशनने केलवड सारख्या दुष्काळी गावात सामाजिक व्रत मानून महिला व मुलींसाठी मोफत संगणक प्रशिक्षण, गावाला टँकरद्वारे पाणी पुरवठा, मोफत वाचनालय आदी सामाजिक उपक्रम यशस्वी राबविले. ग्रामीण भागात वैद्यकीय सुविधा उपलब्ध झाल्या असल्या तरी वैद्यकीय सेवा व औषधांचे वाढलेले दर यामुळे सामान्य, कष्टकरी घरातील कर्ता माणूस आजारी पडला तर त्याच्या उपचारासाठी त्याच्या कुटुंबियांना कर्ज काढावे लागते. नाहीतर मोडकातोडका संसार विकून उपचाराचा खर्च भागवावा लागतो. हे वैद्यकीय सेवेबाबतचे वास्तव हेरून फौंडेशनचे अध्यक्ष उद्योगपती नरेश राऊत व सचिव प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी केलवडमध्ये गेल्या एक वर्षापासून नाममात्र शुल्कावर ओ.पी.डी.सुरू केली आहे. ज्येष्ठ डॉ.राजकुमार दुशिंग वर्षभरापासून रुग्णांना तपासत आहेत. अवघ्या ३० रुपये शुल्कात तपासणी, इंजेक्शन व औषधे फौंडेशनकडून रुग्णांना दिली जातात. या वैद्यकीय सेवेचा लाभ केलवड लगतच्या दुष्काळी पट्ट्यातील खडके वाके, आरडगाव, तळेगाव आदींसह अनेक गावातून येणाऱ्या रुग्णांनी घेतला आहे. ज्या रुग्णांना गरजेनुसार शस्त्रक्रिया किंवा पुढील उपचारासाठी गरजेनुसार फौंडेशन आर्थिक मदतही उपलब्ध करून देते. फौंडेशनच्या वतीने औरंगाबाद जिल्ह्यातील जाटवाडा येथे लम्बाण समाजासाठी मोफत नेत्रतपासणी शिबीरही आयोजित करण्यात आले होते. उपचाराअभावी गोरगरीब, निराधार व कष्टकऱ्यांची अडवणूक होवू नये. त्यांना वेळेवर उपचार मिळावा या उद्देशाने फौंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांच्या दूरदृष्टीतून आम्ही ही ओ.पी.डी. चालवित आहोत,असे प्रतिष्ठानचे सचिव प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी सांगितले.

### लवकरच नांदुर्खीलाही ओपीडी

केलवड मधील फौंडेशनच्या ओ.पी.डी.ला रुग्णांचा मिळालेला उत्स्फुर्त प्रतिसाद बघता ग्रामीण भागातील रुग्णांच्या सोयीसाठी फौंडेशनच्या माध्यमातून ५ एप्रिल पासून नांदुर्खी येथेही ओ.पी.डी.सुरु करण्यात येणार आहे. त्याचा रुग्णांना लाभ घ्यावा असे आवाहन प्रा.गोर्डे यांनी केले आहे.



अमृतमहोत्सवी

# पुढारी

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

www.pudhari.com

२१ मार्च २०१८



राहाता : नरेश फाउंडेशनच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात क्लासेस सुरू झाले आहेत.

# विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात सीईटी क्लासेस

राहाता : प्रतिनिधी

तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फौंडिशन यांनी विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात सीईटी क्लासेस सुरु केले आहेत. याचा फायदा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन नरेश राऊत फौंडिशनचे सचिव प्रा. लक्ष्मणराव गोर्डे यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी व क्लासेससाठी बाहेरगावी जावे लागते. त्यामुळे विशेषतः विद्यार्थीनींना या क्लासेसपासून वंचित रहावे लागते. तसेच या क्लासेससाठी विद्यार्थ्यांना दुसऱ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पैसे द्यावे लागतात. या सर्व गोष्टींचा विचार करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण जवळच उपलब्ध व्हावे, यासाठी नरेश राऊत फौंडिशनने हा उपक्रम प्रथमच सुरु केला आहे. पहिल्याच दिवशी या क्लाससाठी २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. अल्पदरात शिक्षण व क्लासेस घेणारे हे एकमेव फौंडिशन आहे. नरेश फौंडिशनने क्लास बरोबरच- इंग्रजी व मराठी विषयाची टायपिंग क्लासेस, टॅली कोर्सेस, तसेच महिलांसाठी सॅनेटरी नॅपकिन प्रकल्प, ब्युटी पार्लर कोर्सेस, केलवड व जळगांव येथे मोफत संगणक प्रशिक्षण आदी कोर्सेस विद्यार्थ्यांसाठी विनामोबदला सुरु केले आहे. दुष्काळादरम्यान या फौंडिशनने केलवड व जळगाव या गावांना मोफत पिण्याच्या पाण्याचे टँकर उपलब्ध करुन दिले. जलक्रांती अभियान राबवुन पाण्याची समस्या दुर करण्यासाठी मोठी मदत केली आहे. अशा अनेक प्रकारच्या विविध योजना या फौंडिशनने राबविल्या आहेत.

## विविध योजनांचा लाभ घ्यावा: प्रा. गोर्डे

नरेश राऊत फाउंडेशनमार्फत राबविल्या जाणाऱ्या शिक्षण विषयाच्या विविध योजनांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जवळच शिक्षण उपलब्ध व्हावे, अशी संकल्पना उद्योजक नरेश राऊत यांची आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रकारच्या योजना राबविल्या जातात.

प्रा. लक्ष्मणराव गोर्डे, सचिव, नरेश राऊत फाउंडेशन

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
बुधवार, १३ डिसेंबर २०१७

# नरेश राऊत फाउंडेशनचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## सराला बेटाला आदर्श आध्यात्मिक संस्था, सौ. शालिनीताई विखे यांना समाजभूषण तर कृष्णप्रकाश यांना आदर्श पोलीस अधिकारी पुरस्कार

अस्तगाव (वार्ताहर) - राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने दिले जाणारे पुरस्कार जाहीर झाले असून महंत रामगिरी महाराज अध्यक्ष असलेल्या सरला बेटाला आदर्श आध्यात्मिक संस्था पुरस्कार, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे यांना समाजरत्न, तर मुंबईचे विशेष पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश यांना आदर्श पोलीस अधिकारी हा पुरस्कार जाहीर झाला आहे. ही माहिती नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

रविवार दि.२४ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता या पुरस्काराचे वितरण केलवड येथे होणार आहे. महंत रामगिरी महाराज, उद्योजक श्री. मंडलेचा, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे, उद्योजक व फाउंडेशनचे अध्यक्ष, उद्योगपती नरेश राउत, दैनिक सार्वमतचे कार्यकारी संपादक अनंत पाटील आदींच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार असून या सोहळ्यासाठी मुंबईचे विशेष पोलिस महानिरीक्षक कृष्णप्रकाश, राहाता बाजार समितीचे सभापती बापूसाहेब आहेर, पंचायत


महंत रामगिरी महाराज, सौ. शालिनीताई विखे, विशेष पो.महानिरीक्षक कृष्णप्रकाश

समितीच्या सभापती सौ. हिराबाई कातोरे, पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम, प्राचार्य डॉ. बी. के. सलालकर, तहसीलदार माणिकराव आहेर, प्राचार्य राजेंद्र बर्डे, कामगार पोलीस पाटील संघटनेचे माजी अध्यक्ष सुभाष गमे, गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे आदी उपस्थित राहणार आहे.

या सोहळ्यात विविध क्षेत्रातील एकूण २२ जणांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. पुरस्कार- आदर्श आध्यात्मिक संस्था म्हणून सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी गौरविण्यात येणार आहे. समाजरत्न पुरस्काराने जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. शालिनीताई विखें यांना गौरविण्यात येणार आहे.

आदर्श पोलीस अधिकारी म्हणून मुंबईचे पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश यांना, उद्योगरत्न पुरस्कार नाशिक चे उद्योजक मंडलेचा यांना, आदर्श कृषी उत्पन्न बाजार समिती राहाता साठी सभापती बापुसाहेब आहेर यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. अभ्यासू पत्रकारीतेसाठी राहाता येथील जेष्ठ पत्रकार सतीश वैजापूरकर, आदर्श लेखापाल हा पुरस्कार गणेश तोरमल यांना, आदर्श उपक्रमशील मुख्याध्यापक म्हणून रयत च्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील विद्यालयाचे मुख्याध्यापक जी. टी. गमे यांना, आदर्श सामाजिक कार्य हा पुरस्कार शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास कोते यांना, समाजभूषण पुरस्कार विजय कोते यांना, आदर्श वैद्यकीय सेवा हा पुरस्कार श्रीरामपूरचे डॉ. रविंद्र कुटे व राहाता येथील सामाजिक क्षेत्रातील कार्य करणारे व वैद्यकीय क्षेत्रातील डॉ. बापुसाहेब पानगव्हाणे यांना, आदर्श शैक्षणिक संकूलाचा पुरस्कार अस्तगाव येथील रयत च्या न्यू इंग्लिश स्कूलचे मुख्याध्यापक सर्जेराव मते यांना, आदर्श शैक्षणिक संस्था हा पुरस्कार कोऱ्हाळे येथील गणेश शैक्षणिक संकूलाचे प्रमुख प्रा. विजय शेटे यांना, स्त्री अस्मिता हा पुरस्कार प्रसिध्द शिवचरित्राच्या व्याख्यात्या सौ. अनिता उत्तम नळे यांना, आदर्श शैक्षणिक संकूलाचा पुरस्कार औरंगबादच्या जटवाडा येथील सौ. रुपाली बिक्रम राठोड यांना, आदर्श सामजिक संस्थेसाठी संतोष पवार, आदर्श संघटनेसाठी केलवड चे विशाल वाघे यांना, आदर्श सामाजिक कार्य हा पुरस्कार प्रसन्न प्रकाश धुमाळ यांना, उत्कृष्ट जलसंधारक म्हणून जळगावचे गंगाधर चौधरी यांना सन्मानित करण्यात येणार आहे. केलवड येथील प्राथमिक शाळेला आदर्श जिल्हा परिषद शाळा पुरस्कार, तर समाज भूषण पुरस्कार सुनिता तांबे यांना देण्यात येणार आहे.

नवी आशा नवी दिशा

# सार्वमत

। अंक ३३५ । वर्ष ४२ वे । सोमवार, २५ डिसेंबर २०१७ । पाने १६

# लोकांच्या सेवेपेक्षा कोणताही मोठा धर्म नाही : कृष्णप्रकाश

## नरेश राऊत फौंडेशनचे पुरस्कार वितरण, फौंडेशनचे काम चांगले : महंत रामगिरी महाराज



केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेच्यावतीने जि.प. अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे यांना समाजरत्न पुरस्कार देतांना महंत रामगिरी महाराज, विशेष पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश, कैलास कोते, सार्वमतचे कार्यकारी संपादक अनंत पाटील, पं.स. सभापती हिराबाई कातोरे, विजय कोते, समर्थ शेवाळे.

### यांना मिळाले पुरस्कार

आदर्श अध्यात्मिक संस्था- महंत रामगिरी महाराज, समाजरत्न- सौ. शालिनीताई विखे, आदर्श पोलिस अधिकारी - कृष्णप्रकाश, उद्योगरत्न- संतोष मंडलेचा, आदर्श कृषी उत्पन्न बाजार समिती- बापुसाहेब आहेर, अभ्यासु पत्रकार- सतीश वैजापुरकर, आदर्श लेखापाल- गणेश तोरमल, आदर्श उपक्रमशिल मुख्याध्यापक- प्राचार्य जी. टी. गमे, आदर्श सामाजिक कार्य- कैलास बापु कोते, समाजभुषण- विजय कोते, आदर्श वैद्यकिय सेवा डॉ. बापुसाहेब पानगव्हाणे, आदर्श शैक्षणिक संकूल अस्तगाव- प्राचार्य सर्जेराव मते, आदर्श शैक्षणिक संस्था- प्राचार्य विजय शेटे, स्त्री अस्मिता- सौ. अनिता नळे, आदर्श शैक्षणिक संकूल- सौ. रुपाली विक्रम राठोड, आदर्श सामाजिक संस्था- संतोष पवार, आदर्श संघटना- विशाल वाघे, आदर्श सामाजिक कार्यकर्ता- प्रसन्न धुमाळ, उत्कृष्ट जलसंधारण- गंगाधर चौधरी, आदर्श जिप शाळा केलवड, समाजभुषण- सौ. सुनिता तांबे अदिंनी गौरविण्यात आले.

अस्तगाव (वार्ताहर) - स्वार्थासाठी नव्हे तर मानवी कल्याण, समाज व राष्ट्रसेवेसाठी झटतात तीच माणसं खऱ्या अर्थाने जीवन जगतात लोकांच्या सेवेपेक्षा कोणताही मोठा धर्म नाही. अशाच प्रकारे जनसेवेचे निःस्वार्थी कार्य करणाऱ्या विविध क्षेत्रातील सेवकांचा नरेश राऊत फाऊंडेशनने केलेला गुणगौरव समाज सेवेसाठी अधिक प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन मुंबईचे विशेष पोलीस महानिरीक्षक कृष्णप्रकाश यांनी केले

राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने विविध पुरस्काराचे वितरण सोहळा तसेच विद्यार्थिनी वसतिगृह आणि सॅनेटरी नॅपकिन प्रोजेक्ट बांधकामाचा पायाभरणी समारंभ महंत रामगिरी महाराज, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा शालिनीताई विखे, उद्योजक नरेश राऊत व सार्वमतचे कार्यकारी संपादक अनंत पाटील यांच्या हस्ते झाला. आदर्श पोलीस अधिकारी म्हणून त्यांना गौरविण्यात आले. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना कृष्णप्रकाश बोलत होते. यावेळी उद्योजक मंडलेचा, फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा मीनाताई राऊत, सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, बाजार समितीचे सभापती बापूसाहेब आहेर, उपसभापती वाल्मिक गोर्डे, पंचायत समितीच्या सभापती हिराबाई कातोरे, गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, कामगार पोलीस पाटील संघटनेचे सुभाषराव गमे, प्राचार्य डॉ. बी. के. सलालकर, प्राचार्य राजेंद्र बर्डे यांच्यासह तालुक्यातील कार्यकर्ते, केलवड ग्रामस्थ उपस्थित होते.

कृष्णप्रकाश म्हणाले, ज्या क्षेत्रात काम करता, त्या क्षेत्रात निष्ठेने काम केले तरच आपण परमेश्वरापर्यंत जातो.

**घरातला पुरस्कार : सौ. विखे**

जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे म्हणाल्या, आपण बरेच पुरस्कार घेतले, पण हा घरातला पुरस्कार आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यात काम करण्याची संधी मिळाली. महिलांसाठी बचतगटांच्या माध्यमातून जिल्हाभर काम केले. ना. राधाकृष्ण विखे पाटील, सुजय विखे पाटील यांनी या भागात चांगले काम केले.

**पुरस्कार उर्जा देतात : पाटील**

'सार्वमत'चे कार्यकारी संपादक अनंत पाटील म्हणाले, पुरस्कार ही प्रेरणा, ऊर्जा देतात. पुरस्कार निमित्त असले तरी ते समाजात चांगुलपणा पेरण्याचे काम करतात. पुरस्कार पात्र माणसे शोधून काढणे सोपे नाही, प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी ते काम केले.

आशिर्वादपर भाषणात महंत रामगिरी महाराज म्हणाले, जो सत् कार्य करतो त्याचा समाज सत्कार करतो. अज्ञानाला सज्ञान करा, धनाचा सदुपयोग करा, जे परमेश्वराने आपल्याला दिले त्याचा चांगला उपयोग करा.

याप्रसंगी उद्योजक नरेश राऊत, संतोष मंडलेचा, रुपाली राठोड यांची भाषणे झाली.

प्रास्तविकात सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, फाऊंडेशनने हे उद्योजक नरेश राऊत यांच्या आर्थिक योगदानातून काम करते. आम्ही सामाजिक काम करतो, इतरांनीही करावे, यासाठी प्रोत्सहान म्हणून हे पुरस्कार देत आहोत असेही गोर्डे म्हणाले.

सूत्रसंचालन प्रसन्न धुमाळ यांनी केले तर आभार सुभाषराव गमे यांनी मानले.

यावेळी प्रा. सुनिल गमे, अशोकराव नळे, पोलीस निरीक्षक देविदास पवार, बाबासाहेब गमे, शिवाजी गमे, सुनिल गायकवाड, विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर वाकचौरे, सार्वमतचे उपसंपादक नानासाहेब शेळके, अस्तगावकर सराफचे अशोकराव बोऱ्हाडे, संपतराव चौधरी, गंगाधर चौधरी, माजी सभापती निवास त्रिभुवन, कैलास जेजुरकर, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष दशरथ गव्हाणे, शिर्डीचे काँग्रेसचे गटनेते अशोकराव गोंदकर, भाउसाहेब कातोरे, बाळासाहेब जपे, विजय अंभोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

www.esakal.com
सकाळ
• अग्रलेख : पेटलेल्या पाण्याचे राजकारण • पहाटपावलं : यशाची गुरुकिल्ली

# डांगे, घंगाळे व गुंजाळ राहात्याचे वैभव

## खासदार सदाशिव लोखंडे; प्रेस क्लब व नरेश राऊत फाउंडेशनतर्फे गौरव

राहाता, ता. १० : "'डांगे पॅटर्न'च्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण करणारे प्राचार्य इंद्रभान डांगे, सरकारी सेवेत एक लाखावर कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करणारे डॉ. पी. जी. गुंजाळ व केवळ दोन रुपये फी घेऊन रुग्णसेवा करणारे डॉ. महादेव घंगाळे राहात्याचे वैभव आहेत. त्यांचा सत्कार करण्याची संधी मिळणे, हे मी भाग्य समजतो," असे प्रतिपादन खासदार सदाशिव लोखंडे यांनी केले.

राहाता प्रेस क्लब व नरेश राऊत फाउंडेशनतर्फे आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे होते. प्राचार्य इंद्रभान डांगे, डॉ. पी. जी. गुंजाळ व डॉ. महादेव घंगाळे यांना प्रेस क्लबतर्फे लोखंडे यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



राहाता : प्रेस क्लबतर्फे आयोजित कार्यक्रमात खासदार सदाशिव लोखंडे यांच्या हस्ते मानपत्र देऊन प्राचार्य इंद्रभान डांगे, डॉ. महादेव घंगाळे व डॉ. पी. जी. गुंजाळ यांचा सत्कार करण्यात आला. समवेत प्रा. लक्ष्मण गोर्डे व प्रेस क्लबचे अध्यक्ष रामकृष्ण लोंढे.

प्राचार्य डांगे म्हणाले, "केवळ अडीच खड्डू आणि फळा, एवढ्या भांडवलावर सुरू केलेल्या साध्वी प्रीतिसुधाजी शाळेचे रूपांतर आज १५ एकरांवर विस्तारलेल्या अद्ययावत शैक्षणिक संकुलात झाले आहे. 'डांगे पॅटर्न'पासून प्रेरणा घेऊन २५ शाळा सुरू झाल्या. माझा संघर्ष यशस्वी झाला. या सत्काराने त्यावर शिक्कामोर्तब झाले."

डॉ. गुंजाळ म्हणाले, "सरकारी सेवेत असताना रात्रंदिवस झपाटल्यासारखे काम केले. त्यात पत्नीची मोलाची साथ लाभली. राहातेकरांनी नेहमीच मला पाठबळ दिले." डॉ. घंगाळे यांचेही भाषण झाले. प्रेस क्लबचे उपाध्यक्ष दिलीप खरात यांनी स्वागत केले. पत्रकार राजेंद्र भुजबळ, महेंद्र जेजूरकर व सुहास वैद्य यांनी मानपत्राचे वाचन केले. या वेळी प्रा. लक्ष्मण गोर्डे व संदीप दंडवते यांचीही भाषणे झाली. पत्रकार सीताराम चांडे यांनी आभार मानले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ७० । वर्ष ४३ वे । शनिवार, ३१ मार्च २०१८ । पाने १६

# केलवड शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात

## स्नेहसंमेलने विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची : प्रा. गोर्डे



केलवड येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाप्रसंगी प्रा. लक्ष्मण गोर्डे, काळू रजपूत, गोरक्षनाथ वाघे, सरपंच सौ. घोरपडे, गटशिक्षणाधिकारी श्रीमती शिवगुंडे आदी.

अस्तगाव (वार्ताहर) - वार्षिक स्नेहसंमेलने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची आहेत, असे प्रतिपादन नरेश राउत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी केले.

राहाता तालुक्यातील केलवड येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्सहात पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समितीचे सदस्य काळू रजपूत व नरेश राउत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्या गटशिक्षणाधिकारी श्रीमती मीना शिवगुंडे, शिक्षण विस्तार अधिकारी डी. के. राऊत, पोलीस पाटील संघटनेचे ताल[illegible]क्ष सुभाषराव गमे, सरपंच सौ. उष[illegible] घोरपडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भागवतराव गमे, सौ. बेबीताई राऊत अदी उपस्थित होते.

यावेळी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी स्नेहसंमेलने ही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी महत्वाची आहेत. सुप्त गुणांचा विकास साधण्याचे काम या माध्यमातून होते. ग्रामीण भागातील शाळांचे विद्यार्थ्यांसाठी चांगले योगदान असल्याचे ते म्हणाले. यावेळी गटशिक्षणाधिकारी श्रीमती मिना शिवगुंडे यांचेही भाषण झाले. कार्यक्रमाचे प्रास्तविक मुख्याध्यापक अशोक आहेर यांनी केले.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध कलाकृती सादर करत उपस्थितांची मने जिंकली. नरेश राउत फाउंडशनच्या माध्यमातून प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी मंडप, साउंड सिस्टीमची सोय केली होती. तर सुरेशराव गमे यांचे तर्फे बैठक व्यवस्था, स्टेजची व्यवस्था संजय गोडगे, तर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था अनिल गुंजाळ यांनी केली होती. याप्रसंगी सर्जेराव घोडके, शांताराम शेळके, बाबासाहेब गमे, गोरक्षनाथ वाघे, रमेश घोरपडे, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आलका सापते, रेश्मा पवार, विष्णू होन, इम्नाती शेळके, सय्यद [illegible]न्सूर, कैलास मुरादे, परसराम बोडखे, अदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन बाळासाहेब गमे, नंदकिशोर भांड यांनी केले. कैलास ससाणे यांनी आभार मानले.

महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १२+४+१६ = ३२, किंमत : ₹ ४.००
अहमदनगर, सोमवार, दि. १७ ऑगस्ट २०१५

## सामाजिक कार्याचा आधारवड

# श्री नरेश राऊत फौंडेशन

-यमन पुलाटे

सर्वसामान्य जनतेला आधार देण्यासाठी अनेक सेवाभावी संस्था काम करतात. यातून गावाबरोबर गोरगरीब जनतेला आधार मिळत असतो. राहाता तालुक्यातील श्री नरेश राऊत फौंडेशनचे सामाजिक कार्य अनेकांना आधार देणारे असे ठरल्यामुळे तालुक्यातील अनेक गावामध्ये वाचनालय, दत्तक ग्राम योजना, शैक्षणिक, वैद्यकीय, धार्मिक महिला जागृती आदी सेवाभावी कार्यामुळे समाजाला मोठा आधार मिळाला आहे.

केलवड (ता.राहाता) येथे मुंबईचे उद्योगपती नरेश राऊत यांनी स्थापन केलेल्या श्री नरेश राऊत फौंडेशनच्या माध्यमातून संस्थेचे सचिव प्रा.लक्ष्मण गोर्डे सर यांनी समाजसेवेचे व्रत स्वीकारुन अनेकांना मदतीचा हात दिला. या फौंडेशनच्या माध्यमातून विविध उपक्रमातून अनेकांना आधार तर अनेकांना आशेचा किरण लाभला.

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन- वाचाल तर वाचाल अशी एक म्हण आहे. वाचनामुळे प्रत्येकाला नवनवीन माहिती मिळते म्हणून नरेश फौंडेशनच्या वतीने राहाता, केलवड, जळगाव शारदा शैक्षणिक संकुल, राहाता पोलीस स्टेशन अशा अनेक ठिकाणी मोफत वाचनालय सुरु आहेत.

दत्तक ग्राम उपक्रम- जळगाव येथील दत्तक ग्राम उपक्रम अनेक गावांना नवी दिशा देणारे ठरत आहे. संस्थेचे संस्थापक नरेश राऊत यांच्या संकल्पनेतून जळगाव येथे कृषी, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामीण विकासासाठी नियोजनबद्ध उपक्रम सुरु आहे. येथील नाना-नानी पार्क तर अनेक वृद्धांना आधारवडच ठरले आहे. शैक्षणिक कार्य- शैक्षणिक कार्यात देखील नरेश फौंडेशनचे काम शिक्षण क्षेत्राला चालना देणारे आहे. केलवड येथील ज्ञानेश्वर विद्यालय, जिल्हा परिषद शाळा राहाता येथे एलसीडी प्रोजेक्टर, परिसरातील अंगणवाड्यांना माध्यान्ह भोजनासाठी जेवणाची ताटे, सात्रळ, पुणतांबा, प्रवरानगर येथील शाळांना देणग्या देण्याबरोबरच संस्थेच्या वतीने ५ ते १० वी पर्यंतच्या मुलांना मोफत गणित, विज्ञान, इंग्रजीचे जादा तास घेतले जातात. मोफत संगणक सीईटी आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळावे, विविध परीक्षा, रोजगार त्याचबरोबर सीईटी आणि स्पर्धा परीक्षेची माहिती मिळविण्यासाठी दरवर्षी या विषयावर विशेष मार्गदर्शन शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण मुलांना मोफत प्रशिक्षण देण्यासाठी सुसज्ज संगणक प्रयोगशाळा यासाठी उभी करण्यात आली आहे.

महिला जागृती- महिला बचत गट, महिलांच्या विविध समस्या, कुटुंब सल्ला मार्गदर्शन यासह महिलांसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षणाचे आयोजन करुन त्यांना सक्षमपणे उभे करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

वैद्यकीय उपक्रम- प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रवरा मेडिकल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या वतीने मोफत सर्वरोग निदान शिबिर, आरोग्य शिक्षण, ग्रामस्वच्छता याबरोबर गरजूंना आरोग्यासाठी नरेश राऊत फौंडेशन नेहमीच मदत करत असते.

# श्री. नरेश राऊत फाऊंडेशन सामाजिक कार्याचा अविरत वसा

संस्थेचे सचिव यांनी श्री. नरेशजी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने केलवड हे गाव दत्तक घेऊन या विविध सामाजिक उपक्रम राबविले. यामध्ये प्रामुख्याने गावासाठी पाणी टंचाई काळामध्ये पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरु केला. गेल्या दोन वर्षापासून दरवर्षी पाणी टंचाईला मात करण्यासाठी टंचाई काळात या संस्थेमार्फत गावासाठी पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरु केला जातो. शाळेतील विद्यार्थ्यांसाठीही या टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जाते. गरीबांना मदत, जळीतांसाठी मदत, मुलींच्या विवाहासाठी मदत यासारखे उपक्रम या गावामध्ये संस्थेच्या माध्यमातून राबविले जातात. गावातील ग्रामसेवक व तलाठी यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना रोख स्वरुपात पुरस्कार संस्थेने दिले आहे. तसेच गटविकास अधिकारी, पं.स. राहाता व तहसीलदार राहाता यांना रोख पुरस्काराने संस्थेने सन्मानित केले आहे.

## दत्तक ग्राम जळगाव

तालुक्यातील मौजे जळगाव, येथील ग्रामपंचायतीच्या व लोक आग्रहास्तव संस्थेने जळगाव दत्तक गाव घेतले आहे. या गावातही विविध विकासाच्या योजना राबविल्या जातात. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक बोलावून येथील शेतकरी वर्गाला आधुनिक शेती बद्दल मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे येथील शेती व्यवसायाला गती मिळाली आहे. जळगाव येथे महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र वाचनालय सुरु करण्यात आलेले आहेत. शिवाय नाना-नानी पार्कही जळगावमध्ये संस्थेच्या मदतीने खुले झाले आहे.

## शैक्षणिक

केलवड येथील श्री ज्ञानेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी जेवणाची ताटे या संस्थेचे पुरविली आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शालेय इमारत, प्रयोगशाळा साहित्य व इतरही शैषणिक उपक्रमांसाठी या संस्थेने भरीव सहाय्य दिले आहे. केलवड येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बोअरवेल, मोटार त्याचप्रमाणे त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी या दृष्टीने रोख बक्षिस योजना सुरु केली. दरवर्षी स्वांत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी केलवड येथील प्राथमिक व माध्यमिक शाळा व सर्व अंगणवाडीतील त्याचप्रमाणे पंचक्रोशीतील अनेक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले जाते.

जि.प. शाळा राहाता यांना एलसीडी प्रोजेक्टर, मुजमुले वस्ती शाळा, खडकेवाडे यांचेसाठी बोअरवेल या संस्थेने पुरविला आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर व्हावी तसेच त्यांचा औद्योगीकतेकडे कल वाढावा या दृष्टीने तज्ज्ञांची व्याख्याने संस्थेच्या माध्यमातून आयोजित केली जातात. राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुल येथील वद्यिार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी ताटे तसेच न्यू इंग्लिश स्कूल सात्रळ, पुणतांबा येथील शाळानना उपक्रमांसाठी देणग्या दिल्या. या शैक्षणिक मदतीतून शाळेच्या अडचणी दूर झाल्या.

रयत शिक्षण संस्थेच्या सात्रळ येथील वसतिगृहाला संस्थेच्या माध्यमातून दर महिन्याला मदत केली जाते. संस्थेच्या माध्यमातून गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली जाते.

## मोफत संगणक प्रशिक्षण केंद्र

खेड्यातील मुला-मुलींना संगणक प्रशिक्षण घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असे, विद्यार्थ्यांची गरज ओळखून संस्थेच्या माध्यमातून केलवड येथे मोफत संगणक प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. अद्ययावत इमारतीसह अनेक अद्ययावत सुविधा या संगणक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिल्या आहेत. या प्रशिक्षण केंद्रामध्ये एम.एस.सी.आय.टी. व सी.सी.सी. या शासनमान्य कोर्सचे प्रशिक्षण दिले जाते.



मा. नरेश राऊत



मा. लक्ष्मण गोर्डे

**यमन पुलाटे**

## मोफत क्लासेस

संस्थेच्या माध्यमातून इ. ५ वी, ६ वी, ९ वी, व इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी गणित, भूमिती, इंग्रजी व विज्ञान या विषयांसाठी मोफत क्लासेस घेतले जातात. या क्लासेससाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे.

## मोफत वाचनालय

संस्थेच्या माध्यमातून केलवड, जळगाव, ता.रहाता, शारदा शैक्षणिक संकुल राहाता, पोलीस स्टेशन राहाता, माध्यमिक विद्यालय सात्रळ या ठिकाणी मोफत वाचनालय सुरु आहेत.

## वैद्यकीय

संस्थेच्या माध्यमातून मोफत मोतीबिंदू चिकित्सा शिबिर घेऊन त्याचा गावातील अनेक रुग्णांना लाभ मिळाला आहे. गावातील व पंचक्रोशीतील विविध गरजू लोकांना विविध आजारांवर उपचारासाठी संस्थेच्या माध्यमातून मदत दिली जाते.

## धार्मिक कार्य

धार्मिक विकासासाठी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत केली जाते. केलवड येथील मारुती मंदिर, राहता येथील विरभद्र मंदिर, पिंपळस येथील महालक्ष्मी मंदिर, सरला बेट येथील समाधी मंदिर यांच्या बांधकामासाठी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक तसेच मस्जिद बांधकामासाठी संस्थेने हातभार लावला आहे. केलवड येथील गणपती मंदिरास संस्थेने मदत केली आहे. गावातील पायी दिंडी सोहळा तसेच भजनी मंडळासाठी मानधन यासारख्या योजना संस्थेच्या माध्यमातून सुरु आहेत.

## सामाजिक कार्याचे विकत वेड घेतलेली माणसे।

प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी संस्थेच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले आहे. सामाजिक कार्य करता करता त्यांचा प्रवाह वाढला आहे. सामाजिक कार्यात विकत वेड घेतलेली माणसे या संस्थेच्या माध्यमातून दिसून येतात. उद्योजक श्री.नरेशजी राऊत व प्रा.लक्ष्मण गोर्डे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलेले आहे.

### श्री.नरेश राऊत फाऊंडेशन केलवड, ता.राहाता, जि.अ.नगर या सेवाभावी संस्थेने दिलेले पुरस्कार. पुरस्कारार्थींचे नाव

१) मा.महंत श्री.रामगिरीजी महाराज - अध्यात्म रत्न
२) मा.डॉ.सुजयदादा विखे साहेब- समाजभूषण
३) मा.उद्योगपती श्री.राम भोगले - उद्योगरत्न
४) ग्रामपंचायत जळगाव - आदर्श ग्रामपंचायत
५) शारदा शैक्षणिक संकुल - आदर्श शैक्षणिक संकूल
६) श्रद्धा प्रतिष्ठान दाढ - आदर्श सामाजिक संस्था.

१. महाराष्ट्र शासन- टॅलेंट सर्च उपक्रम, शिक्षण विभाग, संपूर्ण राहाता तालुका. २. दत्तक गावे - जळगाव व केलवड (सर्व योजनांसाठी मोफत) ३. श्री.नरेश राऊत फाऊंडेशन संचलित निवासी मुलींचे वसतिगृह सात्रळ हायस्कूल (मोफत वसतिगृह) ४. श्री.नरेश राऊत फाऊंडेशन मोफत वाचनालय १) राहाता शारदा विद्या मंदिर, २) केलवड, ता.राहाता, ३) जळगाव, ता.राहाता, ४) सात्रळ हायस्कूल. ५. मोफत पाणी पुरवठा केलवड. (फक्त टंचाई काळात - केलवड व पिंप्री लोकाई) ६. मोफत एमएस-सीआयटी (एमकेसीएल) प्रशिक्षण केंलवड. १) संगणक १६, २) अद्ययावत इमारत. ७. मोफत सी.सी.सी. चे अद्ययावत केंद्र (केंद्र शासन मान्यताप्राप्त) ८. वैद्यकीय मदत (फक्त गरजूंसाठी) ९. शैषणिक मदत (फक्त गरजूंसाठी) १०. धार्मिक व धर्मादाय मदत (सरला बेट, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर. ११. मोफत महिला संगणक प्रशिक्षण केंद्र. १२. सांस्कृतिक मदत. (भजनी मंडळ केलवड) १३. जळीत, विवाह व इतर कार्ये. १४. नियोजिंत उपक्रम : मोफत महिला कुटीर उद्योग केंद्र केलवड (पुर्तता सुरु) १५. नियोजित उपक्रम : आश्रमशाळा. (प्रस्ताव सादर) १६. नियोजित उपक्रम : कॅन्सर निर्मूलन प्रकल्प. १७. १२ वी (जेईटी ॲण्ड सीईटी) मोफत क्लासेस सुरु.

# બ્રહ્માંડમાં જીવનની શોધ

વિજ્ઞાન જગત
ડૉ. જે. જે. રાવલ



પ્રાચીન સમયમાં લોકો માનતા કે પૃથ્વી વિશ્વના કેન્દ્રમાં છે અને પૂરું વિશ્વ તેની ફરતે ફરે છે. પૃથ્વી જ દુનિયા અને તેની ઉપર તારા ભરેલો ગુંબજ. લોકો માનતાં કે મહાન પુરુષ મૃત્યુ પામે છે ત્યારે ઈશ્વર તેને તારાના રૂપમાં રાત્રિ આકાશમાં સ્થાન આપે છે. સૂર્ય, ચંદ્ર અને ગ્રહો બુધ, શુક્ર, મંગળ, ગુરુ અને શનિ દેવતા છે. ત્યારે શનિ સુધીના ગ્રહો જ જાણીતા હતા.

પછી ખબર પડી કે પૃથ્વી પોતાની ધરી પર પશ્ચિમથી પૂર્વ તરફ ગોળ ગોળ ઘૂમે છે. માટે આકાશ પૂર્વથી પશ્ચિમ તરફ ગોળ ગોળ ફરતું લાગે છે. હકીકતમાં આકાશના તારા તો સ્થિર છે. લોકો જળ, વાયુ, પૃથ્વી, અગ્નિ અને આકાશને પંચમહાભૂત માનતા. વાયુની જળની અગ્નિની શોધ થયા પછી અગ્નિની પ્રચંડ તાકાત તેમને સમજમાં આવી હતી. આકાશને પણ તેમને પંચમહાભૂતમાંના એક તત્ત્વ તરીકે લીધું તે બહુ મોટી વાત ગણાય. છાંદોગ્ય ઉપનિષદમાં આપણા ઋષિ-મુનિઓએ લખ્યું છે કે અંતરીક્ષમાંથી બધું ઉત્પન્ન થાય છે અને અંતરીક્ષમાં સમાય છે. જળને પ્રાચીન ઋષિઓ દેવતા માનતા, કારણકે જળથી જ જીવન શક્ય છે. અગ્નિની અગત્ય તેમને સમજાઈ હતી માટે અગ્નિને પણ તેઓ દેવતા માનતા હતા. વાયુને પણ દેવતા માનતા હતા.

તેઓ પૃથ્વી પરની બધી જ વસ્તુ, પશુ-પંખી, પ્રાણી, વનસ્પતિને એક કુટુંબ જ માનતા. તેઓએ માટે જ સૂત્ર આપેલું કે વસુધૈવ કુટુંબકમ્ અર્થાત્ વસુધા એ જ કુટુંબ. પૂરી વસુધા એક કુટુંબ છે.

અઢી હજાર વર્ષ પહેલાં પ્રાચીન વિદ્વાનોને ખબર પડી કે પૃથ્વીની ધરી ઝૂકેલી છે અને તે ૨૩.૫ અંશે ઝૂકેલી છે અને એક તારો હંમેશાં સ્થિર રહે છે. તેને ધ્રુવ નામ આપ્યું.

છેક ઈસુની સોળમી સદીમાં કોપરનિકસે કહ્યું કે પૃથ્વી વિશ્વના કેન્દ્રમાં નથી પણ સૂર્ય વિશ્વના કેન્દ્રમાં છે. તે સમયે લોકો આપણી આકાશપિંડોને તેમની બધી જ અદ્‌ભુતતામાં જોયાં અને તેને માલૂમ પડ્યું છે કે એ બધાં જ આપણી પૃથ્વી જેવી દુનિયા છે. દૂરબીને ખગોળશાસ્ત્ર એક નવો યુગ શરૂ કર્યો. આકાશીપિંડોને આપણે તેમનાં સાચારૂપમાં સમજતા થયા.

તારાના અભ્યાસે દર્શાવ્યું કે આકાશગંગાના ૫૦૦ અબજ તારામાં પચાસ ટકા તારા તો આપણા સૂર્ય જેવા જ છે. જો સૂર્યને ગ્રહમાળા હોય અને પૃથ્વી જેવો જીવનસભર ગ્રહ હોય તો આ બધા તારાને પણ ગ્રહમાળા હોવી જોઈએ અને તેની ફરતે પૃથ્વી જેવો જીવનસભર ગ્રહ પરિક્રમા કરતો હોવો જોઈએ. આમ બ્રહ્માંડમાં આપણી આકાશગંગાની જગ્યાએ જીવન હોવું જોઈએ તેવી માન્યતા દૃઢ બનતી ચાલી.

ગેલિલિયોએ દૂરબીન બનાવ્યું અને બ્રહ્માંડને આપણી નજીક લાવી દીધું. આપણને ખબર પડી કે ચંદ્ર, મંગળ વગેરે આકાશીપિંડો આપણી દુનિયા જેવા જ છે. હવે માનવીને ત્યાં જવાની તમન્ના જાગવા લાગી. ચંદ્ર, મંગળ, શુક્રની દુનિયામાં ઊતરવાની તમન્ના જાગી.

કેપ્લરના નિયમોએ આપણને ગ્રહગતિના નિયમો સમજાવ્યાં આ નિયમોનો અભ્યાસ કરતાં ન્યૂટનને લાગ્યું કે એવું એક બળ છે જે ગ્રહોને સૂર્ય ફરતે પરિક્રમા કરવા મજબૂર કરે છે. ન્યૂટને ગતિના નિયમો આપ્યાં અને છેવટે ગુરુત્વાકર્ષણના નિયમો આપ્યાં. હવે આપણને બ્રહ્માંડ સમજવાની ચાવી મળી ગઈ. વિજ્ઞાન હવે કૂદકે અને ભૂસકે આગળ વધતું ગયું.

માનવીને આકાશમાં ઊડવાની ખૂબ જ તમન્ના રહી છે. છેવટે તે વિમાનમાં આકાશમાં ઊડ્યો, પણ વિમાન તો પૃથ્વીની નજીકમાં જ ઊડી શકે. તે ૩,૮૪,૦૦૦ કિલોમીટર દૂર સ્થિત ચંદ્ર પર ન જઈ શકે. તે માટે માનવીએ મોટા મોટા રૉકેટો બનાવ્યાં. ન્યૂટનના નિયમો તો છે કારમાં પેટ્રોલ નાખો તો તે ન્યૂટનના નિયમો વડે ચાલે. પણ પેટ્રોલ નાખવું પડે. ચંદ્ર પર જવા પેટ્રોલ તો ઈંધણ તરીકે ચાલે નહીં. રસાયણશાસ્ત્ર અસ્તિત્વમાં આવ્યું. રસાયણશાસ્ત્રની મદદ વડે માનવી વાયુઓને સમજી શક્યો. તેની જ્વલનશીલતાને સમજી શક્યો. અને તેના ગુણધર્મોને સમજી શક્યો. હાઈડ્રોજન અને ઑક્સિજનના તેણે રૉકેટના ઈંધણ તરીકે વાપર્યું અને રૉકેટને ચંદ્ર સુધી જવા સક્ષમ બનાવ્યાં. ન્યૂટનના નિયમો શોધાયા પછી છેક ૨૭૦ વર્ષ પછી રૉકેટ આકાશમાં ઊડ્યું.

આ તરફ મોટા મોટા દૂરબીનો બનતા ગયા ખગોળવિજ્ઞાનીઓએ ગ્રહો, ચંદ્રો, તારાનો અભ્યાસ કર્યો. આપણે સૂર્યમાળાના આકાશીપિંડોને ઘણા નજીકથી સમજતા થયાં. ૧૯૫૭નાં ઑક્ટોબર મહિનાની ચોથી તારીખે રશિયન વિજ્ઞાનીઓએ અંતરીક્ષમાં પ્રથમવાર સ્પૂટનિક નામનો કૃત્રિમ ઉપગ્રહ છોડ્યો. પછી યુરી ગાગારીનું અંતરીક્ષમાં પૃથ્વીની પરિક્રમા કરી આવ્યો. માનવીને હવે લાગ્યું કે તે બીજા ગ્રહ પર ઊતરી શકશે. ચંદ્ર પર ઊતરી શકશે. ચંદ્ર કેવો હશે તે જાણવાની માનવીને તાલાવેલી લાગી. શું ચંદ્ર પર કોઈ જાતનું જીવન હશે? જોકે, પૃથ્વી પર બેઠાં બેઠાં જ વિજ્ઞાનીઓએ જાણી લીધું હતું કે ચંદ્રને વાતાવરણ નથી. તેથી નીલ આર્મસ્ટ્રૉંગ ઑક્સિજનના નળાકારો લઈને તેના સહકાર્યકર આલ્વીન આલ્ડ્રીન સાથે ચંદ્ર પર ઊતર્યા. તેણે ચંદ્રની અદ્‌ભુત દુનિયા જોઈ. ચંદ્ર પરથી પૃથ્વીને જોઈ. ચંદ્ર ખાલીખમ દુનિયા છે. પછી તેજ થયું કે કદાચ મંગળ પર કોઈક જાતનું જીવન હશે. વિજ્ઞાનીઓ માનતાં કે ચંદ્ર પર નદીઓ છે માટે મંગળનો તાગ કાઢવા બે વાઈકીંગ યાનો મંગળ પર ઊતર્યાં. તેણે દર્શાવ્યું કે મંગળ પર કોઈ જાતનું જીવન નથી.

મંદાકિની આકાશગંગાને જ પૂરું વિશ્વ માનતા અને માનતા કે સૂર્ય તેના કેન્દ્રમાં છે. જ્યારે કોપરનિકસે જાહેર કર્યું કે સૂર્ય વિશ્વના કેન્દ્રમાં છે અને પૃથ્વી સહિતના બધા જ ગ્રહો સૂર્યની પરિક્રમા કરે છે. ત્યારે પ્રશ્ન ઊઠ્યો કે બુધ, શુક્ર, મંગળ ગુરુ, શનિ બધાં જ જો ગ્રહો હોય અને પૃથ્વી પણ ગ્રહ હોય અને પૃથ્વી પર જીવન છે તો આ બધા ગ્રહો પર પણ જીવન હોવું જ જોઈએ. તે આપણાથી ઊંચે આકાશમાં છે. માટે ત્યાં ઉચ્ચ પ્રકારનું જીવન હશે એવી માન્યતા ફેલાણી.

પ્રાચીન વિદ્વાનો માનતા કે આકાશમાં આપણી પૃથ્વી જેવી બીજી ઘણી દુનિયા હોવી જોઈએ. ડેમોક્રાઈટસ નામના ગ્રીક વિદ્વાને કહ્યું કે વિશાળ ખેતરમાં આપણે જુવારના દાણા વાવીએ અને માત્ર એક જ છોડ ઊગે તેવું બને જ નહીં. ખેતરમાં કેટલાય છોડ ઊગે અને ઊગે જ. તેમ પૂરા બ્રહ્માંડમાં માત્ર પૃથ્વી જેવી જ જીવનસભર દુનિયા હોય તેવું બને જ નહીં. બ્રહ્માંડમાં ઠેર ઠેર પૃથ્વી જેવી જીવનસભર દુનિયાઓ હોવી જોઈએ.

પછી ખબર પડી કે સૂર્ય તો એક તારો છે અને બધા તારા સૂર્ય. પછી ખબર પડી કે સૂર્ય આપણી મંદાકિનીનાં કેન્દ્રમાં નથી પણ તે આપણી આકાશગંગા મંદાકિનીનાં કેન્દ્રથી બે તૃતિયાંશ દૂર છે. અને બ્રહ્માંડમાં આપણી મંદાકિની જેવી ૧૦૦ અબજ મંદાકિનીઓ છે. આપણી આકાશગંગા મંદાકિનીમાં ૫૦૦ અબજ તારા છે. ૫૦૦ અબજ સૂર્ય છે. આ બધું સદીઓના ખગોળવિજ્ઞાનીઓના આકાશ નિરીક્ષણથી શક્ય બન્યું. તે પછી પ્રશ્ન થયો કે જો સૂર્ય એક તારો હોય અને તેની ફરતે ગ્રહમાળા હોય તો બીજા તારા પણ સૂર્યો જ છે. તેમની ફરતે પણ ગ્રહમાળા હોવી જોઈએ અને તેમાં ઓછામાં ઓછો એક ગ્રહ પૃથ્વી જેવો હોય જ્યાં જીવનની સંભાવના હોય.

ગેલિલિયોએ પોતાનું દૂરબીન બનાવી અને આકાશ તરફ માંડ્યું તો તેણે ચંદ્ર અને ગ્રહોની સપાટી જોઈ. આ બધાં નજીકના



# જનારાને શ્રદ્ધાંજલિ

સમાજ દર્પણ
મીરા ભટ્ટ



હજુ તો એ પાંખો ફફડાવતો, ભરજોબનમાંથી પસાર થતો થનગનતો યુવાન હતો. એની આંખોમાં એક સપનું અંજાયેલું હતું કે સમસ્ત દુનિયામાં ગુજરાતી ભાષાના સર્વોત્તમને પહોંચાડતા રહેવું. એની 'રીડ ગુજરાતી' વેબસાઈટે વિદેશમાં વસતા અનેક ગુર્જરજનોને ગુજરાતી ભાષામાં રસ લેતા કર્યા હતા.

એ આમ જ એક ભરબપોરે મારે ત્યાં આવી ચઢ્યો હતો. મારા એક પુસ્તકના એક પ્રકરણને એને વેબસાઈટ પર મૂકવું હતું, એની સંમતિ લેવા. 'સાત પગલાં સાથે' પુસ્તકનું એ પ્રથમ મુલાકાત પ્રકરણ હતું. બે લગ્નોત્સુક યુવા-યુવતી પહેલી મુલાકાતમાં જે પરસ્પર આદાન-પ્રદાન કરે છે, ભાવિ જીવનનો નકશો દોરે છે તેની વાત એ પ્રકરણમાં હતી. એ વાંચીને એને થયેલું કે મીરાબહેન કોઈ આવી જ સ્વપ્નશીલ નવયુવતી હશે, પરંતુ આવીને જોયું તો પંચોતેરના આરે પહોંચેલી શ્વેતકેશી માતૃતુલ્ય મહિલા! પણ એકાદ કલાકની વાતચીત પછી તો સાચે જ હું એની એવી માતૃતુલ્ય બની ગઈ કે એના મા-બાપ પાસે પણ જે વાતો ન ખોલાઈ હોય એ અમારી પાસે ખોલતો થઈ ગયો.

ગમે ત્યાંથી શોધીને મારા લેખો દુનિયાને પહોંચાડતો રહ્યો અને એના પ્રતિસાદમાં આવતા સંદેશાઓને પણ પહોંચાડતો રહ્યો. ઉપરોક્ત પ્રકરણના અનુસંધાને તો બત્રીસ જેટલા પ્રતિસાદ આવેલા. 'રીડ ગુજરાતી' ઉપરાંત અમારા બન્ને વચ્ચેની એક મજબૂત કડી હતી મોરારિબાપુની. 'અસ્મિતાપર્વ' સાથે એ વર્ષોથી જોડાયેલો અને મોરારિબાપુ એના શ્રદ્ધેય સ્થાને હતા. બાપુની સેવાગ્રામ-કથા વખતે મને પવનાર સુધી પહોંચાડવાનું કામ બાપુએ મૃગેશને સોંપ્યું હતું!

હા, મૃગેશ એનું નામ. મૃગેશ ધનંજય શાહ. પિતા-પુત્ર બન્ને સદ્‌ભાવનાથી ભર્યા ભર્યા, પણ બન્ને ગભરુ ગભરુ લાગે! એમની કોઈ પણ નવી દિશા દબાતા પગલે જ ખૂલે, પરંતુ ઈશ્વરી કૃપા એવી કે બધું સમુંસૂતરું ચાલતું હતું. એનું કામ નિરંતર આગળ ધપે જતું હતું. એના આંગણે હવે ગાડી પણ આવી ગઈ હતી અને પપ્પા સાથે દુબઈ-સિંગાપોર જેવાં પર્યટને પણ એ જઈ આવ્યો હતો.

પરંતુ અચાનક કોણ જાણે શું થયું. આ વખતની શ્રીનાથજીની યાત્રા એના માટે જીવલેણ બની ગઈ! માથા પર ગરમી ચઢી ગઈ હોય કે અન્ય કોઈ કારણસર અચાનક એ એવો બેભાન થઈ ગયો કે પછી એણે આંખો જ ન ખોલી. આઠ-દસ દિવસ દવાખાનામાં રહ્યો. ધીરે ધીરે શરીરની તમામ ક્રિયાઓ જાણે સમેટાતી રહી અને એક દિવસ ડૉક્ટરે કહી દીધું કે આમ તો ઘણા દિવસ લાંબુ ખેંચી-તાણી શકાય, પણ પાછા ફરવાનાં કોઈ લક્ષણ જણાતા નથી! પરિવારમાં માત્ર પિતા હતા. એમને જ કારમો નિર્ણય કરવાનો હતો. પણ 'જેવી ઈશ્વરની ઈચ્છા' કહીને પિતા એને સ્વસ્થતાપૂર્વક ઘેર પણ લઈ આવ્યા અને બે દિવસમાં તો બાકીની લીલા પણ સંકેલાઈ ગઈ.

મૃત્યુ પોતે જ અજ્ઞાત પ્રદેશનું અચાનક આવી પડતું આગંતુક, એમાં અકાળે આવતું અણધાર્યું મોત તો માણસને જાણે અજ્ઞાતના મહાસાગરનાં ઊંડાં જળમાં ડુબાડી દે છે! પરંતુ આપણા માટે જે અકસ્માત, તે નિયતિ માટે તો નિત્યનાં વિધિવિધાન જ છે! માણસ કશું જ ગૃહિત ધારીને જીવી ન શકે. એણે તો હર પળ અકસ્માત માટે તૈયાર રહેવું પડે. એ ઘટના અ-कस्मात् ક્યાંથી આવી પડે છે તેનાથી અજાણ હોઈએ છીએ ત્યારે તો એ 'અકસ્માત' કહેવાય છે.

'સાવધાન!' ઈશ્વરની સૂચના આપવાની આ રીત છે. અવધાનતા સાથે જીવવું તે સાવધાની, ધ્યાન જુદી ચીજ છે. અવધાનતા જુદી ચીજ છે. અવધાન એટલે પ્રતિપળ વધું સમેટીને જીવવું. સફાઈ માટે પણ કેન્દ્ર પરથી નજર ન હટે. જે સતત ન હોય તે સાવધાની જ ન કહેવાય. સૂરજ સતત તપે છે, નદી સતત વહે છે, પૃથ્વી સતત ઘૂમે છે. ચાંદ-તારા-નક્ષત્રો સતત ઘૂમતા રહે છે. તો જીવનની પ્રતિક્ષણની આ સાવધાની પણ સાતત્ય માગી લે છે.

હવે સાવધાની અને સ્મરણ સતત મરણનાં કરવાનાં કે પ્રભુનાં- એ આપણી પસંદગીનો વિષય છે. સહજરીતે પ્રભુ જો 'પ્રીતમ પ્યારો' બન્યો હશે તો આ સાવધાની વરદાનરૂપ બની જશે. એક બાજુ, પ્રીતમનું નિત્ય મધુર સ્મરણ, બીજી બાજુ એની બનાવેલી દુનિયાના સૌ જીવાત્મા સાથે પ્રેમભર્યા સંબંધની ખેવના! આવા અભિગમથી પૃથ્વીલોક અને પ્રભુલોક બંને લોક સધાશે. આપણી સાથે પૃથ્વી પરના સ્નેહીજનોની પ્રેમસંપદા પણ આવશે, જે આપણા ગયા પછી ફૂલની મીઠી સુગંધ બનીને પૃથ્વી પર વહેતી રહેશે. પરંતુ ઘણા લોકોને માટે આ જ્ઞાન 'સ્મશાન જ્ઞાન' જેટલું ક્ષણિક નીવડે છે. આ નિરંતર યાદ નથી રહેતું. એટલે ભગવાન અને મૃત્યુ નિત્ય-સ્મરણનાં વિષય છે. જે રીતે શ્વાસ લેવા-મૂકવાનું યાદ કરવું પડતું નથી, એવો જ ભગવાન કેવા વગો થઈ જવો જોઈએ. શ્વાસે શ્વાસે રામ કહો, બિના નામ નહીં સાંસ! હકીકતે, ભગવાન યાદ કરવાની ચીજ નથી. ભગવાન યાદ આવવાની ચીજ છે. એ સતત યાદ આવતો રહેવો જોઈએ.

મૃત્યુ સતત યાદ આવતું થઈ જાય તે માટે વિનોબાએ આપણી નિત્ય નિદ્રાને મૃત્યુનો પૂર્વપ્રયોગ બનાવી દેવાની ભલામણ કરી છે.

બસ, દિવસ વિરમ્યો, સાંજ પડી અને રાતનાં ઓળાં ઊતરી આવે ત્યાં રોજના દૈનિક જીવનનો વીંટો વાળીને ગર્ભાગારમાં મૂકી પ્રીતમને ઓરડે પહોંચવાની તૈયારી કરવી. સાજીણજીને શય્યા પર પડ્યા કે તરત આંખો મીંચાતા જ પ્રભુ સાથે દૃષ્ટિ-મિલન સધાઈ જાય! ગાઢ નિદ્રા એ પૃથ્વી પરના જીવલોકનું મહાભૂલું વરેણું છે. પરમ સુખદાયી...

આમ તો પળે-પળે લાખો જીવ મરતા હશે, પરંતુ આપણને સ્પર્શી જનારાં મોત પણ આમ જ હવાની લહેરની જેમ અકસ્માત આવી પડે છે! જીવનનું સ્વરૂપ જ આવું છે, એ જેટલું વધારે આત્મસાત્ થાય તેટલું વધારે સહ્ય બની શકે. આપણી અસહ્યતાનું મુખ્ય કારણ-વિયોગ છે. જીવનમાં વિયોગને પચાવવો એ મોટો જીવનયોગ છે. આ પાચનપ્રક્રિયા રોજેરોજ ચાલે તો જ આ વાત પચી શકે તેવી છે. એ માટે 'લગોલગ, છતાંય અલગ' હોવાની મનોવૃત્તિ કેળવવી પડે છે. ઈશ્વરે આપણા માટે આ 'એકલતા' એટલા માટે સર્જી છે કે એ એકાકીતામાંથી સર્વાભિમુખતા કેળવાય. આપણી પોતાની એકાકીતામાં ડૂબી જવું તે પૂરતું નથી. જેવી રીતે બી ધરતીના પેટાળના એકાંતિ અંધારામાં ફૂટીને અનેક બનવા તરફ આગળ વધે છે, એ રીતે આપણી એકાકીતાએ પણ નિજાત્મામાં ડૂબીને અનેકતાને પેદા કરવાની છે.

જ્ઞાનેશ્વર મહારાજે કહ્યું છે કે આ નરબીજ એ બ્રહ્મબીજ છે. બ્રહ્મ એટલે જ અનંત-વ્યાપ્તિ! આપણા જન્મ-જન્માંતરનાં એક પછી એક આવતાં મરણ જો આપણને બ્રહ્મ-બીજત્વની પ્રાપ્તિ ન કરાવે તો આપણા ફેરા વ્યર્થ ગણાશે.

વિશ્વની ઘણી ભાષામાં અનેક પ્રકારના તહેવારોની ઉજવણી થાય છે, પરંતુ ભારત સિવાય બીજા કોઈ પણ દેશમાં મૃત્યુને ડેથ-ફેસ્ટિવલ, એટલે કે 'પ્રયાણોત્સવ' કહેવાયો નથી. આ ભારતીય સંસ્કૃતિ છે જ્યાં મૃત્યુનો પણ મહોત્સવ રચાય છે. અને મૃતકને આપવાની અંજલિને 'શ્રદ્ધાંજલિ' કહેવાય છે! આ જ તો ખૂબી છે ભારતીય સંસ્કૃતિની. અહીં મરણાંજલિ પણ શ્રદ્ધાંજલિ બની જાય છે. આ શ્રદ્ધાંજલિ માનવની આ શ્રદ્ધાને રૂઢ કરાવવા માટે છે કે જે ગયું છે, તેનો માત્ર દેહ ગયો છે. એની અનંત યાત્રા હજુ ચાલુ જ છે અને પ્રભુનાં ચરણોમાં શ્રદ્ધાપૂર્વક એ જ નિવેદન છે કે એની યાત્રાને એની મંઝિલ સુખરૂપેણ પ્રાપ્ત થઈ જાય! જનાર માટેની આવી શ્રદ્ધા એ જ સાચું શ્રાદ્ધ છે. એ જ સાચું તર્પણ છે! ભાઈ મૃગેશ અને ભરતભાઈ બન્નેની સ્મૃતિમાં આ શ્રદ્ધાંજલિના શબ્દફૂલ પાથરીને સૌની શાંતિ માટે પ્રાર્થું છું.

# શિરડીમાં સેવાધૂપની સુગંધ

શબ્દવેધ
રજનીકુમાર પંડ્યા
rajnikumarp@gmail.com





ઈ વાર આકાશમાં બે ગ્રહોની યુતિ રચાય છે જે અતિ ઉત્તમ પરિણામો લાવે છે એમ કહેવાય છે, પણ કોઈ વાર એકબીજાથી સાવ અજાણ્યા એવા બે માણસોની અણધારી યુતિ થાય તો? યુતિશાસ્ત્ર કહે છે કે યુતિ કોની કોની થાય છે તેના કરતાં વધુ મહત્ત્વનું એ છે કે યુતિ પૃથ્વીના કયા સ્થાને (યુતિશાસ્ત્રમાં એને 'સ્થલવિશેષ' કહેવામાં આવ્યું છે) થાય છે તે વધુ મહત્ત્વનું છે., મહારાષ્ટ્રમાં આવેલા સાંઈબાબાનું યાત્રાધામ શિરડી કહાય એવું 'સ્થલવિશેષ' છે, એની તદ્દન નજીક એના જ સગર્ભ જેવા ગામ કેલવડમાં કોઈ એક પ્રસંગે એવી બે વ્યક્તિઓની યુતિ થઈ કે જેના પરિણામે એ આખા વિસ્તારની કાયાપલટ થઈ રહી છે.

પુના યુનિવર્સિટીના મેથેમેટિક્સ શાખેના સાયન્સ ગ્રેજ્યુએટ લક્ષ્મણ દેવરામ ગોર્ડે હવે ચુમ્માલીસ વર્ષના છે. વંશપરંપરાગત વ્યવસાય ખેતીનો છે, તેર એકર જમીનમાં શેરડી, બાજરો, જુવાર જેવા પાક લેતા હતા. પરંતુ વિશેષ ધ્યાન નાની-મોટી વ્યક્તિગત સમાજસેવા ભણી રહેતું હતું. ખેતી પર થોડું ધ્યાન આપવાની સાથે શિક્ષકની નોકરી પણ કરતા હતા. કેલવડની શાળામાં ધોરણ દસથી બારના વિદ્યાર્થીઓને ગણિત ભણાવતા હતા. લોકોમાં લાડીલા 'ગોરડે સર' ગરીબ વિદ્યાર્થીઓને પોતાને ઘેર બોલાવીને મફત ટ્યુશન આપતા હતા, કોઈ કોઈ જરૂરતમંદોને થોડી ઘણી આર્થિક મદદ કરતા રહેતા હતા, કોઈના ઝીણા મોટા કામ આટોપી આપતા હતા. ગામમાં વાંચનાલય ચલાવતા હતા. કોઈ બીમાર પડી ગયું હોય અને સેવાસુશ્રુષાની જરૂર હોય, કોઈની અંતિમયાત્રાની વ્યવસ્થા કરવાની હોય, તો એની ગોઠવણ પણ જાતે ગાંઠના ખર્ચીને એ કરી આપતા હતા. એકવાર નજીકના દુષ્કાળપીડિત ગામમાં પીવાનાં પાણીની ભયંકર તંગી ઊભી થઈ ત્યારે સતત ચાર મહિના સુધી રોજ આઠ હજાર લિટર જેટલું પાણી જાતે ટૅન્કરમાં લઈ જઈને તેમણે પૂરું પાડ્યું હતું. આ બધું એમનામાં પહેલી જન્મજાત વૃત્તિને આભારી હતું. એ એમ કહેતા કે શિરડીના સાંઈબાબાએ જિંદગી આખી ગરીબોની સેવા માટે ખર્ચી નાખી, આ દેહ એ જ ભૂમિ પર વિચરે છે તો એનું એક હજારમાં ભાગનું અનુસરણ હું ના કરી શકું તો મારે આ સેવા-ભક્તિના વિચાર તરંગોવાળી ભૂમિનો ત્યાગ કરી દેવો જોઈએ.

એકવાર સુભાષ દરેકરના ઉદ્યોગશ્રી ઇન્ડસ્ટ્રીઅલ ગ્રુપના કોઈ ઉદ્યોગશ્રી સમારંભમાં શિરડી ગયા. એકબીજાની પિછાણ કરતાં કરતાં એમની મુલાકાત ૨૦૦૭માં દાનવીર ઉદ્યોગપતિ નરેશ રાઉત સાથે થઈ.

મુંબઈના ઉદ્યોગપતિ નરેશ રાઉતની સદ્ અને ભાગ્યશીલ કથા સાંભળતે જ ચાલી આવે છે. ૧૯૪૯ના સપ્ટેમ્બરની ૧૯મીએ ગુજરાતના દહાણુ તાલુકાના બોરડી ગામે જન્મેલા નરેશ રાઉતે ૧૯૮૩માં મુંબઈના જોગેશ્વરીમાં માત્ર ચાર કામગારોથી શરૂ કરેલી એક નાનકડી ફેક્ટરીથી આજે પોતાના ઉદ્યોગને મલ્ટિલેવલ ઓર્ગેનિઝેશન સુધી પહોંચાડ્યો છે, તેમની ફેક્ટરીઓ દાદરા-નગર હવેલી, સેલ્વાસ, ચારકોપ-કાંદિવલી, આંબડ નાસિક, મૅગુલ (પુને), કાંચીપુરમ (ચેન્નઈ) જેવાં સ્થળોએ તેમની ઉદ્યોગ શાખાઓ છે. પરંતુ કમનસીબ એ કે એમના એક પછી એક એમ બન્ને પુત્રો વિકલાંગ જન્મ્યા, પણ હિંમત હાર્યા વગર એમણે બન્ને પુત્રોને એન્જિનિયર બનાવ્યા. બન્નેના અત્યારે લગ્ન પણ થઈ ગયા. નરેશ રાઉત શરૂથી જ સખાવતી ભાવના ધરાવે છે. ગોરડે સર સાથે એમની મુલાકાત ખરેખર શુભ્રયુતિ સાબિત થઈ. ગોરડે સરે એમને શિરડી (કેલવડ) આવવાનું નિમંત્રણ આપ્યું, કારણકે એ નરેશ રાઉતે એમના વતન બોરડીમાં કરેલી શુભ પ્રવૃત્તિઓથી વાકેફ હતા. ૧૯૮૪ માં એમણે બોરડીમાં પ્રેરણા લાઈબ્રેરીની સ્થાપના કરી હતી, ૧૯૯૭માં નરેશ રાઉત ફાઉન્ડેશનના નામથી બોરીવલીમાં સમતોલતિ ટ્રસ્ટની કામગીરી કરી હતી, એ ઉપરાંત એમના કામની સુવાસ ગોરડે સર સુધી પહોંચી હતી. એટલે કાંઈક વિચારીને જ ગોરડે સરે નરેશભાઈને કેલવડ આવવાનું નિમંત્રણ આપ્યું, ૨૦૦૭ માં એ ગોરડે સરને ઘેર આવ્યા અને એમની સાથે ગામડાઓમાં ફર્યા પણ ખરા, ગોરડે સરનું કામ પણ જોયું અને સંસ્થાગત છત્રના અભાવે કરીને એમને નડતી મર્યાદાઓ પણ એ જોઈ શક્યા. બેઉએ ભેગા મળીને આ આખા ગ્રામ્ય વિસ્તારની અનેકવિધ ક્ષેત્રે સેવાઓ કરવાનો નિર્ધાર કર્યો અને પરંપરાગતને બદલે નવતર સેવા પ્રવૃત્તિઓનો આરંભ કરી દીધો.

તેમણે જોયું કે આ ગ્રામ્ય પ્રદેશની મહિલાઓમાં કેળવણીનું પ્રમાણ બહુ નીચું છે, પણ અત્યારના યુગની આવશ્યકતા તેમને પરંપરાગત નહિં પણ રોજગારલક્ષી તાલીમ આપવાની છે. આના ઉકેલના પ્રથમ કદમ રૂપે સૌથી પ્રથમ મહિલા કમ્પ્યુટર કેન્દ્રની સ્થાપના કરી જેમાં નરેશ રાઉતે પોતાના એકલા તરફથી અગિયાર જેટલા કમ્પ્યુટરસેટ આપ્યા અને મહિલાઓને નિઃશુલ્ક તાલીમ આપવાની વ્યવસ્થા કરી. એ પહેલાં એ સગવડ માત્ર દૂર દૂરનાં ગામોમાં જ હતી અને ભારે ફી સાથે હતી. જેથી કન્યાઓ તેનો લાભ લઈ શકતી નહોતી. હવે આ કેન્દ્રના આરંભથી એ સમસ્યા હલ થઈ ગઈ છે. હવે તો સમાજના સહકારથી ત્યાં વીસ કમ્પ્યુટર છે. માત્ર કન્યાઓ જ નહિં, છોકરાઓ પણ ત્યાં તાલીમ મેળવે છે. આ તાલીમ પણ ડીટીપી, સીસીપી અને એમ.સી.આઇ.ટી જેવી રોજગારલક્ષી છે. આને કારણે બેકારીનું પ્રમાણ આ વિસ્તારમાં બહુ ઘટી ગયું છે.

સરકાર તરફથી શાળાઓમાં મધ્યાહ્ન ભોજન આપવામાં આવે છે. અનેક શાળાઓમાં તેમણે ભોજન લેવા માટે થાળી, વાટકા અને ચમચાના સેંકડો સેટ્સ આપ્યા. કેટલીક શાળાઓમાં વિદ્યાર્થીઓને ભણતની પ્રેરણા મળે તે વાસ્તે વિદ્યાર્થીઓના ભણત જૂથ રચી આપ્યા.

પણ આખરે તો એકલા નરેશ રાઉત કે ગોરડે સરથી આનો બોજો ના ઉપાડી શકાય તે સ્વાભાવિક જ છે. સમાજનો પણ ભરપૂર સહયોગ આમાં જોઈએ જ. અને તે માટે સંસ્થાનું રજિસ્ટ્રેશન કરાવવું અનિવાર્ય હતું, છેવટે એ માટેની કાર્યવાહી પણ સંપન્ન કરવામાં આવી અને ૨૦૧૩ના ઑગષ્ટની ૨૨મીએ ચેરિટી કમિશનર દ્વારા તેને ચેરિટેબલ ટ્રસ્ટનો દરજ્જો પણ પ્રાપ્ત થયો.

એ પછી પ્રવૃત્તિનો વ્યાપ વધ્યો. ખેતીમાં અવનવા પ્રયોગો કરીને નવી દિશાઓ ખોલી આપનાર ખોલનાર તાલુકાના ગામ જળગાંવને આર્થિક તથા ટેક્નિકલ મદદ પૂરી પાડવાના હેતુથી દત્તક લેવામાં આવ્યું, કેલવડમાં જ કાવ્ય વિધાયક સંસ્થાની સ્થાપના કરી અને તેમાં એલસીડી પ્રોજેક્ટર ભેટ આપ્યું અને ચારસો જેટલા વિદ્યાર્થીઓને માટે બોરવેલ, ઇલેક્ટ્રિક મોટર અને તેને લગતી સામગ્રી ઉપલબ્ધ કરાવી, વિજ્ઞાન શિક્ષણ માટેનાં સાધનો લઈ આપ્યાં, શાળા જતી બાળાઓને મફત ગણવેશ આપવાથી માંડીને તેમને રમતગમત અને અભ્યાસમાં ઉત્તમ પરિણામો લાવવા બદલ પ્રોત્સાહક ઇનામો આપવા જેવી અનેક પ્રવૃત્તિઓ પણ આદરી.

હવે તેમનો ધ્યાન મહિલાઓ માટે કુટિર ઉદ્યોગ શરૂ કરવાનો છે, અત્યારે પણ પાપડ, મસાલા અને અન્ય ગૃહોપયોગી વસ્તુઓનું ઉત્પાદન તો ચાલુ જ છે પરંતુ હવે જો કોઈ દાતા આગળ આવે તો પેપરડીશ, પતરાળી અને નાયલોન દોરી બનાવવાના ત્રણ મશીનો વસાવવાનાં છે. એકની કિંમત અંદાજે પચાસથી સાઠ હજાર થાય છે, એમ તો લોકોનો આર્થિક સહયોગ મળે તો રખડતી-ભટકતી જાતિના અનાથ થઈ ગયેલાં બાળકો માટે અનાથાશ્રમ ઊભું કરવાનું આયોજન છે. ગોરડે સરે એ માટે પોતાની પચાસથી સાઠ લાખની કિંમતની જમીન પણ આ ફાઉન્ડેશનને દાનમાં આપી દીધી છે, "કેલવડકર રત્ન" તરીકે લોકોમાં ઓળખાતા ગોરડે સર અને શ્રેષ્ઠી નરેશ રાઉત એને માટે ભંડોળ ઊભું કરવા પ્રયત્નશીલ છે. આવકવેરાની કલમ ૮૦ જી મુજબનું સર્ટિફિકેટ પાઈપલાઈનમાં છે.

સંસ્થાનો સંપર્ક - શ્રી નરેશ રાઉત ફાઉન્ડેશન, મુ.પોસ્ટ-કેલવડ. તા. રાહાતા. જિ. અહમદનગર-પિન-૪૨૩૧૦૭/ ગોરડે સર-૦૯૫૨૭૩૩૫૯૧૨/ નરેશ રાઉત, મુંબઈ-૦૯૮૨૦૯૨૨૬૩૩/ E mail-nrfoundation13@gmail.com / support@shrinareshfoundation.co/ સંસ્થાની તે જ નામથી વેબસાઈટ પણ છે.


जि.प.प्राथ.शाळा, केलवड व्यवस्थापन समिती सदस्य व
नरेश राऊत फौंडेशनचे सेक्रेटरी मा.प्रा.लक्ष्मण देवराम गोर्डे
यांचे शाळेला दिलेल्या योगदानाबद्दल
जाहिर आभार..!
केलेले सहकार्य
४० इंची L.E.D. व इन्व्हर्टरसाठी ५०,०००/-
पिण्याच्या पाण्यासाठी बोअरवे- इलेक्ट्रीक मोटार, जेवणाची ताटे व पाईप लाईनसाठी २१,०००/-
१५ ऑगस्ट व २६ जानेवारी रोजी सर्व विद्यार्थ्यांना खाऊ
दिपावली निमित्त सर्व मुलांना खाऊ दिला.
ऑफिस फर्निचरसाठी रू.२१,०००/-
श्रीमती रोहिणी घाटे
मुख्याध्यापिका जि.प.केलवड
सौ.सविता रावसाहेब वाघे
उपाध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती
श्री.चंद्रकांत पुंजाजी गमे
अध्यक्ष, शालेय व्यवस्थापन समिती
सदस्य-
साळबा रजपूत, बाबासाहेब ठोंबरे, मच्छिंद्र रजपूत, आण्णासाहेब खंडागळे, सौ.उषा गोडगे,
वृषाली कांदळकर, सौ.वंदना बढे, सौ.विद्या गमे, सौ.मंदा रजपूत,श्री.प्रा.लक्ष्मण गोर्डे,
सरिता सोनवणे, संपदा गमे, संदेश घोरपडे, वाल्मीक गमे,
सन-२००७-०८
केलवड
सर्व शिक्षा

दैनिक
पुढारी
अहमदनगर
शुक्रवार, दि. ७ एप्रिल, २०१७

# वेध... ग्रामीण विकासाचा!

# सामाजिक बांधिलकी जपणारे 'नरेश फौउंडेशन'



उद्योगपती
मा. नरेश राऊत



सचिव
प्रा. लक्ष्मणराव गोर्डे

*केलवड सारख्या ग्रामीण भागात जिथे नागरिकांना पिण्यासाठी पाणी नाही. हा संपुर्ण परिसर जिरायत परिसर म्हणून ओळखला जातो. अशाठिकाणी समाजातील गरजू घटकांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे अशी संकल्पना बाळगणारे मुंबई येथील उद्योजक नरेश राऊत यांच्या माध्यमातून उच्चशिक्षीत असलेले प्राध्यापक लक्ष्मणराव गोर्डे यांनी नरेश राऊत फौंडेशनच्या माध्यमातून समाजातील गरजु घटकांसाठी विविध योजना राबवुन जिल्ह्यात नव्हे तर राज्यात नरेश राऊत फौंडेशनची ओळख निर्माण केली आहे.*

समाजातील गरीब व गरजू व्यक्तींकरिता आपण काहीतरी केले पाहिजे याची मनात जिद्द लहानपणापासुनच मनात बाळगून प्राध्यापक लक्ष्मण गोर्डे यांनी अत्यंत गरिबीच्या परिस्थितीत सायकलवरुन जावून बी.एस्सी. पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. त्यानंतर त्यांनी केलवड येथील ग्रामीण भागात १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत क्लास घेण्यास सुरुवात केली. १० वीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देत असतांना आपण समाजातील गरजू व्यक्तींना शिक्षणासाठी मदत केली पाहिजे अशी आशा मनाशी बाळगुन असलेल्या प्रा. गोर्डे यांची मुंबई येथील उद्योगपती नरेश राऊत यांच्याबरोबर भेट झाली. मुंबईत काही उद्योगपती एकत्र येवून त्यांनी नरेश राऊत फौंडिशनची स्थापना केली. त्यांनी सुरुवातीच्या काळात

मुंबई येथे जाण्यासाठी उशिरा बसने प्रवास करुन अनेकवेळा मुंबई येथे रेल्वे स्टेशनला झोपावे लागले. परंतू मनाशी जिद्द असल्यामुळे त्यांनी मुंबई येथील उद्योगपती नरेश राऊत यांच्या माध्यमातून गरजू नागरिकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबवुन त्यांना उत्पादनाचे साधन कसे उपलब्ध होईल व गरजु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बाहेरगांवी न जाता ग्रामीण भागात याचा कसा उपयोग होईल याची संकल्पना मनाशी बाळगुन त्यांनी केलवड येथे नरेश राऊत फौउंडेशनची स्थापना सन २०१३ साली केली. ग्रामीण भागातील महिलांनी आपल्या स्वत:चा व्यवसाय करुन स्वत:च स्वावलंबी व्हावे. दुसऱ्यावर अवलंबुन न राहता महिलांनीही व्यवसायात पुरुषांच्या बरोबरीने रहावे यासाठी महिलांना मोफत संगणक प्रशिक्षण, मोफत सॅनिटरी नॅपकिन प्रकल्प, मोफत ब्युटी पार्लर कोर्सेस असे महिलांसाठी विविध प्रकारचे कोर्सेस फौंउडेशन मार्फत संपुर्ण जिल्ह्यात व राज्यात सुरु केले.

ेब सोनवणे

या उपक्रमाचे तालुक्याचे शिल्पकार ना. राधाकृष्ण विखे पाटील, युवा नेते सुजय विखे व जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी अनेकदा कौतुक केले आहे. प्राध्यापक गोर्डे यांनी नरेश राऊत फौउंडेशनच्या मार्फत अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी भरीव मदत दिली आहे. मागील वर्षी दुष्काळादरम्यान ना. विखे पाटील यांच्या संकल्पनेतून तालुक्यात राबविलेल्या जलक्रांती अभियानात नरेश राऊत फौउंडेशनने केलवड व जळगाव हे दोन गावे दत्तक घेवून तेथील पिण्याचा पाणी प्रश्न सोडविण्यास मोठा वाटा उचलला. तसेच तालुक्यातील अनेक गरजू नागरीकांसाठी केलवड येथे मोफत सर्व रोगांचे निदान व्हावे यासाठी अभ्यासु व अनुभव असलेल्या डॉक्टारांची व्यवस्था करुन येथे दवाखाना सुरु केला. दररोज या दवाखान्यामध्ये ग्रामीण भागातील शेकडो रुग्ण येवून मोफत औषधोपचार घेतात. फौउंडेशनच्या माध्यमातून जळीत झालेल्या घरांना मदतीचा हात दिला आहे. पंचक्रोशीतील विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले आहे. या उपक्रमासाठी निधी मिळविण्याची धडपड नरेश राऊत फौउंडेशनचे सचिव गोर्डे हे नेहमीच करीत असतात. त्यांची काम करण्याची धडपड, चिकाटी व कष्ट यामुळेच आज नरेश राऊत फौउंडेशन जिल्ह्यात नव्हे तर राज्यात नावारुपास आले आहे. अशा एक ना अनेक योजना सर्व सामान्यांसाठी प्राध्यापक लक्ष्मणराव गोर्डे राबवत आहेत. यापुढेही त्यांच्या कार्याची घोडदौड अशीच सुरु राहणार आहे.




**राहाता : नरेश राऊत फाऊंडेशनने केलवड येथे ग्रामीण भागात सुरू केलेला मोफत वैद्यकीय दवाखाना.**

शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०१५

अध्यक्ष



मा. नरेश राऊत साहेब, उद्योगपती

सचिव



प्रा. लक्ष्मण गोर्डे (सर)

नवी आशा नवी दिशा सार्वमत वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा!

# श्री नरेश राऊत फाऊंडेशन

## सामाजिक सेवेत मोलाचा सहभाग असणारी संस्था

## विविध उपक्रम

* केलवड येथे मोफत पाणी पुरवठा
* केलवड, जळगांव दत्तक ग्राम
* केलवड, जळगाव, राहाता मोफत वाचनालय सुविधा
* वैद्यकीय क्षेत्रात भरीव मदत
* शैक्षणिक क्षेत्रात भरीव मदत



## श्री नरेश राऊत संगणक प्रशिक्षण केंद्र

* महिलांसाठी मोफत संगणक प्रशिक्षणाची सोय
* आधुनिक सुविधेसह सुसज्ज संगणक कार्यशाळा
* MS-CIT
* C.C.C



## नियोजित उपक्रम

* महिलांसाठी कुटीरउद्योग
* पोस्ट बेसिक आश्रम शाळा
* केलवड, जळगाव, राहाता (भटक्या व विमुक्त जातींसाठी)



E-mail- nrfoundation13@gmail.com

----- our website'-----

shrinareshrautfoundation.com




लोकमत सोमवार दि. २८ मार्च २०१६

## श्री. नरेश राऊत फाऊंडेशन

# सामाजिक कार्याचा अविरत वसा



मा. नरेश राऊत



मा. लक्ष्मण गोर्डे

संस्थेचे सचिव यांनी श्री. नरेशजी राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेने केलवड हे गाव दत्तक घेऊन या गावात विविध सामाजिक उपक्रम राबविले. यामध्ये प्रामुख्याने गावासाठी पाणी टंचाई काळामध्ये पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरु केला. गेल्या दोन वर्षापासून दरवर्षी पाणी टंचाईवर मात करण्यासाठी टंचाई काळात या संस्थेमार्फत गावासाठी पिण्याच्या पाण्याचा टँकर सुरु केला जातो. शाळेतील विद्यार्थ्यांसाठीही या टँकरद्वारे पिण्याचे पाणी पुरविले जाते. गरीबांना मदत, जळीतांसाठी मदत, मुलींच्या विवाहासाठी मदत यांसारखे उपक्रम या गावामध्ये संस्थेच्या माध्यमातून राबविले जातात. गावातील ग्रामसेवक व तलाठी यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना रोख स्वरुपात पुरस्कार संस्थेने दिले आहेत. तसेच गटविकास अधिकारी, पं. स. राहाता व तहसीलदार, राहाता यांना रोख पुरस्काराने संस्थेने सन्मानित केले आहे.

### दत्तक ग्राम जळगाव

तालुक्यातील मौजे जळगाव येथील ग्रामपंचायतीच्या व लोक आग्रहास्तव संस्थेने जळगाव दत्तक गाव घेतले आहे. या गावातही विविध विकासाच्या योजना राबविल्या जातात. कृषी क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक बोलावून येथील शेतकरी वर्गाला आधुनिक शेतीबद्दल मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे येथील शेती व्यवसायाला गती मिळाली आहे. जळगाव येथे महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र वाचनालय सुरु करण्यात आलेले आहेत. शिवाय नाना-नानी पार्कही जळगावमध्ये संस्थेच्या मदतीने खुले झाले आहे.

### शैक्षणिक

केलवड येथील श्री. ज्ञानेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी जेवणाची ताटे या संस्थेने पुरविली आहेत. शाळेतील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी शालेय इमारत, प्रयोगशाळा साहित्य व इतरही शैक्षणिक उपक्रमांसाठी या संस्थेने भरीव सहाय्य दिले आहे. केलवड येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी बोअरवेल, मोटार त्याचप्रमाणे त्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढावी, या दृष्टीने रोख बक्षीस योजना सुरु केली. दरवर्षी स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी केलवड येथील प्राथमिक व माध्यमिक शाळा व सर्व अंगणवाडीतील त्याचप्रमाणे पंचक्रोशीतील अनेक शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले जाते.

जि. प. शाळा राहाता यांना एलसीडी प्रोजेक्टर, मुजमुले वस्ती शाळा, खडकेवाडे यांच्यासाठी बोअरवेल या संस्थेने पुरविला आहे. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी तसेच त्यांचा औद्योगिकतेकडे कल वाढावा, या दृष्टीने तज्ज्ञांची व्याख्याने संस्थेच्या माध्यमातून आयोजित केली जातात. राहाता येथील शारदा शैक्षणिक संकुल येथील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनासाठी ताटे तसेच न्यू इंग्लिश स्कूल सात्रळ, पुणतांबा येथील शाळांना उपक्रमांसाठी देणग्या दिल्या. या शैक्षणिक मदतीतून शाळेच्या अडचणी दूर झाल्या.

रयत शिक्षण संस्थेच्या सात्रळ येथील वसतिगृहाला संस्थेच्या माध्यमातून दर महिन्याला मदत केली जाते. संस्थेच्या माध्यमातून गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत केली जाते.

### मोफत संगणक प्रशिक्षण केंद्र

खेड्यातील मुला-मुलींना संगणक प्रशिक्षण घेण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत असे, विद्यार्थ्यांची गरज ओळखून संस्थेच्या माध्यमातून केलवड येथे मोफत संगणक प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. अद्ययावत इमारतीसह अनेक अद्ययावत सुविधा या संगणक प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिल्या आहेत. या प्रशिक्षण केंद्रामध्ये एम.एस.सी.आय.टी. व सी.सी.सी. या शासनमान्य कोर्सचे प्रशिक्षण दिले जाते.

### मोफत क्लासेस

संस्थेच्या माध्यमातून इ. ५ वी, ६ वी, ९ वी व इ. १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी गणित, भूमिती, इंग्रजी व विज्ञान या विषयांसाठी मोफत क्लासेस घेतले जातात. या क्लासेससाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळत आहे.

### मोफत वाचनालय

संस्थेच्या माध्यमातून केलवड, जळगाव ता. राहाता, शारदा शैक्षणिक संकुल राहाता, पोलीस स्टेशन राहाता, माध्यमिक विद्यालय, सात्रळ या ठिकाणी मोफत वाचनालय सुरु आहेत.

### वैद्यकीय

संस्थेच्या माध्यमातून मोफत मोतीबिंदू चिकित्सा शिबिर घेऊन त्याचा गावातील अनेक रुग्णांना लाभ मिळाला आहे. गावातील व पंचक्रोशीतील विविध गरजू लोकांना विविध आजारांवर उपचारासाठी संस्थेच्या माध्यमातून मदत दिली जाते.

### धार्मिक कार्य

धार्मिक विकासासाठी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत केली जाते. केलवड येथील मारुती मंदिर, राहता येथील विरभद्र मंदिर, पिंपळस येथील महालक्ष्मी मंदिर, सराला बेट येथील समाधी मंदिर यांच्या बांधकामासाठी संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात मदत करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे गावातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक तसेच मस्जिद बांधकामासाठी संस्थेने हातभार लावला आहे. केलवड येथील गणपती मंदिरास संस्थेने मदत केली आहे. गावातील पायी दिंडी सोहळा तसेच भजनी मंडळासाठी मानधन यासारख्या योजना संस्थेच्या माध्यमातून सुरु आहेत.

### सामाजिक कार्याचे विकत वेड घेतलेली माणसे!

प्रा.लक्ष्मण गोर्डे यांनी संस्थेच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले आहे. सामाजिक कार्य करता करता त्यांचा प्रवाह वाढला आहे. सामाजिक-कार्यात विकत वेड घेतलेली माणसे या संस्थेच्या माध्यमातून दिसून येतात. उद्योजक श्री.नरेशजी राऊत व प्रा.लक्ष्मण गोर्डे यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानीत करण्यात आलेले आहे.

यमन पुलाटे

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अंक २८५ । वर्ष ४५ वे । मंगळवार, ३ नोव्हेंबर २०२० । पाने १०

# नरेश राऊत फाउंडेशनमध्ये कोव्हिड चाचणी सुविधा केंद्र



नरेश राउत फाउंडेशनच्या दवाखान्यात विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या. त्याप्रसंगी प्रा. लक्ष्मण गोर्डे, सुभाष गमे, ग्रामस्थ व वैद्यकीय अधिकारी.

अस्तगाव (वार्ताहर)– केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या सेवाभावी दवाखान्यात कोविड चाचणी करण्याची सोय करण्यात आली आहे, अशी माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.


गेल्या सहा वर्षापासून नरेश राऊत फाउंडेशनने केलवड येथे अल्पदरात वैद्यकिय सुविधा ग्रामीण भागात सुरू केली आहे. सर्वसामान्य पेशंटला यामुळे मोठा दिलासा मिळाला आहे. काल या दवाखान्यात नव्याने रुजू झालेल्या डॉ. राधा गमे, डॉ. होन, नर्सेस अनिता गमे यांचे स्वागत ग्रामस्थ तसेच फाउंडेशनच्यावतीने करण्यात आले. या दवाखान्यात शुगर, बीपी, तपासणी तसेच सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध आहेत. केलवड येथे महिला डॉक्टर व नर्सेस असल्याने महिला पेशंटला याचा मोठा फायदा होणार आहे, असे प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले. कोव्हिड तपासणीची सुविधा करण्यात आली आहे.

फाउंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात, त्याचबरोबर महत्त्वाचा उपक्रम म्हणून वैद्यकीय सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. ग्रामस्थांसाठी हा उपक्रम असल्याने ग्रामस्थांनी त्यास सहकार्य करावे. यापुर्वीही फाउंडेशनने विविध शिबिरे तसेच उपक्रम राबविले आहे. त्यासही चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

याप्रसंगी सुभाष गमे, प्रा. लक्ष्मण गोर्डे, अंजाबापू जटाड, अयोध्या संघटनेचे विशाल गमे, दत्तु गोर्डे, शेपाळ, प्रा. विनोद निरगुडे, तसेच आयोध्या संघटनेचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच फाउंडेशनचे मुकूंद गांगड, व्यवस्थापक सचिन वाघे, नवनाथ रजपूत यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

राहाता तालुक्यातील आडगाव येथे उद्या बुधवारपासून अल्पदरात वैद्यकीय सुविधा निर्माण होण्यासाठी नरेश राऊत फाउंडेशनच्या माध्यमातून दवाखाना सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली. फाउंडेशन ग्रामीण भागात वैद्यकिय सुविधा निर्माण करून अल्पदरात ग्रामस्थांना ही सेवा देणार आहे, असेही ते म्हणाले.

पंच लाईन



आवं साहेब... पाणी भरीत व्हतो म्हंजी वावरात बारं देत व्हतो, तुमच्च्यावाजी घरात पाणी नाही भरावं लागत मला...

सार्वमत | www.deshdoot.com | Daily sarvmat | गुरुवार, १६ एप्रिल २०२० | ३

# केलवड येथे श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने किराणा वाटप

**अस्तगाव (वार्ताहर)** - श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत गरजुंना मोफत किराणा मालाचे वाटप करण्यात आले.

केलवड येथील गरीब, विधवा, अपंग, निराधार, मतिमंद अशा सर्व समाजातील महिला व पुरुषांना किराणा मालाचे वाटप सोशल डिस्टन्सिंगचे पालन करत वाटप करण्यात आले. यावेळी राहाता पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, राहात्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत कंदारे, ग्रामविकास अधिकारी देशमुख, सुभाषराव गमे, सरपंच भागवतराव कांदळकर, भारत राऊत, अंजाबापू जटाड आदी उपस्थित होते.

श्री. नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या पुढाकाराने किराणा मालाचे वाटप करण्यात आले. यामध्ये साखर, चहा पावडर, शेंगादाणे, गोडतेल, मसूर डाळ हे प्रत्येकी एक किलो असे एकूण ७८ जणांना वाटप करण्यात आले. वयोवृध्द ग्रामस्थांना याचा मोठा आधार मिळाला.

प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या माध्यमातून केलवड व परिसरात अनेक सामाजिक उपक्रम फाउंडेशन राबवित आहे. गेल्या अनेक वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांना मोफत तास तसेच एसएससीच्या मुलांना दररोज मोफत क्लासेस, संगणक शिक्षण देण्यात येत आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांच्या सहकार्याने आपण हे उपक्रम राबवित आहोत. यापुढेही फाउंडेशन या स्वरुपाचे काम करत राहील. यासाठी अनेक ज्येष्ठ मंडळींचे मार्गदर्शन मिळत आहे. समाजसेवेत आनंद मिळत असल्याचे प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सांगितले.

पुण्य नगरी

# केलवड येथे नरेश राऊत फाऊंडेशनकडून किराणा वाटप

**राहाता :** नेहमी निराधारांच्या मदतीसाठी पुढाकार घेणाऱ्या केलवड येथील नरेश राऊत फाऊंडेशन कोरोना महामारीच्या काळात गरजूंच्या मदतीला धावून आले आहे, अशी माहिती फाऊंडेशनचे सचिव लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

गावातील गरिब, विधवा, अपंग निराधार व्यक्तींना फाऊंडेशनच्यावतीने साखर, चहा, शेंगादाणे, गोडतेल व मसूर दाळ असा किराणा वाटण्यात आला. याचा लाभ ७८ गरजवंतांनी घेतला. 'सोशल डिस्टन्सिंगचे पालन करीत गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक कंदारे, ग्रामविकास अधिकारी देशमुख, पोलीस पाटील सुभाष गमे,सरपंच भागवत कांदळकर, भारत राऊत, अंजाबापू जठार आदी यावेळी उपस्थित होते.

फाऊंडेशनने आदिवासींनी मदत, ना नफा, ना तोटा' आरोग्य सेवा आदी उपक्रम यशस्वी राबविले आहेत. संस्थेचे अध्यक्ष नरेश राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सामाजिक काम सुरू असल्याचे गोर्डे यांनी सांगितले.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
। अंक ३१० । वर्ष ४५ वे । गुरूवार, २६ नोव्हेंबर २०२० । पाने १०

## नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने

# केलवड विद्यालयास सॅनिटायझर किट प्रदान



नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने केलवड विद्यलयास सॅनिटायझर किटचे वाटप करताना सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे, प्रा. सुनील गमे, बबनराव गमे, नितीन गमे, आर. जी. गायकवाड आदी.

**अस्तगाव (वार्ताहर)-** राहाता तालुक्यातील केलवड येथील श्री. नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने ज्ञानेश्वर विद्यालयास सॅनिटायझर किट तसेच मास्क व अन्य साहित्यांचे वाटप करण्यात आले.

नरेश राऊत फाउंडेशनचे संचालक उद्योजक निखील राऊत व अभिजीत राऊत यांच्यावतीने या साहित्याचे वाटप करण्यात आल्याची माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्याहस्ते विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. जी. गायकवाड यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. राहाता बाजार समितीचे संचालक प्रा. सुनील गमे, पालक बबनराव गोडगे, नितीन गमे आदींच्या हस्ते याचे वितरण करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी २०० मास्क, दोन सॅनिटायझर स्टॅंड, पाच लिटर सॅनिटायझर, सॅनिटायझर बॉटल, ऑक्सिजनची पातळी मोजण्यासाठी ऑक्सीमिटर, थर्मल स्कॅनर आदी साहित्याचा समावेश आहे.

फाउंडेशनच्या वैद्यकीय अधिकारी श्रीमती डॉ.राधा योगेश गमे यांनी विद्यार्थ्यांनी कोणती काळजी घ्यावी यावर मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक श्री. गायकवाड यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली. इयत्ता दहावी व नववीच्या विद्यार्थ्यांनी शाळेत पहिल्या दिवशी हजेरी लावली.

पालक बबनराव गोडगे यांनी विद्यार्थ्यांसाठी १०० मास्क दिले. याबद्दल विद्यालयाच्यावतीने फाउंडेशनचे संचालक उद्योजक राऊत बंधू तसेच बबनराव बनसोडे यांचे आभार मानले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ३१५ । वर्ष ४५ वे । मंगळवार, १ डिसेंबर २०२० । पाने १०

# योग्य मार्गदर्शनाने विद्यार्थी घडतात

## प्रा. गोर्डे : फाउंडेशनने केला अक्षरा खर्डेचा सत्कार



**अस्तगाव (वार्ताहर)–** संविधान दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय ऑनलाईन परीक्षेत केलवड येथील जि.प. शाळेची विद्यार्थिनी अक्षरा सुदाम खर्डे हिने लहान गटात जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळविल्याने तीचा नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी सन्मान केला तसेच तीला ११०० रुपये बक्षीसही दिले.

आयडियल बहूजन टिचर्स असोशिएशन व बहूजन मंडळ परिवार अहमदनगर यांच्यावतीने संविधान दिनानिमित्त या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यात कु. अक्षराने तृतीय क्रमांक मिळविला. कु. अक्षरा खर्डे ही तिसरीत शिक्रते.

नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळाले तर ते विविध क्षेत्रात चमकतात. केलवड शाळेत चांगले संस्कार विद्यार्थ्यांवर केले जातात. विविध कलागुणांना विद्यार्थ्यांच्या वाव मिळतो. फाउंडेशन नेहमीच शाळांना, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करते. केलवड विद्यालय असो अथवा प्राथमिक शाळा त्यांच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला अर्थिक मदत करते. स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळतो. फाउंडेशन अशा कार्यक्रमाला सहकार्य करत राहील असेही ते म्हणाले. उद्योजक नरेश राऊत, निखील राऊत, अभिजित राऊत, यांचे मोठे अर्थिक सहकार्य मिळते असेही प्रा. गोर्डे म्हणाले.

याप्रसंगी सुदाम खर्डे, सचिन वाघे, नवनाथ रजपूत, रविंद्र तुपे, अभिषेक गोर्डे, किसन रजपूत, राधाकृष्ण रजपूत, रावसाहेब तुपे, कांचन घोरपडे, वृषाली निर्मळ आदी उपस्थित होते.

www.epunyanagari.com

Toll Free 9773927928

# पुण्य नगरी

अहमदनगर ◆ गुरुवार, २१ जानेवारी २०२१ । वर्ष : १९ । अंक : २९१ । पाने १०+४ =१४ ★ किंमत : ₹ ५.००

# नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह

**राहाता :** तालुक्यातील केलवड येथील श्री नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने अकोले तालुक्यातील वरखडवाडी (देवठाण) येथे आदिवासी मुला-मुलींसाठी निवासी वसतिगृह सुरू करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन नुकतेच फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, गटशिक्षण अधिकारी उमेश डोंगरे, संचालक अंजाबापू जटाड यांच्या हस्ते करण्यात आले.

फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत, संस्थेचे ट्रस्टी निखील राऊत, अभिजित राऊत यांच्या सहकार्यातून हे वसतिगृह आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आले आहे. यावेळी प्रा. गोर्डे म्हणाले, प्रत्येकाने श्रम व कष्ट करून आपले ध्येय गाठावे. आम्ही विद्यार्थ्यांसाठी एक वेगळे व्यासपीठ निर्माण करून दिले असून फाऊंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांचे कार्य खूप प्रेरणादायी असल्याचे ते म्हणाले.



राहाता : तालुक्यातील केलवड येथील श्री नरेश राऊत फाऊंडेशनच्या वतीने अकोले तालुक्यातील वरखडवाडी (देवठाण) येथे आदिवासी मुला-मुलींसाठी निवासी वसतिगृहाचे उद्घाटन करताना प्रा. लक्ष्मण गोर्डे, गटशिक्षण अधिकारी उमेश डोंगरे, संचालक अंजाबापू जटाड आदी.

जटाड म्हणाले, या वसतिगृहामध्ये नऊ मुली व तेरा मुले असून विद्याविभूषीत आहे. हे वसतिगृह फक्त एमपीएससी व एमपीएससी मुलांसाठी असून येथे स्पर्धा मार्गदर्शन केंद्र चालविले जाते. बाहेरून विषयांशी तज्ज्ञ बोलावून योग्य ते मार्गदर्शन केले जाते. वसतिगृहाच्या माध्यमातून अनेक शासकीय अधिकारी निर्माण होणार आहे.

डोंगरे म्हणाले, फाऊंडेशनचे कार्य समाजाला एक वेगळी दिशा देण्याचे असून कौतुकास्पद आहे. यावेळी अमोल कहांडळ, नवनाथ रजपूत, विद्यार्थी-विद्यार्थीनी उपस्थित होते. आभार नवनाथ रजपूत यांनी मानले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

# पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com


अहमदनगर शुक्रवार। २६ मार्च २०२१। स्थापना वर्ष ८३ वे। मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सि

# नरेश संस्थेकडून शेवाळे यांचा सन्मान

**राहाता : पुढारी वृत्तसेवा**

पंचायत समितीचे गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे यांना राज्यस्तरीय गुणवंत अधिकारी म्हणून पुरस्कार मिळाल्याबद्दल केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, अॅड. अनिल गमे, योगा ग्रुपचे संस्थापक डॉ. बापूसाहेब पानगव्हाणे, सामाजिक कार्यकर्ते दशरथ तुपे, ग्रामसेवक देशमुख, विशाल वाघे, दत्तात्रेय गोर्डे यांच्यासह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.



**राहाता : पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शेवाळे यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना लक्ष्मण गोर्डे व ग्रामस्थ.**

यावेळी समर्थ शेवाळे म्हणाले की, आपण प्रामाणिकपणे काम केले, तर आपल्याला कामाची पावती मिळते. प्रत्येकाने आपले काम चांगले व प्रामाणिक भावनेतून केले पाहिजे. सत्कारामुळे अजून चांगले प्रकारे काम करण्याची ऊर्जा मिळते. नरेश राऊत फाउंडेशनचे उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी आहेत. गरजू विद्यार्थ्यांना या फाउंडेशनने शिक्षणाचे माहेरघर उपलब्ध करून चांगली संधी निर्माण करून दिली आहे. प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या माध्यमातून फाउंडेशन चांगल्याप्रकारे उपक्रम राबवितात याची प्रेरणा इतर सेवाभावी संस्थांनी घेणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

यावेळी अॅड. अनिल गमे यांनी फाउंडेशनच्या विविध उपक्रमाची माहिती देताना गटविकास अधिकारी शेवाळे यांचे अभिनंदन केले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com
अहमदनगर रविवार । ५ सप्टेंबर २०२१ । स्थापना वर्ष ८३ वे । मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली, सातारा, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागि

# नरेश राऊत फाउंडेशनचे विशाल दातृत्व

## पो. नि. गायकवाड

**शिर्डी : पुढारी वृत्तसेवा**

प्रगतीचा आलेख हा उंचावता ठेवण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून त्यांना स्थिरस्थावर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारी समाजसेवेतील नरेश राऊत फाउंडेशन ही विशाल दातृत्व असणारी सामाजिक संस्था असल्याचे गौरवोद्‌गार राहाता पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुनील गायकवाड यांनी केले.



**शिर्डी : पोलिस निरीक्षक सुनील गायकवाड यांचा सत्कार करताना प्रा. लक्ष्मण गोर्डे समवेत पोलिस अधिकारी.**

राहाता पोलिस ठाण्याचे प्रभारी म्हणून पोलिस निरीक्षक एस. पी. गायकवाड नुकतेच हजर झाले. राहाता पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गावांचा पाहणी दौरा आयोजित केला होता. त्यादरम्यान राहाता तालुक्यातील केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या कार्यालयाच्या भेटीसाठी गेले होते. त्याप्रसंगी संस्थेचे सचिन प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी त्यांचा सन्मान केला. याप्रसंगी सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रशांत कंधारे, पोलिस उपनिरीक्षक संतोष पगारे, आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

गायकवाड म्हणाले की, नरेश फाउंडेशनचे जल शिवार, शैक्षणिक, आरोग्य सेवेत बहुमूल्य असे कार्य थक्क करणारे आहेत. अशी सामाजिकता जपणारी एकमेव संस्था आहे. फाउंडेशनने सुरू केलेला सॅनिटरी पॅडचा नवा प्रकल्प हा विद्यार्थिनींसाठी फारच उपयुक्त आहे.

यावेळी संस्थेचे संस्थेचे प्रकल्प अधिकारी सचिन वाघे, संस्थेचे लेखापाल बत्तासे, श्रीमती निर्मळ, संस्थेचे संचालक अभिषेक गोर्डे, किसन राजपूत, राधाकृष्ण राजपूत, संजय सोनवणे, दत्तू राजपूत, सुनीता गोर्डे, सुवर्णा गायकवाड आदींसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

M
SMOLENS
Invites I
Recognized b
UNIVERSITY -
Moscow, Very hi
Indian students (

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ३४ । वर्ष ४७ वे । मंगळवार, २२ फेब्रुवारी २०२२ । पाने १२

# शिवजयंतीसाठी केलवडच्या श्री. नरेश राऊत फाउंडेशनची २५ हजारांची मदत



केलवडच्या श्री. नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने शिवजयंतीला २५ हजारांचा धनादेश समाजोपयोगी उपक्रमांसाठी देताना सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे.

राहाता (तालुका प्रतिनिधी)– शिवजयंती साठी विविध उपक्रम राबविण्यासाठी तसेच जयंती सोहळा उत्सहात पार पडावा यासाठी केलवडच्या श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने केलवडच्या आयोध्या युवा प्रतिष्ठानला २५ हजार रुपयांची मदत दिली आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची १९ फेब्रुवारीला जयंती होती. केलवड येथे छत्रपती शिवरायांचा अश्वारुढ पुतळा आहे. दरवर्षी केलवडला शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदाही शिवजयंती उत्सहात साजरी व्हावी, विविध उपक्रम मंडळाने राबवावेत म्हणून श्री नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी आयोध्या युवा प्रतिष्ठानला २५ हजारांचा धनादेश दिला आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा उपसरपंच विशाल वाघे, सचिव अंजाबापू जटाड यांचेकडे सुपूर्द केला. यावेळी दीपक वाघे, राहुल शेपाळ, हर्षल शेपाळ, हर्षल वाघे, साईनाथ घोरपडे, रामनाथ आदक, अभिजीत बरवट, दिपक आदक, यांचेसह श्री नरेश राऊत फाउंडेशनचे सेवक वृंद उपस्थित होते.

याप्रसंगी आयोध्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष, उपसरपंच विशाल वाघे यांनी श्री नरेश राऊत फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत, फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांचे आभार मानले. यावेळी श्री नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे म्हणाले, फाउंडेशन सामाजिक कार्यात अग्रेसर असते, शिवजयंती निमित्त विविध उपक्रम राबवून शिवरायांच्या कार्याची महती नविन पिढीला अवगत व्हावी, शिवराय हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे. शिवरायांच्या कार्याची, त्यांच्या कारभाराची माहिती नविन पिढीला समजावी अशी अपेक्षा प्रा. गोर्डे यांनी व्यक्त केली.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक ८३ । वर्ष ४७ वे । बुधवार, १३ एप्रिल २०२२ । पाने १२

# नरेश राऊत फाऊंडेशनची डॉ. आंबेडकर जयंतीसाठी मदत

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता तालुक्यातील केलवड येथील श्री नरेश राऊत फाऊंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त केलवड येथील जयंती साठी २१ हजाराची मदत दिली आहे.

सामाजिक क्षेत्रात सतत अग्रेसर असलेल्या या फौंडेशनने नुकतेच महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्तही मदत दिली होती. आताही डॉ. आंबेडकर यांच्या जयंती निमित्त ही मदत दिली आहे.

२१ हजार रूपयांची देणगी सचिव प्रा. गोर्डे यांनी नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृती समिती केलवड व ब्लु डायमंड ग्रुप केलवड व ग्रामस्थ संजय गोडगे, विशाल वाघे, आंजाबाप्पु जटाड, संजय सोनवणे, दत्तु गोडगे, रविंद्र सोनवणे, बबन गोडगे, सागर सोनवणे, संदीप गोडगे, संतोष गोडगे, साहेबराव सोनवणे, राहुल सोनवणे यांचेकडे सुपूर्द केली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी २१ हजाराची देणगी देतांना नरेश राउत फौंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

अंक ९६ | वर्ष ४७ वे | मंगळवार, २६ एप्रिल २०२२ | पाने १२

# नरेश राऊत फाउंडेशनची काकडीत अल्पदरात वैद्यकिय सुविधा

राहाता (तालुका प्रतिनिधी)– तालुक्यातील केलवड येथील श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने काकडी येथे अल्पदरात वैद्यकिय सुविधा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष उद्योजक नरेश राऊत यांच्या हस्ते दवाखाना सुरू करण्यात आला, अशी माहिती फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी दिली.

नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने अनेक उपक्रम राबविले गेले आहेत. सामाजिक उपक्रम म्हणून केलवडसह अन्य ठिकाणी जिरायती टापूतील रुग्णांना अल्पदरात वैद्यकिय सुविधा मिळावी या हेतूने ओपीडी सुरू करण्यात आल्या आहेत. नुकतेच काकडी येथेही फाउंडेशनने दवाखाना सुरू केला आहे. या दवाखान्यात अल्पदरात वैद्यकिय सुविधा मिळणार आहेत. काकडी येथील या वैद्यकिय सेवेमुळे डांगेवाडी, मल्हारवाडी, मनेगाव या आजुबाजुंच्या गावातील गरजुंची सोय होणार आहे. अत्यंत अल्पदरात ही सोय करण्यात आल्याचे प्रा. गोर्डे यांनी सांगितले.

याप्रसंगी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी प्रास्तविक करत नरेश राऊत फाउंडेशन राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. तसेच उद्योजक नरेश राऊत यांचे मोठे आर्थिक योगदान या सामाजिक कार्यासाठी असते. त्यांच्या दानातून विविध योजना जिरायती टापूतील या गावांमध्ये राबविता येतात. या विविध उपक्रमांसाठी सर्वांचे सहकार्य मिळते म्हणूनच या योजना राबविण्यासाठी उत्साह येतो, असेही प्रा. गोर्डे म्हणाले.




**नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने काकडी येथे अल्पदरात ओपीडी सुरु केली. त्याप्रसंगी उद्योजक नरेश राऊत, सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे, प्रभाकर गुंजाळ आदी.**

### समाजकार्यातून आनंदच!

▶ उद्योजक नरेश राऊत म्हणाले, सामाजिक कार्यात मोठा आनंद आहे. गेल्या १०–११ वर्षांत प्रा. लक्ष्मण गोर्डे यांच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविता आले. समाजासाठी आपण काही देणे लागतो, समाजासाठी दिल्याने प्रत्येक माणसाची सामाजिक उंची वाढते व भरभराटीही होते. सामाजिक उपक्रम फाउंडेशनसारखे ज्यांना शक्य आहे, त्यांनी राबवावेत.

यावेळी राजमुद्रा प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रभाकर गुंजाळ, मल्हारवाडीचे पोलीस पाटील गुंजाळ, मुख्याध्यापक गुडगे, कल्याणराव सोनवणे, पावलस सोनवणे, अरुण सोनवणे, नवनाथ दिघे, अशोक गुंजाळ, भारत रानडे, सरपंच रवींद्र गुंजाळ, चंद्रभान गुंजाळ, रावसाहेब गुंजाळ, वाल्मिकराव बडे, आरपीआयच्या वैशालीताई सोनवणे, संजय गुंजाळ, शंकर दिघे, नानासाहेब गुंजाळ, अनिल गुंजाळ, फाउंडेशनचे सर्व सेवकवृंद तसेच वैद्यकिय अधिकारी डॉ. होन आदी यावेळी उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
। अंक २४१। वर्ष ४७ वे। गुरुवार, २२ सप्टेंबर २०२२। पाने १०+८



# नरेश राऊत फाउंडेशनकडून मुलींच्या वसतिगृहाला २५ लाखाची मदत



राहाता (तालुका प्रतिनिधी)– नरेश राऊत फाउंडेशन, केलवड या सेवाभावी संस्थेकडून पालघर जिल्ह्यातील सोमवंशी क्षत्रीय समाजोन्नती संघ फंड ट्रस्ट, मुख्यालय, केळवे या संस्थेस विद्यार्थिनी वसतिगृहासाठी २५ लाख रुपयांची देणगी देण्यात आली.

नरेश राऊत फाउंडेशन हे गेल्या १० वर्षांपासून केलवड या जिरायती भागातील गावात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यक्रमात अग्रभागी आहे. फाउंडेशनचे अध्यक्ष नरेश राऊत यांच्या माध्यमातून फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी विविध ठिकाणी गरजुंना मदत, विविध शाळांना मदती, मोफत संगणक शिक्षण, माफक दरात वैद्यकीय उपचार आदी महत्त्वपूर्ण क्षेत्रांत उल्लेखनीय काम केले आहे. प्रत्येक विधायक कामामध्ये सतत ही संस्था मदत करते.

फाउंडेशनने नुकतेच सोमवंशी क्षत्रीय समाजोन्नती संघ फंड ट्रस्ट, मुख्यालय, केळवे, जि. पालघर यांच्या अधिनस्त सुरू असलेल्या विद्यार्थिनी वसतिगृहास २५ लाखांची आर्थिक मदत केली आहे. नवीन विद्यार्थिनी वसतिगृह या संस्थेस बांधवायचे आहे. संस्थेने मुलींची गैरसोय ओळखून या संस्थेस २५ लाखांचा धनादेश संस्थेचे मुख्य विश्वस्त डॉ. सदानंद अनंत कवळी यांना प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नरेश राऊत, सचिव प्रा.लक्ष्मण गोर्डे, संचालक निखिल राऊत, अभिजीत राऊत, पल्लवी राऊत, मौसमी राऊत व संस्थेच्या उपाध्यक्ष मिना राऊत व पदाधिकारी उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा
# सार्वमत
। अंक २२ । वर्ष ४७ वे । गुरुवार, १० फेब्रुवारी २०२२ । पाने १०+भविष्यवेध



# निरोगी आरोग्यासाठी व्यायामाची गरज
## प्रा. लक्ष्मण गोर्डे: नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी



नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने केलवड प्राथमिक शाळेत मोफत तपासणी शिबिरप्रसंगी मान्यवर.

**राहाता (तालुका प्रतिनिधी)** – निरोगी आरोग्यासाठी व्यायामाची गरज असून बालवयातच व्यायामाचे धडे घेतल्यास आरोग्याच्या समस्या फारशा भेडसावत नाहीत, असे प्रतिपादन नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी केले.

जिल्हा परिषद शाळा केलवड येथे श्री नरेश राऊत फाउंडेशनमार्फत मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रा. लक्ष्मण गोर्डे बोलत होते. यावेळी केलवड गावचे सरपंच दीपक कांदळकर, उपसरपंच विशाल वाघे, स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष आप्पासाहेब सोनवणे, विद्यालयाचे स्कूल कमिटीचे अध्यक्ष पी. डी. गमे, शाळेचे मुख्याध्यापक अण्णासाहेब गुंजाळ, डॉक्टर होन, डॉक्टर सौ. गुंजाळ, फाउंडेशनचे सर्व सहकारी व केलवडचे पोलीस पाटील सुरेश गमे पाटील, नवनाथ रजपूत, वाघे, योगेश गोसावी व ग्रामस्थ उपस्थित होते.

करोना सारख्या महामारीत ज्यांना व्यायामाची सवय होती. त्यांची ऑक्सिजन लेव्हल मेंटेन राहिली. किंबहूना त्यांना श्वसनास फारसा त्रास झाला नसल्याची उदाहरणे आहेत, असे सांगून प्रा. गोर्डे म्हणाले, श्री नरेश राउत फाउंडेशनच्या माध्यमातून केलवड, आडगाव भागात अल्पदरात वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली. सध्या वातावरणात मोठे बदल होत असल्याने अनेक आजार बळावले आहेत. करोनामुळे शाळा बंद होत्या. आता सुरू झाल्यातर विविध आजाराने अनेक जण बेजार असल्याने विद्यार्थ्यांनाही पुन्हा आजाराचा सामना करण्याची वेळ येऊ नये म्हणून विद्यार्थ्यांच्या मोफत आरोग्य तपासणीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यात ऑक्सिजन लेव्हल, ब्लड प्रेशर, तापमान, व अन्य तपासण्या करण्यात येत आहेत. उद्योजक नरेश राउत यांचे मार्गदर्शन आणि मोलाची साथ या कामात मिळत आहे. विद्यार्थ्यांना आरोग्य तपासणी बरोबरच खाऊचेही वाटप केले जात असल्याचे प्रा. गोर्डे यांनी सांगितले.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
अंक ६० । वर्ष ४७ वे । सोमवार, २१ मार्च २०२२ । पाने १२

# नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने मंदिराला देणगी



**केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्या वतीने खडकेवाके येथील साईबाबा मंदिराला ५१ हजारांची मदत दिली.**

**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– केलवड येथील नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने खडकेवाके येथील साईबाबा मंदिराला ५१ हजारांची मदत दिली आहे. खडकेवाके येथील साईबाबा मंदिर, दत्त मंदिर, गणपती मंदिर, जीर्णोद्धारसाठी नरेश राऊत फाउंडेशन कडून ५१ हजार रुपये देणगी देण्यात आली आहे. यावेळी संस्थेचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी ही देणगी खडकेवाके गावचे सरपंच सचिन मुरादे, जालिंदर मुरादे, पोलीस पाटील रावसाहेब लावरे, केलवडचे सरपंच दीपक कांदळकर, उपसरपंच विशाल वाघे, दीपक गायकवाड, बी. टी. मुरादे, नरेंद्र मुरादे, सदस्य जालिंदर मुरादे, सुदाम लावरे, बापूसाहेब मुरादे, योगेश गोसावी आदींच्या उपस्थितीत दिली.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
। अंक १२६ । वर्ष ४८ वे । रविवार, २८ मे २०२३ । पाने १०+८

# विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी शालेय पातळीपासुनच करावी

## ■ प्रा. लक्ष्मण गोर्डे : नरेश राऊत फौंडेशनच्यावतीने विद्यार्थ्यांचा सत्कार

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांनी आपल्या करियरची निवड करतांना आपली आवड, निवड पाहावी, स्पर्धा परीक्षांची तयारी शालेय, महाविद्यालयीन पातळीपासुनच करावी, असे प्रतिपादन नरेश राऊत फौंडेशनचे सेक्रटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी केले.



नरेश राउत फौंडेशनच्या वतीने इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन शिबिराप्रसंगी प्रा. गोर्डे बोलत होते. यावेळी पोलिस पाटील सुरेश गमे, मुख्याध्यापक महेंद्र जेजुरकर, सरपंच दिपकराव कांदळकर, उपसरपंच विशाल वाघे, सोसायटीचे अध्यक्ष बाळासाहेब गमे, संदीप नवले, योगेश गोसावी, सचिन वाघे, यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थीनी, फौंडेशनचे सर्व स्टॉफ उपस्थित होता.

नरेश राऊत फौंडेशन मागील दहा वर्षापासून ग्रामीण भागातील विविध समस्यांवर कार्य करत असल्याचे सांगत प्रा. गोर्डे पुढे म्हणाले, सामाजिक जाणीवेतून गावातील आरोग्य, संगणकीय शिक्षण आणि जलसंधारण या मुलभूत समस्यांवर विविध कार्यक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांनी सर्वसाधारणपणे करिअर निवडताना दोन निकष विद्यार्थी व पालकांसमोर असतात. एक म्हणजे परीक्षेत मिळवलेले गुण व सामाजिक प्रतिष्ठा. केवळ परीक्षेतील गुणांनुसार करिअर ठरवणे तितकेसे योग्य नसते.

पोलिस पाटील सुरेश गमे म्हणाले, पुढे कोणतेही क्षेत्र निवडतांना त्यात यशस्वी होण्यासाठी कष्ट करण्याची तयारी ठेवावी, आपण एमपीएससी च्या परीक्षा दिल्या होत्या, परंतु आपल्याला व्यावसायात रस वाटला. गुणवत्ता असेल तरच यश मिळेल असे नाही. कमी शिक्षणावालेही विविध क्षेत्रात आघाडीवर आहेत. त्यामुळे कमी गुण मिळाले म्हणून खचून जावू नका.

यावेळी मुख्याध्यापक महेंद्र जेजुरकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. संगणक विभाग प्रमुख प्रा. योगेश गोसावी यांनी सूत्रसंचालन केले. तर कांचन घोरपडे यांनी आभार मानले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक १४८ । वर्ष ४८ वे । सोमवार, १९ जून २०२३ । पाने १२

# नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने पंढरपूर दिंडीस आर्थिक मदत



**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– राहाता तालुक्यातील केलवड येथील श्री नरेश राऊत फाऊंडेशनच्यावतीने केलवड ते पंढरपूर जाणाऱ्या दिंडीस ११ हजार रुपयांची देणगी दिली आहे. तर आयोध्या युवा प्रतिष्ठानच्यावतीने ३ हजार रुपयांची देणगी दिली आहे.

केलवड गावात सद्गुरू गंगागिरी महाराज, ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांचे निःस्सीम भक्त आहेत. दरवर्षी केलवड ते पंढरपूर अशी पायी दिंडी आषाढी एकादशीला पंढरपूरला जात असते. यंदाही दिंडीचे प्रयोजन असल्याने भाविकांना मदत म्हणून श्री नरेश राउत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी केलवड ते पंढरपूर या दिंडीसाठी मदत दिली आहे. नुकतेच केलवड येथे हनुमान मंदिराच्या प्रांगणात दिंडीतील प्रमुख मंडळींकडे ही मदत त्यांनी सुपूर्द केली. तसेच सामाजिक कार्यात सदा अग्रेसर राहिलेल्या आयोध्या युवा प्रतिष्ठानच्यावतीने उपसरपंच विशाल वाघे यांनीही दिडीतील भाविकांना मदत म्हणून तीन हजार रुपयांची मदत त्यांनी केली. याप्रसंगी सरपंच दीपक कांदळकर, उपसरपंच विशाल वाघे, अंजाबापू जटाड, ग्रामपंचायत सदस्य रामनाथ गमे, ग्रामस्थ, दिंडीतील पदाधिकारी उपस्थित होते.

नवी आशा नवी दिशा
सार्वमत
। अंक १९६ । वर्ष ४८ वे । शनिवार, ५ ऑगस्ट २०२३ । पाने १२

# ग्रामीण विद्यार्थ्यांना दिशा मिळाली की ते यशस्वी होतात- प्रा. गोर्डे

## नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने डॉ. ठोंबरे हिचा सत्कार

**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– केलवड ही गुणवंताची खाण आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन मिळाले की ते जीवनात यशस्वी होतात, असे प्रतिपादन श्री नरेश राऊत फाउंडेशनचे सचिव प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी केले.

केलवड येथील डॉ. दीपांजली लक्ष्मण ठोंबरे ही एमबीबीएस, एम.एस. स्त्रिरोगतज्ञ झाल्याबद्दल तिचा श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने सुनीता लक्ष्मण गोर्डे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी प्रा. गोर्डे बोलत होते. यावेळी लक्ष्मण ठोंबरे, उर्मिला ठोंबरे, बाबासाहेब ठोंबरे, केलवड सोसायटीचे सचिव सुनील गमे, सचिन वाघे, प्रा. लुटे, नवनाथ रजपूत यांचेसह श्री नरेश राऊत फाउंडेशनचे कर्मचारी उपस्थित होते.

प्रा. गोर्डे म्हणाले, डॉ. दीपांजली ही केलवड येथील सर्वसामान्य कुटुंबातील मुलगी आहे. लक्ष्मण ठोंबरे यांची



आर्थिक परिस्थिती संघर्षमय असताना त्यांनी आपल्या मुलीला एमबीबीएस व एमएस स्त्रिरोगतज्ञ हे उच्च शिक्षण दिले. डॉ. दीपांजली हिने दहावीनंतर डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले होते. तिने ते जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर पूर्ण केले. तिचा आदर्श ग्रामीण भागातील मुलींना महत्त्वाचा ठरणारा आहे. उच्च शिक्षण घेताना कष्ट करावे लागतात. अभ्यासू वृत्ती लागते आणि त्या विषयाची आवड लागते. ग्रामीण भागातील मुलीही शहरी मुलींप्रमाणे आपले करिअर घडवू शकतात, असेही प्रा. गोर्डे म्हणाले.

सुनील गमे म्हणाले, केलवड येथील ठोंबरे कुटुंबातील डॉ. दिपांजलीने मोठे स्वप्न पाहिले होते. ते तिने पूर्ण केले. अशा यशस्वी मुलीची दखल नरेश राऊत फाउंडेशनने घेतली. ही सुध्दा अभिमानाची बाब आहे. प्रा. गोर्डे यांनी गावातील शाळेसाठी मदतीचा हात दिला आहे, असेही श्री. गमे म्हणाले. यावेळी डॉ. दीपांजली यांनी आपले विचार मांडत आपले आई-वडिलांनी व कुटुंबियांनी आपल्याला उच्च शिक्षण दिले. आपणही जिद्द ठेवली व यश मिळविले. आभार बाबासाहेब ठोंबरे यांनी मानले.

नवी आशा नवी दिशा

सार्वमत

। अंक २०९ । वर्ष ४८ वे । शनिवार, १९ ऑगस्ट २०२३ । पाने १२

# नरेश राऊत फाउंडेशनकडून स्वातंत्र्यदिनी विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण



**राहाता (तालुका प्रतिनिधी)** – तालुक्यातील केलवड येथील श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांना खाऊचे तसेच बक्षिसांचे वितरण करण्यात आले. तसेच अकोले तालुक्यातील अदिवासी भागातील मवेशी येथील शाळेला विद्यार्थ्यांच्या पिण्याच्या पाण्यासाठी ३० हजार रुपयांची मदतही करण्यात आली.

राष्ट्रीय सणाला दर वर्षी श्री नरेश राऊत फाउंडेशन सेवाभावीवृत्तीने शाळेतील १ ली ते १० पर्यंतच्या विद्यार्थ्यांना खाऊ वाटप गेल्या दहा वर्षांपासून करत आले आहेत. केलवड पंचक्रोशीतील प्राथमिक तसेच माध्यमिक शाळा तसेच वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. केलवड येथील जिल्हा परिषद शाळा, राऊत वस्ती शाळा, गमे गोठा शाळा, तसेच ज्ञानेश्वर विद्यालय केलवड या शाळांचा समावेश आहे. या शाळांमधील १ ली ते १० वी पर्यंत वर्गात प्रथम तीन येणारांना ते रोख स्वरुपाची बक्षीसे दर वर्षी देतात. याही वर्षी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्सहान मिळावे म्हणून बक्षीसांचे वितरण केले आहे. खाऊ आणि बक्षीसे यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर आनंद दिसून आला. केलवड येथील ज्ञानेश्वर विद्यालयातील ३३ विद्यार्थ्यांना रोख स्वरुपाची बक्षीसे देण्यात आली.

अकोले तालुक्यातील आदिवासी भागातील मवेशी येथील श्री समर्थ विद्यालय मवेशी या विद्यालयातील ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना खाऊचे तसेच वर्गात पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख स्वरुपाची बक्षीसे देण्यात आली. तसेच अदिवासी विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी श्री नरेश राऊत फाउंडेशनच्यावतीने ३० हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला. विद्यालयाच्या प्रांगणात विंधन विहीर घेऊन त्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय केली जाणार आहे, अशी माहिती श्री नरेश राऊत फाउंडेशनचे सेक्रेटरी प्रा. लक्ष्मण गोर्डे यांनी यावेळी दिली.